21-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
VVK/ AKN/ MMP/ 13:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**पुण्यातील बालभारतीच्या दैनंदिन व्यवहारात पारदर्शकता आणण्याबाबत**

**(1) * १२६४९ ॲड.जयदेव गायकवाड : दिनांक ३० जुलै, २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक २३२७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुण्यातील बालभारतीच्या दैनंदिन व्यवहारात पारदर्शकता आणण्यासाठी पाच वर्षापूर्वी दहा कोटी खर्च करुन सॅप यंत्रणा खरेदी करण्यात आली असून सदर यंत्रणेचा वापर करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर यंत्रणेचा वापर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(2), (3) व (४) बालभारतीच्या दैनंदिन व्यवहारात पारदर्शकता आणण्यासाठी खरेदी करण्यात आलेली सॅप यंत्रणा वापरण्यासाठी अद्ययावत करणे आवश्यक असून याबाबत कार्यवाही सुरु आहे.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, पुण्यातील बालभारती मंडळामध्ये 5 वर्षापूर्वी 10 कोटी रुपये खर्च करुन सॅप यंत्रणा खरेदी करण्यात आली होती. ती यंत्रणा वापराविना पडून आहे. बालभारती मंडळाचा कारभार पारदर्शी असावा यासाठी सॅप यंत्रणा खरेदी केली होती. सॅप यंत्रणा पडून आहे याचा अर्थ सरकारला पारदर्शी कारभार करायचा नाही काय ? ही यंत्रणा खरेदी करुन पाच वर्षे झाली आहेत, त्यामुळे ती केव्हा अद्ययावत करण्यात येणार आहे. लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "सॅप यंत्रणा अद्ययावत करणे आवश्यक असून याबाबत कार्यवाही सुरु आहे." ही यंत्रणा अद्ययावत करण्यासाठी शासनाला किती कालावधी लागणार आहे व शासनाला पारदर्शी कारभार करायचा आहे काय ? याचा खुलासा मंत्री महोदय करतील काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांनी जो प्रश्न विचारला त्यानुसार गेल्या पाच वर्षापूर्वी 10 कोटी रुपये खर्च करुन सॅप यंत्रणा खरेदी केली होती. त्या सॅप यंत्रणेचे किंवा इलेक्ट्रानिक यंत्रणेचे लायसन्स पाच वर्षाचे असते, सदर सॅपचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लायसन्स आता संपलेले आहे. ती यंत्रणा सुरु करावयाची असेल तर त्या यंत्रणाच्या लायसन्सचे

....2...



ता.प्र.क्र.12649...

श्री.विनोद तावडे...

नुतनीकरण करावे लागेल व त्यासाठी आणखी तेवढाचा निधी खर्च करावा लागेल. सॅप यंत्रणा न वापरता बालभारती मंडळाच्या कारभारात पारदर्शीपणा आणण्यासाठी या खात्याचा कारभार माझ्याकडे आल्यानंतर गेल्या वर्षापासून वेब पोर्टलच्या माध्यमातून योजना राबविण्यात येत आहेत. सर्व शिक्षा अभियानातून पुस्तकांची मागणी वेब पोर्टलवर नोंदविण्यात येते, ती माहिती सर्वांना दिसते. बालभारती मंडळाच्या व्यवहारात गेल्या वर्षापासून पारदर्शकता मेन्टेन केलेली आहे. गेल्या पाच वर्षात सॅप यंत्रणेचा वापर व्हायला पाहिजे होता तो झालेला नाही याची काय कारणे आहेत ती तपासण्यात येतील. अशी तपासणी करण्याच्या सूचना विभागाला देण्यात आल्या आहेत, त्या पध्दतीने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, सॅप यंत्रणा वापराविना बंद आहे, ती पुन्हा सुरु करायची तर परवाना नुतनीकरणासाठी साधारणपणे तेवढाच खर्च येईल. वेब पोर्टलच्या माध्यमातून बालभारती मंडळाचा कारभार मागील वर्षापासून सुरु केलेला आहे. मला असे वाटते की, सॅप यंत्रणा बसविण्यात आली होती. आता कोणतेही संगणकीय माध्यम वापरताना त्याची आज असलेली उपयुक्ता दोन तीन वर्षात संपुष्ठात येते. ती यंत्रणा निकामी होते. सदर यंत्रणा निकामी झाल्यामुळे वेब पोर्टलची व्यवस्था केली असेल तर सॅप यंत्रणा न बसविल्यामुळे बालभारती मंडळाच्या कारभारात कोणत्या उणिवा राहिल्या होत्या. गेल्या वर्षभरात ज्या सुधारणा केल्या त्यामुळे कोणता रचनात्मक बदल बालभारती मंडळात घडून आला, याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा. कारण बालभारती हा विषय वेगवेगळ्या माध्यमातून कायम चर्चेत राहिलेला आहे, त्याची कारणे अनेक आहेत, त्या तपशीलात मी जाऊ इच्छित नाही. वेब पोर्टलच्या माध्यमातून जी कामे करायची होती, त्यामध्ये गुणात्मकदृष्ट्या बालभारती मंडळाच्या कामात सॅप यंत्रणेशिवाय काय काय बदल घडून आले आहेत ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. सॅप यंत्रणे ऐवजी गेल्या वर्षी ई-बालभारती डॉट इन हे पोर्टल सुरु केले, या मार्फत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

21-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-3

VVK/ AKN/ MMP/ 13:00

ता.प्र.क्र.12649...

श्री.विनोद तावडे...

गेल्या वर्षापासून बालभारती मंडळाने सर्व पुस्तके व ईबुक उपलब्ध करुन दिली आहेत. पुस्तकांच्या मागण्या ऑनलाईन येतात, पैसे भरुन पुस्तके घरपोच मिळतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे, व्यापाऱ्यांना ऑनलाईन मागण्या नोंदविता येतात व ऑनलाईन पैसे भरता येतात. त्याच बरोबर या पोर्टलच्या माध्यमातून सर्व शिक्षा अभियानातून सर्व जिल्ह्यांच्या मागण्या नोंदविणे, पुरवठा नियोजनचा टाईमटेबल तयार करणे सोईचे होते. या सर्व कामांमध्ये पारदर्शकता असते, कोणी व काठे नोंदणी केली, पुस्तके कोठे पोहचली आहेत, कोणत्या तारखेला पोहचली ही सर्व प्रक्रिया या पोर्टलच्या माध्यमातून पारदर्शकपणे करण्यात येते. यामध्ये छपाई व पुरवठ्याचे व्यवस्थापन सर्वांना ऑनलाईन पाहता येते.

श्री.संदिप बजोरिया : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे 10 कोटी रुपयांना खरेदी केलेली सॅप यंत्रणा वापराविना पडून राहिली आहे. ही यंत्रणा पडून राहण्याची कारणे काय आहेत ? ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी ज्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे काय ? कारवाई करण्यात आली नसेल तर ती केंव्हा करण्यात येईल ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, 22 जून 2008 रोजी तत्कालीन शिक्षणमंत्री यांच्या कार्यालयातून मे.एन्ड्राईट इन्फोटेक पुणे या संस्थेबरोबर सॅप यंत्रणेचा प्रस्ताव तयार करण्याचे आदेश बालभारती मंडळास प्राप्त झाले होते. त्यानंतर अभ्यास गट नेमला गेला, त्यानंतर बालभारती मंडळाच्या ठराव क्रमांक 3969 दिनांक 04/10/2008 अन्वये मंडळात सॅपकरण करण्यासाठी ओमेगा सिस्टीम नाशिक, मे.एन्ड्राईट इन्फोटेक पुणे यांच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली होती. ही सॅप प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी तेथील कर्मचारी संघटनेने विरोध दर्शविला, त्यांनी सांगितले की, हे आम्ही करणार नाही, त्यानंतर तत्कालीन मंत्री महोदय व मंडळांच्या अधिकाऱ्यांकडून कर्मचाऱ्यांना समजविण्याचा प्रयत्न झाला होता. त्यांना प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या सर्व कालावधीत वेळ गेल्यामुळे पाच वर्षात सॅप यंत्रणेचा परवाना समाप्त झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ती यंत्रणा त्यानंतर वापरता येण्यासारखी नव्हती. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे

...4..



ता.प्र.क्र.12649...

श्री.विनोद तावडे...

शासनाचे10 कोटी रुपये त्या अर्थाने वाया गेले आहेत. यासाठी कोण जबाबदार आहे, याचा अभ्यास करावा लागेल, या विषयाची सविस्तर चौकशी करुन...

श्री.संदिप बाजोरिया : सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी एसीबी मार्फत करण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या विषयाबाबत विभागीय चौकशी करुन काय तथ्य आहे, ते पाहिल्यानंतर पुढील योग्य कारवाई करण्यात येईल. जनतेचा पैसा वाया जाणार नाही. पारदर्शक कारभारासाठी सॅप प्रणाली स्वीकारल्यानंतर कर्मचारी संघटनेने अडवणुकीची भूमिका घेताना ती भूमिका योग्य होती की, अयोग्य होती, ही बाब तपासावी लागेल, एखादे वेळेस कर्मचाऱ्यांची भूमिका योग्य देखील असू शकते, याबाबत चौकशी करावी लागेल.

**सभापती** : ठीक आहे, मंत्री महोदयांनी निश्चित कालावधीत चौकशी करावी.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी व्यवसाय सुरु केला तेव्हा मी बालभारती मंडळामध्ये जात होतो, बालभारतीच्या 40 लाख पुस्तकांच्या छपाईची कामे मी करीत होतो. बालभारती मधील कर्मचारी व अधिकारी अरेरावी व दादागिरी करतात. याबाबत मी स्वतः अनुभव घेतला आहे. चौकशी करण्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आहे, माझी अशी मागणी आहे की, पुस्तक छपाईची कामे किती मुद्रणालयाला देण्यात येतात, एका वर्षात किती पुस्तके छापण्यात येतात. पुस्तकातील पानांचा दर्जा सुधारण्यासाठी मंत्री महोदय काय प्रयत्न करणार आहेत, पुस्तकांच्या पेपरचा दर्जा आज 60 जीसीएमचा आहे, तो 80 जीसीएमपर्यंत नेण्याचा आदेश राज्य सरकार बालभारती मंडळास देईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य त्या काळात बालभारतीमध्ये जात होते, तेव्हा पुस्तकाचा दर्जा तसा असेल, आता बालभारती मध्ये ते गेले तर त्यांना चांगला अनुभव मिळेल अशी मी खात्री देतो. आपण जो प्रश्न केला त्याबाबत केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियानातून निधी मिळतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.११६४९.....

श्री.विनोद तावडे.....

त्या निधीमधून ज्या विद्यार्थीवर्गाला जितकी पुस्तके आपल्याला द्यायची आहेत त्यास अनुसरुन पेपर क्वॉलिटीचा विचार नक्की केला, तो पेपर टिकावू असला पाहिजे. माननीय सदस्यांसारख्या व्यक्तीने पेपर क्वॉलिटीचा विचार केला पाहिजे, त्या माध्यमातून जे काही शिकविले जाते त्याच्या क्वॉलिटीमध्ये सुध्दा निश्चित सुधार करीत आहोत. बालभारतीच्या शैक्षणिक गुणवत्तेवर जास्त भर दिला पाहिजे असे माझे मत आहे. माननीय सदस्य म्हणतात तसे पेपर क्वॉलिटी, पुस्तक क्वॉलिटी याबाबत पोर्टलच्या माध्यमातून पारदर्शकता आल्यामुळे पैसे वाचतील. त्यातील पेपर क्वॉलिटी आणि बायडिंगबाबत पॉझिटिव्ह विचार करीत आहोत.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यशंवतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्यावतीने अकोला येथे घेण्यात आलेल्या पत्रकारिता पदविका अभ्यासक्रमाबाबत

(२) * ११४२६ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशंवतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्यावतीने अकोला येथे घेण्यात आलेल्या पत्रकारिता पदविका अभ्यासक्रमाच्या परिक्षेदरम्यान एका परिक्षा केंद्रावर आधी चुकीची प्रश्नपत्रिका आणि नंतर दोनदा चुकीच्या निकालामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे १८ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, तद्नुषंगाने या विद्यार्थ्यांची फेरपरिक्षा घेण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रवींद्र वायकर, श्री. विनोद तावडे यांच्याकरिता : (१) हे अंशत: खरे आहे. परीक्षा केंद्रावर परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांनी निवडलेला विषय JOU १०२ ऐवजी JOU १०४ या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचे वाटप झाल्याची बाब लगेच लक्षात आल्यावर विद्यार्थ्यांना JOU १०२ या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचे वाटप करुन पेपर लिहीण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या व त्या दरम्यान वाया गेलेला वेळ अधिक वेळ देऊन भरुन देण्यात आलेला आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडून जी परीक्षा घेण्यात आली त्या संदर्भात अकोला परीक्षा केंद्रावर वेगळ्याच विषयाची प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्या परीक्षेकरिता जेओयू १०२ ऐवजी जेओयू १०४ या विषयाची प्रश्नपत्रिका वाटप करण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ उडाला. शासनाने ही बाब अंशत: खरी आहे असे उत्तर दिलेले आहे. मात्र या प्रकरणाची चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असेही म्हटले आहे. जर प्रकरणाची वस्तुस्थिती अंशत: खरी असेल तर चौकशी करण्यास हरकत नव्हती. मात्र शासनाकडून चुकीचे उत्तर देऊन खरी माहिती दडविण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे दिसून येते. प्रत्यक्षात सायंकाळी ६.०० वाजता प्रश्नपत्रिका देण्यात आली होती. मात्र उत्तराचे अवलोकन केले असता दोन तासात दुसरी प्रश्नपत्रिका दिली गेली असावी असे वाटते, परंतु प्रत्यक्षात तसे घडलेले नाही. परीक्षेच्या निकालामध्ये विद्यार्थ्यांना गैरहजर दाखविण्यात आले. मंत्री महोदय या विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देतील काय?

....३....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.११४२६...

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून डिप्लोमा इन जर्नालिझम या विषयाची परीक्षा ११ ते १४ ,........ २०१५ या कालावधीत ४६ केंद्रावर घेण्यात आली होती. ही परीक्षा घेत असताना ११ तारखेची परीक्षा निर्विवादपणे पार पडली. १२ तारखेच्या परीक्षेकरिता कोड क्रमांक जेओयू १०२ 'कार्य व पत्रकारांची जबाबदारी' ऐवजी जेओयू १०४ क्रमांकाची प्रश्नपत्रिका वितरित करण्यात आली. ही गोष्ट लक्षात आल्यानंतर त्यांनी ताबडतोब कोड क्रमांक जेओयू १०२ ची प्रश्नपत्रिका मागवून घेण्यात आली व ती प्रिंट करून विद्यार्थ्यांना देण्यात आली. परीक्षा सुरळीतपणे पार पडली. अकोला येथील केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली त्या ठिकाणी नोंदणीकृत विद्यार्थी ३२ असले तरी प्रत्यक्षात १७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. १७ पैकी १५ विद्यार्थ्यांनी कोड क्रमांक १०२ ची प्रश्नपत्रिका घेतली नाही. कारण त्यांचे म्हणणे होते की, आम्ही कोड क्रमांक १०४ ची प्रश्नपत्रिका ५० टक्के सोडविली आहे. आता आम्ही काही बदल करणार नाही. त्यांनी सोडविलेली प्रश्नपत्रिका तपासण्यात आली त्यामध्ये १७ पैकी १ विद्यार्थी उत्तीर्ण झाला, २ विद्यार्थ्यांनी मूळ प्रश्नपत्रिका घेतली ते दोन्ही विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, दहावी व बारावीच्या परीक्षेचे स्थळ बदलणे, विषय बदलणे, प्रश्नपत्रिका बदलल्या जाणे यामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गोंधळ निर्माण होतो. या परीक्षांच्या संदर्भात चुकीचे काही घडू नये म्हणून कठोर प्रयत्न केले जातील काय?

श्री. रवींद्र वायकर : सभापती महोदय, नक्की प्रयत्न केले जातील. ज्यावेळी विद्यार्थी परीक्षा केंद्रावर जातात त्यावेळी प्रश्नपत्रिकेबाबत त्यांनी अभ्यास केलेला असल्यामुळे त्यांच्या डोक्यात उत्तरे तयार असतात. परंतु दुसऱ्याच विषयाची प्रश्नपत्रिका दिली गेली तर ते गोंधळून जातात. काय लिहावे, कसे लिहावे याबाबत संभ्रम निर्माण होतो. म्हणून याबाबत कठोर कारवाई करू

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडे इतर विद्यापीठांपेक्षा विद्यार्थी संख्या किती तरी पटीने जास्त आहे. तेथील सन्माननीय कुलगुरूंनी जाहीर केले की, यापुढे परीक्षा नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन पध्दतीने घेतल्या जातील. या

...४..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.११४२६....

श्री.हेमंत टकले....

सगळ्या व्यवस्थेचा विचार करीत असताना अकोला येथील परीक्षा केंद्रावर जी घटना घडली तशा प्रकारचे दोष राहून जाऊ शकतात. त्या फॅक्च्युअल एरर्स आहेत. कोड क्रमांक १०२ ऐवजी कोड क्रमांक १०४ ची प्रश्नपत्रिका दिली गेली. काही विद्यार्थ्यांनी मूळ प्रश्नपत्रिका सोडविली तर काही विद्यार्थ्यांनी बदललेली प्रश्नपत्रिका सोडविली. हा विद्यार्थ्यांचा प्रश्न नसून यंत्रणेचा प्रश्न आहे. यंत्रणेच्या दोषामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ एक्झामिनकडून योग्य ती दखल घेतली गेली पाहिजे. शेवटी कोणत्याही विद्यार्थ्यावर या परीक्षेच्या तांत्रिक दोषामुळे परिणाम होणार नाही आणि त्यांचे वय वाया जाणार नाही याबाबत खबरदारी घेण्याच्या सूचना विद्यापीठाला देणार आहात काय?

श्री.रवींद्र वायकर : नक्की सूचना दिल्या पाहिजेत. तशा पध्दतीच्या सूचना कुलगुरुंना देण्यात येतील. अशा चुका विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये घातक ठरू शकतील. त्या दृष्टीने सूचना देण्यात येतील.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, शासनाने वेळ मारुन नेण्याची भूमिका घेतलेली दिसते. विद्यार्थ्यांना मूळ विषयाची प्रश्नपत्रिका देण्याऐवजी वेगळया विषयाची प्रश्नपत्रिका देण्यात येणे ही बाब गंभीर आहे. या प्रकरणाची चौकशी केली आहे का? या प्रश्नाला चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे उत्तर देण्यात आले आहे. यातून शासन या विषयाबाबत किती गंभीर आहे हे दिसून येते. चुकीची प्रश्नपत्रिका वाटप करणाऱ्याच्या विरोधात शासनाने काय कारवाई केली आहे? या प्रश्नाला कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे उत्तर दिले आहे. या दोन्ही उत्तरांबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, विद्यार्थ्यांना ताबडतोब मूळ विषयाची प्रश्नपत्रिका दिली गेल्यामुळे कारवाई करता येत नाही. परंतु चुकीच्या घटनेमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असेल, विद्यार्थी नापास होत असतील तर विद्यापीठाच्या कुलगुरुंच्या माध्यमातून अशा घटनांबाबत निर्बंध घालण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

---------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्रातील वजन मापे दुरूस्तक, उत्पादक व विक्रेते यांच्या मागण्यांबाबत

(३) * १२३२१ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक ५६६५ ला दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील वजन मापे दुरूस्तक, उत्पादक व विक्रेते यांनी त्यांच्या मागण्यांसाठी दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ पासून ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंदोलनकर्त्यांच्या मागण्या कोणकोणत्या आहेत,

(३) तसेच सदर मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) होय, हे खरे आहे.

(२) आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत.

अ) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार वजने मापे दुरुस्तक यांना उपयोगकर्त्यांच्यावतीने पडताळणी शुल्क जमा करण्यास परवानगी द्यावी.

ब) वजन-मापे उत्पादक यांचे रद्द केलेले परवाने त्वरीत नूतनीकरण करुन त्यांचा उपजिविकेचा प्रश्न सोडवावा.

क) नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांनी विधीमंडळाचा चुकीचा शब्द वापरुन केलेल्या अवमानाबद्दल त्यांच्यावर कारवाई करावी.

ड) विना परवाना रिक्षा मीटर दुरुस्त करणाऱ्या दुरुस्तकांवर कायदेशीर कारवाई करावी व शासकीय प्रमाणपत्र छापणाऱ्या कंपनीवर कारवाई करावी.

इ) रिक्षा टॅक्सी मीटर पडताळणीचे काम काही मोजक्याच संस्थांना दिले आहे, याबाबत उच्चस्तरीय चौकशी करावी.

ई) रिक्षा/टॅक्सी चालकांचे बेकायदेशीररित्या वसूल केलेले अतिरिक्त रु. ५० त्यांना परत करावे.

फ) मुंबई मध्ये बंद असलेले निरीक्षक कार्यालय नियमित सुरु करुन वजने मापे पडताळणीच्या कामाला सुरुवात करावी.

...६..

२१-१२-२०१५ ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) B.६

SGB/ MMP/ AKN/ १३:१०

ता.प्र.क्र.१२३२१....

श्री.गिरीश बापट....

(३) आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

अ) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दि. २२.१०.२०१४ व दि. २७.१०.२०१४ ची परिपत्रके रद्द केल्याबाबतच्या सूचना सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

ब) ज्या परवानाधारकांचे परवाने रद्द केले आहेत त्यापैकी ज्यांनी अपील दाखल केले आहे त्यावर नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.

क) तत्कालीन नियंत्रक, वैधमापनशास्त्रयांची गृह विभागाच्या I दिनांक ०३.१०.२०१५ च्या आदेशान्वये बदली करण्यात आली आहे.

ड) रिक्षा, टॅक्सी मीटर विनापरवाना दुरुस्ती होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले नाही. ी एनआयसीकडून तयार करुन घेतलेल्या सॉफ्टवेअरचा वापर करुन वैध मापन शास्त्र अधिकाऱ्यांमार्फत रिक्शा/टॅक्सी पडताळणी प्रमाणपत्रे तयार करण्यात येतात.

इ) रिक्षा / टॅक्सी मीटर दुरुस्तीसाठी परवाने नियमातील तरतुदीनुसार देण्यात आले आहेत.

ई) रिक्षा टॅक्सी मीटरच्या पडताळणी व मुद्रांकनासाठी महाराष्ट्र वैधमापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ मधील तरतुदीनुसार शुल्क आकारण्यात आले असल्यामुळे रु. ५० परत करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

फ) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी PIL No. १५०/२०१२ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार रिक्षा व टॅक्सी मीटर पडताळणीचे काम विहित मुदतीत पुर्ण करणे आवश्यक होते, सबब, उपलब्ध असलेल्या संपुर्ण मनुष्यबळाचा उपयोग करुन सदर काम पुर्ण करण्यात आले.` त्यामुळे फेरपडताळणी व मुद्रांकनाच्या कामावर थोडाफार परिणाम झाला. I परंतु, सदर काम आता नियमितपणे सुरु झालेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांबाबत खुलासा करताना उत्तरामध्ये म्हटले आहे की, नियंत्रक, वैधमापन शास्त्र यांनी विधीमंडळाचा चुकीचा शब्द वापरुन केलेल्या अवमानाबद्दल त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.*

*.....सी.१...*

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12321....

श्री.अमरसिंह पंडित....

लेखी उत्तरात असेही नमूद करण्यात आले आहे की, "तत्कालीन नियंत्रक, वैधमापनशास्त्र यांची गृह विभागाच्या दिनांक 3.10.2015 च्या आदेशान्वये बदली करण्यात आली आहे". त्यांची बदली केली म्हणजे त्यांनी चुकीचे शब्द वापरले आहेत हे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. विधान मंडळाच्या सभागृहात चुकीची मांडणी करतो, त्याची बाहेर चर्चा करायची हे चुकीचे आहे. हे सभागृह सार्वभौम असून त्याचा अवमान करायचा हे बरोबर नाही. आपल्या या सभागृहाचा अवमान केल्यानंतर त्यांची बदली करायची हे चुकीचे आहे. त्यामुळे माझे अतिशय स्पष्ट मत आहे की, केवळ बदली न करता या सद्गृहस्थाला आपण निलंबित केले पाहिजे होते. त्यांनी चूक केली आहे हे आपण मान्य केले आहे. त्याची बदली करून भागणार नाही. त्याला शासन निलंबित करणार आहे काय ? दिनांक 22.10.2014 व दिनांक 27.10.2014 चे परिपत्रक रद्द करण्यात आले आहे. म्हणजे ते परिपत्रक बेकायदेशीर होते काय ? असेल तर त्याची चौकशी करून कारवाई का करण्यात आली नाही ?

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे दोन प्रश्न आहेत. नियंत्रक, वैध मापन शास्त्र हे पद अनेक वर्षापासून आहे. या खात्यासंबंधी खूप अभ्यास करून काही गोष्टी बारकाईने करायला पाहिजे होत्या. मी पक्षीय आकसाने काहीही बोलत नाही. परंतु, या खात्याकडे गेली दहा ते अकरा वर्षे थोडे दुर्लक्ष झाले होते. हे खाते खूप महत्त्वाचे आहे. डिझेल, पेट्रोल, रॉकेल, रिक्षा, टॅक्सी, लाखो दुकानदार, त्यांच्या दुकानात असलेली वजने, मापे, यांच्याशी या खात्याचा संबंध येतो. गेल्या पंधरा-वीस वर्षात या खात्यामध्ये नवीन स्टाफही दिला नाही. 250 ते 275 निरीक्षक असताना एकाही नवीन निरीक्षकाची भरती झाली नाही. आता ती संख्या 175 वर आलेली आहे. या खात्याचा सर्वंकष अभ्यास केला तेव्हा नियमाने काय काय करता येते ते पाहिले. मग कारवाई करण्यासंबंधातील नोटीसा व पत्र देण्यात आली. नंतर अनेक उत्पादक, विक्रेत आले, दुरूस्तक आले. तांत्रिक दोष असता कामा नये पण प्रॅक्टीकली वेळ लागला तरी चालेल म्हणून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीश बापट...

काही दुरूस्तकांना पारवानगी दिल्या व तसे आदेश देखील मी दिले. त्यामुळे आता निम्म्याच्या वर दुरूस्तकांचे काम सुरू झालेले आहे. यात एकच साधा प्रश्न आहे की, नियमाने जो दुरूस्तक आहे, त्याला दुकानातील वजन व माप दुरूस्त करायला अडचण नाही. दुरूस्तक दुकानदाराला बाजूला ठेवून गुड्डयाने आमच्याकडे स्टॅम्प मारण्यासाठी वजने आमच्याकडे पाठवायला लागले. मधल्या काळामध्ये अशाही तक्रारी आल्या की, माझी फी 100-200 रूपये आहे. माझे दुरूस्त केले व पण माझ्या दुरूस्तकाने एक हजार रूपये घेतले. कोणी म्हणायचे 750 रूपये घेतले. सररकारची फी वाढली आहे काय ? आम्ही त्यांना सांगितले की, सरकारची फी वाढलेली नाही. त्यामुळे दुरूस्तकांना नियम केला की, त्यांनी दुरूस्तकाचे काम करावे. पण स्टॅम्प मारण्यासाठी संबंधित मालकाने आमच्याकडे यायला पाहिजे. त्याने त्याचे चलन बनविले पाहिजे. पावती बनविली पाहिजे. यामुळे दुरुस्तकांच्या व्यवसायावर थोडा परिणाम झाला. कारण दुकानदार स्वत: करत बसण्याऐवजी 10-20 मापे दुरूस्तकाला देऊन टाकायचे. हा नियम थोडासा कठोर केल्यामुळे असंतोष निर्माण झाला. हा नियम कठोर ठेवायलाच पाहिजे. कारण ज्या दुकानदाराच्या दुकानातून वजन मापातून सामान्य माणसाला, ग्राहकाला जो माल मिळणार आहे त्यामध्ये फरक झाला तर हजोरो लोकांचा तोटा होऊ शकतो. जेव्हा नियम झाले तेव्हा ते दुरूस्तकांनी आणून देण्याचा नियम नव्हता. दुकानदारांनीच आणून देण्याचा नियम होता. परंतु, मधल्या काळात दुकानदारांचा वेळ वाचचा, आमच्या खात्यामध्ये कमी लोक असल्यामुळे ही प्रथा पडली. खात्याने दुरूस्तकांना त्यांचा अर्ज भरून देताना किती जणांकडून पैसे वसूल करून आणले हा एक आयटेम टाकला. आपल्याकडे कायदा झाल्यानंतर नियमावली होते. ती नियमावली विधानमंडळाच्या समितीकडे जाते. ती मग आपल्याकडे येते. त्यामध्ये असे काही नव्हते. पण खात्याने कॉलम टाकल्यामुळे हायकोर्टाने तो संदर्भ घेतला की, खात्यानेच तक्त्यामध्ये हा कॉलम घातला असल्याने याचा अर्थ दुरूस्तकाला गोळा करून आणून स्टॅम्प मारून, स्वत: आणून फी द्यायची परवानगी आहे. असा तो

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12321....

मुद्दा आहे म्हणून आम्ही त्या दुरूस्तीमध्ये आम्ही फरक करीत आहोत. यामध्ये काय बदल करायचा यासाठी तीन तज्ज्ञांची समिती नेमली आहे. त्याचा आता अहवाल येईल. मधल्या काळामध्ये संबंधित नियंत्रकांचे प्रमोशन झाले. ते ॲडिशनल डी.आय.जी.झाले. गृह विभागाने त्यांची होमगार्ड खात्यामध्ये बदली केली. केवळ याच कारणामुळे केली असे नाही. पण अनेक दुरूस्तकांना त्रास होऊ लागला म्हणून मी स्वतः आमच्या खात्यातील तीन जणांची समिती नेमली. पोलीस लायसेन्स नाही म्हणून लायसेन्स रद्द झाले होते. दोन वर्षाचे ऑडिट दिले नाही म्हणून लायसेन्स रद्द करण्यात आले होते. जे लोक पारंपरिक व्यवसाय जिन्याखाली, घरी करीत होते त्यांना वाणिज्यिक प्रमाणपत्रसंबंधातील अटी काढून टाकण्यात आल्या. त्यामुळे निम्म्याच्या वर दुरूस्तकांचे काम झाले. ते आता कामाला आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे आता आले असल्यामुळे मी त्यांचे स्वागत करतो. .... (अडथळा).....

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, हे उत्तरामध्ये कुठे आहे ?

**सभापती :** ते कंसात बोलले आहेत.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, मी अनेक गोष्टींमध्ये सन्माननीय सदस्य श्री.सुनीलजी तटकरे यांचे मार्गदर्शन घेत असतो. यात देखील त्यांचे मार्गदर्शन घेतले होते. ते मला आता समोर दिसल्यामुळे स्फूर्ती आली म्हणून मी त्यांचे नाव घेतले आहे. त्याचा आपल्याला त्रास झाला आहे काय ? आपणालाही त्रास होईल असे मी काही वागणार नाही हे मी नक्की ठरविलेले आहे. मला सांगायला अभिमान वाटतो की, या खात्याशी संबंधित 33 लाखाच्यावर ग्राहक आहेत. 175 निरीक्षक हा कारभार पाहात असतात. आता मी समिती नेमलेली आहे. ऑनलाईन काही करता येईल काय हे देखील बघण्यात येत आहे. ... (अडथळा).... आपल्याला माहीत व्हावे म्हणून मी सविस्तर उत्तर देत आहे. आपल्याला एका वाक्यात उत्तर पाहिजे असेल तर ती मी देण्यास तयार आहे.

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12321....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे. त्यासंबंधी स्पेसिफिक उत्तर अपेक्षित होते. परंतु, संपूर्ण खाते कसे काम करते हे सभागृहाला समजावून सांगण्यात आले आहे. त्याबद्दल मंत्री महोदयांचे मनापासून आभार मानतो. आम्हाला खाते कसे काम करते हे आता समजले आहे. सभागृहात प्रश्न विचारताना डेव्हलप करण्यासाठी वेळ लागतो. परंतु, येथे माननीय मंत्री उत्तरच डेव्हलप करीत आहेत. या प्रकरणात केवळ नियंत्रकाची बदली झाली आहे. त्यांनी केलेल्या गैरकारभारसंबंधी चौकशी का करण्यात आली नाही असा स्पेसिफिक प्रश्न आहे. त्याचे उत्तर अपेक्षित आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांनी विधिमंडळाचा चुकीचा शब्द वापरून अवमान केलेला आहे. ही गंभीर बाब आहे. त्यासंबंधी मंत्री महोदय उत्तर देत नाही. अधिकारी विधिमंडळाचा अवमान करायला लागले तर हे शासन चालणार कसे, सभागृहाचे कामकाज कसे चालणार ? सध्या त्या अधिकाऱ्याची पोझिशन काय आहे, त्या अधिकाऱ्याविरूद्ध निलंबनाची कारवाई न करता त्याला कामावरून कमी केले पाहिजे. यासाठी तो कोर्टात गेला तरी चालेल. या सभागृहाचा अवमान करण्याची त्याची हिंमत होते हे काही बरोबर नाही. त्यास मंत्री महोदय उत्तरच देत नाही.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझी उत्तरालाच हरकत आहे.

**सभापती :** मंत्री महोदयांना उत्तर देऊ द्यावे. माननीय मंत्र्यांनी उत्तर डेव्हलप केले आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आता जे सांगितले आहे ते बरोबर आहे. माननीय मंत्र्यांनी प्रश्नाला स्पेसिफिक उत्तर द्यावे.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांच्यापासून मला संरक्षण द्यावे. मला त्यांची भीती वाटते. मला सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांच्यापासून भीती वाटत नाही.

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना सांगू इच्छितो की, आपण खाली बसून सभागृह चालवू नये. ...5

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12321....

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, नियंत्रकांची बदली या कारणामुळे झाली हे बरोबर नाही. ते असत्य आहे. नियंत्रकाच्या मार्फत कारवाया जास्त प्रमाणात झाल्या. त्या होऊ नये म्हणून ते नियंत्रक पदावर असतानाच समिती नेमली होती. ज्यांची लायसेन्स होती ती त्यांनी रद्द केली होती. त्यासाठी समितील नेमली होती. त्यामुळे केवळ या कारणाकरिता नियंत्रकांची बदली झाली असे म्हणणे चुकीचे आहे. त्यांची बदली आता होमगार्ड विभागामध्ये झालेली आहे. त्यांची बदली गृह विभागाने केली आहे. यासाठी आमच्या खात्याने शिफारस केली नव्हती. नियंत्रकांनी जो नियम काढला तो नियम आपल्या पुस्तिकेमध्ये आहे.

D-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:12321......

श्री.गिरीष बापट ....

नंतरच्या काळामध्ये सर्व दुरुस्तकांना सोयीचे व्हावे म्हणून नियम केला होता. त्यामुळे नियंत्रकावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी स्पष्टपणे उत्तर दिलेले आहे परंतु त्या नियंत्रकाचे प्रमोशन झाल्यामुळे बदली झाली आहे. नियंत्रकाने विधिमंडळाच्या संदर्भात केलेल्या अपमानाबद्दल त्याच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे सदर नियंत्रकाने विधिमंडळाच्या केलेल्या अपमानाबद्दल,वापरलेल्या अपशब्दांबद्दल संबंधितावर कारवाई केली जाणार आहे की, नाही ?

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, नियंत्रकावर कारवाई केली जाणार नसून त्याचे कारण असे आहे की, या विषयाच्या संदर्भात विभागाच्या तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती नेमली असून ज्या केसेस नाकारण्यात आल्या होत्या त्या सर्व केसेसचा पुनर्रविचार करुन ....(अडथळा)

**सभापती :**सन्माननीय सदस्यांचा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, नियंत्रकाने विधिमंडळाच्या संदर्भात अवमानकारक शब्द उच्चारले आहे, विधिमंडळाचा अवमान झाल्यामुळे संबंधित नियंत्रकाचे निलबंन केले तर प्रश्नच शिल्लक राहणार नाही.

श्री.गिरीष बापट :सभापती महोदय, यामध्ये विधिमंडळाचा अपमान झालेला नाही. या विषयाच्या संदर्भात विभागाने 3 वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती नेमली असून समितीला अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

----------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*राज्यात नॅशनल ॲसेसमेंट व ॲक्रिऐशन कौन्सिल (नॅक) कडून मुल्यांकन न करणाऱ्या महाविद्यालये व विद्यापीठांवर कारवाई करण्याबाबत*

*(४) *११२०८ श्री.अनंत गाडगीळळ:ळ तारांकित प्रश्न क्रमांक ८१११ ला दिनांक १७ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) राज्यात नॅशनल ॲसेसमेंट व ॲक्रिऐशन कौन्सिल (नॅक) कडून मुल्यांकन न करणाऱ्या महाविद्यालये व विद्यापीठांवर उच्च तंत्र शिक्षण विभागाकडून कार्यवाही करण्यात येणार आहे, तसेच अनुदानही बंद करण्याचे आदेशही शिक्षण संचालनालयाने सर्व अकृषी विद्यापीठांना दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,*

*(२) असल्यास, नॅककडून मुल्यांकन करुन घेण्यास टाळाटाळ करणारी विद्यापीठे व महाविद्यालये यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,*

*(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री.रविंद्र वायकर,श्री. विनोद तावडे यांच्या करिता :* (१) *हे अंशत: खरे आहे. अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयांचे मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करणेबाबत तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या दिनांक* २९-०१-२०१५ *च्या पब्लिक नोटीसीद्वारे दिलेल्या सूचना उच्च शिक्षण संचालनालयाने दिनांक* १६-०७-२०१५ *च्या पत्रान्वये सर्व अकृषि विद्यापीठांना कळविलेल्या आहेत.*

*(२) याबाबत संचालक, उच्च शिक्षण यांनी दि.* १२/१०/२०१५ *च्या पत्रान्वये आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत.*

*(३) प्रश्न उद्‌भवत नाही.*

*श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, नॅकने मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकन कारवाई करावयास पाहिजे असते. विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या दिनांक २९०१०२०१५ च्या पब्लिक नोटीद्वारे दिलेल्या सूचना उच्च संचालनालयाने दिनांक १६.७.२०१५ च्या पत्रान्वये अकृषि विद्यापीठांना आणि संलग्न अनुदानित महाविद्यालयांना कळविले आहे. त्यामुळे यामध्ये नेमक्या कोणत्या सूचना देण्यात आलेल्या आहेत ? यामध्ये किती विद्यापीठे व किती प्रमुख अनुदानित महाविद्यालये आहेत याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी.*

*श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, विद्यपीठ अनुदान आयोगाने युजीसीच्या माध्यमातून दि.नांक २२.१२.२०१४ च्या बैठकीत ३१.२१.२०१५ पर्यंत नॅककडे मुल्यांकनासाठी अर्ज करावेत अन्यथा दि. १.४.२०१६ पासून अनुदान बंद करण्यात येईल अशा प्रकारची पब्लीक नोटीस दि.२९ जानेवारी, २०१५ रोजी युजीसीच्या सचिवांनी काढली होती. त्यानुषंगाने उच्च शिक्षण संचालनालयाने १७.७.२०१५ च्या पत्राने सर्व अकृषि विद्यापीठांना तसे कळविण्यात आले. नॅ मूल्यांकनावरून टाळाटाळ करणाऱ्या विद्यापीठांना व महाविद्यालयांना पुन्हा नोटीस .....यामध्ये सन्माननीय सदस्यांनी नॅकच्या संदर्भातील माहिती विचारली आहे. यामध्ये अनुदानित महाविद्यालयांची संख्या जवळ जवळ ११७२ असून नॅक मूल्यांकन केलेल्या महाविद्यालयांची संख्या ९२१ आहे. ए ग्रेड मिळालेल्या महाविद्यालयांची संख्या १६३ आहे. बी ग्रेड मिळालेल्या महाविद्यालयांची संख्या ५३५ आहे व सी ग्रेड मिळालेल्या महाविद्यालयांची संख्या २२३ आहे व नॅकचे मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांची संख्या २५१ आहे.*

...३...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :११२०८......

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, अनुदानित महाविद्यालयांचे मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकनाच्या संदर्भातील निर्णय युजीसीने दि. २२.१२.२०१४ रोजी घेतला व त्याबाबतचे आदेश दि. २९ जानेवारी, २०१५ रोजी देण्यात आले. परंतु यासंदर्भातील सूचना संबंधित अकृषि विद्यापीठांना ६ महिन्यानंतर गेलेल्या आहेत. विद्यापीठांना सूचना सहा महिने उशीराने पाठविण्याची कारणे काय आहेत ?

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, अकृषि विद्यापीठांच्या माध्यमातून नॅक मूल्यांकनाच्या बाबतीतील तपशील मी पटलावर ठेवतो. परंतु नॅक मूल्यांकनाची टाळाटाळ केली जात होती. नॅक मूल्यांकनामध्ये विद्यापीठाने काय केले पाहिजे, कॉलेजेसने काय केले पाहिजे अशा सर्व माहितींचा उल्लेख असतो. यामध्ये अभ्यासक्रमाच्या घटकाची पूर्तता करणे, अध्यापन व मूल्यांकन, संशोधन सल्ला विस्तार, पयाभूत सुविधा,अध्यापन श्रोत,विद्यार्थी सुविधा,विकास, प्रशासन नेतृत्व व्यवस्थापन तसेच निकोप व उत्तम उपक्रम राबविणे यासंदर्भात नॅशनल ॲसेसमेंट व ॲक्रिऐशन कौन्सिलच्या माध्यमातून केले जाते. सन्माननीय सदस्यांनी सहा महाविद्यालयांना सूचना सहा महिने उशीराने का प्राप्त झाल्या असा प्रश्न विचारला असून त्यासंदर्भात चौकशी करुन निर्णय घेण्यात येईल.

----

...४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

***डॉ.बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठातील रिक्त पदे असल्याबाबत***

***(५) * ११८०५ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

***(१) औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठातीलल अधिकारी/कर्मचारी वर्ग १ ते ४ मधील मंजूर असलेल्या पदांपैकी ३२५ रिक्त पदे आहेत, हे खरे आहे काय,***

***(२) असल्यास, मराठवाडा विद्यापीठातील शिक्षकांची ७७ रिक्त पदे आहेत तसेच ४५ विभागांपैकी १० विभागात विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी एक शिक्षक असल्याने विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यापासून वंचित राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,***

***(३) मराठवाडा विद्यापीठामध्ये सी.ए.एस.अंतर्गत मागील पाच वर्षापासून पदोन्नती दिली नाही, हे खरे आहे काय,***

***(४) तसेच, विद्यापीठातील मुलींच्या वस्तीगृहाची दुरवस्था झाली असून दहा बाय दहाच्या खोली मध्ये दहा विदयार्थींनीना प्रवेश दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,***

***(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,***

***(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?***

***श्री.रविंद्र वायकर, श्री. विनोद तावडे यांच्या करिता :** (१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वर्ग १ ते ४ मधील एकूण शिक्षकेत्तर २३८ पदे व ६६ शिक्षकीय पदे रिक्त आहेत.*

*(२) हे खरे नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास मंजूर असलेल्या एकूण २५९ शिक्षकीय पदांपैकी ६६ पदे रिक्त आहेत. वेळोवेळी शैक्षणिक कार्यभार / अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरिता अंशदायी, व्हिजिटिंग इ. शिक्षकांची नेमणूक करुन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यात येत आहे.*

*(३) हे खरे नाही.*

*(४) हे खरे नाही.*

*(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.*

श्री.विक्रम काळे :सभापती महोदय, मराठवाडा विभागातील औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठामध्ये गेल्या अनेक वर्षापासून प्राध्यापकांची पदे मोठया प्रमाणात रिक्त आहे. तेथील लोक प्रतिनिधी म्हणून, शिक्षक प्रतिनिधी म्हणून मी असो किंवा आमचे पदवीधर आमदार सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण असो, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे यासाठी प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी आम्ही वारंवार विद्यापीठाकडे व शासनकडे पाठपुरावा करीत असतो. ही पदे शासन अनुदानित आहेत. शासन या पदांना ग्रँट देत असते. आज जवळपास 10 विभागामध्ये एक शिक्षक आहे. ज्या प्रमाणे प्राथमिक शाळेत एक शिक्षकांचा वर्ग असतो तशा पध्दतीने आज विद्यापीठांतील विद्यार्थ्यांना एका शिक्षकांकडून शिकून घेण्याची वेळ आलेली आहे. ही पदे भरण्याच्या संदर्भात वारंवार पाठपुरावा करुन सुध्दा आजतागायत कारवाई झालेली नाही. त्यामुळे पदे भरण्याची कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करणार आहेत. परंतु विद्यापीठाच्या अनुदानातून जी पदे भरावयाची असतात, ज्यापदांना शासन अनुदान देत नाही. जी पदे त्यांच्या अधिकारात असतात त्या पदांच्या संदर्भात लक्ष्मी दर्शन होत असल्यामुळे ही पदे

ता.प्र.क्र.:11805....

श्री.विक्रम काळे .....

ताबडतोब भरली जातात. परंतु शासन अनुदानितची पदे जाहीरात देऊन भरली जात असतात त्यामुळे ही पदे भरली जात नाहीत. परिणामी गोरगरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे असे नुकसान करणाऱ्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? प्राध्यापकांची एकंदर रिक्त पदसंख्या किती आहे व ही पदे किती कालावधीत भरली जाणार आहेत ?

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, विद्यापीठ कायद्याच्या कलम 8 च्या माध्यमातून विद्यापीठाचे अधिकार व कर्तव्य तसेच विद्यापीठाने वापरण्यास व पार पाडण्यास कसूर केली असेल, किंवा विद्यापीठाने समयोजित रीतीने कर्तव्ये पार पाडलेली नसतील किंवा राज्य शासनाने काढलेल्या आदेशाचे पालन केले नाही तर त्या विद्यापीठाचे अधिकार व कर्तव्ये योग्य रीतीने पार पाडण्यास किंवा शासनाच्या आदेशाचे पालन करण्याचे निर्देश देण्यात येतील. तसेच त्यांच्यावर कलम 8(4) नुसार उचित कारवाई करण्यात येईल. (अडथळा)

सभापती महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठामध्ये रिक्त पदे असून ती भरली पाहिजे ही वस्तुस्थिती आहे. या विद्यापीठात 777 पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्याच्या संदर्भात वित्त विभाग शासन निर्णय संकीर्ण 2015/41/ दि.2 जून,2015 मध्ये शिक्षक व रिक्त पदांमध्ये 75 टक्क्यापर्यंत पदे भरण्यास मुभा राहील. रिक्त पदांपैकी 75 टक्के पदे भरण्याच्या संदर्भात शासनाकडे आम्ही परवानगी मागितली आहे. शासनाने यासंदर्भात दि.26.9.2015 नुसार परवानगी दिली असून यानुसार छाननी झालेल्या अर्जांची पुढील प्रक्रिया करुन पदे भरण्यात येतील.

E-1/......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 11805.....

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मराठवाड्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठास देशात एक ऐतिहासिक वलय आहे. या विद्यापीठात आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे अशी अपेक्षा व्यक्त जात असते. मराठवाडा विद्यापीठास डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांचे नाव मिळाल्यापासून केवळ मराठवाड्यातील नव्हे तर इतर राज्यातील विद्यार्थी देखील या विद्यापीठात शिक्षण घेण्यास आतूर असतात. हे विद्यापीठ आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्हावे यासाठी शासन प्रयत्न करणार काय ? या विद्यापीठात शिक्षकेतरांची 238 पदे रिक्त आहेत आणि शिक्षकांची 66 पदे रिक्त आहेत. जर शिक्षकांची पदे रिक्त असतील तर विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची काय अवस्था होत असेल, तेव्हा शिक्षकांची रिक्त पदे शासन केव्हा भरणार आहे ? या विद्यापीठामध्ये मुलींचे वसतिगृह आहे. परंतु त्या ठिकाणी अनेक गैरसोयी आहेत. तेव्हा शासन या मुलींच्या वसतिगृहामध्ये सोयीसुविधा उपलब्ध करुन देणार आहे काय ?

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, शिक्षकेतर संवर्गामध्ये वर्ग 1 ते 4 मध्ये 238 कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत तर शिक्षकांची 66 पदे रिक्त आहेत, ही गोष्ट खरी आहे. शिक्षकांची रिक्त पदे लवकर भरण्याबाबत शासन निश्चितपणे प्रयत्न करील आणि तसे कुलगुरुंना सांगण्यात येईल. त्या ठिकाणी मुलींची सहा वसतिगृहे आहेत. या वसतिगृहांमध्ये एकूण 236 खोल्या असून त्याची प्रवेश क्षमता 603 आहे, परंतु प्रत्यक्षात 809 विद्यार्थीनी रहात आहेत. खोल्या कमी आणि मुलींची संख्या जास्त आहे. मुलींना शिक्ष्ण देणे गरजेचे आहे. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थित् लक्षात घेऊन जास्तीत जास्त मुलींना सामावून घेतले आहे. 10x12 च्या खोलीमध्ये 3 विद्यार्थिनी, 15x15 मध्ये 5 विद्यार्थीनी आणि 15x14 मध्ये 4 विद्यार्थीनी ठेवले जाते. जवळपास 200 प्रवेश क्षमतेच्या वसतिगृहाचे बांधकाम सुरु झालेल आहे हे बांधकाम 2017 मध्ये पूर्ण होईल त्यावेळी या सर्व मुलींना तेथे सामावून घेण्यात येईल.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अगोदरच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, 75 टक्के जागा भरण्यास परवानगी दिलेली आहे. या रिक्त जागा भरण्यास दोन वर्षापूर्वी परवानगी दिलेली आहे. तेव्हा या जागा का भरण्यात आल्या नाहीत ?

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 11805.....

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, मागील दोन वर्षापासून वर्ग-1 आणि वर्ग-2, तसेच शिक्षकेतर संवर्गातील वर्ग 1 ते 4 च्या जागा भरावयाच्या आहेत. ही पदे भरण्यासाठी जाहिरात देण्यात आली होती. यासाठी कुलगुरुंनी 15 सदस्यांची छाननी समित निर्माण केली होती, परंतु ही छाननी परिपूर्ण झालेली नसल्यामुळे रिक्त पदे भरण्यात आली नाहीत. तसेच अनुकंपा तत्वावरील पदे भरण्या संदर्भात न्यायालयात केस होती, अशा वेगवेगळ्या कारणांमुळे ही पदे भरता आलेली नाहीत. ईएसबीसी आणि एबीसीच्या आरक्षणाबाबत माननीय उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठामध्ये याचिका प्रलंबित असल्यामुळे पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण करता आलेली नाही. तसेच विद्यापीठात दिनांक 23.3.2014 ते 3.6.2014 पर्यंत कुलगुरुंची पूर्णवेळ नियुक्ती नव्हती. विषय तज्ज्ञांच्या याद्या तयार नसल्यामुळे तसेच विषय निवड समिती घटित करण्यात आली नसल्यामुळे पद भरतीची प्रक्रिया लांबणीवर पडली आहे.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, मोठ्या आंदोलनानंतर मराठवाडा विद्यापीठास डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे नाव मिळालेले आहे. या विद्यापीठात मागासवर्गीयांची पदे जाणीवपूर्वक भरली जात नाहीत असा माझा आरोप आहे. या विद्यापीठास संवर्ग एक मध्ये मागासवर्गीयांची किती पदे रिक्त आहेत ?

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, शिक्षकेतर संवर्गामध्ये वर्ग 1 ते 4 मध्ये 777 पदे आहेत त्यामध्ये सरळ सेवेतील मंजूर पदे 534 आणि पदोन्नतीने 443 पदे भरावयाची आहेत, आपण सरळसेवेने 360 पदे भरलेली आहेत म्हणजे सरळसेवेमध्ये 174 रिक्त पदे आहेत आणि पदोन्नतीने 164 अशी भरावयाची आहेत अशी सरळसेवेची एकूण 238 पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे तत्काळ भरणे आवश्यक आहे. यामध्ये तत्काळ लक्ष घालून ही रिक्त पदे भरण्याची कारवाई करण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय उत्तर देताना अनुशेष आणि न्यायालयीन बाबींचा उल्लेख करीत आहेत. ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे ते औरंगाबाद विभागातील असून त्यातील एक सदस्य पदवीधर मतदारसंघातील आहेत तर दुसरे सदस्य हे शिक्षक मतदारसंघातील आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात अनेक

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 11805.....

श्री.सुनील तटकरे......

वर्षापासून ही पदे रिक्त आहेत. दोन वर्षापूर्वी ही पदे भरण्यात येतील असे सांगण्यात आले. त्यानंतर माननीय मंत्र्यांनी असा आभास निर्माण केला ही पदे तत्काळ भरण्यासाठी कार्यवाही केलेली आहे. जागरुक सदस्यांनी निदर्शनास आणल्यानंतर त्यांनी सांगितले की, दोन वर्षापासून ही पदे रिक्त आहेत. माझा प्रश्न आहे की, पुढील अधिवेश्न सुरु होण्यापूर्वी ही रिक्त पदे भरण्यात येतील काय ?

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात जातीने लक्ष घालून ही पदे भरण्यात येतील.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या ठिकाणी विभागाचे मंत्री उपस्थित आहेत ते याबाबतीत खुलासा करतील काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो स्पेसिफीक प्रश्न विचारलेला आहे त्याचे स्पेसिफीक उत्तर माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेले आहे. सध्या विद्यापीठात ॲकेडमिक कौन्सिल कार्यान्वीत नाही. त्यामुळे या नेमणुका झाल्या तर त्या नेमणुका एकांगी झाल्या असे वाटण्याची शक्यता आहे. जर त्या एकांगी होणार नसतील तर दहा दिवसांत नेमणुका करण्यात येतील. त्या नेमणुका एकांगी वाटत असतील तर ॲकेडमिक कौन्सिल सुरु होईपर्यंत थांबावे लागेल.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, ॲकेडमिक कौन्सिल सुरु झाल्याशिवाय या रिक्त जागा भरण्यात येऊ नयेत अशाप्रकारच्या सूचना विद्यापीठास देण्यात येतील काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी असे आदेश देण्यास तयार आहे. या संदर्भातील विधेयक मंजूर झाल्यावर ॲकेडमिक कौन्सिल होईल त्यानंतर ही पदे भरण्यात येतील.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे असा माननीय मंत्र्यांचा नेहमी आग्रह असतो.

....... F-1

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11805....

आम्ही विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांची व्यवस्था करा असे सांगत असताना सुध्दा सरकार त्या बाबतीत उदासीन आहे. या ठिकाणी शासनाकडून केवळ शासन निर्णय वाचून दाखविण्यात येत आहे. वास्तविक पाहता पदे भरण्यासाठी दोन वर्षांपूर्वी परवानगी दिलेली असताना सुध्दा त्या अनुषंगाने काहीच कार्यवाही केली जात नाही. या ठिकाणी सांगण्यात आले की, न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे. मी सांगू इच्छितो की, माननीय राज्यमंत्र्यांना चुकीची माहिती देण्यात आलेली आहे. रिक्त पदे भरण्यासाठी कोणत्याही प्रकारचा स्टे नव्हता. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, ही पदे दोन वर्षे भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ? तसेच दुसरी बाब अशी की, माननीय मंत्र्यांनी त्यांच्या 15 मिनिटांच्या उत्तरामध्ये संबंधित दोषी अकिाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कसलाही उल्लेख केलेला नाही. मला वाटते माननीय मंत्री अधिकाऱ्यांना पाठीशी घालत आहेत. माझे मत आहे की, नवीन कायदा करण्यात येत असला तरी ही पदे भरण्याची प्रक्रिया तातडीने सुरु केली पाहिजे. कारण ही पदे भरण्यासाठी जाहिरात देणे, मुलाखती घेणे इत्यादी पक्रिया पार पाडण्यासाठी भरपूर वेळ लागू शकतो. त्यामुळे या प्रक्रिया पार पाडल्यास दरम्यानच्या कालावधीत नवीन कायदा मंजूर होऊ शकतो. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, पद भरतीची प्रक्रिया ताबडतोब सुरु करुन, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मराठा समाजाच्या आरक्षण स्थगितीमुळे तसेच विषयवार आरक्षण की एकूण आरक्षण, या संदर्भात प्रकरण सुरु होते. त्यामुळे आता या विषयी पुढील 15 दिवसात कार्यवाही करण्यात येईल.

---------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

***ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील प्रलंबित प्रकरणांबाबत व गैरकारभाराबाबत***

*(६) * **१२६१८** श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील कामकाजाबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे व शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांचेकडे वारंवार तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या तक्रारींची / निवेदनांची दखल घेऊन शासनाने व शिक्षण विभागातील वरीष्ठ अधिकाऱ्यांनी काय कार्यवाही केली आहे,*
*(३) टप्पा अनुदान मंजूरी आदेशाची, अनुकंपाधारकांच्या समायोजनाची, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक पदाच्या मान्यतेची, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची व अन्य स्वरुपाची किती प्रकरणे माहे सप्टेंबर, २०१५ अखेर प्रलंबित आहेत,*
*(४) असल्यास, १ महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी प्रकरणे निकाली न काढता प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,*
*(५) सदर प्रकरणे जाणीवपूर्वक वव अपेक्षेने प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,*
*(६) नसल्यास, अशा अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याची कारणे काय आहेत ?*

*श्री. विनोद तावडे* **:** (१) *होय, हे खरे आहे.*
*(२) होय, विविध पत्रावर कार्यवाही सुरु आहे.*
*(३) सप्टेंबर, २०१५ अखेर टप्पा अनुदान, अनुकंपाधारक समायोजन, मुख्याध्यापक मंजूरी, पर्यवेक्षक मंजूरी, वैद्यकीय देयके अशी एकूण ९८ प्रकरणे प्रलंबित आहेत, अनुकंपाधारकांची प्रकरण वगळता इतर प्रकरणे निकाली काढली आहेत.*
*(४) प्रकरणाबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून माहिती घेण्यात येत असून माहिती प्राप्त झाल्या प्रकरणी प्रकरणे काढण्यात येत आहे.*
*(५) व* (६) *प्रश्न उद्‌भवत नाही.*

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने प्रश्न क्रमांक-3 च्या लेखी उत्तरात सुधारणा करु इच्छितो. प्रश्न क्रमांक-3 च्या लेखी उत्तरात "एकूण 98 प्रकरणे प्रलंबित आहेत," या ऐवजी "एकूण 98 प्रकरणे प्रलंबित होती," असे वाचावे. यातील 27 प्रकरणे वगळता इतर प्रकरणे निकाली काढण्यात आली आहे. या बाबतची कारणे नंतर सांगतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12618....

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्याच्या शिक्षण विभागातील माध्यमिक विभागाशी संबंधित हा प्रश्न आहे. ठाणे जिल्ह्यात ग्रामीण भागात, शहरी भागात, नगरपालिका क्षेत्रात 1 हजार पेक्षा जास्त शाळा आहेत. शिक्षकांनी दिलेल्या तक्रारी वा निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही झाली नसल्यास संबंधित शिक्षक आम्हा लोकप्रतिनिधींकडे त्यांच्या तक्रारी वा निवेदने देतात. त्यांच्या तक्रारी वा निवेदने प्राप्त झाल्यानंतर आम्ही त्या तक्रारी वजा निवेदनाच्या अनुषंगाने शिक्षणाधिकाऱ्यांना पत्र पाठवितो. परंतु त्यांच्याकडून कसल्याही प्रकारे आमच्या पत्राची दखल घेतली जात नाही. आम्हा लोकप्रतिनिधींना सहा महिने, आठ महिने, वर्षभर त्या तक्रारी वा निवेदनावर काय कार्यवाही केली याचे उत्तर दिले जात नाही. वास्तविक पाहता शासनाचे आदेश आहेत की, लोकप्रतिनिधींचे पत्र प्राप्त झाल्यानंतर त्या पत्राला 8-15 दिवसांत इंटेरियम उत्तर द्यावयास पाहिजे आणि अंतिम कार्यवाही झाल्यानंतर त्या संदर्भातील निर्णय कळविला पाहिजे. परंतु असे कधी होत नाही. ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात अशी अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. मी विचारु इच्छितो की, अशी प्रकरणे प्रलंबित राहू नयेत म्हणून शासन काय दखल घेणार आहे ? तसेच दुसरी बाब अशी की, शिक्षण विभागाकडे मुख्याध्यापक पदोन्नती मान्यतेचे प्रस्ताव, पर्यवेक्षक मंजुरीचे प्रस्ताव, वैद्यकीय देयके मंजुरीचे तसेच नियमित वेतनश्रेणी मिळण्याबाबतचे, असे अनेक प्रस्ताव प्रलंबित आहेत. वास्तविक पाहता असे प्रस्ताव आल्यानंतर ते एका महिन्यात निकाली काढणे अपेक्षित असते. परंतु ते प्रस्ताव सहा महिने, वर्षभर निकाली काढले जात नसतील तर, ते विहित मुदतीत निकाली काढण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे खरे आहे की, सध्या शिक्षण विभागामध्ये बरीच पदे रिक्त आहेत. त्यामुळे आहे त्या पदांवर काम करणाऱ्यांवर प्रचंड ताण आहे. ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाल्यानंतर पालघर हा स्वतंत्र जिल्हा निर्माण झाला. त्यानंतर त्या ठिकाणी कामाचा ताण वाढला. सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या प्रकरणांवर कार्यवाही करण्यात उशीर झाला असे जे सांगत आहेत ते खरे आहे. मी सांगू इच्छितो की, शासनाने ही पदे भरण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. तसेच दुसरी बाब अशी की, लोकप्रतिनिधींनी दिलेल्या कोणत्याही विषयावर पुढील 10 दिवसांत स्पेसिफिक उत्तर दिले पाहिजे, अशा प्रकारचे स्पष्ट आदेश विभागातील सर्व अधिकाऱ्यांना देण्यात येतील. यामध्ये अडचणी अशी आहे की, कामाचा ताण आणि कमी पदे याचा विचार करता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12618....

श्री.विनोद तावडे...

हे शक्य होत नाही. त्यामुळे येत्या तीन महिन्यात ही अडचण सुध्दा दूर करण्यात येईल. ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाल्यानंतर नव्याने निर्माण झालेल्या पालघर जिल्ह्यामध्ये स्टाफ गेला नाही. त्यामुळे आम्ही जिल्हानिहाय प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांना सांगू इच्छितो की, ठराविक कालावधीत, ठराविक प्रश्न मार्गी लावण्याचे आदेश आम्ही देत आहोत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न तेवढ्यापुरता मर्यादित नाही. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते हे गेल्या दोन अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित करीत आहेत. संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांना अपमानास्पद वागणूक दिली होती. त्यावेळी ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाले नव्हते. ते स्वत: त्या कार्यालयात गेल्यानंतर संबंधित शिक्षणाधिकारी सन्माननीय सदस्यांना वाटेल ते बोलले, ही बाब सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली होती. एवढे सर्व होऊनही माझ्या माहितीप्रमाणे ते शिक्षणाधिकारी अजूनही त्याच ठिकाणी आहेत. त्यांच्यावर कसल्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही. माननीय मंत्री आणि सभागृहाने आदेश देऊन सुध्दा अधिकारी काम करीत नसतील तर ते चुकीचे आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या भावना योग्य आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, आता संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन त्यांची बाहेर बदली करण्यात आली आहे.

श्री.नागो गाणार : सभापती महोदय, हा प्रश्न केवळ ठाणे जिल्ह्याशी संबंधित विचारला असला तरी अशा प्रकारची परिस्थिती राज्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी कार्यालयात आहेत. सर्वात पहिली गोष्ट अशी की, शिक्षणाधिकारी हे कार्यालयात उपस्थित नसतातच. आलेले प्रस्ताव आणि तक्रारी या निकाली काढायच्याच नाही अशा त्यांची मानसिकता आहे. ज्यांच्या तक्रारी वा प्रस्ताव असतो त्यांनी आपल्याला भेटायला आले पहिजे, अशी त्यांची अपेक्षा असते. त्याच्याशी देवाण-घेवाण करण्याबाबतची भाषा बोलण्याची अपेक्षा असते. पैसा मिळावा म्हणून हे प्रस्ताव/तक्रारी प्रलंबित ठेवण्यात येतात. तसेच शिक्षणाधिकाऱ्यांकडून तक्रारी वा निवेदनांचा आढावा

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12618....

श्री.नागो गाणार....

घेण्यात येत नाही. तसेच ज्यांच्याविरुध्द भ्रष्टाचाराच्या तक्रारी करण्यात येतात त्यांची चौकशी सुरु आहे एवढेच उत्तर आम्हाला मिळते. कोणत्याही अधिकाऱ्यावर प्रत्यक्षात कारवाई होत नाही. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, प्रलंबित प्रकरणे निकाली न काढणाऱ्या आणि ज्यांच्या विरुध्द भ्रष्टाचाराच्या तक्रारी आहेत, त्या अधिकाऱ्यांवर निश्चित कालावधीत कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, जुन्या सवयी जाण्यास थोडा वेळ लागतो. आम्ही सध्या सिस्टीम नीट करीत आहोत. सिस्टीममध्ये सुधारणा केल्यानंतर व आवश्यक तो कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिल्यानंतर विहित मुदतीत ज्यांनी काम केले नसेल त्यांना निलंबित करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना देण्यात येतील. परंतु अनुकंपाधारकांना मान्यता मिळण्याबाबतचा विषय हा फार गंभीर आहे. ठाणे जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागामध्ये अनुकंपाधारकांची 40 पेक्षा अधिक प्रकरणे आहेत. अन्य जिल्ह्यात अनुकंपाधारकांच्या समायोजनाबाबत मान्यता मिळते. या प्रकरणांना शिक्षण उप संचालकांनी तातडीने मान्यता देण्याबाबतचा आदेश निघालेला आहे. असे असताना सुध्दा 5-7 वर्षे अनुकंपाधारकांची प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, ही प्रकरणे 15 दिवसांच्या आत निकाली काढण्याचे आदेश देण्यात येतील काय ? तसेच ज्यांचे प्रस्ताव असतात त्यांच्यासाठी शिक्षणाधिकारी कार्यालय सायंकाळी 6.00 वाजेनंतर म्हणजेच कार्यालयीन वेळ संपल्यानंतर सुरु होते. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, ज्या शिक्षकांचे काम असेल, प्रकरण, प्रस्ताव असतील त्यांना शिक्षणाधिकारी कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही किंवा त्यांनी कार्यालयात येऊच नये असे आदेश पारित केले पाहिजे. कारण प्रस्ताव सादर करण्याबाबतची कार्यवाही संबंधित शाळेच्या माध्यमातून करण्यात येते. त्यामुळे त्या प्रस्तावावर करण्यात आलेली कार्यवाही शाळेलाच कळवावी. म्हणून मी विचारु इच्छितो की, शासन धोरणात्मक निर्णय घेऊन शिक्षकांच्या फेऱ्या वाचविण्यासाठी काय निर्णय घेणार आहे ?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

21-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F-6

SJB/ AKN/ MMP/ 13:50

ता.प्र.क्र.12618....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अनुकंपा तत्त्वावरील पदे भरण्यासाठी संबंधित खाजगी शाळेत पदे रिक्त असतील तर ती पदे येत्या 15 दिवसांत भरण्यात येतील. तसेच दुसरी बाब अशी की, सायंकाळी 6.00 वाजेनंतर म्हणजेच शाळा सुटल्यानंतर शिक्षक आपल्या कामाच्या बाबतीत पाठपुरावा करण्यासाठी येत असतात. अनेकदा शिक्षकांच्या तक्रारी असतात की, अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी गेल्यानंतर ते भेटत नाहीत. त्यामुळे ज्या शिक्षकाचे काम असते त्यांनी कार्यालयात जाऊन पाठपुरावा करणे अपेक्षित असते. पंतु आता सर्व कार्यवाही ऑनलाईन स्वरुपात केल्यामुळे प्रत्यक्षात कार्यालयात येऊन, अधिकाऱ्यांना भेटून चिरीमिरी देण्याची गरज पडणार नाही. सन्माननीय सदस्यांच्या मनात भ्रष्टाचार थांबविण्याचा उद्देश आहे. मी सांगू इच्छितो की, भ्रष्टाचार थांबविण्यासाठी शासनाकडून पूर्णपणे व्यवस्था करण्यात येईल.

------------

..7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आणि इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालये येथे रिक्त पदे असल्याबाबत**

*(७) * ११०५६ श्री.नागो गाणार, प्रा..अनिल सोले : सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (मेडिकल कॉलेज) व रुग्णालय आणि इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय (मेयो हॉस्पिटल) येथे असलेल्या जनरल नर्सिंग स्कूल मधील प्राचार्य, उपप्राचार्याची रिक्त पदे आहेत, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,*
*(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेतत ?*

*श्री. विनोद तावडे : (१) व (२) अशंत: खरे आहे.*
*तथापि, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील परिचर्या महाविद्यालयात बेसिक बी.एस्सी. (न.) हा ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात आला असून भारतीय परिचर्या परिषदेच्या मानकानुसार सदर महाविद्यालयात नव्याने प्राध्यापक-नि-प्राचार्य व प्राध्यापक-नि-उपप्राचार्य या संवर्गातील पदे नव्याने निर्माण करण्यात आली असून सदर पदांचे सेवा प्रवेश नियम नसल्यामुळे सदर पदे लोकसेवा आयोगाच्या कार्यक्षेत्रातून वगळून त्या पदावर सध्या कार्यरत असलेल्या पाठ्यनिर्देशकामधून भरण्याबाबतचा यथायोग्य प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला आहे.*
*इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील परिचर्या प्रशिक्षण संस्था मध्ये जी.एन.एम. हा ३ वर्ष ६ महिन्याचा पदविका अभ्यासक्रम राबविण्यात येतो. सदर परिचर्या प्रशिक्षण संस्थेमध्ये प्राचार्य व उपप्राचार्य पदे मंजूर नसल्यामुळे अन्य इतर शा.वै.म. व रु.तील परिचर्या प्रशिक्षण संस्थेमध्ये सदरची पदे अद्याप निर्माण न केल्यामुळे या समान अशा एकूण ३ परिचर्या प्रशिक्षण संस्थेमध्ये प्राचार्य व उपप्राचार्य या संवर्गातील पदे नव्याने निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.*
*(३) प्रश्न उद्भवत नाही.*

*श्री.नागो गाणार : सभापती महोदय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील परिचर्या महाविद्यालयात बेसिक बीएससी हा चार वर्षाचा पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. या महाविद्यालयात काम करणाऱ्या प्राध्यापकांना नियुक्ती मिळावी असा माझा प्रश्न होता. या प्रश्नाला असे लेखी उत्तर देण्यात आले आहे की, नियुक्तीबाबत मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, हा प्रस्ताव मंजूर होण्यासाठी किती कालावधी लागेल ?*

*....जी....*

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11056 ....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, एमपीएससी म्हणजेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मार्फत करीत होतो. आता त्यातून वगळून ते आम्ही आमच्या विभागाकडे घेतले आहे त्यामुळे ते केल्यानंतर ते लगेच आम्ही करू. जी पदे मंजूर नाहीत, या विषयात त्यांना मान्यता घेऊन ती पदे भरू.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बीड जिल्ह्यात विद्यार्थीनीला बारावी उत्तीर्ण करून देतो असे सांगून तिच्यावर करण्यात आलेल्या शारीरिक शोषणाच्या औचित्याच्या मुद्याबाबत**

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्याद्वारे आपले लक्ष वेधत आहे. काल बीड जिल्ह्यात एक घटना घडली. बुलढण्यातील विद्यार्थीनीला नोकरीला लावतो असे आश्वासन देऊन तिचे बऱ्याच लोकांनी म्हणजे 3 प्राचार्य व 22 शिक्षकांनी शारीरिक शोषण केले आहे. अनेक मुलींना या पध्दतीने शोषणाच्या षडयंत्रामध्ये फसवत असावेत. सभापती महोदय, अशा पध्दतीची घटना उघडकीस आली आहे. व्हिक्टिमाईजिंग द व्हिक्टिम. पीडित महिलेलाच गुन्ह्यामध्ये नोंदवून तिच्या तारखेला पोलीस निरीक्षक न गेल्यामुळे दिनांक 29 डिसेंबरपर्यंत तीच कैदेत आहे. आता आरोपींना अटक झाली आहे, त्यांच्या पाठीमागे कोण आहे याचीही कल्पना नाही. मी औचित्याच्या मुद्याद्वारे या संदर्भात विनंती करते. अधिवेशनाचे शेवटचे 3 दिवस राहिले आहेत. निर्भयाच्या प्रकरणातील बालगुन्हेगार सुटलेला आहे. कायद्याची चौकट आहे. बाल लैंगिक शोषणाचा कायदा म्हणजे पॉस्को किंवा 376 च्या कलमामध्ये दुरूस्त्या झाल्या. जामीन मिळता कामा नये अशी तरतूद आहे. मात्र त्या कायद्यामध्ये सुध्दा महाराष्ट्रात बुलढाण्यात किंवा अन्यत्र जामीन मिळालेले आहेत. माझी विनंती आहे की, राज्यसभेत कायदा संमत होईल त्यावेळी होईल. बालगुन्हेगारांबद्दल कायदा आहे. महाराष्ट्र सरकारने यामध्ये तपासून घ्यावे. सभागहाचे नेते सभागृहात उपस्थित आहेत. आपण बालगुन्हेगारांचे वय 18 वर्षांवरून 16 वर्षे करण्याबाबत विचार करावा, जेणेकरून निर्भयासारख्या प्रकरणातील आरोपी परत मुक्तपणे सुटणार नाहीत. बीडच्या घटनेत श्री. कस्तुरे हे पोलीस निरीक्षक स्वतः तारखेला गैरहजर राहिले. उलट आता ती मुलगी तुरूंगात आहे. सदर प्रकरणी वरिष्ठ स्तरावर महिला पोलीस अधिकारी यांना तेथील एसपींबरोबर मदतीला देऊन संपूर्ण चौकशी, तपास करावा असा मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे. सभापती महोदय, आपला स्वतःचा कायद्याचा अभ्यास आहे. माझी विनंती राहील. महाराष्ट्राचे लक्ष याकडे लागले आहे. सरकारले ज्युवेनाईल जस्टीस ॲक्टच्या संदर्भात सुधारणा करण्याच्या संदर्भात भूमिका घ्यावी.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, बीड जिल्ह्यातच नव्हे तर संबंध राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा फार गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. बीड जिल्ह्यातील प्राचार्यांनी विद्यार्थीनीवर बळजबरीने सामुहिक बलात्कार करण्याची घटना नुकतीच काल उघडकीस आली आहे. बारावीच्या परीक्षेत चांगले गुण देऊन उत्तीर्ण करण्याचे अमिष दाखवून प्राचार्य व शिक्षकांनी विद्यार्थीनीवर मागील अनेक महिन्यांपासून सामुहिक बलात्कार केल्याची घटना शनिवारी 19 डिसेंबर रोजी उघडकीस आली आहे. पोलिसांकडून अद्याप आरोपींना अटक करण्यात आलेली नाही. जिल्ह्यात असे मोठे सेक्स रॅकेज असण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रकरणाचा तपास सीआयडीसारख्या यंत्रणेकडे देण्याची मागणी सामाजिक संघटनांनी केली आहे. सभापती महोदय, आपणास या संदर्भात विनंती आहे. बीडमध्ये अतिशय गंभीर घटना घडली आहे. पोलीस याबाबत आणखीही उदासीन आहेत. सदर प्रकरणी सरकार काय कारवाई करणार आहे आणि आतापर्यंत काय कारवाई झाली याचा खुलासा आज सभागृह संपण्याच्या अगोदर होणे हे देखील सभागृहाला आवश्यक वाटते.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे व सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे एक मुद्दा उपस्थित केला असून तो अतिशय गंभीर आहे. मी आपल्याला त्याबद्दल थोडीशी माहिती देतो. ही तरुणी बुलढाणा जिल्ह्यातील असून औरंगाबादला आली. तिला बारावी उत्तीर्ण व्हायचे होते, तिने अगोदर 2 वेळा परीक्षा दिली होती, मात्र ती परीक्षा उत्तीर्ण झाली नाही. तिला मैत्रिण भेटली. त्या मैत्रिणीने तिला सांगितले की, मी तुला उत्तीर्ण करुन देते. मात्र प्राचार्याशी तुला संबंध ठेवावे लागतील, अशा पध्दतीने प्राचार्य महादेव बजगुडे, वांगी, ता. बीड यांच्याशी ओळख करुन दिली. तिने संबध ठेवायला या तरुणीला भाग पाडले. त्या तरुणीने त्या प्रचार्याबरोबर संबंध ठेवल्यानंतर त्या प्राचार्याने चांगले शिकवायच्या ऐवजी त्याने दुसऱ्या एका आत्याभाऊ पवार याच्याशी ओळख करुन दिली, तो गजानन पवार .... (अडथळा) अतिशय महत्त्वाचा विषय आहे. थोडक्यात सांगतो. पवारांना यामध्ये घेतले, दुसरा प्राचार्य आला. या प्रचायाने नंतर शिवणीचा केशव भांगे याला मध्ये टाकले. 3 प्राचार्य यामध्ये आले.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ....

त्या मुलीचे शोषण केले आणि परत परत शोषण केल्यामुळे ती गरोदर राहिली. तिला भीती वाटल्यामुळे आणि मग काय करायचे म्हणून या लोकांच्या मागे लागल्यानंतर त्यांनी सांगितले की, तू बीडला एखाद्या मुलाला घेऊन ये. मग ती मुलगी बीडला आली, गर्भपात कयायचा आहे, तूला करून देतो म्हणून सांगितले. परिणाम असा झाला की, उलट यातील सर्व प्राचार्य, शिक्षकांनी पोलीस स्टेशनला हाताशी धरून, शिवाजी नगरच्या श्री. कस्तुरे या पीआयला हाताशी धरून या मुलीवरच ब्लॅकमेलिंगचा आणि खंडणीचा गुन्हा दाखल केला, तिला अटक केली, तिला आतमध्ये ठेवले आणि नंतर तिला जामीन मिळू नये म्हणून वकील देऊ दिला नाही, स्वतः न्यायालयात हजर राहिले नाहीत, अशा पध्दतीचे तिचे शोषण केले. 9 डिसेंबरला ही घटना घडली. परवा 19 डिसेंबरला तिला जामीन मिळाला आणि जामीन मिळाल्यानंतर तिने या लोकांचे खरे कारस्थान समोर आणल्यानंतर गुन्हा दाखल केला. पण आजतागायत या शिक्षकांविरुध्द, प्राचार्यांविरुध्द कारवाई झालेली नाही, त्यांना अटक केलेली नाही. उलट हा गुन्हा औरंगाबादला वर्ग करून टाकला आहे. माननीय गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत, त्यांनाही निवेदन दिले आहे. सर्व प्रकरणात मोठे सेक्स रॅकेट आहे. त्यामुळे आपण या प्रकरणाची सखोल चौकशी एखाद्या आयजीच्या स्तरावर मग श्री. विश्वास नांगरे-पाटील असतील किंवा तत्सम महिला अधिकाऱ्यांच्या मार्फत कराल का, फौजदार श्री. कस्तुरे यांनी मदत केली, त्यांना निलंबित करणार का, तरुणीला न्याय द्याल का ?

**सभापती** : शासनाने यावर निवेदन करावे. 3 सन्माननीय सदस्य यावर बोलले आहेत. मी माझ्या अधिकारात या गंभीर घटनेच्या संदर्भात औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी दिली आहे. बाकीचे औचित्याचे मुद्दे नंतर घेण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ. रणजित पाटील (विधि व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांचा सन 2007-2008, 2008-2009, 2009-2010, 2010-2011, 2011-2012, 2012-2013 व 2013-2014 या वर्षांचा अनुक्रमे सातवा, आठवा, नववा, दहावा, अकरावा, बारावा व तेरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----

श्री. एकनाथराव खडसे (दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन 2013-2014 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. दीपक केसरकर (नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ विकास मंडळ, नागपूर, मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ, मुंबई यांचा सन 2014-2015 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांचा सन 2014-2015 या वर्षाचा वार्षिक अहवाल व लेखा सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल व लेखा सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविंद्र वायकर (उच्च आणि तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांचा सन 2013-2014 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. रविंद्र वायकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे सन 2014-2015 या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----

श्री. रविंद्र वायकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे सन 2014-2015 या वर्षाचे वार्षिक लेखे आणि संविधानिक लेखा परीक्षकांचा लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

....H

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रवींद्र वायकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचे सन 2013-2014 या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-------

श्री.चंद्रकांत पाटील (वस्त्रोद्योग मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन 2014-2015 या वर्षाचा चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल आणि वित्तीय पत्रके सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** वार्षिक अहवाल व वित्तीय पत्रके सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--------

डॉ.रणजित पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादित यांचा सन 2009-2010 या वर्षाचा छत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री.दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचा सन 2013-2014 या वर्षाचा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री.दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन 2012-2013 व 2013-2014 या वर्षांचा अनुक्रमे बेचाळीसावा व त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे

श्री.माणिकराव ठाकरे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा चौथा, पाचवा व सहावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती महोदय, लोकलेखा समितीचा अहवाल सादर करीत असताना या तिन्ही अहवालात ज्या मुख्य शिफारशी करण्यात आल्या आहेत त्या मी थोडक्यात सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.

सभापती महोदय, शासनातर्फे विकास कामांसाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येत असते. अर्थसंकल्पामधून ग्रामपंचायतींना निधी देण्यात येतो. ग्रामपंचायतीनी 15 टक्के लोकवर्गणी उभी करावी व शासनामार्फत 85 टक्के निधी देण्यात येईल, अशा प्रकारचा निर्णय सन 2002 मध्ये राज्य शासनाने घेतला होता. टाटा इंन्स्टिटय़ूट ऑफ सोशल सायन्सेस यांनी या निधीच्या विनियोगाबाबत सर्वेक्षण केले होते. बहुतांश ठिकाणी लोकवर्गणी लोकांकडून गोळा केली जात नाही. ती कंत्राटदारांमार्फतच भरली जाते.

**सभापती :** पाहिजे तर आपण अहवालावर पुढील अधिवेशनात चर्चा ठेऊ. सन्माननीय सदस्यांनी कृपया भाषण करु नये.

लोकलेखा समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

----------

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे

श्री.पांडुरंग फुंडकर (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा तिसरा, चौथा व पाचवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती :** पंचायती राज समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

----------

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

**सभापती :** आज दिनांक 21 डिसेंबर, 2015 रोजी सर्वश्री संजय दत्त, शरद रणपिसे, प्रा.जनार्दन चांदुरकर, सर्वश्री अनंतराव गाडगीळ, ॲड.रामहरी रुपनवर, वि.प.स.यांनी सकाळी 9.00 वाजता "महाराष्ट्र राज्याचे महाधिवक्ता ॲड.श्रीहरी अणे यांनी महाराष्ट्रातुन विदर्भ वेगळा करण्याच्या जाहीरपणे केलेल्या मागणीच्या वक्तव्यावर माननीय मुख्यमंत्री यांनी दिनांक 16 डिसेंबर, 2015 रोजी सभागृहात निवेदन करणे, निवेदनात तो खाजगी कार्यक्रम असल्याबाबत स्पष्ट करणे, ॲड.श्रीहरी अणे यांनी आपली भूमिका बदललेली नसून पुन्हा त्यांनी वेगळ्या विदर्भाची जाहीर मागणी दिनांक 18 डिसेंबर, 2015 रोजी औरंगाबाद येथे करणे, यासाठी राज्याची विभागणी करणारे मत मांडणाऱ्या व महत्वाचे सांविधानिक पद सांभाळणाऱ्या महाधिवक्ता यांना बडतर्फ करण्याची होत असलेली मागणी" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांना दोन मिनिटे बोलण्याची परवानगी मी देत आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, शुक्रवार दिनांक 17 डिसेंबर, 2015 रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर सरकारची भूमिका मांडण्यासाठी ॲडव्होकेट जनरल गेले असताना त्यांनी परत वेगळ्या विदर्भाची मागणी केली आणि वेगळ्या विदर्भासाठी जनमत घ्यावे, असे जाहीर वक्तव्य केले असून या संदर्भातील बातम्या मीडियामध्ये प्रसारित झाल्या आहेत.

सभापती महोदय, राज्याचे विभाजन करणे हा धोरणात्मक विषय आहे. या संदर्भात यापूर्वी मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात निवेदन केलेले आहे. परंतु, त्यानंतरही ॲडव्होकेट जनरल पुन्हा पुन्हा वेगळ्या विदर्भाची मागणी करीत आहेत. हे काय चालले आहे, राज्यामध्ये सरकार आहे की नाही ? मुख्यमंत्री महोदय एक भूमिका घेतात आणि ॲडव्होकेट जनरल त्यांना सुपरसिट करुन राज्याचे विभाजन करावे, वेगळा विदर्भ करावा, अशी मागणी सातत्याने करीत आहेत. या सरकारमध्ये काही डिसिप्लिन आहे की नाही ?

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात केलेले निवेदन वस्तुस्थितीला धरुन नव्हते, सभागृहाची दिशाभूल करणारे होते, या प्रकरणावर पांघरुण घालणारे होते, हे मला नम्रपणे

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त........

निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. ॲडव्होकेट जनरल यांनी एका खाजगी कार्यक्रमामध्ये वक्तव्य केले, असे त्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे. परंतु, तो खाजगी कार्यक्रम नव्हता तर त्यांच्या पुस्तकाच्या विमोचनाचा सार्वजनिक कार्यक्रम होता. मुख्यमंत्री महोदयांनी निवेदनात असे म्हटले आहे की, विविध वक्त्यांनी विदर्भाविषयी मागणी केली आहे आणि त्या अनुषंगाने ॲडव्होकेट जनरल यांनी ती मागणी केली. वेगळ्या राज्यासाठी जर एखादे पीआयएल दाखल झाले आणि इतर ॲडव्होकेट यांनी तशी भूमिका मांडली तर ॲडव्होकेट जनरल वेगळ्या विदर्भाविषयी भूमिका मांडणार आहेत का ?

सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरल यांनी रिफरंडमचाही उल्लेख केला आहे. अशा प्रकारची कोणतीही तरतूद संविधानामध्ये नाही, याची माहिती ॲडव्होकेट जनरल यांना नाही का ? मग ते अशी असंविधानिक मागणी कशी करु शकतात.

सभापती महोदय, वेगळ्या विदर्भाविषयी ॲडव्होकेट जनरल यांचे वैयक्तिक मत आहे, असे मुख्यमंत्री महोदय सांगतात. मुळात वैयक्तिक मत व्यक्त करण्याचा अधिकार ॲडव्होकेट जनरल यांना नाही. यामध्ये शासनाच्या भूमिकेला महत्व आहे. माझी अशी मागणी आहे की, हा प्रश्न पुन्हा पुन्हा निर्माण होत आहे. त्यामुळे सरकार जोपर्यंत त्यांचा राजीनामा घेतला नाही किंवा त्यांना बरखास्त करीत नाही तोपर्यंत या विषयावर सभागृहात चर्चा करण्याची संधी आपण आम्हाला उपलब्ध करुन द्यावी.

**सभापती :** महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील एखादा नियम स्थगित करणे या संबंधाचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल.

यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.........

हा विषय या अधिवेशनात दिनांक 8 डिसेंबर, 2015 पासून माननीय सदस्यांनी म.वि.प.नियम 289 अन्वये, औचित्त्याच्या मुद्याव्दारे व इतर आयुधांमार्फत सभागृहामध्ये सतत मांडण्याचा प्रयत्न केला होता. त्या संदर्भात मी शासनाने निवेदन करावे, असे निदेशही दिले होते. त्या अनुषंगाने दिनांक 16 डिसेंबर, 2015 रोजी माननीय मुख्यमंत्री यांनी सभागृहामध्ये सविस्तर निवेदन केलेले आहे. परंतु, आज नियम 289 अन्वये जो काही नवीन विषय सभागृहासमोर आला आहे त्यावर शासनाने निवेदन करावे, हे सर्व लक्षात घेता माननीय सदस्यांची ही सूचना मी नाकारीत आहे.

यानंतर आज दिनांक 21 डिसेंबर, 2015 रोजी सर्वश्री धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, शरद रणपिसे, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, संजय दत्त, जयंत पाटील, वि.प.स.यांनी सकाळी 9.30 वाजता तसेच सर्वश्री धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, हेमंत टकले, वि.प.स.यांनी सकाळी 10.11 वाजता "महाराष्ट्राच्या विविध भागातून व प्रामुख्याने नांदेड येथून आलेल्या मातंग समाजाच्या मोर्चावर शुक्रवार, दिनांक 18 डिसेंबर, 2015 रोजी तसेच सहा दिवसांपूर्वी आपल्या मागण्यांसाठी आलेल्या राज्य परिचालकांच्या मोर्चावर पोलिसांनी अमानुषपणे लाठीहल्ला करणे, सलग सातव्या दिवशीही संगणक परिचालकांचे आंदोलन व उपोषण सुरूच असणे, सनदशीर मार्गाने न्याय मागण्यासाठी आलेल्या आंदोलनकर्त्यांवर गंभीर गुन्हे दाखल करण्यात येणे" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....I-1.........

**सभापती**.........

या सूचनेसंबंधी माननीय विरोधी पक्षनेत्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येत आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, यापूर्वीही संगणक परिचालकांचा नागपूर येथे मोर्चा निघाला होता आणि मोर्चाच्या दुसऱ्या दिवशी सकाळी 8.30 वाजता संगणक परिचालकांवर पोलिसांकडून लाठीचार्ज करण्यात आला. त्या दिवशी म.वि.प. नियम 289 अन्वये मी हा विषय सभागृहात उपस्थित केला होता. शासनाकडून या विषयाचे निवेदन येण्यापूर्वी मातंग समाजाने त्यांच्या मागण्यांबाबत मोर्चा काढला आणि त्या मोर्चावर देखील पोलिसांनी नागपूर येथे अमानुषपणे लाठीचार्ज केला. आज एकीकडे नागपूर शहर क्राईम कॅपिटल म्हणून ओळखले जाते. पोलीस मोर्चेकऱ्यांवर अशा पद्धतीने लाठीचार्ज करीत असतील आणि शासनाने पूर्वीच्या 289 च्या सूचनेचे देखील अद्याप निवेदन केलेले नाही. मोर्चे काढून शासनाकडे मागण्या करण्यात येत असतील आणि पोलिसांकडून आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होत असेल तर लोकशाहीमध्ये कोणत्याही राज्यकर्त्याला ही गोष्ट शोभणारी नाही. मातंग समाजाच्या मागण्या काय होत्या ? यापूर्वी नागपूर येथे मोर्चे निघाले नाहीत काय ? यापूर्वी देखील मोर्चे काढण्यात आलेले आहेत. परंतु, मोर्चावर लाठीचार्ज करणे हाच मार्ग असेल आणि शासनाने असे ठरविले असेल की, आता सामान्य माणसाचा आवाज दाबण्यासाठी लाठीचार्ज केल्याशिवाय दुसरा पर्याय नाही तर ते बरोबर नाही. शासनाने आज सभागृह स्थगित होईपर्यंत याबाबत खुलासा करावा. त्याच बरोबर लाठीचार्ज करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे, हे दखील स्पष्ट करावे.

**सभापती** : वरील विषय आजच्या कामकाज पत्रिकेत समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे. तथापि, या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने आजच निवेदन करावे.

यानंतर आज दिनांक 21 डिसेंबर, 2015 रोजी सर्वश्री अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे, सतिश चव्हाण, वि.प.स. यांनी सकाळी 10.24 वाजता "बीड जिल्ह्यातील प्राचार्यांनी विद्यार्थीनीवर बळजबरीने सामुहिक बालत्कार करण्याची घटना नुकतीच उघडकीस येणे......" माननीय विरोधी पक्षनेते, हा विषय झालेला असल्यामुळे मी ही सूचना वाचत नाही.

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.......

यानंतर आज दिनांक 21 डिसेंबर, 2015 रोजी श्री.शरद रणपिसे यांनी सकाळी 9.31 वाजता "नॅशनरल हेरॉल्ड प्रकरणी माननीय सर्वोच्च न्यायालयाने काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय नेते माननीय श्रीमती सोनियाजी गांधी व उपाध्यक्ष माननीय राहुल गांधी यांना दिनांक 19 डिसेंबर, 2015 रोजी जामीन दिला असून, या प्रकरणी केंद्र शासन सुडाचे राजकारण करीत असल्यामुळे जनमाणसात पसरलेली तीव्र नाराजी, राज्यातील जनतेमध्ये केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे गढूळ झालेले राजकारण समोर येत असून याबाबतीत जाहीर निषेध होत असून, त्यामुळे राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती" या विषयावर म.वि.प. नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. या सूचनेसंबंधी सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, दिनांक 19 डिसेंबर, 2015 रोजी काँग्रेस पक्षाच्या नेत्या आदरणीय श्रीमती सोनियाजी गांधी आणि उपाध्यक्ष माननीय श्री.राहुलजी गांधी दिल्ली न्यायालयात उपस्थित राहिले आणि नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी त्यांनी जामीन घेतलेला आहे, याची आपणा सर्वांना कल्पना आहे. हा जामीन घेताना काँग्रेस पक्षाच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, जी कायदेशीर लढाई आहे ती आम्ही कोर्टात लढू, आमचा न्यायालयावर पूर्ण विश्वास आहे आणि राजकीय लढाई आम्ही रस्त्यावर लढू.

सभापती महोदय, काल माननीय श्री.शरद पवार साहेबांचा पुणे येथे सत्कार झाला आणि ते असे म्हणाले की, देशात सध्या सुडाचे राजकारण सरु आहे. राज्यात सगळीकडे मोर्चे निघाले आहेत. नागपूर येथे देखील मोर्चा काढण्यात आला होता. मलाही पोलिसांनी ताब्यात घेतले. मला ओपन जेलमध्ये ठेवण्यात आले आणि 7.30 वाजता सोडण्यात आले. मी माननीय गृहराज्यमंत्री महोदयांना एसएमएस केला. काल जो प्रकार घडला तो मी आपल्याला सांगितला आहे. जर शांततेने मोर्चा निघत असेल, शांततेने निदर्शने होत असतील तर पोलिसांनी त्यामध्ये अतिरेकीपणा करु नये, असा माझा मुद्दा आहे. 20 फेब्रुवारी रोजी आमचे नेते न्यायालयात उपस्थित राहणार आहेत. शासनाने याबाबत काळजी घ्यावी आणि नॅशनल हेरॉल्डचा विषय कायदाबाह्य नाही. त्या

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिस........

संदर्भात (...अडथळा....) मी न्यायप्रविष्ट बाबीवर बोलत नाही. माझी शासनाला विनंती आहे की, मी काल माननीय गृह राज्यमंत्री महोदयांना काही सूचना केलेल्या आहेत. मी माननीय गृह राज्यमंत्री महोदयांचे अभिनंदनही करतो की, माझा एसएमएस मिळाल्यानंतर त्यांनी फोन केला, सर्व माहिती घेतली आणि तत्परतेने कार्यवाही केली. 20 फेब्रुवारी रोजी राज्यात अनुचित प्रकार घडू नये या दृष्टीने गृह विभागाने काळजी घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : हा विषय आजच्या कामकाजात न दाखविल्यामुळे मी ही सूचना नाकारत आहे.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत नव्याने वस्त्रोद्योग उद्यान (टेक्सटाईल पार्क) उभारणे

**मु.शी.:** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत नव्याने वस्त्रोद्योग उद्यान (टेक्सटाईल पार्क) उभारणे यासंबंधी माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन.

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

-------

..J-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** CSR (Corporate Social Responsibility) च्या माध्यमातून राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची गुणवत्ता वाढ करणे.

**मु.शी.:** CSR (Corporate Social Responsibility) च्या माध्यमातून राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची गुणवत्ता वाढ करण्यासंबंधी माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन.

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

निवेदन

(प्रेसः येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

------

...K-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी.:** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त अभिष्टचिंतन करणे

**मु.शी.:** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त अभिष्टचिंतन करण्यासंबंधी माननीय महसूल मंत्र्यांचा प्रस्ताव

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील प्रस्ताव मांडतो.

"महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात यावे."

सभापती महोदय, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री आदरणीय श्री.शरदचंद्रजी पवार यांनी वयाची 75 वर्षे पूर्ण केल्याबद्दल त्यांचे अभिष्टचिंतन करण्याच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. आदरणीय श्री.शरदचंद्रजी पवार साहेबांनी वयाच्या 75 वर्षांपैकी जवळपास 50 वर्षे राजकीय जीवन यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

.....एल.1....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथनाराव खडसे....

या सभागृहामध्ये फार कमी व्यक्तींचे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले गेले आहेत. आदरणीय श्री.शरद पवार यांचा अभिनंदनाचा प्रस्ताव मांडून त्यावर विचार व्यक्त करण्याची संधी मिळणे म्हणजे हा आमचा सन्मान नाही, तर तो सभागृहाचा सन्मान आहे. एखाद्या व्यक्तीचा सन्मान हा त्याच्या कर्तृत्वामुळे होतो, त्याच्या वक्तृत्त्वामुळे होतो, वर्तणुकीमुळे होतो, नेतृत्त्वामुळे होतो. श्री.शरद पवार यांचे एक वेगळे व्यक्तिमत्व आहे. ते एक आगळेवेगळे रसायन आहे. त्यामध्ये सगळेच गुण सामावलेले आहेत. वयाच्या 22 वर्षी ते पहिल्यांदा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. तेव्हा पासून खऱ्या अर्थाने त्यांच्या राजकीय जीवनाची सुरूवात झाली. या क्षणापर्यंत त्यांनी कधीही मागे वळून पाहिलेले नाही. त्यांनी जीवनामध्ये अनेक चढउतार अनुभवले आहे. परंतु, ते पदावर असोत किंवा नसोत त्यांच्या लोकप्रियेमध्ये कधीच घट झाली नाही. निव्वळ कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस मधील व्यक्ती किंवा अन्य राजकीय विचार असणाऱ्या व्यक्तींनीच त्यांच्यावर प्रेम केले असे नाही. राजकारणाच्या पलीकडे जाऊन त्यांच्यावर मनापासून प्रेम करणारे अनेक समर्थक व चाहते आहेत. विचारांची लढाई विचारांनीच लढली पाहिजे. राजकारणामध्ये राजकीय दृष्टीने विचार करीत असताना कधी कधी टोकाची भूमिका देखील घ्यावी लागते. परंतु, व्यक्तीगत संबंधाच्या माध्यमातून राजकीय विषय सोडून ते संबंध अधिक दृढ करणे, समाजाच्या प्रती अधिक व्यापक अशी आपुलकी निर्माण करणे हे श्री.पवार साहेबांना उत्तम जमते. ते त्यांनी त्यांच्या जीवनामध्ये करून देखील दाखवले. तो एक आदर्श आहे. वयाच्या 22 व्या वर्षापासून वाटचाल करीत असताना 38 व्या वर्षी त्यांना महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. राज्यात जेवढे म्हणून मुख्यमंत्री झालेत त्यात सर्वात तरूण मुख्यमंत्री म्हणून श्री.शरद पवार यांचा उल्लेख केला जातो. वयाच्या 38 व्या वर्षी त्यांनी या राज्याची धुरा आपल्या हातामध्ये घेतली. तेव्हापासून उत्तम प्रशासक, उत्तम राजकर्ता, दूरदृष्टी असणारा नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. त्यांनी आता पर्यंत जे जे निर्णय घेतलेले आहेत त्याचा अनुभव आपल्याला पहायला मिळालेला आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथनाराव खडसे....

सभापती महोदय, सन 1978 मध्ये श्री.शरद पवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. 1978 ते 80 या कालावधीत विविध पक्षांबरोबर राहून त्यांनी कामकाज केले. 1978 ते 80 या कालखंडामध्ये जनता पक्ष होता, आमची पुलोद आघाडी होती. आताची भारतीय जनता पार्टी आणि त्यावेळच्या जनता पार्टीतील आमचे नेते स्व.श्री.नानासाहेब उत्तमराव पाटील, श्री.हशुजी अडवाणी, श्री.दिलावरसिंगदादा पाडवी, श्रीमती प्रतिलाताई टोपले यांच्यासह त्यांनी भारतीय जनता पार्टीतील अनेक नेत्यांना संधी दिली होती. त्या कालखंडामध्ये श्री.शरद पवार यांचे नेतृत्व मान्य करून या राज्यात प्रगतीचे नवीन दालन उघडण्याचा प्रयत्न झाला होता. नंतर परिस्थिती बदलत गेली. या बदलत्या परिस्थितीशी अनुरूप राहून श्री.पवार साहेबांनी वेगवेगळे निर्णय घेतले. कधी पुलोद मध्ये होते, कधी लोकशाही आघाडीमध्ये होते. पूर्वी त्यांनी एस कॉंग्रेसची स्थापना केली, आता त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली आहे, तर कधी त्यांनी काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला होता. तसेच 1990 मध्ये वेगळ्या पद्धतीने निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला होता. सन 1993 मध्ये महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून काम करीत असताना मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटाची परिस्थिती हाताळण्यासाठी देखील त्यांनी चांगले निर्णय घेतले होते. श्री.पवार साहेबांचे नेतृत्त्व पुढे येत असताना त्यांनी घेतलेले वेगवेगळे निर्णय माझ्या समोर येतात. गेल्या अनेक वर्षांपासून माझा त्यांच्यांशी संपर्क आहे. त्यांच्या बरोबर एक सामान्य कार्यकर्ता म्हणून काम करण्याची संधी मला देखील मिळाली होती. 1980 मध्ये या राज्यामध्ये पहिल्यांदाच आंदोलन सुरू झाले. स्व.श्री.शरद जोशी यांच्या माध्यमातून शेतकरी चळवळ सुरू झाली. श्री.शरद पवार यांच्या माध्यमातून कापसाला भाव मिळावा म्हणून जळगाव ते नागपूर विधान भवन अशी पायी दिंडी काढण्याचा संकल्प त्यांनी केला. कापसाला भाव मिळावा म्हणून मोठ्या प्रमाणावर कापूस उत्पादक त्या दिंडीमध्ये सहभागी झाले होते. त्या दिंडीमध्ये एक सामान्य कार्यकर्ता म्हणून मी देखील सामील झालो होतो. त्यावेळी आमच्या मतदार संघामध्ये आम्ही जेवण ठेवले होते. त्यावेळी दिंडीला मोठा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथनाराव खडसे....

समूह होता. शेतकऱ्यांच्या हितासाठी संघर्ष करणारा नेता अशी त्यांची ओळख झाली होती. ते या दिंडीमध्ये स्वत: सामील झाले होते. पहिल्या पासून शेवटपर्यंत पायी चालणारा एक नेता अशी त्यावेळी त्यांची ओळख निर्माण झाली होती. त्यावेळी शासनाला कापसासंबंधी निर्णय घ्यावा लागला. त्याकाळी कापूस एकाधिकार खरेदी योजना होती. या योजने अंतर्गत आपण मिनिमम अणि मॅक्झिमम भाव देत होतो. यात जी ग्रेडिंग पद्धती होत त्यात बदल करण्यासंबंधी राज्य सरकारने निर्णय घेतला. त्यांचे प्रशासनासंबंधातील अनेक निर्णय सांगता येतील.

आज आपण म्हणतो की, महिलांना न्याय मिळाला पाहिजे. महिलांवर होणाऱ्या अत्याचारासंबंधातील चर्चा सभागृहात वारंवार होत असतात. महिलांना राजकारणामध्ये प्राधान्य मिळाले पाहिजे, सत्तेमध्ये प्राधान्य मिळाले पाहिजे ही भूमिका श्री.शरद पवार यांनी घेतली. महिलांसाठी पहिल्यांदा 33 टक्के आरक्षण आणि नंतर ते 50 टक्क्यांपर्यंत वाढविण्याचा निर्णय श्री.शरद पवार यानीं घेतला आहे. त्यामुळे आज महिलांना मोठ्या प्रमाणावर या राज्यात प्रतिनिधीत्व निर्माण झाले आहे.

शेतकरी आज आर्थिकदृष्ट्या मागास आहे. तो आजच आहे अशातला भाग नाही. शेतकऱ्याला शेती करताना निसर्गाचा मुकाबला हा करावाच लागतो. शेतकऱ्यांना ऊर्जितावस्था प्राप्त करून दिली पाहिजे, त्यांचे प्रश्न सुटले पाहिजे, त्याच्यावर असलेले कर्ज कमी झाले पाहिजे म्हणून केंद्रीय कृषी मंत्री असताना 70 हजार कोटी रूपयांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. हा अत्यंत दूरगामी ठरणारा असा नियम होता. देशात एवढ्या मोठ्या प्रमाणावर कर्ज कोणीही माफ केलेले नाही. कर्ज माफ करायचे किंवा नाही यासंबंधी फार मोठ्या चर्चा देखील झाल्या. परंतु, कर्ज माफ कसे केले आहे व ते योग्य कसे आहे हे त्यांनी देशभरातील सर्व शेतकरी समुहाला सांगितले. यापूर्वी तामिळनाडू राज्याने शेतकऱ्यांची कर्जमाफी केली होती. देशातील पहिली कर्जमाफी ही श्री.शरद पवार यांनी जाहीर केली होती. शेतकऱ्यांविषयी आस्था बाळगणारा

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथनाराव खडसे....

नेताच असा निर्णय घेऊ शकतो. मी 1990 पासून या सभागृहात असून श्री.शरद पवार यांनी घेतलेले अनेक निर्णय मला आठवतात. त्यांनी कोकणाला कॅलिफोर्निया करू अशी घोषणा केली होती. राज्यभरात फळबागासाठी एक धोरण असले पाहिजे यासाठी रोजगार हमी योजनेतून 100 फळबागांची लागवड करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. हा एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय होता. ज्या राज्यात आपल्याला फळे बाहेरून आणावी लागत होती त्या राज्यातील फळे आज निर्यात होत आहेत. हे त्यावेळी दूरदृष्टीने घेतलेल्या निर्णयाचे प्रतिक आहे. आज फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग आले आहेत. आज महाराष्ट्रातील फळे मोठ्या प्रमाणावर परदेशात जात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना एका अर्थाने जोडधंदा, पूरक व्यवसाय मिळाला.

M-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे .....

पूर्ण जग हादरल्यामुळे कोणाचाही तोंडून शब्द निघत नव्हता. मुंबईत बॉम्बस्फोट झाले होते तेव्हा मी आमदारा निवासाच्या खाली बसलो होतो. त्या ठिकाणी बॉम्बस्फोटाचे मोठ्ठे आवाज येत होते. पोलिसांच्या गाडयांच्या सायरनचे आवाज आणि पोलिसांच्या गाडया धावायला लागल्यामुळे आम्ही रेडिओकडे वळल्यानंतर मुंबईमध्ये सलग बॉम्बस्फोटाची कल्पना आली. परंतु बॉम्बस्फोट झाल्यानंतर ज्या दंगली उसळल्या त्या दंगली आटोक्यात येतील की, नाही. याची प्रत्येकाला चिंता वाटू लागली होती. प्रत्येक राजकीय पक्षाचा कार्यकर्ता,सामाजिक कार्यकर्ता हवालदिल झाला होता. एका बाजूला मुंबई पेटली होती आणि दुसऱ्या बाजूला दंगली पेटल्या होत्या. अशा परिस्थितीत महाराष्ट्र कधी शांत होईल अशी चिंता असतांना माननीय पवार साहेबांनी कौशल्याने व शांतपणे हे प्रकरण हाताळले, मला वाटते ही बाब त्यांच्या राजकीय जीवनात सर्वात मोठी होती. सामाजिक आणि विकासाच्या कामामध्ये जसे महत्व आहे तसेच शांतता,सुव्यवस्था ठेवण्यामध्ये तत्काळ निर्णय घेण्याची क्षमता असलेले नेते असले तर परिस्थिती किती लवकर आटोक्यात येऊ शकते याचे हे उत्तम उदाहरण आहे. यामुळे मुंबई लवकर सावरली. त्यांच्या जीवनात जे माईल्स स्टोन म्हणतो त्यातील हा एक माईल्स स्टोन आहे.

सभापती महोदय, त्याच कालखंडात किल्लारी येथे भूकंप झाला. ज्या प्रमाणे मुंबई बॉम्बस्फोटाने हादरली होती त्याच प्रमाणे भूकंपामुळे मराठवाडा हादरला होता. त्यावेळेस समितीच्या दौऱ्याच्या निमित्ताने आम्ही केदारनाथला जाण्यसाठी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला आलो होतो. त्यावेळेस भूकंपात 500 लोक मृत्युमुखी पडले, 5000 लोक मृत्युमुखी पडले अशा बातम्या येऊ लागल्या. हा भूकंप किती गावांमध्ये झाला होता याची माहिती मिळत नव्हती. या भूकंपामध्ये एकंदर किती लोकांचा मृत्यू झाला याची माहिती मिळत नव्हती. त्यावेळेस अफवांचा बाजार सुरु होता. अशा कालखंडात माननीय पवार साहेबांनी रेडिओवरून आवाहन केले होते. भूकंपाची परिस्थिती हाताळण्याच्या संदर्भात त्यांना पूर्वानुभव नव्हता.आपल्या राज्यात किल्लारीचा भूकंप पहिल्यांदा घडला होता. अशा वेळी लोकांना दिलासा देणे, स्थलांतरित करणे, आरोग्याच्या सुविधा देणे अशा अनेक बाबतीत त्यांनी तातडीने निर्णय घेतल्यामुळे अनेकांचे संसार सावरले गेले, लोकांचे मनोबल वाढले, सरकार आपल्या पाठीशी उभे आहे अशी भूमिका त्या माध्यमातून निर्माण झाली.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे .....

माननीय पवार साहेबांच्या जीवनात प्रदीर्घ अनुभव आहेत. राजकीय विषय सोडून दिला तर सामाजिक जीवनात काम करीत असताना त्यांना प्रदीर्घ अनुभव आहेत. माननीय अटलजी साहेबांनी यासंदर्भात नोंद घेतली होती. ज्यावेळेस गुजरातमध्ये भूकंप झाला होता त्यामध्ये मोठयाप्रमाणात जिवीत हानी झाली होती. त्यावेळेस सर्वात अनुभवी म्हणून माननीय अटलजी यांनी गुजरातच्या भूकंपाची परिस्थिती हाताळण्याची जबाबदारी माननीय पवार साहेबांना दिली आणि त्यांनी अत्यंत कार्यक्षमतेने भूकंपाची परिस्थित्‍ी हाताळली. माननीय पवार साहेबांमुळे गुजरात लवकर सावरु शकले. किल्लारी भूकंपाचा अनुभव माननीय पवार साहेबांना गुजरातमध्ये कामी आला.

माननीय पवार साहेबांनी महाराष्ट्राच्या विकासात फार मोठ्या प्रमाणात चालना दिलेली आहे. परंतु अशा कालखंडात जे निर्णय घेतले त्यामुळे समाजामध्ये चांगल्या प्रकारचे स्वास्थ नीट नेटके राहू शकले.

सभापती महोदय, सहकार हा आत्मा आहे. आर्थिक दृष्टया जर राज्य मजबूत व्हावयाचे असेल तर सहकारी चळवळ विस्तारली पाहिजे, वाढली पाहिजे यासाठी आपल्या राज्यात पूर्वीपासून प्रयत्न सुरु होते. आपल्या राज्यात सहकार चळवळ मजबूत होत असताना सहकाराच्या माध्यमातून शेतीवरील प्रक्रिया उद्योग वाढले पाहिजे यासाठी माननीय पवार साहेबांनी खूप कार्य केलेले आहे. माननीय पवार साहेबांनी प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याचे धोरण या राज्यात पहिल्यांदा आणले होते. सहकाराच्या माध्यमातून बँका,सुत गिरण्या,पतपेढया इ.चालविल्या जात होत्या. परंतु राज्यातील शेतीचे उत्पादन वाढविणे, ते परदेशात निर्यात करण्याचे काम माननीय पवार साहेबांनीच केलेले आहेत. त्यांनी द्राक्ष,ऊस,ज्वारीवर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना चालना दिली होती. आज आपल्या महाराष्ट्राच्या विकासामध्ये आणि उत्पन्नामध्ये भरीव कार्य माननीय पवार साहेबांनी केलेले आहे.

सभापती महोदय, मी त्यावेळेस विरोधी पक्षात होतो. माननीय पवार साहेबांनी त्यावेळेस द्राक्षापासून वाईन तयार करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यावेळी यासंदर्भात प्रचंड टीका झाली होती. परंतु वाईन ही दारु नाही असे पवार साहेबांनी ज्यावेळेस सांगितले त्यावेळी या विषयावर आणखी मोहळ उठल्‍ होते. जर शेतकऱ्यांच्या मालाला बायप्राडक्ट्सची जोड दिली नाही, उप

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे .....

पदार्थ बनविण्यास जोड दिली नाही तर शेतकऱ्याला त्याचा धंदा परवडणार नाही याची कल्पना माननीय पवार साहेबांना होती. त्यावेळेस त्यांनी वाईन उत्पादकाला प्रोत्साहन दिल्यामुळे आज नाशिक जिल्हा वाईनच्या संदर्भात प्रगत झाला. आपल्याकडील वाईन आता परदेशात जाऊ लागली आहे. त्यांनी या निर्णयाच्या माध्यमातून वेगळी सुरुवात केली होती. समाजामध्ये एखाद्या गोष्टी बाबत चीड असते. दारु म्हटली की, लोकांच्या भावना वेगळया असतात. अशा परिस्थिती त्यांनी लोकांना वाईनच्या विषयाकडे वळवून त्यांनी वाईनला चालना देण्याचे काम केले.

सभापती महोदय, माननीय पवार साहेबांनी शेतीच्या संदर्भात अनेक निर्णय घेतले होते. महिला धोरण, फळ प्रकिया उद्योग,क्रीडा धोरण त्यांनी राबवले. त्यांचे क्रीडा धोरण केवळ क्रिकेटपुरते मर्यादित राहिलेले नाही. मी गेल्या 20-25 वर्षापासून त्यांनी घेतलेल्या निर्णयाचा साक्षीदार आहे, विरोधी पक्षाचा सदस्य म्हणून टिकाकारही आहे. त्या कालखंडात आम्ही माननीय पवार साहेबांवर टिका केली होती. परंतु त्या टीकेला समर्पक उत्तर देण्याची क्षमता त्यांच्यामध्ये होती व वेळीच शंकेचे समाधान करण्याची क्षमता त्यांच्यात होती व त्यांना महाराष्ट्राला वेगळया दिशेने न्यावयाचे आहे हे दिसून येत होते. महाराष्ट्रात काम करतांना त्यांनी महाराष्ट्रासाठी अनेक निर्णय घेतले परंतु देशाचे कृषी खाते सांभाळत असताना इतके प्रदीर्घकाळ कृषीमंत्री म्हणून काम करण्याची संधी पवार साहेबांव्यतिरिक्त दुसरी कोणालाही मिळालेली नाही. त्यांनी कृषी क्षेत्राला, प्रक्रिया उद्योगाकडे जास्त जोर दिला होता. कृषीमंत्री असतांना त्यांच्याकडे ग्राहक संरक्षण,अन्न व नागरी पुरवठा खाते सुध्दा होते. कृषीला अधिक न्याय देता आला पाहिजे म्हणून त्यांनी स्वतःहून मला कृषी सोडून दुसरा भार नको अशी विनंती त्यांनी पंतप्रधानांना केली होती. त्यामुळे ते कृषी क्षेत्रावर जास्त जोर देऊ शकले. त्यांच्यामुळेच आपल्याकडे कृषीमध्ये परदेशी तंत्रज्ञान येऊ शकले. 20-25 वर्षापासून मी शेतीकडे जवळून पाहतो आहे. शेतीमधील बदल आम्ही अनुभवतो आहोत. नवीन आशा आणि नवीन दिशा शेतीमध्ये अनुभवत असताना आपण शेतीच्या पुढच्या टप्प्यात जात आहोत. त्या कालखंडात प्रक्रिया उद्योगाबरोबर फुलांची शेती,पॉली हाऊस, शेडनेटचे प्रकार आता वाढू लागले आहे. पवार साहेब कृषी मंत्री होते त्यावेळेस त्यांनी तात्पुरते निर्णय घेतले होते आता ते निर्णय व्यापक झाले आहेत. संस्थांच्या माध्यमातून आधुनिक पध्दतीची शेती, आधुनिक डेअरी

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे .....

व्यवसाय या सर्वामधून रोजगार कसा निर्माण होईल यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. बारामती येथे जेव्हा डेअरी व्यवसाय सुरु झाला तेवहा मी त्यांच्यावर टिका केली होती. परंतु मी बारामती येथे स्वत: जाऊन माहिती घेतली तेव्हा हजारो लोकांच्या हाताला काम मिळत आहे हे मला दिसून आले. दूध उत्पादकांना रोजगार मिळावा असा त्यांचा उद्देश होता. त्याहीपेक्षा बरोजगारांना काम मिळावे असा त्यांचा उद्देश होता. ज्या नोकरांना आपण सरकारी सेवेत सामावून घेऊ शकत नाही अशांना रोजगार देण्यासाठी पर्याय उपलब्ध झाले पाहिजे, उद्योग उभे केले पाहिजे या निमित्ताने डेअरी व्यवसाय,फूल शेतीचा व्यवसाय,कृषी विद्यापीठांची रचना त्यांनी केली. शेती व्यवसाय तोटयातून नफ्यात आणण्याच्या संदर्भात त्यांनी प्रयत्न केलेले आहे. निसर्गाशी संघर्ष करणारा शेतकरी सातत्याने तोटयात जातो आहे, कर्जबाजारी होतो आहे याकडे त्यांचे लक्ष होते व त्यातून त्याला बाहेर काढण्यासाठी त्यांनी जीवापाड प्रयत्न केले.

N-1/........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

कर्जबाजारी होते, परंतु एक नवीन धोरण घेतले पाहिजे ही भावना त्यांनी सातत्याने बाळगळी.

सभापती महोदय, आदरणीय श्री.शरद पवार साहेबांचे सर्वच राजकीय पक्षांसोबत चांगले संबंध होते. त्यांच्यावर कधी टीका झाली तर त्यांनी ती हसतखेळत स्वीकारली. असा एकही नेता नाही की ज्यांचे श्री.शरद पवार यांचेसोबत जवळीचे नाते नाही. या आपुलकीच्या नात्यातून त्यांनी मग हक्काचे नाते निर्माण करून प्रसंगी अधिकार वाणीने सांगण्याची, अधिकार वाणीने सूचना करण्याची प्रतिमा आपल्या स्वतःच्या कर्तृत्वातून आणि वर्तणुकीतून निर्माण केली. विरोधकांना सुद्धा आपण असे असे केले पाहिजे असे ते सांगायचे. आता आम्ही सत्तेमध्ये आहोत. काही धोरणांच्या बाबतीत मला श्री.शरद पवार साहेबांचे फोन येतात आणि एकनाथराव, तुम्हाला हे चुकते असे वाटत नाही काय असे विचारतात. त्यावेळी आपले काही चुकले असेल तर ते आपण दुरूस्त करतो. आजही आम्ही तशी दुरूस्ती करतो.

सभापती महोदय, माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी असे म्हटले होते की, आम्ही श्री.शरद पवार साहेबांशी आठवड्यातून बोलतो. त्यावेळी कित्येकांना असे वाटले की, हे काय चालले आहे ? श्री.शरद पवार साहेबांच्या सल्ल्याने केंद्र सरकारचा कारभार चालला आहे की काय ? पण हा सल्ला राजकीय नाही. विकासाच्या दृष्टीने आणि हिताच्या दृष्टीने सल्ला असेल आणि तो योग्य असेल तर तो स्वीकारला पाहिजे. असे अनेक विषय आहेत की, जे राजकारणाच्या पलीकडचे आहेत. आपण राजकीय दृष्टीकोनातून पाहिले तर अनेक अर्थ निघू शकतील. श्री.शरद पवार साहेबांनी स्वतःहून सूचना केली आणि आपली खरोखर चूक असेल तर ती दुरूस्त करण्याची संधी सरकारमध्ये असताना आपल्यासारख्याला मिळाली याचा अधिक आनंद होतो. आम्हाला त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळाला पाहिजे.

सभापती महोदय, मी आजचीच गोष्ट सांगतो. ट्रस्टसंबंधी एक विधेयक येत आहे असे त्यांनी ऐकले. आपण खाजगी ट्रस्टच्या कारभारात लक्ष घालत नाही. ट्रस्टचा विषय चॅरिटी कमिशनर यांचेकडे दिलेला आहे. त्यांचे अधिकार अबाधित ठेवलेले आहे. श्री.शरद पवार साहेबांनी मला विचारले की, ट्रस्टच्या संदर्भात सरकारचा सरळ हस्तक्षेप असू शकेल अशा स्वरूपाचे विधेयक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

सरकार आणत आहे काय ? मी त्यांना सांगितले की, मला अशी काही कल्पना नाही. पण मी माहिती तपासून घेतो. त्यांनी मला सांगितले की, या संदर्भात माझे मत असे आहे की, जे योग्य आणि चांगले चालले असेल, ज्यांनी मेहनतीने आणि कष्टाने ट्रस्ट उभा केला असेल तर तेथे शासनाचा हस्तक्षेप नसावा अशा स्वरुपाच्या काही सूचना आहेत, हस्तक्षेप नसावा परंतु कायद्याच्या चौकटीच्या माध्यमातून जे कोणी ट्रस्ट चालवित असतील तर त्यांच्यावर नियंत्रण असावे.

सभापती महोदय, माननीय श्री.शरद पवार साहेबांचा सहकाराचा अभ्यास अतिशय चांगला आहे. त्यांचा सर्व क्षेत्रातील अभ्यास चांगला आहे. परंतु कालानुरुप ज्या काही नवीन सुधारणा करावयाच्या असतील, काही नवीन बदल करायचे असतील तर त्या संदर्भात त्यांच्या सूचना अमोल आहेत. कोण सरकामध्ये आहे, कोण विरोधी पक्षामध्ये आहे, यापेक्षा सूचना किती महत्वाच्या आहेत, किती मोलाच्या आहेत हे महत्वाचे आहे. कारण कोणताही कायदा दूरगामी परिणाम करणारा असेल याची जाण ठेवूनच कायदे तयार झाले पाहिजेत, अशी त्यांची जी भावना आहे, ती भावना या विधिमंडळामध्ये काम करणाऱ्या प्रत्येकाने अंगिकारली पाहिजे.

सभापती महोदय, एक नेता, एक राज्यकर्ता, एक व्यक्तिगत संबंध असलेला मित्र, असे अनेकांशी संबंध असू शकतात, एखाद्या व्यक्तीचे मत वेगळे असू शकते. आपण राजकारणामध्ये कधी कठोर टीकाटिप्पणी करीत असतो. कोणाला हिटलर आवडतो. कोणाला नेपोलियन आवडतो अशी व्यक्तिमत्वे असू शकतात. राजकारणामध्ये अशा मोजक्या व्यक्ती आहेत की, ज्यांनी राज्याला, देशाला पुढे नेण्याचे काम केलेले आहे. ज्यांनी मार्गदर्शक म्हणून तहहयात आयुष्य घालविले, काही निर्णय चुकले असतील किंवा नसतील हे मला माहीत नाही, तेवढे आपण मोठेही नाही. परंतु जे काही चांगले असेल ते स्वीकारुन वाटचाल करणे हे राजकारणाच्या पलीकडे घेऊन जाण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये अजून खूप निर्णय व्हावयाचे आहेत. या आधी खूप निर्णय झालेले आहेत. माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या हातून असे काही निर्णय झालेले आहेत की, त्यामुळे राज्याला नवीन चालना आणि दिशा मिळालेली आहे. राज्य पुढे जावे या दृष्टीकोनातून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

त्यांच्या मार्गदर्शनाची आम्हाला अजूनही गरज आहे. आज ते 75 वर्षात पदार्पण करीत आहेत. 75 वर्षे हा जीवनातील महत्वाचा टप्पा आहे. इतक्या वर्षाचा प्रदीर्घ अनुभव, त्यांची ती वाटचाल समाजातील अनेक पिढयांना मार्गदर्शक ठरेल.

सभापती महोदय, माननीय श्री.शरद पवार साहेब देशाचे पंतप्रधान व्हायला पाहिजे होते असे कुणीतरी सांगितले. कोणी कोण व्हावे हा नशिबाचा भाग आहे. परंतु त्यासाठी पात्रता हा एक भाग आहे. या पात्रतेमध्ये नाव घेऊन त्यामध्ये बसविले जाते हे कमी नाही. आपण देशामध्ये असे अनेक नेते पाहिले, त्यांनी वर्षानुवर्षे काम केले,परंतु त्यांचे नाव कधी पंतप्रधान पदाच्या शर्यतीमध्ये देखील पोहोचले नाही. परंतु श्री.शरद पवार साहेबांचे नाव पंतप्रधान पदाच्या शर्यतीमध्ये सातत्याने राहिले.

सभापती महोदय, श्री.शरद पवार साहेबांनी राजकीय जीवनामध्ये सर्वच क्षेत्रांमध्ये काम केलेले आहे. मला वाटते एखाद्या पदासाठी क्वॉलिफायची आवश्यकता असते त्याप्रमाणे श्री.शरद पवार साहेब हे पंतप्रधान पदासाठी क्वॉलिफाय नेतृत्व आहे. शेवटी राजकीय खेळ हा मतांच्या जोरावर असतो. ज्या पक्षास बहुमत त्या पक्षाचे सरकार असते. कधी कधी कठोर टीकाटिप्पणी झ ाली की माणूस अस्वस्थ होतो. परंतु श्री.शरद पवार साहेबांवर कितीही कठोर टीकाटिप्पणी झाली तरी त्यास हसतखेळत सामोरे जाऊन समोरच्या व्यक्तीला काय, कसे काय चालले आहे असे विचारणार, हा त्यांच्या मनाचा फार मोठेपणा आहे. आकस ठेवून वागणारे नेते आणि मनामध्ये असलेली खंत बोलून दाखवून त्यादृष्टीने मार्गदर्शन करणारे नेते वेगळे, त्यांनी खुल्या मनाने मार्गदर्शन करण्याचे काम केलेले आहे. मी त्यांना दीर्घायुष्य चिंतितो. त्यांचे आम्हाला अशाच पद्धतीने मार्गदर्शन मिळत राहील अशी अपेक्षा व्यक्त करतो. श्री.शरद पवार साहेबांनी 75 वर्षे साजरी केलेली आहेत, त्यांनी आणखी 100 वर्षापर्यंत जावे आणि 100 वर्षापर्यंत जात असताना त्यांना चांगले निरायम आयुरारोग्य लाभावे, अशी ईश्वराकडे प्रार्थना करतो.

सभापती महोदय, खूप बोलण्यासारखे विषय आहेत. गेल्या अनेक वर्षापासून त्यांच्याशी संबंध आलेला आहे. त्यांच्या सोबत अनेक केलेल्या बैठका केलेल्या आहेत. त्यांच्या सोबत राहिलो आहे. विरोधी पक्षात असताना आणि सत्तेमध्ये असतानाही त्यांचे मार्गदर्शन मिळालेले आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

सभापती महोदय, माननीय श्री.शरद पवार साहेबांनी मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा जटील प्रश्न सोडविला. या नामांतरणास अनेक लोक विरोध करीत होते. महाराष्ट्रात मराठवाडा विद्यापीठास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचा प्रश्न वर्षे दीड वर्षे धगधगत होता. रक्तपात, हल्ले, ॲक्ट्रॉसिटीच्या केसेस यामुळे उभा महाराष्ट्र दीड वर्षे अस्वस्थ होता. या प्रश्नाच्या माध्यमातून दूरी वाढत जाईल की काय असे चित्र निर्माण झाले होते. महाराष्ट्राचे विभाजन होईल की काय असे चित्र होते. पण त्या कालखंडामध्ये दोन्ही बाजुशी संपर्क साधून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामकरणाचा संकल्प केला त्यास दोन्ही समाज टाळ्या वाजवून स्वागत करायला लागला, हा एक आगळावेगळा निर्णय आहे. त्यामध्ये दोन्ही समाजाचे समाधान झाले. विद्यापीठाच्या नावामध्ये "मराठवाडा" शब्द आला आणि "डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे" नाव देखील आले. हे कुशल राज्यकर्त्यांचे जीवंत उदाहरण आहे. त्यावेळी फार मोठा संघर्ष झाला होता. हा संघर्ष मी अनुभवला होता. नामांतराच्या चळवळीमध्ये स्व.गोपीनाथ मुंडे आणि स्व.प्रमोद महाजन 22 दिवस तुरुंगात होते. त्यावेळी राज्यात काय परिस्थित्ी होती त्याची आपणा सर्वांना माहिती आहे. परंतु अशा परिस्थितीतून त्यांनी मार्ग काढला. मला वाटते आज अशा कुशल नेतृत्वाची आवश्यकता आहे. त्यांचे राज्यातील नेतृत्व संपले. आता दिल्लीमध्ये अशा मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. ते तशी मदत करीत आहेत. मी त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देतो. मी मनापासून पुनश्च एकदा त्यांचे अभिनंदन करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

-------

.....O-1

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय सभापती महोदय, देशाचे नेते आदरणीय श्री.शरदचंद्र पवार साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने, सभागृहाचे नेते माननीय श्री.एकनाथराव खडसे यांनी जो अभिष्टचिंतनाचा प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आणि राजकीय जीवनात वावरणाऱ्या व्यक्तीच्या आयुष्यात वेगवेगळे क्षण येत असतात. या सभागृहाने काही मोजक्याच व्यक्तींच्या अभिनंदनाचे प्रस्ताव संमत केलेले आहेत. सभापती महोदय, 25 वर्षांपूर्वी माननीय श्री.शरद पवार साहेबांचे सुवर्ण महोत्सवी वर्ष झाले. त्यांच्या आयुष्याची 50 वर्षे पूर्ण झाली होती. त्यावेळी सुध्दा नागपूरच्याच अधिवेशनामध्ये विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहांमध्ये माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या अभिष्टचिंतनाचा ठराव मांडण्यात आला होता. आज मी अत्यंत अभिमानाने आणि स्वाभिमानाने सांगू इच्छितो की, त्या ठरावाची आज द्विरुक्ती होत आहे. या संदर्भातील भावना आम्हा सर्वांच्याच मनात खूप मोठ्या प्रमाणावर आहेत.

सभापती महोदय, माननीय श्री.शरद पवार साहेबांसारख्या लोकोत्तर नेतृत्वाच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सभागृहात कितीही दिवस चर्चा केली तरी तो वेळ अपुरा पडेल, एवढे त्यांचे कार्य मोठे आहे. पुरोगामी विचाराच्या घरात जन्मलेले श्री.शरद पवार साहेबांचे नेतृत्व होते. त्या कालावधीत म्हणजेच विद्यार्थीदशेत त्यांनी आपल्या कामाला सुरुवात केली. त्या कालखंडात शेती, कष्ट, मेहनत आणि पुरोगामी विचाराचे संस्कार या मुशीतून त्यांच्या आयुष्याची सुरुवात झाली.

सभापती महोदय, काटेवाडी परिसरात जन्माला आलेले नेतृत्व बारामतीला शिक्षणासाठी गेले. त्यावेळी घरची आर्थिक स्थिती, त्यांच्या मातोश्रींनी त्यांच्यावर केलेले संस्कार, वडिलांची शिस्त, पुरोगामी विचार या सर्वांचेच बाळकडून त्यांना त्यांच्या आयुष्याच्या सुरुवातीलाच मिळाले. त्यामुळे विद्यार्थीदशेत त्यांच्या नेतृत्वाचे वेगवेगळे पैलू घडावयास लागले. ज्यावेळी गोवा मुक्ती संग्रामाचे आंदोलन झाले त्यावेळी ते अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी येथे शिकत होते. त्या कालावधीत सुध्दा त्यांनी मोर्चा काढला, अहमदनगर बंद केले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. साखर कारखाना सुध्दा एक दिवस बंद ठेवला पाहिजे असे विद्यार्थी दशेत असणाऱ्या, बालवयात



असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

असणाऱ्या एका चळवळीतील नेतृत्वाने सांगितले. त्यावेळी सहकार चळवळीत काम करणाऱ्या मोठ्या नेतृत्वाला प्रश्न पडला की, साखर कारखाना कशासाठी बंद ठेवायचा ? त्यावेळी माननीय श्री.शरद पवार साहेबांनी विद्यार्थी दशेत असताना या संदर्भात युक्तिवाद केला. तो युक्तिवाद राज्याच्या हितासाठी किती मोठ्या प्रमाणावर प्रगल्भ असू शकतो याचे उदाहरण त्यांनी त्या कालखंडात घालून दिले. तद्‌नंतर महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी ते पुणे येथे गेले. पुणे परिसरात त्यांनी एका बाजूला विद्यार्थी चळवळ संघटीत करीत असतानाच दुसऱ्या बाजूला उपलब्ध असलेल्या प्रत्येक क्षेत्रात आपण ज्ञान घ्यावे, त्या त्या क्षेत्रात असलेल्या प्रत्येक व्यक्तिमत्त्वाच्या जवळ जावे अशी भूमिका स्वीकारली. पुण्याच्या शनिवारवाड्यावर आयोजित केलेल्या मोर्चात त्यांनी अवघ्या 20 वर्षाचे असताना भाषण केले. त्यांचे ते भाषण संपूर्ण पुण्यावर आपले विचार प्रभावित करणारे ठरले. यातून युवक काँग्रेसचा कार्यकर्ता हा साहेबांच्या रुपाने त्या कालावधीत घडला. त्याच दरम्यान पक्षाच्या संघटनेत काम करण्याची संधी त्यांना मिळाली.

सभापती महोदय, 1957 मध्ये डाव्या विचारसरणीच्या माध्यमातून शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली. माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या घरात शेतकरी कामगार पक्षाचे विचार मोठ्या प्रमाणावर असताना त्यांनी काँग्रेस पक्षाच्या विचारांचा अनुनय करण्याचे मनापासून ठरविले. स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या मनावर मोठ्या प्रमाणात पडला. 1957 च्या निवडणुकीत त्यांचे वडील बंधू शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने उभे राहिले असताना, आपल्या बंधूच्या विरोधात प्रचार करण्याचे धाडस त्यांनी दाखविले. यासाठी घरच्या लोकांनी सुध्दा त्यांना मोकळीक दिली आणि त्यांनी काँग्रेस पक्षाचा उमेदवार निवडून आणण्यासाठी अपार मेहनत घेतली. युवक काँग्रेसचा कार्यकर्ता, युवक काँग्रेसचे सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष, विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने त्यांची देश पातळीवर झालेली निवड महत्त्वाची होती.

सभापती महोदय, आज आम्हाला देशाच्या बाहेर शिष्टमंडळात जाण्याची संधी मिळाली तर खूप मोठा आनंद होतो. पण 1960-65 च्या दशकात पंडित जवाहरलाल नेहरु यांनी देशाचे नेतृत्व जगभरात प्रभावित केलेले असताना, या देशातील युवक चळवळीतील प्रतिनिधींना जगाच्या राजकारणाचा आणि समाज कारणाचा अभ्यास करण्याकरिता, परदेशात युवक प्रतिनिधी पाठविण्याचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

धोरण केंद्र सरकारच्या माध्यमातून स्वीकारले. त्यावेळी यासाठी माननीय श्री.शरद पवार साहेबांची

..3..



श्री.सुनील तटकरे....

निवड झाली. ते दशक 1960-65 चे होते. युवक प्रतिनिधी म्हणून ते जगाच्या वेगवेगळ्या देशाच्या प्रमुखांच्या सहवासात 15-15 दिवस राहिले. त्या त्या देशांतील वेगवेगळ्या गोष्टींचे आकलन करुन घेणे, तेथील पिकांची माहिती घेणे, तेथील लोकशाही पध्दतीची माहिती घेणे, अध्यक्षीय पध्दतीचा मोठ्या प्रमाणावर विचार करणे अशा अनेक बाबी केल्या. आपल्या प्रशिक्षणाची वेळ संपल्यानंतर 15 दिवस त्या राष्ट्र प्रमुखांच्या कार्यालयात राहून पी.आर.ओ. म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली. देशातील मोजक्याच नेत्यांना त्या कालावधीत अशा प्रकारची संधी मिळाली होती, त्यापैकी माननीय श्री.शरद पवार साहेब हे एक होत.

सभापती महोदय, 1967 साली म्हणजे आपल्या वयाच्या 48 व्या वर्षी महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत उमेदवारी मिळण्यासाठी सुध्दा त्यांना संघर्ष करावा लागला. त्यांना आपल्या राजकीय जीवनात स्व.यशवंतराव चव्हाण यांचा परिसस्पर्श मोठ्या प्रमाणावर लाभला. आयुष्यातील विधानसभेची पहिली निवडणूक लढविण्यासाठी त्यांना पक्षांतर्गत संघर्ष करावा लागला. काँग्रेस पक्षाचा वैचारिक पाया एका बाजूला समजून घेत असताना, दुसऱ्या बाजूला स्व.यशवंतराव चव्हाण यांचे उमेदवारी मिळण्यासाठी त्यांना पूर्ण आशिर्वाद मिळाले. बारामतीच्या विधानसभा निवडणुकीत स्थानिक उमेदवार निवडून येत नव्हता. माननीय श्री.शरद पवार साहेबांना बारामती मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली. त्यावेळी इच्छुक असलेल्या सर्वच उमेदवारांनी सांगितले की, श्री.शरद पवार हे बारामतीतून पराभूत होतील. त्यावेळी स्व.यशवंतराव चव्हाण म्हणाले होते की, विधानसभेच्या एकूण 270 जागा आहेत. सर्व जागांवर काँग्रेस पक्ष निवडून येईल असे नाही. यातील 70-80 जागांवर उमेदवार पराभूत होत असतील तर त्यामध्ये बारामतीची सुध्दा एक जागा असू शकते. एवढे सर्व होऊनही त्यांनी माननीय श्री.शरद पवार साहेबांना उमेदवारी दिली पाहिजे अशा प्रकारची आग्रही भूमिका घेतली. त्या निवडणुकीत माननीय श्री.पवार साहेबांनी अभूतपूर्व असे यश मिळविले. सभापती महोदय, माननीय श्री.शरद पवार साहेबांनी आपल्या 48 वर्षाच्या राजकीय कारकिर्दीत 14 निवडणुका लढविल्या. मग त्यामध्ये विधानसभा असो, विधानपरिषद असो किंवा लोकसभा असो. परंतु ते एकाही निवडणुकीत अपराजित झाले नाहीत. देश पातळीवरील प्रदीर्घ

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

काळ विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका लढवित अपराजित राहणारे एकमेव नेतृत्व म्हणून माननीय श्री.शरद पवार साहेब यांचा उल्लेख मी अभिमानपूर्वक करतो..

..4..



श्री.सुनील तटकरे....

सभापती महोदय, विधानसभेच्या निवडणुकीत यश मिळाल्यानंतर त्यांनी संसदीय कार्य पध्दतीचा अभ्यास केला पहिजे ही भूमिका स्वीकारली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संसदीय लोकशाहीचा पाया अतिशय उत्तम पध्दतीने घडविला होता. त्यामुळे त्यांनी विधानसभा व लोकसभा सभागृहांचा विनियोग व वापर केला. त्यांनी प्रत्येक संसदीय आयुधाचा वापर करुन मतदारसंघातील प्रश्न सोडवित असतानाच, महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातील प्रश्न सोडविण्यासाठी बांधिलकीच्या माध्यमातून त्यांनी केलेले काम मोठ्या प्रमाणावर आहे. आम्ही ज्या संघटनेत काम करतो, त्या संघटनेचे ते प्रमुख आहेत. त्यांनी सुध्दा एके काळी संघटनेत काम केले. संघटनेच्या मुख्य कार्यालयात वर्षानुवर्षे 10 बाय 10 च्या खोलीत राहून, संघटनेचे काम करणारे दुर्मीळ असे व्यक्तिमत्त्व म्हणून माननीय श्री.शरद पवार साहेबांचा महाराष्ट्राच्या राजकारणात निश्चिपणे उल्लेख करता येईल. संघटनेत काम करीत असताना ते महाराष्ट्रभर एस.टी. व रेल्वेने प्रवास करायचे. ते कधीही विश्रामगृह किंवा हॉटेलमध्ये नव्हे तर कार्यकर्त्यांच्या घरात उतरायचे. त्या कार्यकर्त्यांच्या घरातील मीठ-भाकरी खायचे. त्याच्या जवळची समरसता दाखविण्याची मानसिकता त्यांनी रुजविली. विधानसभेमध्ये जाण्यापूर्वीच त्यांना चांद्यापासून बांद्यापर्यंत असलेला संपूर्ण महाराष्ट्र समजून घेण्याचे भाग्य लाभले. त्यांनी अतिशय उत्तमप्रकारे अखंडपणे मेहनत घेतली. त्यामुळे त्यांना महाराष्ट्र त्याच कालावधीत समजला.

सभापती महोदय, 1972 मध्ये विधानसभेवर त्यांची दुसऱ्यांदा निवड झाली. वसंतराव नाईक यांनी राज्याचे नवीन मंत्रिमंडळ स्थापन केले. त्यावेळी त्यांना हक्काने राज्य मंत्रिमंडळात संधी मिळाली. त्यावेळी त्यांचे वय अवघे 32 वर्षे होते. म्हणजे 27 व्या वर्षी ते विधानसभेत निवडून आले आणि 32 व्या वर्षी त्यांचा राज्य मंत्रिमंडळात समावेश झाला. आज राज्यमंत्र्यांना किती अधिकार आहेत या बद्दल वेगवेगळे प्रवाद असतील. त्यावर मी बोलणार नाही. परंतु त्यावेळी वसंतराव नाईक साहेबांनी माननीय श्री.शरद पवार साहेबांकडे गृह, अन्न व नागरी पुरवठा आणि सामान्य प्रशासन हे विभाग दिले. त्यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे राज्यमंत्री म्हणून, राज्याच्या वरिष्ठ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधिकाऱ्यांच्या नस्त्या किंवा गोपनीय अहवाल माननीय श्री.शरद पवार साहेबांकडे यायचे. माननीय श्री.शरद पवार साहेबांनी मोरारजी देसाई, स्व. यशवंतराव चव्हाण, स्व.वसंतदादा पाटील

..5..

21-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) O-5

SJB/ MMP/ AKN/ 15:20

श्री.सुनील तटकरे....

यांच्यापासून ते वसंतराव नाईक यांच्यापर्यंत वेगवेगळ्या फाईलवर लिहिलेले शेरे आत्मसात करून घेण्याचा प्रयत्न केला.

...पी..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

ही नेतेमंडळी ज्या पध्दतीने राज्यकारभार करीत होती, तो राज्यकारभार जर मला पुढच्या कालावधीत करायचा असेल तर त्याचे शिक्षण मी आता घेण्याची एक संधी मला चव्हाण साहेबांच्या रूपाने मिळाली आहे, त्या संधीचे सोने केले गेले पाहिजे असे त्यांना वाटले. या भूमिकेने सन 1972 ते सन 1975 या कालावधीमध्ये त्यांनी काम केले. सन 1975 ला ते या राज्याचे कृषी मंत्री राहिले. आज आपण कृषी मंत्री आहात. सन 1975 च्या आसपास शरद पवार साहेब राज्याचे कृषी मंत्री राहिले. त्यावेळी सुध्दा महाराष्ट्रातील कृषी मालाचे उत्पादन होत नव्हते. सन 2004 मध्ये त्यानी देशाच्या कृषी मंत्री पदाची सूत्रे हातामध्ये घेतली, त्यावेळी आपण अन्नधान्य आयात करीत होतो. सन 1975 च्या आसपास त्यांनी महाराष्ट्राच्या कृषी मंत्री पदाची सूत्रे हातामध्ये घेतली, त्यावेळी महाराष्ट्राला इतर राज्यांतून धान्य आणावे लागत होते आणि महाराष्ट्रातील जनतेची भूक भागवावी लागत होती. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत फिरत शेतकऱ्यांशी जवळीक साधत महाराष्ट्राच्या प्रादेशिक भागामध्ये जाऊन त्या-त्या ठिकाणी असलेल्या जमिनीचा पोत समजून घेत तेथील शेतकऱ्यांच्या व्यथा समजून घेत त्या दृष्टीकोनातून कृषी खात्याच्या मार्फत आणि राज्य सरकारच्या वतीने खूप मोठ्या प्रमाणात कशा चांगल्या योजना आणता येतील याच सर्वंकष पध्दतीचा प्रयत्न त्यांनी त्या कालावधीत केला. मला आठवते की, सन 1975 च्या आसपास मी कोकणातून रायगड जिल्ह्यातून निवडून येतो, कुलाबा जिल्ह्यातून निवडून येत होतो. कुलाबा जिल्हा भाताचे कोठार म्हणून गणले जात होते. आज सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील येथे आहेत. खोडखेड्याने आमचे भात पीक पूर्णपणे उद्ध्वस्त होत होते. राज्याचे कृषी मंत्री म्हणून त्यांनी त्यावेळी सन 1975 मध्ये आमच्या रायगड जिल्ह्याचा रोहा तालुक्याचा दौरा केला. माझे वय 20 वर्षे हाते. पवार साहेबांना आयुष्यामध्ये पहिल्यांदाच पाहण्याची संधी आमच्या घरामध्ये मिळाली. खोडखेड्याची पाहणी करण्यासाठी त्यावेळी देशाचे कृषी राज्य मंत्री अण्णासाहेब शिंदे, ममदानी, सपकाळ साहेब या सर्वांना घेऊन आदरणीय पवार साहेब यांनी त्यावेळी कुलाबा जिल्ह्याचा दौरा केला. सबंध भाताचे आणि सबंध शेतीचे त्यांनी खूप मोठ्या प्रमाणात आकलन करण्याचा त्या निमित्ताने प्रयत्न केला. राज्य सरकारच्या वतीने खूप मोठ्या प्रमाणात उपाययोजना केल्या आणि त्यांनी उपाययोजना



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

केल्या त्यानंतर आज 40 वर्षे झाले पुन्हा कधी रायगड जिल्ह्यामध्ये, कुलाबा जिल्ह्यामध्ये खोडखेडा रोग आला नाही. भातावर आलेल्या त्या रोगाचे समूळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न त्यावेळी पवार साहेबांच्या माध्यमातून झाला. आम्ही रायगड जिल्ह्याचे कायकर्ते भाग्यवान आहोत. सन 1976 मध्ये बॅ. अंतुले यांची देशाचे सरचिटणीच म्हणून निवड झाल्यानंतर त्यावेळच्या कुलाबा जिल्ह्याचे ते पालकमंत्री राहिले. आमच्या जिल्ह्याचे पालकमंत्री पद एक वर्ष त्यावेळी पवार साहेबांनी भूषविले. रायगड जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यांत फिरत असताना त्यांनी वेगवेगळी ठिकाणे समजून घेण्याचा प्रयत्न केला.

सभापती महोदय, आज आपण सर्वजण त्यांच्या स्मरणशक्तीच्या बाबतीत कौतुकाने बोलत आहोत. मी त्यांच्या स्मरणशक्तीचा एक किस्सा सांगेन. सन 1976-77 च्या आसपास आमच्या त्यावेळच्या कुलाबा जिल्ह्यातील प्रत्येक गावात ते गेले होते. माझे वडील त्यावेळी पंचायत समितीचे सभापती होते. त्यावेळी त्यांनी आमच्या जिल्ह्यातील सर्व ठिकाणे समजून घेतली होती. सन 2004 मधील एक किस्सा आहे. विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने नवी मुंबईची सभा रात्री दहा वाजता संपली आणि त्यानंतर महाडला प्रचाराच्या सभेला साहेबांना जायचे होते, त्यावेळी कॅन्सरसारख्या अत्यंत दुर्धर आजाराने ते आजारी होऊन 6 महिने लोटले होते. आम्ही रात्रीचा प्रवास करीत हातो. रात्री साडे अकरा वाजता आमच्या गावावरून पुढे गलो. त्यांनी सांगितले की, सुनील, तुझे घर येथे आहे. तेथून पुढे 10-12 किलोमिटर अंतरावर गेलो. इंदापूर नावाचे गाव आहे. पुणे जिल्ह्यात एक इंदापूर आहे. पुण् जिल्ह्यातील इंदापूरमध्ये एसटीचे स्टॅण्ड मंजूर झाले होते, पण ते चुकून रायगड जिल्ह्यातील इंदापूरला बांधले गेले. ही वस्तुस्थिती खरी आहे. यातील एकही वाक्य खोटे नाही. इंदापूर हे पुणे जिल्ह्यातील इंदापूर, तेथे एसटी स्टॅण्ड बांधल् जाणार होते. ते एसटी स्टॅण्ड सन 1975 च्या आसपास रायगड जिल्ह्यातील, कुलाबा जिल्ह्यातील इंदापूर येथे बांधले गेले. रात्रीचे सव्वा बारा वाजले होते. त्यावेळी एसटी स्टॅण्ड बघितल्यावर मला संगितले की, सुनील हे इंदापूर आले आहे. त्यांनी ते 27-28 वर्षांपूर्वी पाहिले असेल. सभापती महोदय, पण त्याहीपेक्षा पुढील किस्सा महत्त्वाचा आहे. 200 फूट पुढे गेलो असू, एक रस्ता तळा तालुक्याकडे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

जातो. रात्री साडे बारा वाजले होते, त्यांनी मला विचारले की, सुनील, या ठिकाणी एक पाटील नावाच्या माणसाचे एक दुकान आहे. तेथे सुकी मच्छी म्हणजे सोडे, बोंबील, सुकट मिळते. ते दुकान अजून चालू आहे का ? ते दुकान त्यांनी सन 1976-77 ला पाहिले होते आणि आठवण सन 2004 मध्ये केली. 27 वर्षांनंतर रात्री बारा वाजता एका खेडेगावातील एक मच्छीचे दुकान आहे की नाही याची आठवण असणारा नेता या देशात दुसरा कोणी असू शकत नाही हे आज या निमित्ताने मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, आताच्या संगणकाच्या युगात एखाद्या वेळी संगणकातून माहिती चुकीची येईल. पण पवार साहेबांच्या संगणकामध्ये असलेली माहिती कधी आयुष्यभरात चुकीची येणार नाही, इतकी प्रचंड पध्दतीची स्मरणशक्ती असलेले एक लोकोत्तर नेतृत्व महाराष्ट्रामध्ये दीर्घकाळ नेतृत्व करीत आहे, याचा अभिमान केवळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते म्हणून आम्हालाच नव्हे तर उभ्या महाराष्ट्रातील आणि देशातील प्रत्येकाला आहे हे आवर्जून या निमित्ताने मला सांगावेसे वाटते. वेगवेगळ्शा पध्दतीने काम करणची त्यांनी मनोभूमिका घेतली. सन 1978 च्या आसपास त्यावेळचे काँग्रेस आणि रेड्डी काँग्रेसचे सरकार आले. मनामध्ये एक तऱ्हेची अस्वस्थता होती. टीकाटिप्पणी करण्यासाठी तो उल्लेख मी या ठिकाणी करू इच्छित नाही. कारण मला माहीत आहे की, एका लोकोत्तर नेतृत्वाच्या अभिष्टचिंतनाच्या प्रसंगी मी या ठिकाणी बोलत आहे. त्यावेळी त्यांनी सरकारमधून बाहेर पडण्याची भूमिका घेतली, पुलोदचे सरकार त्या कालावधीत त्यांनी स्थापन केले. वय वर्षे 38 असताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद त्यावेळी त्यांनी भूषविले. देशातील सर्वात तरुण मुख्यमंत्री म्हणून पवार साहेबांनी त्यावेळी तो सन्मान त्या कालावधीत मिळविला. एक पक्षीय सरकार चालविण्यासाठी किती अडचणी येतात हे महाराष्ट्रातील राजकारण गेली अनेक वर्षे तुम्ही आम्ही पाहत आलो आहोत. पण त्यावेळी विविध राजकीय पक्षाच्या राजकीय नेते मंडळींना सोबत घेत, विविध विचारसरणीच्या नेते मंडळींना सोबत घेत, पुलोदचे सरकार चालविणे ही किमया देशामध्ये पहिल्या प्रथम कोणी केली असेल तर ती पवार साहेबांनी केली. कारण पुलोदच्या मंत्रिमंडळामध्ये जनता पक्ष होतो. जनता पक्ष हा एकमेव पक्ष असा नव्हता, त्यात वेगवेगळे पक्ष

श्री. सुनील तटकरे ....

सहभागी झाले होते, त्यामध्ये जनसंघ सुध्दा होता, समाजवादी पक्ष होता, त्यावेळचे सोशॅलिस्ट पक्ष होते, ते सुध्दा त्या सरकारमध्ये होते. शेतकरी कामगार पक्ष सुध्दा त्या सरकारमध्ये होता. वेगवेगळे राजकीय पक्ष, वेगवेगळी राजकीय विचारप्रणाली असलेली सर्व नेतेमंडळी पुलोदच्या सरकारमध्ये होती. दोन वर्षे ते सरकार चालले. पण त्या दोन वर्षांमध्ये पुलोदची सर्कस चालवत असताना मंत्रिमंडळामध्ये कुठे मतभेद होत आहेत हे कधीही महाराष्ट्राच्या जनतेसमोर आले नाही. सर्व ज्येष्ठ मंडळींना सोबत घेत महाराष्ट्राचा राज्यकारभार उत्तम पध्दतीने केला, त्यांनी त्या कालावधीत शेतकऱ्यांसाठी घेतलेले निर्णय आजही खूप मोठ्या प्रमाणात आहेत. आज आम्ही पेड पेंडिग केसेस किती आहेत याबद्दलचा आढावा घेतो. देशाच्या पाठीवरचे एकमेव असे नेतृत्व आहे की, ज्यांनी शेतकऱ्यांना वीज पंप दिलेच पाहिजेत असे सांगितले. वीज पंपाच्या विद्युत बिलाची आकारणी करीत असताना हॉर्स पॉवरवर आकारणी केली पाहिजे असा देशाच्य पाठीवर पहिला निर्णय कोणी घेतला असेल तर तो शरद पवार साहेबांनी पुलोदचे मुख्यमंत्री असताना त्या कालावधीत घेतला. आता आम्ही जरी विद्युत बिलाची मिटरप्रमाणे आकारणी करीत असू तरी सुध्दा ज्यांनी त्या कालावधीत विद्युत पंप घेतले आहेत त्या सर्वांना हॉर्सपॉवर आधारित असलेले विद्युत बिल सरकारच्या माध्यमातून दिली जातात ही गेली प्रदीर्घ कालावधीत त्यांनी घेतलेली एक तऱ्हेची फलश्रुती आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात परत सन 1975 मध्ये कृषीमंत्री पद त्यांच्याकडे दिले गेले. तो किस्सा त्यांच्या पुस्तकामध्येच आहे. माझ्यासारख्या कार्यर्त्याला ज्ञात होता. कृषी मंत्री पद शरद पवार साहेबांना दिले त्यावेळी इंदिराजींनी विचारले की, महाराष्ट्र आता पंजाब आणि हरयाणा यांच्याकडे किती दिवस बघणार आहे, शरदराव आता पुन्हा बघावे लागणार नाही अशा पध्दतीने तुम्ही कृषी मंत्री म्हणून काम करा. इंदिरा गांधींनी तेव्हा देशाचे पंतप्रधान म्हणून सांगितले. महाराष्ट्राला अन्नण्धान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याचा एक चंगच त्या कालावधीत त्यांनी बांधला आणि तुम्ही आणि मी सर्वार्थाने अभिमानपूर्वक बोलू इच्छितो की, महाराष्ट्रात अन्नधान्याचे उत्पादन, मघाशी माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांनी सांगितल्याप्रमाणे, फळप्रक्रिया व शेतीला

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

लागणारे पुरक व्यवसाय उभे करण्याच्या दृष्टीने त्यांनी त्यावेळी धाडसीपणाने निर्णय निश्चितपणे घेतले. सन 1980 च्या काळात इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर आल्या. राज्यात पुलोदचे सरकार होते. नागपूरला पुलोदच्या सरकारचे शेवटचे अधिवेशन असेल की काय पवार साहेबांना माहीत नव्हते. कारण 5 वर्षे विधानसभेची कारकीर्द असते. पण येथे नागपूरला असताना त्यावेळचे सरकारचे माजी राष्ट्रपती आणि त्यावेळचे गृहमंत्री ग्यानी झैलसिंग यांचा फोन आला की, तुम्ही तातडीने दिल्लीला निघून या. सभागृहाचे कामकाज टाकून केंद्रीय गृहमंत्र्यांनी बोलाविले म्हणून पवार साहेब त्यावेळी दिल्लीला गेले, दिल्ली गृहमंत्रालयाने त्यांची व्यवस्था केली होती, त्यांची आणि ग्यानीजींची भेट झाली, ग्यानीजींनी एवढेच सांगितले की शरदराव, आपल्याला देशाच्या पंतप्रधानांकडे जायचे आहे. पवार साहेबांनी त्यावेळी एवढेच सांगितले की, इंदिराजी पुन्हा सत्तेवर आलेल्या आहेत. मी एका राज्याचा मुख्यमंत्री आहे, त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मी वेळ घेऊन त्या ठिकाणी जाण्याची आवश्यकता आहे. ग्यानीजींनी सांगितले की, तुम्हाला या प्रथेची आवश्यकता नाही. तुम्हाला मला घेऊन बोलाविण्यात आले आहे. मग तेथे पवार साहेबांचे आणि इंदिरांजींचे हितगुज झाले ते त्यांनी त्यांच्या पुस्तकात सांगितले आहे. काही बाबतीत विचारांची कदाचित असहमती झाली असेल. त्यावेळी ते मुंबईला निघून आले.

....Q

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनिल तटकरे.........

आणि त्यानंतर दुसऱ्या, तिसऱ्या दिवशी पुलोद सरकार बरखास्त झाले. पण तिसऱ्या दिवशी श्री.शरद पवार साहेब आपली फियाट चालवीत ब्रेबॉर्न स्टेडियमवर क्रिकेटची मॅच बघण्यासाठी ज्यावेळी गेले त्यावेळी स्टेडियममधील सर्व लोक उभे राहिले. काल यांचे मुख्यमंत्री पद गेले, पण आज हा क्रिकेटवेडा माणूस स्वतःचे वाहन चालवीत ब्रेबॉर्न स्टेडियमवर येतो, हे बघून क्रिकेटप्रेमी रसिकांना एक प्रकारचा आश्चर्याचा धक्का बसला. गावचे सरपंच पद सोडताना आपच्या मनात अनेक वेळा धाकधुक निर्माण होते. एखाद्या वेळी आम्ही जर का दोन-तीन टर्म केल्या असतील तर ते पद आपल्याला सोडवत नाही. पण राज्याचे मुख्यमंत्री पद सहजगत्या सोडत, त्याबद्दल कोणत्याही नकारात्मक भावना मनामध्ये न ठेवता, कोणत्याही प्रकारचे नैराश्य येऊ न देता, खिलाडुपणाने ते ब्रेबॉर्न स्टेडियमवरील टेस्ट मॅच बघण्यासाठी गेले, हा खिलाडुपणा त्यांच्या रोमारोमात भरलेला आहे.

सभापती महोदय, स्व.इंदिराजींच्या पुढाकाराने ज्यावेळी पहिल्या प्रथम आशिया स्पर्धा या देशात भरविण्याचा निर्णय झाला त्यावेळी अनेकांना असे वाटत होते की, कबड्डीचा समावेश आशिया स्पर्धेत व्हावा. स्व.इंदिराजींशी मतभेद झालेले असताना, पुलोद सरकार बरखास्त झाले असताना श्री.शरद पवार साहेबांनी स्व.इंदिराजींची भेट घेतली आणि त्यांना सांगितले की, "भारतीय मातीतील, लाल मातीतील हा खेळ जगाच्या पाठीवर जावा, असे वाटत असेल तर कबड्डीचा समावेश आशिया स्पर्धेत करण्यास आपण मान्यता द्यावी." त्यावेळपासून कबड्डीचा समावेश आशिया स्पर्धेत झाला. या साऱ्याचे जनक आदरणीय श्री.शरद पवार हे आहेत, हे मला आज या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, शेतीविषयक निर्णय घेतले गेले, प्रशासनाचे निर्णय घेतले गेले, क्रीडा क्षेत्रात कोणत्याही गोष्टीची कमतरता राहणार नाही, या दृष्टीकोनातून प्रयत्न केले गेले. श्री.शरद पवार साहेब कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष होते, खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष होते, कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष होते आणि ज्या क्रिकेटच्या खेळाला जगभर ग्लॅमर मिळाले आहे, त्या क्रिकेटच्या एमसीएचे, बीसीसीआयचे आणि जागतिक क्रिकेट संघटनेचे अध्यक्षपद भुषविणारेही ते एकमेव नेते आहेत, याचा अभिमानपुर्वक उल्लेख मी आज या निमित्ताने करीत आहे.

..2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनिल तटकरे.......

सभापती महोदय, सभागृहाचे नेते सन्माननीय श्री.एकनाथराव खडसे यांनी श्री.शरद पवार साहेबांनी काढलेल्या शेतकरी दिंडीचा उल्लेख आपल्या भाषणात केला आहे. त्यावेळी श्री.शरद पवार साहेब मुख्यमंत्री नव्हते तर विरोधी पक्ष नेते होते. विरोधी पक्षनेते असताना त्यांनी नागपूरच्या विधानभवनावर शेतकऱ्यांची दिंडी आणली होती. त्या दिंडीत महाराष्ट्राचे पहिले सुसंस्कृत मुख्यमंत्री म्हणून ज्यांना ओळखले जाते, ते स्व.यशवंतराव चव्हाण साहेब देखील सहभागी झाले होते आणि राज्य सरकारने त्यावेळी त्यांना अटक देखील केली होती. ही आठवण एवढ्यासाठीच आहे की, त्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांचे देशव्यापी नेतृत्व देखील केले. दिल्लीला रामलीला मैदानावर देशभरातील शेतकऱ्यांचा प्रचंड मेळावा भरविण्याचे, त्या तरुण वयात त्यांनी दाखविलेले कर्तृत्व एवढे असामान्य पध्दतीचे ठरले की, देशातील शेतकऱ्यांचा 'जाणता राजा' म्हणून, देशातील शेतकऱ्यांचे नेतृत्व करणारा म्हणून श्री.शरद पवार साहेबांचे नेतृत्व राष्ट्रीय पातळीवर निश्चितपणे उदयास आले.

सभापती महोदय, सन 1980 मध्ये श्री.शरद पवार साहेबांचे 58 आमदार निवडून आले होते. पण ते लंडनला असताना त्यामधील 52 आमदार पक्ष सोडून गेले आणि त्यांच्याबरोबर फक्त 6 आमदार राहिले. पण या 6 आमदारांना बरोबर घेऊन पुन्हा एकदा महाराष्ट्रात काम करण्याचे धाडस दाखविणारे लोकोत्तर नेतृत्व म्हणून श्री.शरद पवार साहेबांचा उल्लेख महाराष्ट्रातील राजकारणात खूप प्रकर्षाने करावा लागणार आहे. आपले आमदार आपली साथ सोडून गेल्या नंतर एखादा नेता डगमगला असता. कारण स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांनी सुध्दा त्या कालावधीमध्ये कॉँग्रेस (आय) पक्षात प्रवेश घेतला होता. पण वैचारिकदृष्ट्या ठाम असलेल्या श्री.शरद पवार साहेबांनी स्वतःच्या निर्णयाशी ठाम राहण्याचा त्या कालावधीत दाखविलेला आत्मविश्वास खूप मोठ्या प्रमाणावर प्रेरणा देणारा ठरला आणि महाराष्ट्राच्या राजकारणाला एक वेगळे वळण त्या कालावधीत लागले.

सभापती महोदय, एका गोष्टीचा उल्लेख सर्वच सन्माननीय वक्त्यांनी या ठिकाणी केला आहे. आज आपण सर्व जण अभिमानपूर्वक त्याचा उल्लेख करीत आहोत. सन 1978 ला पुलोदचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनिल तटकरे........

मुख्यमंत्री म्हणून श्री.शरद पवार साहेबांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर राज्यात आगडोंब उसळला आणि म्हणून तो निर्णय त्या कालावधीत स्थगित करावा लागला. मात्र, त्या निर्णयाची अंमलबजावणी सन 1993 ला झाली. त्यानंतर तीन वेळा श्री.शरद पवार साहेबांनी मुख्यमंत्री पद भुषविले आणि ज्यावेळी चौथ्यांदा ते मुख्यमंत्री पदावर आले त्यावेळी त्यांनी ठरविले की, माझे मुख्यमंत्री पद गेले तरी बेहत्तर, सत्ता गेली तरी चालेल पण महाराष्ट्रामध्ये शाहु, फुले, आंबेडकरांच्या विचारांना जराही धक्का लागता कामा नये, मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नांव मी देणारच. त्यांनी हा महत्वपूर्ण निर्णय त्या कालावधीत घेतला.

सभापती महोदय, तत्कालीन पंतप्रधान माननीय श्री.व्ही.पी.सिंगांनी मंडल आयोग स्विकारला. त्या काळात देशभरामध्ये मंडल आयोगाच्या बाबतीत वेगवेगळ्या भूमिका घेतल्या जात होत्या. महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशात आगडोंब उसळला होता. पण श्री.शरद पवार साहेबांच्या माध्यमातून देशातील पहिले असे एकमेव नेतृत्व निघाले की, ज्यांनी अंमलबजावणीबाबतचा निर्णय घेतला. आपण सर्वजण त्या निर्णयाचे साक्षीदारच आहोत, असे नाही तर उपभोक्तेही आहोत. देशात मंडल आयोगाची अंमलबजावणी करणारे पहिले राज्य कोणते असेल तर ते महाराष्ट्र राज्य होते आणि त्याबाबतचा धाडसी निर्णय घेणारे पहिले मुख्यमंत्री श्री.शरद पवार साहेब होते, याचाही आवर्जून उल्लेख या ठिकाणी मी करु इच्छितो.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दफन केले. त्या आधारावर असलेली विचारसरणी पूर्णपणे बाजूला गेली पाहिजे आणि समाजातील उपेक्षित घटक मूळ प्रवाहात आणला गेला पाहिजे, यासाठी मंडल आयोगाची निर्मिती झाली होती आणि त्याची अंमलबजावणी करण्याचा धाडसी निर्णय आपल्या राज्याने घेतला त्यामुळेच राज्यातील वेगवेगळ्या समाजाचे नेते आज राजकारण आणि समाजकारणात त्यांच्या कर्तृत्वाचा आलेख अतिशय उत्तम पध्दतीने राखू शकत आहेत आणि याचे सर्व श्रेय श्री.शरद पवार साहेबांकडे जाते, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनिल तटकरे.......

सभापती महोदय, सन 1988 ते 1990 च्या आसपास श्री.शरद पवार साहेबांनी स्व.राजीव गांधीजींसमवेत जाण्याचा निर्णय घेतला आणि औरंगाबादच्या ऐतिहासिक सभेत आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन केला. त्यावेळी त्यांनी राष्ट्रीय पातळीवरील सर्व नेत्यांची सहमती मिळविली होती. त्यानंतर ते दुसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर महाराष्ट्रात सुध्दा काही चांगले निर्णय घेतले गेले पाहिजेत, अशा प्रकारची भूमिका त्यांनी त्या कालावधीत घेतली. तो कालखंड काही निर्णयांच्या बाबतीत महत्वपूर्ण होता. कोकण रेल्वेच्या बाबतीत आज आपण सर्वजण बोलतो. सन्माननीय शिक्षण मंत्री श्री.विनोद तावडेजी, तुम्ही, आम्ही सर्वजण कोकणातील आहोत. माननीय स्व.बॅरिस्टर नाथ पै, माननीय स्व.मधु दंडवते, माननीय स्व.जॉर्ज फर्नांडिस या सर्वांकडे निश्चितपणे कोकण रेल्वेचे श्रेय जाते. पण ज्यावेळी प्रत्यक्षपणे कोकण रेल्वेच्या बाबतीतील निर्णय घेतला गेला त्यावेळी जॉर्ज फर्नांडिस साहेब देशाचे रेल्वे मंत्री होते. त्यांच्याकडे कोकण रेल्वेच्या संदर्भात बैठक झाली आणि त्यांनी असे सांगितले की, "केंद्राच्या निधीतून आम्ही कोकण रेल्वेचा प्रकल्प करु शकणार नाही. कारण, सर्वात महागडा आणि अत्यंत दुर्गम रेल्वे प्रकल्प कोणता असेल तर तो कोकण रेल्वे प्रकल्प आहे. कोकण रेल्वे साकारायची असेल तर ती भारतीय रेल्वेच्या माध्यमातून केली जाणार नाही, त्यासाठी कोकण रेल्वे कॉर्पोरेशन तयार करावे लागेल." अशा प्रकारे देशात रेल्वे मार्ग करण्यासाठी पहिल्याप्रथम कोकण रेल्वे कॉर्पोरेशन निर्माण केले गेले. या कॉर्पोरेशनला भागभांडवल कोण देणार निधीची उपलब्धता कशा प्रकारे होणार, यासाठी जी बै्ठक झाली त्या बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून श्री.शरद पवार साहेब आणि गोवा, कर्नाटक आणि केरळ राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते. महाराष्ट्र सोडून सर्व राज्यांनी भागभांडवल देण्यास असमर्थता दाखविली. पण श्री.शरद पवार साहेबांनी पुढाकार घेतला आणि महाराष्ट्राचे भागभांडवल तर उपलब्ध करुन दिलेच पण या तिन्ही राज्यांचे भागभांडवल राज्य सरकार उपलब्ध करुन देईल, कोकण रेल्वे साकारली गेली पाहिजे, अशा प्रकारचा निर्णय त्यांनी त्या कालावधीत घेतला आणि आज कोकण रेल्वेचे जे जाळे एवढ्या मोठ्या प्रमाणावर कोकणात विणले जात आहे, त्याची सुरुवात त्या कालावधीत श्री.शरद पवार साहेबांनी मुख्यमंत्री म्हणून केली.

...5....

श्री.सुनिल तटकरे........

सभापती महोदय, राज्याचे मुख्यमंत्री म्हणून राज्यातील उद्योग वाढले पाहिजेत, राज्यात रोजगाराची साधने निर्माण झाली पाहिजेत, राज्याच्या सर्व विभागात विशेषतः विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण या सर्व विभागांचा विकास झाला पाहिजे, वेगवेगळ्या उद्योगांचे जाळे निर्माण झाले पाहिजे, या दृष्टीकोनातून त्या त्या विभागातील शेती आणि भौगोलिक परिस्थितीचा पूर्णपणे अभ्यास करीत तेथील शेतकऱ्यांना न्यायाच्या प्रक्रियेत कसे नेता येईल, याची सर्वंकष विचारधारा त्यांनी त्या कालावधीत रूजवली. म्हणूनच रोजगार हमी योजनेची सांगड फलोद्यानाशी घालण्याचा एक क्रांतीकारी निर्णय त्यांनी त्या कालावधीत घेतला. कोकणासाठी त्या काळात घेतलेला हा निर्णय नंतरच्या काळात संपूर्ण महाराष्ट्रासाठी राबविला गेला आणि ते जेव्हा देशाचे कृषी मंत्री झाले त्यावेळी हा निर्णय राष्ट्रीय फलोत्पादन योजनेच्या माध्यमातून देशभर राबविण्याचे श्रेय आदरणीय श्री. शरद पवार यांच्याकडे जाते, याचा देखील आवर्जुन उल्लेख या ठिकाणी करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, आज आपण सर्वजण शेतकऱ्यांच्या कर्जमाफी बाबत बोलत आहोत. त्याबाबतीतील निर्णय होईल की नाही, हा भाग वेगळा राहील. पण सन 1978 मध्ये श्री.शरद पवार साहेबांनी शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जावरील व्याज माफ केले. महाराष्ट्रातील पिचलेल्या शेतकऱ्यांची बाजारातील नष्ट झालेली पत पुन्हा निर्माण करावयाची असेल तर वेगवेगळ्या बँकांकडून घेतलेल्या कर्जाचा जो डोंगर त्यांच्यावर आहे, तो माफ केला पाहिजे, या भावनेतून त्यांनी राज्यात पुलोदचे सरकार असताना व्याजमाफीचा क्रांतीकारक निर्णय सर्वप्रथम घेतला. शेतकऱ्यांची कर्जमाफी होऊ शकते, याची दिशा या देशामध्ये पहिल्याप्रथम कोणी दाखविली असेल तर ती श्री.शरद पवार साहेबांनी दाखविलेली आहे.

सभापती महोदय, माननीय श्री.शरद पवार यांनी महिला आयोग स्थापन करण्याचा निर्णय घेतला, महिला धोरणाच्या बाबतीतील निर्णय घेतला. अशी वेगवेगळ्या निर्णयांची शिदोरी या महाराष्ट्रातील नेत्याने देशाला दिलेली आहे. महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण देण्याबाबत सर्वांचीच सहमती होती, असे नाही. पण धाडसाने त्याबाबतीतील निर्णय घेण्याचे पाऊल श्री.शरद पवार साहेबांनी टाकले.

...R-1.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे........

आज महाराष्ट्रात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिकांमध्ये आमच्या समस्त महिला भगिनी प्रशासनाचे उत्तम कौशल्य दाखवत पंचायत समिती किंवा ग्रामपंचायतींचा कारभारत अतिशय उत्तम पद्धतीने करीत आहेत. याचे संपूर्ण श्रेय माननीय श्री.शरद पवार साहेबांना जाते. अशा प्रकारे वेगवेगळे समाजाभिमूख निर्णय घेताना, त्या निर्णय क्षमतचे पडसाद देशभरात किती उत्तम पद्धतीने उमटू शकतील यासंबंधीचे विचार त्यांनी खूप मोठ्या प्रमाणावर दाखविले. परंतु, त्यांनी आयुष्यभर केवळ राजकारण केले नाही. जगात उपलब्ध असलेल्या प्रत्येक क्षेत्राशी त्यांनी जवळीक निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आज सर्व क्षेत्रांशी जवळीक असणारे नेतृत्व म्हणून जर कोणाचे नाव पुढे येत असेल तर ते आदरणीय श्री.शरद पवार साहेबांचे. ते क्रीड, कला, उद्योग, कृषी क्षेत्राशी जोडले गेले. ग्रामीण भागातील प्रत्येक तालुक्यातील 50-100 कार्यकर्त्यांची ओळख असणारे नेतृत्व आज राष्ट्रीय पातळीवर आपणा सर्वांना बघावयास मिळते. त्यांनी आयुष्यात वेगवेगळ्या प्रकारचे निर्णय घेतले. त्यांना अनेक वेळा टिकाटिप्पणीला देखील सामोरे जावे लागले. परंतु, टिकाटिप्पणी होत असताना त्यांच्या सारखा संयम अभवानेच देशामध्ये कोणाकडे आढळतो. कारण, आम्हाला स्तुती ऐकण्याचीच सवय झालेली आहे. आमच्यावर थोडी जरी टिका झाली, आमच्या विरुद्ध वर्तमानपत्रात दोन ओळी जरी छापून आल्या तरी आम्ही मोठ्या प्रमाणावर अस्वस्थ होतो. आम्ही केवळ अस्वस्थ होऊनच थांबत नाही तर आम्ही ताबडतोब प्रतिक्रिया देतो. मागील 40-50 वर्षांच्या काळात त्यांना अनेक वेळा टिकेला सामोरे जावे लागले. उलट माननीय श्री.शरद पवार साहेबांवर टिका केली तर आपल्याला आपोआप प्रसिद्धी मिळते, यासाठी कोणत्याही गोष्टीचा पायपोस नसताना सुद्धा त्यांच्यावर टिका करण्यासाठी टिकाकार पुढे आले. कारण, माननीय श्री.शरद पवार साहेबांवर टिका केल्यानंतर आपल्याला वर्तमानपत्रात पहिल्या पानावर स्थान मिळू शकते, या भावनेपोटी सुद्धा त्यांच्यावर अनेक वेळा टिका झाली. परंतु, त्यांनी त्या टिकेकडे कधी त्या पद्धतीने बघितले नाही. म्हणूनच सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांबरोबर त्यांचे चांगले संबंध राहिले. परंतु, त्यांच्या राजकीय विचारसरणीला कधीही तडा गेला नाही. शाहू, फुले, आंबेडकरांच्या सामाजिक समतेला त्यांनी कधीही तडा दिला नाही.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे........

सभापती महोदय, सन 1999 मध्ये राज्यात सत्तांतर झाले. त्यावेळी देशात देखील सत्तांतर झाले होते. त्यांना माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये जाण्याची संधी सहजगत्या उपलब्ध होत होती. महाराष्ट्रात देखील त्या काळात वेगळे राजकारण होऊ शकत होते. कारण, काँग्रेस पासून फारकत घेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली होती. परंतु, आपल्या विचारांशी अजिबात तडजोड न करणारा नेता म्हणून माननीय श्री.पवार साहेबांनी देश पातळीवर स्वतःला मिळणारे मंत्रिपद नाकारले आणि आम्ही त्या काळात राज्यात काँग्रेस पक्षाबरोबर लोकशाही आघाडीचे सरकारक स्थापन केले. आम्ही मागील 15 वर्षे राज्यात सत्तेवर राहिलो. आज माननीय श्री.पवार साहेबांमुळे आमच्या सारख्या छोट्या मोठ्या कार्यकर्त्याला राज्य पातळीवर सलग काम करण्याची संधी मिळाली. त्यांचा कृषीमंत्री पदाचा कालखंड वेगळा राहिला असता. मघाशी सांगितल्याप्रमाणे आपत्ती व्यवस्थापनामध्ये त्यांचा हात धरणारे नेतृत्वच नाही. ज्यावेळी मुंबई शहरात दंगली झाल्या त्यावेळी ते देशाचे संरक्षणमंत्री होते. त्यांनी मुंबईमध्ये यावे असे त्यावेळच्या पंतप्रधानांनी ठरविले. ते मुंबईमध्ये आले, त्यांनी मुंबई पुन्हा सुरळीत करण्याचा प्रयत्न केला आणि मुंबई शहरात बॉम्बस्फोट झाले. परंतु, 24 तासाच्या आत स्टॉक एक्सचेंजसह मुंबई सुरळीत करण्याच्या दृष्टीकोनातून त्यांनी दाखविलेले धाडस अतुलनीय पद्धतीचे होते. सन 2001 मध्ये ज्यावेळी गुजरातमध्ये भूकंप झाला त्यावेळी त्यावेळचे पंतप्रधान म्हणाले की, 750 सांसदों में अकेले माननीय श्री.शरद पवार साहब ऐसे है जिन्होंने बताया कि, यह जिम्मेदारी निभाने के लिए मैं तैयार हूं. 750 खासदारांमध्ये माननीय श्री.शरद पवार साहेब एकटे असे होते की, आपत्ती व्यवस्थापनासाठी ते धावून जायला तयार आहे. हे उद्‌गार सुनील तटकरे यांचे नाहीत. त्यावेळचे पंतप्रधान श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे हे उद्‌गार आहेत. त्यावेळी गुजरातच्या आपत्ती व्यवस्थापनाची जबाबदारी माननीय श्री.शरद पवार साहेबांवर सोपविण्यात आली. त्यांनी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनाचा उत्तम पद्धतीने आराखडा तयार केला. ज्या ज्यावेळी देशात आपत्ती येते त्या त्यावेळी त्यांनी निर्माण केलेल्या आराखड्याच्या माध्यमातून त्या त्या राज्यातील जन जीवन पूर्वपदावर आणण्याच्या दृष्टीकोनातून दिपस्तंभाप्रमाणे राज्य सरकार, केंद्र सरकारला दिशा देणारे मार्गदर्शन त्यांनी त्यांच्या कालावधीत अतिशय उत्तमपणे केले.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे........

सभापती महोदय, सन 2004 मध्ये माननीय श्री.शरद पवार साहेबांनी केंद्रीय कृषीमंत्री पदाची सूत्रे हाती घेतली. त्यावेळी सुद्धा आपला देश आयातीवर अवलंबून होता. याचा उल्लेख परवाच्या कार्यक्रमात झाला. आता आपला देश अन्न धान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे आणि म्हणूनच देशात न भूतो न भविष्यती असा कार्यक्रम दिल्ली येथील विज्ञान भवनमध्ये होऊ शकला. माननीय राष्ट्रपती, माननीय उप राष्ट्रपती, माननीय पंतप्रधान, माननीय श्रीमती सोनिया गांधी, माननीय श्री.मुलायमसिंगजी, माननीय श्री.प्रकाशसिंह बादल, माननीय श्री.लालू प्रसादजी, माननीय श्री.नितीश कुमार, माननीय श्री.फारुख अब्दुल्ला इत्यादी मान्यवर नेते त्या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. देशातील सर्व राजकीय पक्षाचे नेते एका व्यासपीठावर येणारा अभूतपूर्व क्षण स्वातंत्र्यानंतर या देशाने संसदीय लोकशाहीत पहिल्याप्रथम माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या निमित्ताने अनुभवला. आम्ही सर्व भाग्यवान आहोत की, आम्हाला या सोहळ्याचे साक्षीदार बनण्याची संधी मिळाली. माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या अमृत महोत्सवानिमित्त विज्ञान भवनमध्ये न भूतो न भविष्यती अशा पद्धतीचा सोहळा झाला. देशातील सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांनी एका व्यासपीठावर येऊन त्यांनी राष्ट्रात केलेल्या सेवेबद्दल त्यांच्या विषायी आदर व्यक्त केला. पक्ष आणि पक्षाच्या विचारसरणीला बाजूला सारून या नेतृत्वाने आपल्या कार्याने राष्ट्रीय पातळीवर आपला सन्मान उंचाविला आहे हे आपल्याला देश पातळीवर माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या रूपाने अनुभवायला मिळाले. याचा रास्त अभिमान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता म्हणून मला नाही तर मी महाराष्ट्रातील एक नागरीक आहे याचा मला सर्वात मोठा अभिमान वाटतो, असे भाग्य एका नेतृत्वाच्या माध्यमातून मिळाले.

सभापती महोदय, देशाच्या राजकारणात त्यांचा वेगळा दबदबा आहे. सर्वांना मनापासून वाटते की, माननीय श्री.शरद पवार साहेबांना पंतप्रधान पदाची संधी मिळावी. परंतु, माननीय श्री.पवार साहेबांनी नेहमीच आपले पाय जमिनीवर ठेवले. त्यांनी नेहमीच सांगितले की, माझ्या पक्षाचे संख्याबळ मला पंतप्रधान बनण्यासाठी कधीही उपयुक्त ठरणार नाही. त्यांच्या अमृत महोत्सवानिमित्त परवा मुंबई येथे एक कार्यक्रम झाला. त्या कार्यक्रमाला सर्व राजकीय पक्षाचे नेते

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे........

उपस्थित होते. त्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याची संधी मला मिळाली. ज्या प्रमाणे दिल्ली येथील कार्यक्रमात सर्व पक्षाचे नेते उपस्थित होते त्या प्रमाणे मुंबई येथील कार्यक्रमाला देखील सर्व पक्षाचे नेते उपस्थित होते. माननीय श्री.उद्धवजी ठाकरे आणि माननीय श्री.राज ठाकरे साहेब देखील त्या व्यासपीठावर उपस्थित होते. त्यांनी एकमेकांपासून फारकत घेतल्यानंतर पहिल्यानंतर ते शक्य होऊ शकले आणि ते केवळ माननीय श्री.पवार साहेबांच्या राज्यातील योगदानामुळे होऊ शकते. दिल्ली येथील कार्यक्रमानंतर महाराष्ट्रातील कार्यक्रमाला सर्व पक्षाचे नेते एका व्यासपीठावर येऊ शकतात हा महाराष्ट्राच्या विचारांचा, संस्कृतीचा ठेवा देश पातळीवर इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेला आहे की, देशात राजकारणातील शत्रू हे आपले कायमचेच शत्रू आहेत, अशी मानण्याची स्थिती ज्यावेळी मोठ्या प्रमाणावर बळावत जाते त्यावेळी या सर्वांवर जर कोणता उतारा असेल तर ते माननीय श्री.शरद पवार साहेबांचे नेतृत्व आहे, अशी समज देशात निर्माण झाल्याचे चित्र त्यांच्या अमृत महोत्सवानिमित्त सर्वांना बघावयास मिळते. परंतु, शेतकऱ्यांचा जाणता राजा, वयवर्षे 75 झाल्यानंतर सुद्धा गप्प बसलेला आहे. देशात राजशिष्टाचाराचा धर्म पाळणारे ते नेते आहेत. माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फणवीस सभागृहात उपस्थित नाहीत. माननीय श्री.अशोक चव्हाण, स्व.विलासराव देशमुख, माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे, माननीय श्री.शिवाजीराव निलंगेकर-पाटील, स्व.सुधारराव नाईक यांनी माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या मंत्रिमंडळात कोणी मंत्री, तर कोणी राज्यमंत्री म्हणून काम केलेले आहे. त्यावेळी माननीय श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांचे वडील माननीय श्री.शरद पवार साहेबांबरोबर विधान परिषदेत काम करीत होते. त्यांनी 4 वेळा राज्याचे मुख्यमंत्री, देशाचे संरक्षण मंत्री, देशाचे कृषीमंत्री पद भूषविलेले आहे. त्यांचे 75 वर्षे वय असताना ज्यावेळी हा नेता मुख्यमंत्री महोदयांच्या भेटीला जातो त्यावेळी माननीय मुख्यमंत्री त्यांची वाट बघत नाहीत, तर ते आजही 5 मिनिटे अगोदर माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या भेटीला जातात आणि माननीय श्री.देवेंद्र फडणवीस आल्यानंतर मुख्यमंत्री महोदयांचा सन्मान राखला पाहिजे म्हणून उठून उभे राहतात, एवढा राजशिष्टाचार धर्म देशात कोणी पाळू शकत नाही. हे कधीच कोणाला सहजगत्या शक्य होऊ शकत नाही. हा मनाचा मोठेपणा दाखविण्यासाठी जाणते असावे लागते आणि राजधर्माचे पालन

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे........

करण्याची मानसिकता तरुण पिढीच्या मनात कशा पद्धतीने बिंबली पाहिजे याचे सुस्पष्ट विचार त्या निमित्ताने आपल्याला कोठे ना कोठे बघावयास मिळतात. मी हे सांगण्याचा प्रपंच एवढ्यासाठीच करीत आहे की, पुढील पिढीने राजकारण, समाजकारण करताना या सर्व गोष्टी शिकाव्यात. कारण, चव्हाण साहेब काय होते हे मधल्या पिढीला समजविण्यासाठीच आम्ही चव्हाण सेंटरच्या माध्यमातून काम करतो. आजच्या संगणकाच्या युगातील नवीन पिढीला माननीय श्री.शरद पवार साहेबांचे 48 वर्षाचे योगदान समजून घेण्याच्या दृष्टीकोनातून आणि राजकारणात वावरणाऱ्या आमच्या सारख्या कार्यकर्त्यांना सहजगत्या एखाद्या वेळी एखादे पद मिळाल्यानंतर आमच्या डोक्यात हवा जाऊ शक्ते. परंतु, 50 वर्षातील राजकीय प्रवासानंतर सुद्धात विचारांचा शांतपणा दाखविणारे नेतृत्व त्यांच्या रुपाने आपल्याला अपवादात्मकरीत्या बघावयास मिळते.

सभापती महोदय, माननीय श्री.शरद पवार साहेबांना कॅन्सर सारखा दुर्धर आजार झालेला असताना ते प्रचारासाठी बाहेर पडणार होते. तुम्ही आणि मी याचे साक्षीदार आहोत. त्यांनी आपल्याला बोलावून सांगितले की, मी पहिल्यांदाच निवडणुकीच्या प्रचाराला नाही. सेनापती नसताना तुम्हाला लढावे लागणार आहे, तुम्ही लढा. परंतु, ब्रिच कॅन्डी रुग्णालयात कॅन्सरची शस्त्रक्रिया झाल्यानंतर माननीय श्री.पवार साहेब रुग्णालयातून डिस्चार्ज घेत होते.

..S-1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनिल तटकरे...

त्यावेळी एक तरुण डॉक्टर साहेबांकडे गेला व त्यांना सांगायला लागला की, तुम्ही आता आवरायला घ्या, तुमचे आयुष्य फक्त 5 ते 6 महिन्यांचे राहिले आहे. तुम्हाला जे निर्णय घ्यावयाचे असतील ते लवकर घ्या. तेव्हा पवार साहेब त्या डॉक्टरांना म्हणाले की, मला दुर्धर आजार झाला याची माहिती आहे, मी तुला पोचवेपर्यंत देखील मरणार नाही. त्यांच्याकडे अशी प्रबळ इच्छाशक्ती होती. कॅन्सर झाला असे कळल्यावर माणसांची हिंमत इतकी जाते, पुन्हा त्या आजारातून आपण सावरु शकतो की, नाही अशी शंका असते, या आजाराने व्याधिग्रस्त असलेली लाखो लोक आहेत, त्या व्याधीवर प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर मात करता येऊ शकते, हे उदाहरण पवार साहेबांच्या रुपाने महाराष्ट्र आणि देशाने पाहिले आहे. आज त्यांचे वय 75 वर्षे असताना देखील महाराष्ट्रातील व देशातील शेतकरी संकटात आल्यानंतर देशाचे पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी, राज्याचे मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांना भेटून शेतकऱ्यांच्या व्यथा ते मांडतात, अनेक लोक असे म्हणतात की, तुम्ही मार्गदर्शन व सल्ला का करतात. शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्यासाठी मला उपलब्ध असलेली माहिती सरकारकडे देऊन सरकारकडून त्याबाबतीत उपाययोजना झाल्या पाहिजेत, एक वेळ माझा मानसन्मान बाजूला राहिला तरी चालेल, महाराष्ट्रातील व देशातील शेतकरी ताठ मानेने उभा राहिला पाहिजे. हे जाणणारे नेतृत्व पवार साहेबांच्या रुपाने महाराष्ट्रातील जनता अनुभवत आहे. अशा नेतृत्वाचा अमृत महोत्सवी सोहळा आपण सर्वजण साजरा करीत आहोत, त्याचे साक्षीदार बनण्याचे भाग्य आपणाला मिळाले आहे. त्यांच्या बाबतीत आपणाला आज चार शब्द बोलता आले.

सभापती महोदय, देशातील राजकारणात त्यांनी एक वेगळा ठसा उमटविला आहे. वेगवेगळी पदे भूषवित असताना त्या कार्याची शैली त्यांनी प्रभावीपणे निर्माण केली. तरुण पिढीशी संवाद कसा ठेवायचा याचे उत्तम उदाहरण त्यांनी दिले आहे. मी सांगितले की, त्यांच्या पिढीतील सर्व लोकांशी त्यांची ओळख आहे, आमच्या पिढीतील देखील तालुक्यातील 5 ते 50 कार्यकर्ते त्यांना ओळखतात, आमच्या नंतरच्या पिढीशी तितकीच जवळीक साधणारा नेता पवार साहेबांच्या रुपाने महाराष्ट्र अनुभवीत आहे. आजोबांशी तेवढीच जवळीक, वडिलांशी तेवढीच जवळीक आणि

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनिल तटकरे...

नातवाशी देखील तेवढीच जवळीक. इतक्या तीन पिढीशी जवळीकीचे नाते निर्माण करण्याचे काम पवार साहेबांच्या सहह्रदयतेने केले आहे. त्यामुळे नव्या पिढीला विचारसंपदेचा वारसा निश्चितपणे मिळेल असा विश्वास या अमृत महोत्सावाच्या निमित्ताने मी देऊ इच्छितो.

सभापती महोदय, देशाच्या व महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी अढळस्थान निर्माण केले आहे. देशाच्या सर्वोच्च पदावर जाण्याची त्यांना संधी मिळाली नाही, त्याची खंत किंवा यातना त्यांच्या मनात कधीच आल्या नाहीत. मिळालेले काम निष्कामपणे करणे, लोकांची सेवा अविरतपणे करणे, आता देखील सकाळी 7 वाजता उठून समाजासाठी काम करणारे नेतृत्व कोणते असेल तर देशात पवार साहेबांकडे पाहिले जाते, त्यांच्याकडे प्रबळ इच्छाशक्ती आहे, कमालीची सहनशिलता आहे, प्रचंड मेहनत घेण्याची त्यांची क्षमता आहे. ही क्षमता अंगिकारण्याचे काम नवीन पिढीने केले तर खूप मोठे काम देशासाठी होऊ शकते. अशा लोकोत्तर नेतृत्वाला मानाचा मुजरा करण्यासाठी सभागृहाने आज हा प्रस्ताव आणला आहे, हा प्रस्ताव आणून सभागृहाने पवार साहेबांचा सन्मान वाढविला नाही तर सभागृहाच्या भावना व सभागृहाची उंची या प्रस्तावाच्या निमित्ताने वाढली आहे असे मी म्हटले तर ते चुकीचे ठरु शकणार नाही. आपण सर्वजण एकत्रितपणे बोलत आहोत, याचा अर्थ एकच आहे की, या लोकत्तर नेतृत्वाच्या प्रती आपल्या मनात असलेल्या भावना. राजकारणाच्या पलिकडे जाऊन त्या भावना जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न आपण ज्या पध्दतीने करीत आहोत, त्यामुळे हे सहज शक्य होऊ शकते.

सभापती महोदय, अशा लोकोत्तर नेतृत्वाला भारताच्या राष्ट्रपतींनी त्या दिवशी सलाम केला. त्यांनी सांगितले की, सलाम मुंबई, सलाम शरदराव, देशाचे महामहिम राष्ट्रपती त्यांच्या कार्याच्या गौरवाबाबत त्यांना सलाम करतात, देशाचे पंतप्रधान त्यांच्याबाबत गौरवाचे उद्‌गार काढतात. कॉंग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी त्यांच्याबाबत बोलतात, देशाचे माजी पंतप्रधान त्यांच्याबाबत बोलतात, काश्मिर पासून कन्याकुमारी पर्यंतचे सर्व राज्यातील सर्व पक्षाचे खासदार त्या कार्यक्रमाला येतात, त्यांची उंची जगभरात नेण्यासाठी या देशाला मोठे करण्यासाठी हे किती स्फुर्तीदायी ठरणार आहे, ही बाब आपणाला भावणारी ठरत आहे. याचा आवर्जुन उल्लेख या प्रस्तावाच्या प्रसंगी करतो, मला अभिमान वाटतो की, पवार साहेब राष्ट्रीय अध्यक्ष आहेत व मी त्या

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनिल तटकरे...

राज्याचा प्रदेशाध्यक्ष आहे. आपण सर्वजण भाग्यवान आहोत की, हे तिन्ही कार्यक्रम आपल्याला नजरेत सामावून घेता आले, ते आपणाला पाहता आले, हे कार्यक्रम पाहता आले एवढेच भाग्य आम्ही समजतो असे नाही तर त्या विचारांशी समरस होण्याची संधी या निमित्ताने मिळाली आहे. आम्ही पांडुरंगाच्या चरणी एवढीच प्रार्थना करतो की, पवार साहेबांना उदंड आयुष्य मिळावे, त्यांच्या हातून जनसेवा व देशसेवा व्हावी, हजारो कार्यकर्ते वेगवेगळ्या पध्दतीने निर्माण व्हावेत, देशभक्ती सर्वधर्मीय पध्दतीचे विचार व सर्व क्षेत्रात प्रभुत्व दाखविणारी महाराष्ट्रातील एक तरुण पिढी त्यांच्या विचाराच्या माध्यमातून घडावी, अशा भावना या प्रस्तावाच्या निमित्ताने व्यक्त करतो. महाराष्ट्राच्या सर्व जनतेच्या वतीने माननीय मुख्यमंत्री किंवा सभागृहाचे नेते म्हणतील. परंतु या सर्वोच्च सभागृहाच्या निमित्ताने मी त्यांचे मन:पूर्वक अभिष्टचिंतन करुन माझे विचार थांबवितो, जयहिंद, जय महाराष्ट्र.

------------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय श्री.शरदचंद्र पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त अभिष्टचिंतनाचा प्रस्ताव विधानपरिषदेमध्ये मांडलेला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी अतिशय विस्तृत मांडणी केली आहे. यापूर्वी सभागृह नेते श्री. एकनाथराव खडसे हे बोलले आहेत. आपण सर्वजण राजकारणात अनेक वेगवेगळ्या टप्प्यामध्ये श्री.शरदराव पवार यांचे व्यक्तिमत्व, धुरंधर राजकारणी, व्यक्ती, नेता, राजकीय व सामाजिक अशा विविध पैलूमध्ये त्यांचा आपल्याला परिचय आहे. शिवसेनेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करीत असताना मला अतिशय आनंद होतो. नेहरु सेंटर येथील कार्यक्रमात शिवसना पक्षप्रमुख श्री.उध्दवजी ठाकरे यांनी बोलतांना सांगितले होते की, माननीय बाळासाहेब ठाकरे आज असते तर त्यांनी श्री. शरदराव पवार यांना नक्कीच आशीर्वाद दिले असते. बाळासाहेब आणि श्री.शरदराव पवार यांची वेगळ्या प्रकारची मैत्री होती. मैत्री असली तरी राजकारणात संवाद साधायची आवश्यकता असते. काही गोष्टी राजकीय तटबंदीच्या पलिकडे जाऊन बोलायच्या असतात, त्यावेळी मैत्रीमधून निश्तिपणे वेगळ्या प्रकारे पूल बांधले जाऊ शकतात, असे पूल, तशा पध्दतीच्या घटना, तशा पध्दतीची वळणे ही बाळासाहेब ठाकरे व श्री.शरदराव पवार यांच्या मैत्रीतून निश्चितपणे आपणाला दिसून येतात, यातील सर्व उल्लेख मी करणार नाही, फक्त दोन उल्लेख करणे येथे मला आवश्यक वाटते. माननीय श्रीमती प्रतिभाताई पाटील यांना देशाचे राष्ट्रपती म्हणून निवडण्याचा विचार आला त्यावेळी बाळासाहेब ठाकरे, श्री.शरदराव पवार व देशातील अनेक नेत्यांनी मिळून प्रयत्न केला. महाराष्ट्राची कन्या देशाच्या राष्ट्रपती होतात तेव्हा सर्व पक्षांनी राजकीय मतभेदाच्या पलिकडे जाऊन त्यांना पाठिंबा दिला पाहिजे. अशा प्रकारची एक ऐतिहासिक भूमिका शिवसेनेच्या बरोबर श्री.शरदराव पवार यांनी बजावली. त्यानंतर प्रणवकुमार मुखर्जी यांच्या निवडीमध्ये शिवसेना पक्षाने पाठिंबा दिला, त्यावेळी देखील श्री.शरदराव पवार यांची भूमिका चांगली होती. बऱ्याचवेळा असे वाटते की, राजकारणात व्यक्तींची मैत्री असते, त्या मैत्रीचे गहिरेपण काय आहे, ती मैत्री कशासाठी असते, शेवटी मैत्री ही वैयक्तिक असते, त्यामुळे त्यातील सर्व तपशील किंवा सगळी चर्चा प्रत्येकाला माहिती असेल किंवा माझ्या सारख्या कार्यकर्त्याला

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

माहिती असेल असा दावा मी कधीच करणार नाही. येथे मला सांगायला पाहिजे की, आम्ही वेगवेगळ्या प्रवाहातून शिवसेनेत आलो आहेत. त्यामध्ये श्री.शरदराव पवार यांनी मुख्यमंत्री पदाचे कालखंड भूषविला आहे, त्यामध्ये 18 जुलै, 1978 ते 17 फेब्रुवारी, 1980. त्यानंतर 26 जून 1988 ते 4 मार्च 1990. त्यानंतर 4 मार्च 1990 ते 25 जून 1991 आणि 6 मार्च 1993 ते 14 मार्च 1995 या विविध संघर्षाच्या काळात त्यांनी मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले आहे. 1992 पासून 1998 पर्यंत मी स्वतः यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये महाराष्ट्र महिला व्यासपीठाची संयोजक म्हणून काम करीत होते. हे काम करीत असताना मला श्री.शरदराव पवार यांच्या कामाची पध्दत आणि खास करुन सर्व महाराष्ट्रातील सामाजिक संघटना, महिला संस्था यांच्या सोबत कशा प्रकारे महिला धोरण आखता येईल याबाबत काम करताना बऱ्याच गोष्टी शिकता आल्या.

....T-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

सभापती महोदय, 1993 मध्ये लातूर येथे अतिशय भीषण असा भूकंप झाला. त्यचा भूकंपाच्या निमित्ताने संपूर्ण जगामधून वेगवेगळी मदत पाठविण्यात येत होती. या निमित्ताने आमची एक छोटी सामाजिक संस्था कार्यरत होती. मुख्यमंत्री कार्यालयातील प्रधान सचिव श्री.प्रवीण परदेशी हे त्यावेळी लातूर जिल्हयाचे जिल्हाधिकारी होते. त्यावेळी आम्ही जी संस्था चालवित होतो त्या संस्थेमार्फत 12-15 गावांमध्ये काम करावयाचे होते. शासनाने सुरुवातीला अशी भूमिका घेतली की, ज्या मोठया संस्थांना घरे बांधण्यासाठी काम करावयाचे आहे, अशा कामासाठी जे 1-2 कोटी रुपये देण्यास तयार आहेत त्या संस्थांना निर्णयाच्या माहितीमध्ये सामावून घेतले जाईल. आमची तळमळ प्रामुख्याने भूकंपामध्ये 10 हजार महिला विधवा झाल्या होत्या त्यांना मदत कशी करता येईल ही होती. 400 बालके निराधार अवस्थेत असल्याची दिसून आली होती. त्या काळात श्री.शरद पवार यांनी महिना-दीड महिना सोलापूर येथे मुक्काम केला होता.

सभापती महोदय, आंबेजोगाई येथे डॉ.लोहिया, विवेक पंडित, लातूरमधील काही संस्थांना मिळून बऱ्याच गोष्टी मांडावयाच्या होत्या. आमची कुरकुर ही होती की, आमचे म्हणणे सरकार ऐकत नाही. लातूर येथे श्री.शरद पवार यांनी आम्हाला सांगितले की, तुम्ही सोलापूरला अमुक तारखेला या. त्या तारखेला आम्ही त्यांना जाऊन भेटलो. त्यावेळी जिल्हाधिकारी श्री.परदेशी यांना त्यांनी सांगितले की, संस्था किती निधी देते त्यानुसार सरकारने त्यांचा सहभाग ठरवू नये, ज्या संस्था 2-2 कोटी रुपये घरे बांधण्यासाठी देत असतील त्यासह ज्या संस्था सामाजिक काम करीत आहेत त्यांना सुध्दा सहभागी करुन घ्यावे. त्यानंतर एक वेगळया प्रकारचे धोरणात्मक काम लातूर भूकंप पुनर्वसनाच्या निमित्ताने आमच्या संस्थेला करता आले. ज्यामध्ये एकट्या असणाऱ्या विधवा स्त्रियांना प्रत्यक्षात शेती करण्यासाठी उतरविण्यात आले. त्याचबरोबर तेथील अनेक लोक भूकंपग्रस्त होते, त्यांच्या मदतीमध्ये बदल झाला. त्यांना नवीन घरे पती पत्नी दोघांच्या नावाने दिली गेली. जनावरे पती पत्नी दोघांच्या नावाने दिली गेली. त्यावेळी सन्माननीय श्री.मधुकरराव चौधरी तेथे आले होते. आपत्तीची इष्टापत्ती कशी करता येईल या दृष्टीने सामाजिक संस्था म्हणून तुम्ही प्रयत्न करा असे ते म्हणाले. त्यावेळी श्री.शरद पवार यांनी आमच्यासारख्या संस्थांना प्रोत्साहित केले. त्यामधून सरकार आणि सामाजिक संस्थांमध्ये फार मोठे युध्द सातत्याने सुरु असले पाहिजे असा भाग नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

21-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) T.2

SGB/ MMP/ AKN/ 16:10

डॉ.नीलम गोऱ्हे.....

सभापती महोदय, आमच्या असे लक्षात आले की, लोकांना ब्लँकेट दिली गेली, ती एका ब्लँकेटचे दोन भाग करुन देण्यात आली. त्यावेळी एका ब्लँकेटचे दोन भाग करुन वाटप केले ते योग्य नाही याबद्दल महाराष्ट्र टाईम्स या दैनिक वृत्तपत्रामध्ये माझे स्टेटमेंट छापून आले होते. त्या दिवशी मला श्री.शरद पवार यांचा फोन आला की, आज महाराष्ट्र टाईम्स वाचला. त्यामधून त्यांनी माझे स्टेटमेंट वाचले हे लक्षात आले. इतक्या मोठया प्रमाणात ब्लँकेट वाटप सुरु असताना एक-दोन अधिकाऱ्यांनी चुकीच्या गोष्टी केल्या असतील तर आम्ही जरुर दुरुस्ती करु परंतु उर्वरित प्रशासन नाराज होऊन पूर्ण यंत्रणा ठप्प होईल अशी भूमिका घेऊ नये असे म्हणणे पडले. स्वतः मुख्यमंत्री श्री.शरद पवार एखाद्या सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्याशी बोलतात, त्यांना भूमिका समजावून सांगतात अशा वेळेला निश्चितपणे आदर करणे हा एक भाग असतो.

सभापती महोदय, 1994 साली राज्य सरकारने महिला धोरण आखले. राज्याचे महिला धोरण तयार करताना निश्चितपणे आम्हाला समाधान वाटत होते. महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे, ज्या राज्याने संपत्तीमधील वाटा स्त्रीला देण्याच्या संदर्भात सकारात्मक भूमिका घेतली आणि कायद्यामध्ये बदल करण्याची बीजे या धोरणामध्ये रोवली गेली. महिला धोरणामधून कोणता कृती कार्यक्रम तयार होणार याबाबत टीका होत होती. 1998 मध्ये माझी महिला आर्थिक विकास मंडळावर अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. त्यावेळी महिला धोरणाच्या प्रत्येक कृती कार्यक्रमाचा विभागनिहाय सचिव, मुख्यमंत्री आणि संबंधित विभागाकडे पाठपुरावा करु शकलो. 2002 मध्ये पुन्हा महिला धोरणाची पुनर्रचना झाली. त्यामध्ये काही मुद्दे घातले गेले. 2013 चे महिला धोरण सर्वपक्षीय महिलांनी मिळून ठरविले. त्यावर आधारित 1994 चे महिला धोरण आहे. या सगळ्याबरोबर विविध विषयांचा अभ्यास, अधिकाऱ्यांबरोबर बोलण्याची हातोटी, अधिकाऱ्यांकडून माहिती घेणे, अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करणे या संदर्भात ते जसे प्रेमाने बोलत असत तसेच काही वेळेला आम्ही त्यांना अधिकाऱ्यांवर रागावलेले सुध्दा पाहिले आहे. काही वेळेला मी आमदार असताना मला सातत्याने धमक्या येत होत्या. त्यावेळी स्व.आर.आर.पाटील हे गृहमंत्री होते, त्यांच्या कानावर हा विषय घातल्यानंतर श्री.शरद पवार यांनी फोन केला. अशा परिस्थितीत काय

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

केले असेल? त्यांनी 3-4 अधिकाऱ्यांची नावे घेतली.  10 मिनिटात त्या अधिकाऱ्यांचा मला फोन आला.  धमक्याच्या मुळाशी जाऊन तो विषय संपुष्टात आणल्याचे मला दिसून आले.

....3...



डॉ.नीलम गोऱ्हे.....

सभापती महोदय, मी शिवसेना पक्षात काम करीत असताना विरोधी पक्षातील प्रमुखांनी आपल्याकडे तक्रार मांडली.  त्याला मदत करण्याच्या संदर्भात त्यांची भूमिका होती.  इतकेच नव्हे तर 2005 मध्ये शिवसेनेमधून काही नेते बाहेर पडले आणि त्यांनी विधानसभेत शिवसेनेच्या त्या फुटीर आमदारांची आमदारकी रद्द व्हावी या दृष्टीने त्यांनी प्रयत्न चालविले होते.  अशा परिस्थितीत आपण काम करावयास पाहिजे यासाठी आमची त्यांच्याशी अनौपचारिक चर्चा चालू होती.  पेचप्रसंग असतील त्यावेळेला आमचे पक्षश्रेष्ठी बाळासाहेब ठाकरे त्यांच्याशी चर्चा करीत असत.  बाळासाहेब ठाकरे यांचे राहत्या घरी दु:खद निधन झाले.  आमचे पक्षप्रमुख गेले म्हटल्यावर आम्हाला कोणाला काही सुचत नव्हते.  तशी परिस्थिती नव्हती.  मला आठवते, श्री.शरद पवार यांनी त्या संपूर्ण काळात श्री.संजय राऊत, मी आणि इतर अनेक जणांना फोन केले आणि बाळासाहेब ठाकरे यांच्याशी त्यांचे कसे घनिष्ठ संबंध होते याबद्दल ते सातत्याने बोलत होते.

सभापती महोदय, जाहिरात वगैरे विषय नसतो.  राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी आमचे 100 टक्के मतभेत अनेक बाबतीत असू शकतात.  आम्ही शिवसैनिक म्हणून संपूर्णपणे अंत्यसंस्कारात बुडून गेलो होते.  राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आम्हाला वैशिष्ट्य वाटले.  संपूर्णपणाने दु:ख व्यक्त करणाऱ्या भावना त्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने व्यक्त केल्या होत्या.  जसे एखाद्या घरामध्ये एखादी दु:खद घटना घडल्यानंतर स्वयंपाक होत नाही, अशावेळी शेजारचे लोक जेवण बनवून पाठवितात.  सगळ्या राजकीय मतभेदाच्या पलीकडे जाऊन एकमेकाशी चर्चा होऊ शकते.  मला असे वाटते की, श्री.शरद पवार यांच्यापर्यंत एखादी भावना पोहोचवायची असेल तर आम्ही माननीय उप सभापती यांची मदत घेत होतो, त्या भावना त्यांच्यापर्यंत पोहोचल्या.  सर्व पक्षांचे वेगवेगळे राजकारण असते.  परंतु सर्वांचे मिळून समाजकारण आणि राजकारण असते.  या दृष्टीने श्री.शरद पवार यांच्या सत्काराचा कार्यक्रम दिल्ली, मुंबई व पुण्यामध्ये झाला.  त्यामधून परत एकदा महाराष्ट्रातील वातावरण सुदृढ होईल ही एक जाणीव सातत्याने होत राहिली.  दिल्लीतील आमच्या काही मैत्रिणी, प्रेसमधील व्यक्ती, इतर पक्षाचे वेगवेगळे प्रतिनिधी यांच्याशी आम्ही बोलतो त्यावेळी त्यांच्या मनात महाराष्ट्राच्या नेतृत्वाबद्दल काही रिझर्व्हेशन्स दिसून आल्या.  ते म्हणतात, तुमचे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लोक फक्त तुमच्याच राज्याचा विचार करतात. या ठिकाणी मला वाटते की, एका बाजूला श्री.शरद पवार देशाच्या नेतृत्वाचा विचार करीत असताना सातत्याने त्यांचे लक्ष राज्याकडे राहिले आहे. राष्ट्रवादी पक्षाचे नेते, देशाचे संरक्षण मंत्री व कृषी मंत्री म्हणून त्यांनी काम केलेले असले,

......4..



डॉ.नीलम गोऱ्हे.....

आज सगळया राज्यांमध्ये त्यांचे पूर्वीचे नेटवर्क असले तरी हिंदी भाषिक लॉबी देशामध्ये राष्ट्रीय स्थानावर आहे. बिगर हिंदी भाषिक लॉबी म्हणजे दक्षिणेमधील राज्ये काही बाबतीत एक होतात. महाराष्ट्र, गोवा, गुजरात आणि काही प्रमाणात मध्यप्रदेशमधील भागातून येणारे नेतृत्व देशव्यापी होत असताना नेटवर्क स्वीकारार्ह ठरेल. परंतु संख्यात्मक नेतृत्व करण्यामध्ये त्यात काही अडचणी आहेत, त्या सातत्याने आपल्याला दिसून येतात.

यू.1........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, ते धुरंदर राजकारणी आहेत. राजकारणामध्ये मैत्री कशी ठेवायची हे त्यांच्याकडून शिकावे असे ते एक वेगळ्या प्रकारचे नेते आहेत असे मला वाटते. आपले राजकीय विरोधक किती संतापतील आणि संतापून ते चुका कशा करतील याचा देखील त्यांना अंदाज असतो. शिकारी हा त्यांच्यावर गोळी झाडत असतो पण ती गोळी त्यांना लागण्या ऐवजी शिकाऱ्याच्या पाठीमागे लागते. असे देखील राजकारणात कित्येक वेळा घडल्याचे चित्र आपण पाहिलेले आहे. त्यांच्याकडून शिकण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. त्यांच्याकडून काही वेळा कार्यकर्ते किंवा व्यक्ती अनेक वेळा दुखावल्या जातात. त्यावेळी ते वेगवेगळ्या पद्धतीचा रस्ता अवलंबितात, याची देखील उदाहरणे आहेत. ते राजकारणामध्ये अपरिहार्य असते असे मला वाटते. त्यांना 75 वर्षे पूर्ण झालेली असल्यामुळे महाराष्ट्राच्या विधिमंडळामध्ये गौरवोद्‌गार काढत आहोत. सहकार, कृषी, उद्योग, उद्योगाचे विकेंद्रीकरण. आधुनिक शेती, महाराष्ट्राची संस्कृती, गौरव यासंदर्भातील त्यांचा अभ्यास दांडगा आहे. आजही त्यांची कष्ट करण्याची तयारी आहे. ते सकाळी 8.00 वाजल्यापासून ते रात्रो 10.30 वाजेपर्यंत आपला दौरा करतात. ते कोणालाही फोन करून माहिती घेतात. ती महिती घेतना त्यांची जी भूमिका असते ती खरोखर राजकारणातील कार्यकर्त्यांनी शिकण्यासारखी आहे. त्यांना 75 वर्ष पूर्ण होत असताना त्यांनी शतायुषी व्हावे व त्यांना चांगल्या प्रकारचे राजकीय सहकार्य मिळो व सुसंवादातून त्यांचे कार्य अधिक वृद्धिंगत होऊन गोरगरीब शेतकऱ्यांना त्याचा फायदा व्हावा अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करते. धन्यवाद. जय महाराष्ट्र.

......



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.नरेंद्र पाटील)**

श्री.शरद रणपिसे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय श्री.शरदरावजी पवार साहेबांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने अभिनंदनाचा जो प्रस्ताव सभागृहासमोर आला आहे त्याला काँग्रेस पक्षाच्या वतीने मी पाठिंबा देतो आणि माननीय श्री.शरद पवार साहेबांना शुभेच्छाही देतो.

सभापती महोदय, या अमृतमहोत्सावाच्या निमित्ताने तीन कार्यक्रम झाले. एक दिल्लीमध्ये झाला, दुसरा मुंबईमध्ये झाला आणि तिसरा पुण्यामध्ये कार्यक्रम झाला. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष श्री.सुनील तटकरे, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे, विधान सभेचे सन्माननीय सदस्य श्री.अजितदादा पवार, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले या सगळ्या सहकार्यांनी अतिशय उत्तम प्रकारचे कार्यक्रमांचे आयोजन केले होते. दिल्लीच्या कार्यक्रमाबद्दल मला अनेक नेत्यांनी सांगितले की, सर्व राजकीय पक्षाचे नेते त्या कार्यक्रमाला उपस्थित होते. काँग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनियाजी गांधी यांचे भाषण अप्रतिम झाले. अशा प्रकारे तिन्ही ठिकाणी उत्तम कार्यक्रम झाला. तेव्हा मी सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, एखाद्या व्यक्तीने वयाची 50 वर्षे, 61 वर्षे, 75 वर्षे पूर्ण केल्याबद्दल आपण त्याचा वाढदिवस साजरा करतो. मग त्या व्यक्तीने आयुष्यात काय केले याचा एक आलेख आपण मांडतो. त्या व्यक्तीचे आयुष्य, जीवन यशस्वी झाले किंवा नाही याबद्दल चर्चा करतो. मी या निमित्ताने एक उदाहरण देऊ इच्छितो. थोर तत्वज्ञ बरट्रॉल रसेल यांचाही एकदा वाढदिवस लंडनमध्ये साजरा झाला. त्यावेळी जगातील अनेक मोठ-मोठे लोक, पत्रकार उपस्थित होते. त्या पत्रकारांनी विचारले की, श्री.रसेल साहेब, सगळे जग मतभेद विसरून आपणास मान-सन्मान देतात, आपले मोठेपण मान्य करतात, आपल्या यशस्वी जीवनाचे गमक कशात आहे, आपले जीवन कशामुळे यशस्वी झाले ? त्यावेळी रसेल साहेबांनी फार चांगले उदाहरण दिले. ते म्हणाले की, आयुष्यात खूप धनदौलत मिळाली म्हणून जीवन काही यशस्वी होत नाही. खूप सत्ता मिळाली म्हणून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरदे रणपिसे....

जीवन यशस्वी झाले असे म्हणता येत नाही. खूप मोठे आयुष्य लाभले म्हणून जीवन यशस्वी झाले असे म्हणता येत नाही. परंतु, ऐन तारूण्यात आपल्या भोवती सामाजिक प्रेरणा असतात त्या प्रेरणांशी समरस होऊन त्या व्यक्तीने सामाजिक बांधिलकीसाठी किती काम आहे केले त्यावर त्या व्यक्तीचे जीवनावरील यशस्वीपण अवलंबून असते. त्यामुळे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते की, पवार साहेबांनी आपल्या ऐन तारूण्यात आपले सगळे जीवन या सामाजिक बांधिलकीसाठी, प्रेरणेसाठी व्यतित केले. त्यामुळे त्यांचे जीवन यशस्वी झाले असे म्हटले तर त्यात काहीही वावगे होणार नाही.

सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सांगितले की, 1967 ते 2015 या कालावधीत सलग विधानसभा किंवा संसदेमध्ये 48 वर्षे एका दिवसाचा खंड न पडता लोकप्रतिनिधीत्व करण्याचा विक्रम श्री.पवार साहेबांनी केला आहे. त्यांच्या निवडणुकांचे देखील वैशिष्ट्य आहे. बारामती हे त्यांचे बलस्थान आहे. या मतदार संघात अर्ज भरल्यानंतर प्रचाराचा नारळ फोडायचा. मधल्या कालावधीमध्ये जायचे नाही. मतदानाच्या अगोदर द्यायचे, मतदार राजाला नमस्कार करायचा, मतदान करायचे आणि मधल्या काळात महाराष्ट्र पिंजून काढायचा अशी त्यांची कार्यपद्धती आहे. मी अत्यंत नम्रपणाने सांगू इच्छितो की, अशा प्रकारचे राजकीय व्यक्तिमत्व आज महाराष्ट्रात कोण असेल तर ते श्री.पवार साहेब आहेत. याचा मी आवर्जून उल्लेख करू इच्छितो.

सभापती महोदय, श्री.पवार साहेबांची कार्यशैली मी जवळून पाहिली आहे. माझा 1970-72 पासून त्यांच्याशी संपर्क आहे. त्यांचे वैशिष्ट्य असे आहे की, संघटनेत आणि राजकारणात काम करीत असताना योग्य तरूण कार्यकर्ते शोधणे, नेते शोधणे, त्यांना ताकद देणे आणि आपली संघटनात्मक शक्ती वाढविणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. आजही राज्यात अनेक नेते आहेत, राजकीय पक्ष आहेत. त्या नेत्यांनी आपल्या परिने काम केलेले आहे. त्यांचाही आपण सन्मान करतो. परंतु, राज्यातील 288 मतदार संघ, 48 लोकसभा मतदार संघामध्ये हुज हू, व्हॉट इज व्हॉट, कोणाचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरदे रणपिसे....

संबंध काय आहे, रिपब्लीकन पक्षाचे काय चालले आहे, जनता दलाचे काय चालले आहे, इतर राजकीय पक्षांचे काय चालले आहे, याची इत्यंभूत माहिती असणारा एकमेव नेता म्हणजे श्री.शरद पवार साहेब आहेत याचाही मी आवर्जून उल्लेख करतो. त्यामुळे हा नेता जमिनीवर पाय ठेवून चालणारा आहे असे म्हटले तर त्यात काही वावगे होणार नाही.

सभापती महोदय, श्री.दिनेश देसाई हे त्यांचे मित्र आहेत. त्यांनी त्यांच्यावर दी मॅन ऑफ ऑल क्रायसिस यांवर इंग्रजी पुस्तक लिहिले आहे. हे अगदी छोटेखानी पुस्तक आहे. अत्यंत चांगले असे हे पुस्तक आहे. क्रायसिस मधून पवार साहेबांचे नेतृत्व कसे उभे राहिले याबद्दलचा चांगला आलेख त्यांनी मांडलेला आहे. मी जास्त वेळ त्या खोलात जाणार नाही. किल्लारीचा भूकंप असेल, बाबरी मशीद पडल्यानंतर उसळलेली दंगल असेल, 1993 मध्ये मुंबईमध्ये झालेली बॉम्बस्फोट मालिका असेल या सगळ्याबाबतीत श्री.पवार साहेबांचे नेतृत्व आपल्याला खुलून दिसते हेही मी या निमिताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, त्यांचे तिसरे वैशिष्ट्य असे आहे की, त्यांना देशाच्या आणि राज्याच्या राजकारणाची जाण आहे.

V-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे ......

मधील काळात मोठमोठे राजकीय पक्ष थोडे मागे पडले होते. त्यावेळेस मी पवार साहेबांबरोबर पुण्यामध्ये चर्चा करीत बसलो होतो. त्यावेळेस ते म्हणाले की, यानंतर प्रादेशिक पक्ष मोठया प्रमाणात युदयास येतील. आणि त्यांचे म्हणणे खरे ठरले. त्यावेळेस तृणमुल काँग्रेस,मुपनार काँग्रेस, जनता दल, बिजू जनता दल, सेक्युलर जनता दल, डीएमके, अण्णा डिएमके, लोक दल, नॅशनल फ्रंट हे प्रादेशिक पक्ष मधील काळात मोठया प्रमाणात पुढे आले. या प्रादेशिक पक्षाचे नंतर काय होणार यासंदर्भातही माननीय पवार साहेबांनी भाकीत केले होते. आपल्या सर्वांना आठवत असेल की, 21 खासदारांच्या जोरावर श्रीमती जय ललिता यांनी केंद्रातील भाजपा प्रणित सरकार उलथून लावले होते हे आपल्या कोणालाही विसरता येणार नाही आणि एवढी राजकीय माहिती, राजकीय जाण पवार साहेबांना आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी मंडल आयोगाचा उल्लेख केलेला आहे. मंडल आयोगाची अंमलबजावणी माननीय पवार साहेबांनीच केली होती. मी अभिमानाने सांगू इच्छितो की, पंतप्रधान कै.राजीव गांधी यांनी महिला सक्षमीकरणाचे धोरण आणले, घटनेमध्ये दुरुस्ती केली आणि मंडल आयोगाची पहिली अंमलबजावणी महाराष्ट्रात झाली आणि त्याचे श्रेय आपल्याला माननीय पवार साहेबांना दिले पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना त्यांनी या निमित्ताने आरक्षण दिले.

सभापती महोदय, माननीय पवार साहेबांनी दिल्लीत आणि देशात आपल्या राजकारणाचा ठसा उमठवला होता हे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते. पवार साहेब ज्यावेळेस पहिल्यांदा लोकसभेत गेले त्यावेळेस पवार साहेब संसदेत कसे काम करतात यांसदर्भात कुजबूज सुरु झाली. माननीय पवार साहेब ज्यावेळेस पहिल्यांदा लोकसभेत बोलावयास उभे राहिले त्यावेळेस त्यांनी "अध्यक्ष महाराज" म्हणून भाषणास सुरुवात केली. आपल्याला विधानसभेत अध्यक्ष महाराज म्हणावयाची सवय पडलेली असते. पवार साहेब चुकून पहिल्याच दिवशी, पहिल्याच वेळेला "अध्यक्ष महाराज" म्हणाले. उत्तर भारतात "महाराज" हा शब्द स्वयंपाकी किंवा आचाऱ्याला उद्देशून बोलला जातो. यासंदर्भात दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात पत्रकारांनी यासंदर्भात टीका केली. परंतु तसे काही झाले नाही. पवार साहेबांनी देशाच्या राजकारणात आपला ठसा उमठवला.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे ......

सभापती महोदय, महाराष्ट्राचे जे जे नेते संसदेमध्ये गेले, ज्यांनी आपल्या कामाचा ठसा उमठवला त्यामध्ये स्व.यशवंजरावजी चव्हाण यांचे नाव आपल्याला घ्यावे लागेल. एकदा श्रीमती इंदिरा गांधी म्हणाल्या होत्या की, "Yashwantrao Chavan and Babu Jagjivanram are the pillars of the Parliament." आदरणीय चव्हाण साहेब, आदरणीय वसंतराव नाईक, आदरणीय वसंतदादा पाटील यांच्या बरोबर काम करण्याची संधी मला मिळाल्यामुळे मी स्वतःला फार भाग्यवान समजतो. केंद्रामध्ये स्व.यशवंतराव चव्हाणांनी आपला ठसा उमठवला होता. ते देशाचे उप पंतप्रधान झाले. मी या ठिकाणी आवर्जून माननीय शंकरराव चव्हाण साहेबांचा उल्लेख करतो. चव्हाण साहेब केंद्रामध्ये गृहमंत्री पदापर्यंत गेले. एक निष्कलंक व्यक्तिमत्व आणि प्रशासन कसे करावे याचा आदर्श शंकरराव चव्हाण यांनी घालून दिलेला आहे. आजही इरिगेशन डिपार्टमेंटच्या फाईल्स काढल्या तर त्यावर इरिगेशन मंत्री म्हणून चव्हाण साहेबांनी जे नोटींग लिहिलेले आहे त्या नोटींगला राज्यसरकारचे अधिकारी प्रमाण मानतात एवढे त्यांचे महत्व आहे.

सभापती महोदय, माननीय चव्हाण साहेबांच्या नंतर देशाच्या राजकारणात कृषी मंत्री म्हणून माननीय पवार साहेबांनी ठसा उमठवला आहे याचे मी या ठिकाणी आवर्जून उल्लेख करतो. माननीय पवार साहेबांचे कौतुक देशाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंहांनी सुध्दा केलेले आहे.

सभापती महोदय, संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर स्व.यशवंतराव चव्हाणांनी त्याचा पाया घातला. कृषी, सहकार, उद्योग, शिक्षण या सर्व क्षेत्रामध्ये माननीय यशवंतराव चव्हाणांनी ज्या मूलभूत गोष्टी केल्या त्याला महाराष्ट्र कधीही विसरु शकणार नाही. माननीय यशवंतरावांचे कर्तृत्व फार मोठे होते. 1962 मध्ये चीन बरोबर युध्द झाले, कृष्ण मेनन यांना संरक्षण पदाचा राजीनामा द्यावा लागला त्यावेळेस पंडित जवाहरलाल नेहरु पंतप्रधान होते. त्यावेळेस या देशाचे संरक्षण मंत्री पदासाठी माननीय पंडितजीची नजर महाराष्ट्राकडे आली आणि माननीय यशवंतराव चव्हाण साहेब देशाचे संरक्षण मंत्री झाले आणि महाराष्ट्राचा सह्याद्री हिमालयाच्या रक्षणासाठी धावून गेला असे मथळे दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रातून लिहून आले. माननीय यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राचा पाया घातला होता. त्यांनी प्रगतीचा आणि विकासाचा पाया रचला.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे ......

सभापती महोदय, आपण माननीय वसंतराव नाईक यांना आपण कधीही विसरु शकणार नाही. 1972 च्या दुष्काळात ऊसाचा चोथा आणि गुळाची मिश्रित सुकडी खावून लोक जिवंत राहिले. त्यावेळेस लोकांनी आत्महत्या केल्या नाहीत, जनावरे मेली नाहीत. त्यांनी सगळयांचे प्रश्न सोडवले.

सभापती महोदय, माननीय वसंतराव नाईक यांचे पुण्यातील शनिवार वाडयामध्ये भाषण झाले होते त्यामध्ये ते म्हणाले होते की, "या महाराष्ट्रामध्ये जर हरितक्रांती झाली नाही तर शनिवार वाडयाच्या समोर मला फासावर लटकवा". माननीय वसंतराव नाईकांनी महाराष्ट्रामध्ये भरीव अशी कामगिरी केली आहे.

सभापती महोदय, मला माननीय शंकरराव चव्हाण साहेबांचा उल्लेख करावा लागेल. ते उत्तम प्रशासक आणि निष्कलंक होते. त्यांनी सुध्दा आपला कार्याचा ठसा महाराष्ट्राच्या जीवनात उमठवला होता.

सभापती महोदय, कमी शिक्षण घेतलेले उत्तम प्रकारे प्रशासन करु शकतात, उत्तम प्रकारे राज्यकारभार करु शकतात असा इतिहास कुणी निर्माण केला असेल तर तो कै.वसंतदादा पाटील यांनी निर्माण केला आहे. माननीय यशवंतराव चव्हाण, माननीय वसंतराव नाईक, माननीय शंकरराव चव्हाण, माननीय वसंतदादा पाटील यांनी महाराष्ट्रावर आपला ठसा उमठवला असून त्यांच्या नंतर महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये आपल्याला माननीय शरद पवार साहेबांचे नाव घ्यावे लागेल हे मी या ठिकाणी अवर्जून सांगू इच्छितो.

शेवटी एवढेच म्हणेन की, वास्तवाची जाण आणि प्रश्नाचे भान या सर्व गोष्टींचे मिश्रण माननीय पवार साहेबांच्या नेतृत्वात झालेले आहे. माननीय पवार साहेबांबरोबर मला विधानसभेत काम करण्याची 10 वर्षे संधी मिळाली होती. माननीय पवार साहेब संसदीय कामामध्ये जीव ओतून काम करीत असल्याचे मी बघितले आहे. 1993 मध्ये मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाले त्यावेळेस मी सभागृहात होतो. 24 तासाच्या आत देशाचे वैभव असलेले स्टॉक मार्केट त्यांनी सुरु केले होते. मुंबई बॉम्बस्फोट मालिकेत त्यांनी जनतेला विश्वास दिला. दंगली झाल्यानंतरही लोक 8-10 दिवस

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे ......

घरात बसले असे चित्र नव्हते. 24 तासाच्या आत मुंबई पूर्ववत झाली होती हे मी डोळयाने पाहिलेले आहे. एवढेच नाही तर मुंबईचे वैभव पुन्हा प्राप्त व्हावे, मुंबई बिझनेस सेंटर व्हावे म्हणून त्यांनी बीकेसीची निर्मिती करण्याची घोषणा केली त्यामुळे महाराष्ट्राला फार मोठा दिलासा मिळाला.

सभापती महोदय, मुंबईमध्ये जेव्हा बॉम्बस्फोट झाले त्यावेळेस माननीय श्री. माणिकराव ठाकरे गृहराज्यमंत्री होते. जखमींना पाहण्यासाठी ते जे.जे.रुग्णालयात गेले होते त्यावेळेस माननीय माणिकराव ठाकरे हे सुध्दा त्यांच्या बरोबर होते. त्या ठिकाणी तुफान जनसमुदाय होता. माननीय पवार साहेबांना परिस्थितीचे भान असायचे. त्यांनी माणिकरावांना सांगितले की, आता जनसमुदाय संतापलेला आहे. "आपले येथून जाणे हे आता योग्य राहील". मुंबई 24 तासात पूर्ववत सुरु करणे हे मुख्यमंत्री म्हणून माननीय पवार साहेबांनी केलेले कर्तव्य फार मोठे आहे. हे सर्व मिश्रण पवार साहेबांच्या नेतृत्वात झांलेले आहे. त्यामुळे मी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने माननीय पवार साहेबांना मनापासून शुभेच्छा देतो, त्यांना शतायुषी चिंतितो आणि मी माझे भाषण येथेच संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री.एकनाथराव खडसे यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त जो अभिष्टचिंतनाचा प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, दिनांक 12 डिसेंबर, 2015 रोजी माननीय श्री.शरद पवार साहेबांनी 75 वर्षात पदार्पण केले. साधारणत: रौप्य महोत्सव, सुवर्ण महोत्सव, एकसष्ठी आणि अमृत महोत्सव साजरे केले जातात. अमृत महोत्सवाचे भाग्य फार कमी लोकांना लाभते. राजकारणामध्ये काम करीत असताना 75 वर्षे गाठणारा हा एकमेव नेता आहे आणि आपण सर्वजण त्यांचे अभिष्टचिंतन करीत आहोत.

सभापती महोदय, श्री.शरद पवार साहेबांच्या अमृत महोत्सवानिमित्ताने दिल्लीमध्ये कार्यक्रम झाला. या कार्यक्रमास देशातील सर्व पक्षांतील नेत्यांची मांदियाळी होती. या कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्वच पक्षांतील नेत्यांनी त्यांच्या कामांचा गुणगौरव केला. मागील 50-60 वर्षात असा कार्यक्रम प्रथमच झाला असावा, असे मला वाटते. मुंबईमध्ये अशाच पद्धतीचा कार्यक्रम झाला. काल देखील पुण्यामध्ये अशाच पद्धतीचा कार्यक्रम झाला. कालच्या कार्यक्रमात त्यांनी यापुढे कोणत्याही सत्काराच्या कार्यक्रमाला जाणार नाही असे घोषित केले.

सभापती महोदय, 37 वर्षापूर्वी माझा श्री.शरद पवार साहेबांशी संबंध आला. देशात आणीबाणी झाल्यानंतर देशात आणि राज्यात निवडणुका झाल्या. त्यावेळी मी कॉलेजमध्ये एलएल.बी.शिकत होतो. जनता पार्टीने मला खामगाव मतदारसंघातून निवडणुकीसाठी उभे केले. ज्या मतदारसंघामध्ये जनता पार्टीच्या उमेदवाराची अनामत रक्कम कधीही वाचली नाही अशा खामगाव मतदारसंघामध्ये मला निवडणुकीसाठी उभे करण्यात आले. त्या निवडणुकीमध्ये मी विजयी झालो. ही 1978 सालची गोष्ट आहे. तेव्हापासून माननीय श्री.शरद पवार साहेबांशी माझा संबंध आला. त्यानंतरच्या घडामोडीचे मी रिपिटेशन करणार नाही. त्यानंतर राज्यामध्ये वसंतदादाचे सरकार आले, त्यावेळी जनता पार्टीचे 120 उमेदवार निवडून आले होते. जनता पार्टी शेकापची मदत घेऊनही सरकार बनवू शकत नव्हते. तेव्हा वसंतदादाच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले आणि श्री.नासिकराव तिरपुडे उपमुख्यमंत्री झाले. वर्षा-दीड वर्षानंतर ते सरकार पडले



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर......

आणि श्री.शरद पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली पुलोदचे सरकार आले. त्या पुलोदच्या सरकारमध्ये जनता पार्टीचा समावेश होता. तेव्हापासून मी श्री.शरद पवार साहेबांच्या संपर्कात आलो. श्री.शरद पवार साहेबांचे नेतृत्व जबरदस्त होते, त्यांची संघटन शक्ती जबरदस्त होती. त्यांची व्हील पॉवर जबरदस्त होती. त्यांच्याकडे लोहचुंबकासारखा गुण होता. कोणीही त्यांच्याकडे आकर्षित होत असे. आम्ही जेव्हा नव्याने निवडून आलो तेव्हा श्री.शरद पवार साहेबांनी आम्हाला सांगितले की, "तुम्ही नवीन आहात, तुम्ही चांगल्या पद्धतीने काम करा, तुम्हाला राजकारणामध्ये खूप वर्षे काम करायचे आहे." ते मुख्यमंत्री असताना त्यांच्याशी वेगवेगळ्या कामाच्या निमित्ताने भेट होत असे त्यावेळी ते आम्हाला काही गोष्टी सांगत असत.

सभापती महोदय, एके दिवशी अचानाक श्री.शरद पवार साहेबांनी मला त्यांच्या दालनात बोलाविले आणि सांगितले की, मला एक पत्र लिहून दे, मी तुला खामगाव मतदारसंघासाठी सूतगिरणी मंजूर करतो. माझ्या डोक्यात असा कधी विचार आला नाही आणि कधी तसा विचारही केला नाही. मी सहकार क्षेत्राशी संबंधितही नव्हतो. मी त्यांना सांगितले की, मला विचार करण्यास दोन दिवस द्या. मी दोन दिवसानंतर त्यांना सांगितले की, मला सूतगिरणी नको. परंतु माझ्या मतदारसंघातील दोन प्रकल्पांचा सर्व्हे झालेला आहे, त्या दोन प्रकल्पांना मंजुरी दिली तर मला सूतगिरणी मिळाल्यासारखे होईल. त्यांनी माझ्याकडून त्या दोन प्रकल्पाची माहिती मागवून घेतली आणि मला दोन दिवसानंतर सांगतो असे सांगितले. दोन दिवसानंतर त्यांनी मला बोलावून सांगितले की, त्या प्रकल्पांचा प्रोजेक्ट रिपोर्ट करायला सांगितला आहे, आठ दिवसात या प्रकल्पांच्या कामास मंजुरी देतो. आठ दिवसाच्या आत मला त्या दोन्ही प्रकल्पास मान्यता मिळाल्याचे पत्र मिळाले. मी राजकारणात 30-35 वर्षे काम करीत आहे. राजकरण कसे असावे, बदल्या बदल्यांच्या संदर्भातील राजकारण सांगणार नाही. नवीन निवडून आलेल्या आमदाराचा मतदारसंघ कसा डेव्हलप झाला पाहिजे यासाठी मार्गदर्शन करणारा नेता असा असावा. मी त्यांच्या पक्षाचा सदस्य नव्हतो. खामगाव मतदारसंघात ज्यांचा मी पराभव केला ते काँग्रेस पक्षाचे उमेदवार होते आणि ते श्री.शरद पवार साहेबांच्या जवळचे होते. असे असताना सुद्धा त्यांनी मला सांगितले

श्री.पांडुरंग फुंडकर......

की, हा मतदारसंघ तुला डेव्हलप करायचा आहे, नीट काम कर. आज ते दोन्ही प्रकल्प पूर्ण झालेले असून शेतीला पाणी मिळत आहे, याचा मला आनंद आहे. मला अशी अनेक उदाहरणे देता येतील. श्री.शरद पवार हे संरक्षण मंत्री असताना मी खासदार होतो. मी निवडणुकीसाठी उभे रहायचो त्यावेळी श्री.शरद पवार साहेब हमखास अकोल्यामध्ये प्रचारासाठी यायचे. कारण अकोला मतदारसंघ हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला होता. श्री.वसंत साठे हे तेथून सातत्याने निवडून येत होते आणि त्या मतदारसंघामध्ये भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराची अनामत रक्कम जप्त होत असे. सन 1984 मध्ये निवडणूक झाली त्यावेळी मला पक्षाने उभे राहण्यास सांगितले. श्री.प्रकाश वैराळे आणि श्री.प्रकाश आंबेडकर यांच्या विरोधात मी निवडणुकीसाठी उभा होतो. त्यावेळी श्री.शरद पवार साहेबांनी मला सल्ला दिला की, तू निवडणुकीसाठी उभा राहू नकोस. तुझी निवडणूक लढविण्याची ही वेळ नाही, तुला महाराष्ट्रात काम करायचे आहे. मी त्यांना सांगितले की, मला पक्षाने आदेश दिलेला आहे, मला लोकसभेची निवडणूक लढवावी लागेल. त्या निवडणुकीत माझा पराभव झाला. त्यानंतर मी 1989 निवडणूक लढविली आणि लोकसभेत निवडून गेलो. मला असे अनेक प्रसंग सांगता येतील. राज्य सहकारी बँकेच्या निवडणुकीचा प्रसंग सांगता येईल. लोकसभेत घडलेले अनेक प्रसंग येथे सांगता येतील. मी श्री.शरद पवार साहेबांकडे आकर्षित झालो. मी तत्वाशी कधी तडजोड केली नाही. लोकसभेत मतदानाचे अनेक प्रसंग आले पण श्री.शरद पवार साहेबांनी मला कधीही क्रॉस व्होटींग कर असे सांगितले नाही. त्यांनी मला पक्षाचे काम करण्यास सांगितले. मी जेव्हा प्रदेशाध्यक्ष झालो त्यावेळी श्री.शरद पवार साहेबांना भेटलो होतो. त्यानंतर विरोधी पक्ष नेता झाला त्यावेळी देखील त्यांना भेटलो होतो. मी विरोधी पक्ष नेता असताना दिल्लीमध्ये गेलो होतो. दिल्लीत आलो आहे तर श्री.शरद पवार साहेबांना भेटून जाऊ म्हणून मी त्यांच्या कार्यालयाला फोन लावला. मी त्यांना विचारले की, साहेब आहेत काय, मला त्यांना भेटायचे आहे. आपण कोण अशी मला विचारणा झाली. मी त्यांना माझे नाव सांगितले. त्यांनी श्री.शरद पवार साहेबांना विचारले आणि मला भेटीची वेळ दिली.

.....X-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

मी त्यांना भेटण्यासाठी जायचे ठरविले. परंतु त्याच दरम्यान आमच्या पक्षाचे तत्कालीन अध्यक्ष श्री.नितीन गडकरी यांच्याकडे गेलो असता तेथेच मला थोडा वेळ झाला. त्यामुळे माझी माननीय श्री.पवार साहेबांना भेटण्याची वेळ चुकली. तद्नंतर मला त्यांच्या कार्यालयातून फोन आला. मला माननीय श्री.शरद पवार साहेबांनी विचारले की, तुम्ही भेटण्यासाठी येणार आहात की नाही ? सभापती महोदय, माननीय श्री.पवार साहेबांनी माझी अर्धा तास वाट बघितली होती. त्यानंतर ते कार्यालयातून घरी जाण्यास निघाले. ते कार्यालयातून पायऱ्या उतरत असतानाच मी तेथे पोहचलो. त्यावेळी ते मला म्हणाले की, मी तुमची वाट बघून थकलो आणि शेवटी आता घरी जायला निघालो. त्यांनी माझा हात धरून मला घरी नेले आणि माझ्यासोबत चर्चा केली. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, कोणालाही वेळ दिल्यानंतर आपण त्या वेळेवर पोहचलो पाहिजे हे लक्षा ठेवा. खरोखरच त्यांनी अतिशय चांगली गोष्ट सांगितली.

सभापती महोदय, माझा लोकसभेमध्ये काम करताना वारंवार माननीय श्री.पवार साहेबांसोबत संबंध आला. त्या कालावधीत त्यांनी मला बहुमोल मार्गदर्शन केले. एक दूरदृष्टी असलेला नेता, दुसऱ्यांना घडविणारा नेता आणि हजारो कार्यकर्ते जोडणारा नेता म्हणून माननीय श्री.शरद पवार साहेबांचे नाव घ्यावे लागेल.

सभापती महोदय, दिल्लीत राहून सुध्दा ते अकोला जिल्ह्यातील त्यांच्या कार्यकर्त्यांची ख्यालीखुशाली विचारायचे. यातून त्यांचा स्वभाव आणि कर्तृत्वाची जाणीव होते. मी तर म्हणेन की, माननीय श्री.शरद पवार साहेब हे हजारो माणसे जोडणारे व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी कृषी, सहकार, शेती प्रक्रिया इत्यादी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेले आहेत. एवढेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात सहकाराचे जाळे पसरविणे, शेतकऱ्यांसाठी सिंचन व्यवस्था निर्माण करणे, शेतमालाला भाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे इत्यादी बाबतीत अतिशय चांगले काम केले आहे.

सभापती महोदय, आमच्या पक्षाने मध्यंतरी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत आंदोलन केले होते. त्यावेळी माननीय श्री.शरद पवार साहेबांनी आम्हाला सांगितले की, तुम्हाला आंदोलन करण्याची आवश्यकता नाही. मी शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार आहे. सभापती महोदय, त्यांनी सांगितल्यानुसार लगतच्या काळात देशातील शेतकऱ्यांची कर्जमाफी केली. मी तर म्हणेन की,



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

माननीय श्री.पवार साहेब हे शेतकऱ्यांच्या दु:खावर फुंकर घालणारे नेते आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे दु:ख त्यांना चांगलेच माहीत आहे. चार-पाच महिन्यापूर्वी माझी आणि त्यांची भेट झाली होती. त्यावेळी त्यांनी मला विचारले की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासन विविध प्रकारच्या उपाययोजना करीत असताना सुध्दा शेतकऱ्यांच्या आत्महत्या का थांबत नाहीत ? त्यांनी असेही सांगितले की, कोणतेही सरकार असले तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणे हे शेतकऱ्यांच्या दृष्टीने कदापि योग्य नाही. सभापती महोदय, माननीय श्री.पवार साहेब हे शेतकऱ्यांविषयी, युवकांविषयी एवढेच नव्हे तर क्रीडा क्षेत्राविषयी कळवळा असलेले नेते आहेत. क्रीडा क्षेत्रात अतिशय उच्च पदावर पोहचणारे माननीय श्री.शरद पवार हे एक नेते आहेत.

सभापती महोदय, मी माननीय श्री.शरद पवार साहेबांचे अभिष्टचिंतन करीत असताना प्रार्थना करतो की, त्यांना उदंड आयुष्य लाभो. महाराष्ट्राला आणि राज्यातील शेतकऱ्यांना घडविण्याचे काम त्यांनी केले आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची जाण असलेले माननीय श्री.शरद पवार साहेब म्हणजेच 'जाणता राजा' आपल्या वयाची 75 वर्षे पूर्ण करीत आहेत. त्यामुळे पुन:श्च एकदा त्यांना उदंड आयुष्य लाभो, अशी परमेश्वर चरणी प्रार्थना करतो. तसेच त्यांचे पुढील आयुष्य महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये निश्चितपणे उपयोगी पडेल अशी अपेक्षा व्यक्त करून माझे भाषण संपवितो.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, सभागृहाचे माननीय नेते श्री.एकनाथराव खडसे यांनी माजी केंद्रीय मंत्री माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने अभिष्टचिंतनाचा ठराव मांडलेला आहे. त्या ठरावावर बोलण्यासाठी तसेच माननीय श्री.शरद पवार साहेबांचे अभिष्टचिंतन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आमच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री.सुनील तटकरे यांनी माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या जन्मापासून ते काल पुणे येथे झालेल्या कृतज्ञता सोहळ्यापर्यंतचा पूर्ण सार उकलून सांगितला आहे. त्यांनी ही चर्चा एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवली आहे. या चर्चेची उंची त्याच ठिकाणी राहिली पाहिजे, किंबहुन त्या पुढे गेली पाहिजे असे मी सर्वप्रथम सांगू इच्छितो. ही चर्चा इतक्या सविस्तर स्वरुपात झाली आहे की, कोणत्याही सन्माननीय सदस्यांना माननीय श्री.पवार साहेबांच्या बाबतीत कोणताही विषय आता बोलण्यासाठी उरलेला नाही. हे खरे असले तरी माननीय श्री.शरद पवार साहेबांचे अनेक पैलू हे जनतेशी निगडित आहेत. त्यामुळे ते पैलू आपल्याला या ठिकाणी मांडता येतील.

सभापती महोदय, मी गेल्या 20 वर्षांपासून सार्वजनिक जीवनात काम करीत आहे. मी पुणे येथे 1993-94 मध्ये लॉ अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री.शरद पवार साहेब आणि विरोधी पक्ष नेते स्व.गोपीनाथ मुंडे साहेब होते. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यात संघर्ष सुरु असताना मी पुणे येथील सिम्बॉयसीस कॉलेजमध्ये शिक्षण घेत होतो. त्यावेळी माझी मेस बारामती होस्टेलमध्ये होती. त्यावेळी माननीय श्री.शरद पवार साहेबांचे काम, त्यांचे सर्व पैलू मी विद्यार्थीदशेत असताना माझ्या मनावर कोरले गेले. आमच्या घरात विरोधी बाजू असताना, या सर्व गोष्टी मी जवळून बघितल्या. मी विद्यार्थीदशेत असताना पुण्यातील संपूर्ण विद्यार्थ्यांमध्ये माननीय श्री.पवार साहेबांबद्दल उत्सुकता असायची. आम्ही माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या सोबत गेलो नसलो तरी त्यांच्या मागे मागे जाऊन त्यांच्या सभा आणि दौरा बघितला. एवढेच नाही तर पुण्यात जे नेते येत त्यांची पाहणी आम्ही जवळून करीत होतो.

सभापती महोदय, मला एक क्षण आठवतो. बालेवाडी येथील छत्रपती क्रीडा संकुलाच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम होणार होता. त्या कार्यक्रमाचा पास आम्हा विद्यार्थ्यांना हवा होता. मला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माझ्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी संगितले की, या कार्यक्रमाच्या पासेस तू माननीय श्री.शरद पवार

..4..



श्री.धनंजय मुंडे....

साहेबांना भेटला तरच त्यांच्याकडून मिळू शकतात. बारामती होस्टेलच्या ठिकाणी आदरणीय श्री.शरद पवार साहेबांचे गेस्ट हाऊस होते. मी त्यावेळी बारामती होस्टेल येथे त्यांची भेट घेण्यासाठी गेलो. त्या कालखंडात माननीय मुख्यमंत्री आणि माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा संघर्ष सुरु होता. मी माननीय श्री.शरद पवार साहेबांकडे स्व.गोपीनाथ मुंडे साहेबांचा पुतण्या म्हणून पासेस मागायला गेलो होतो. मी त्यांच्याकडे पासेसची मागणी केल्यानंतर त्यांनी मला अगोदर चहा पाजला आणि त्यानंतर मला पासेस दिल्या. ज्यांनी मुख्यमंत्री म्हणून माझ्यावर आरोप केले त्या विरोधी पक्ष नेत्यांचा पुतण्या माझ्याकडे पासेस मागायला आला ही कटुता त्यांनी पाळली नाही. अशा या व्यक्तीचे अभिष्टचिंतन हे सभागृह आणि संपूर्ण देश करीत आहे. सभापती महोदय, मी सुध्दा विधानपरिषदेचा विरोधी पक्ष नेता म्हणून त्यांचे अभिष्टचिंतन करतो.

सभापती महोदय, आज माझ्यासारख्या तरुण व्यक्तीला विरोधी पक्ष नेते पदाची जबाबदारी देण्याचा विचार हा माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या मनात येऊ शकतो, तो एवढ्यासाठीच की येणाऱ्या काळात त्यांचे अधुरे स्वप्न आमच्या हातून पूर्ण करता यावे.

...वाय...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ....

आमच्यासाठी आव्हान काय आहे तर साहेबांच्या मनातील स्वप्ने, साहेबांच्या दृष्टीतील महाराष्ट्र जो अधुरा राहिला आहे तो खऱ्या अर्थाने पूर्ण करण्याची जिम्मेदारी आज आमच्या सारख्या नव्या पिढीवर पवार साहेबांनी दिलेली आहे आणि ती सांभाळत असताना सर्व गोष्टींसाठी आपल्यासमोर साहेबांचे काम, साहेबांचे मार्गदर्शन असणे आवश्यक आहे. साहेबांनी स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून त्यांच्या विचारांनी सबंध महाराष्ट्र घडविला, देश घडविला. माझी अभिष्टचिंतनाच्या ठरावावर बोलत असताना सभागृहाला आणि आपल्याला एवढीच विनंती आहे की, 12 मार्चला स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांची जयंती आहे, त्या जयंतीच्या निमित्ताने दोन्ही सभागृहांचे एक विशेष संयुक्त अधिवेशन बोलवावे आणि तेथे आदरणीय पवार साहेबांना बोलावून सदनातील त्यांचे अनुभव सबंध आताच्या पिढीतल्या आणि आजही राजकारणात असलेल्या दोन्ही सदनांतील सन्माननीय सदस्यांच्या समोर त्यांनी मांडले तर नक्कीच ते येणाऱ्या काळात आम्हा सर्वांसाठी फार उपयुक्त ठरू शकतात.

सभापती महोदय, मी पहिल्यांदा साहेबांना दिल्लीला भेटायला गेलो होतो. मनात राजकीय अस्थिरता होती. मी ज्या विचारांत पूर्वी होतो त्या विचारांत मला माझे भविष्य दिसत नव्हते. मी भेटायला गेल्यानंतर त्यांनी माझी सुध्दा समजूत काढली की, तू एका नेत्याचा पुतण्या आहेस, राजकारण जरी करीत असलास तरी तू पुन्हा एकदा विचार कर, विचार करीत असताना ठरव की राजकारण करायचे की घर सांभाळायचे. माझे तुला सांगणे आहे की, तू घराच्या बाबतीत विचार केला पाहिजेस आणि एवढ्यावरच जर हा विषय जुळत नसेल तर नक्की तू तुझा विचार मला कळव. माझ्यातील काही तरी साहेबांनी पाहिले आणि ही जबाबदारी दिली. खरंच माझ्या सारख्या असंख्य तरुणांवर साहेबांचे उपकार आहेत. काल पुण्यात सोहळा झाला. मला राज्यामध्ये एक अनुभव फिरत असताना मिळाला. राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या घरात पवार साहेबांच्या माध्यमातून काही तरी विषय पोहचलेला आहे. ज्या-ज्या वेळी राज्यात संकटे आली त्या- त्या वेळी या राज्याला संकटातून बाहेर काढण्याचे काम आदरणीय साहेबांनी केले. ज्या-ज्या वेळी इतर राज्यांवर सुध्दा संकटे आली त्या-त्या वेळी सुध्दा साहेबांनाच त्या ठिकाणी पाचारण केले गेले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

21-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Y.2

MSK/ AKN/ MMP/ 17:00

श्री. धनंजय मुंडे ....

शेतकऱ्यांचा नेता, शेतकऱ्यांचा कैवारी असे त्यांचे अभिष्टचिंतन होत आहे. मला आठवते की, अतिवृष्टीच्या दौऱ्यात लेकसभा निवडणुकींच्या अगोदर साहेब मानवतच्या दौऱ्याच्या निमित्ताने हेलिकॉप्टरने जाऊ लागले. अचानक हेलिकॉप्टर अंबाजोगाईला इमरजन्सी लॅण्ड करावे लागले. मला सन्माननीय सदस्य श्री. सतिश चव्हाण साहेबांचा फोन आला की, साहेब अचानक मानवतला जाणार होते, मात्र हेलिकॉप्टरला अंबाजोगाईला लॅण्ड होत आहे. मी अंबाजोगाईतल्या माझ्या एका सहकाऱ्याला सांगितले की, तुम्ही जेथे हेलिकॉप्टर लॅण्ड होत आहे तेथे पोहचा. मी परळीहून पोहचतो. एवढाच निरोप दिला आणि त्या सहकाऱ्याने पोहचून साहेबांना सांगितले की, मी धनंजयचा सहकारी आहे, आपला कार्यकर्ता आहे. त्या कार्यकर्त्याच्या गाडीत साहेब बसून परळीपर्यंत आले. मी परळीपासून निघालो होतो. गारपीट चालू झाली. गारपीट चालू झाली असताना त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली की, आपल्या गोविंद बागेत सुध्दा गारपीट चालू आहे का ते पहायला पाहिजे. देशाचे कृषी मंत्री मानवतच्या दौऱ्यावर जात असताना, आम्ही कारने जात असताना त्यांनी फोन केला, त्यावेळी त्यांच्या गोविंद बागेत सुध्दा गारपीट झाली होती. त्यावेळी त्यांनी सांगितले की, देशाचा कृषी मंत्री असला तरी आणि देशाचा सामान्य कार्यकर्ता असला तरी निसर्गाच्या पुढे कोणीही वाली नाही, त्यांनी बाकी पूर्ण दौरा थांबविला आणि सलग दोन दिवस मराठवाड्यात अतिवृष्टीचा दौरा केला. लोकसभेच्या निवडणुका बघितल्या नाहीत की इतर बाकी काही विषय बघितले नाहीत. दौरा केल्यानतर 15 दिवसांच्या आत अतिवृष्टीमध्ये संकटात आलेल्या शेतकऱ्याला केंद्र सरकारकडून मदत मिळवून देण्याचे काम आदरणीय पवार साहेबांनी कृषी मंत्री म्हणून केले. असे अनेक प्रसंग आहेत की, ज्या प्रसंगाच्या बाबतीत या ठिकाणी बोलले जाऊ शकते. माझ्यासारख्या एका तरूण कार्यकर्त्यात अनुभव असा आला. पूर्वी ज्या विचारात होतो त्या विचारात असताना सुध्दा त्या पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या सोबत मला काम करण्याची संधी मिळाली. आज मी साहेबांच्या नेतृत्वाखाली काम करीत आहे, दादांच्या नेतृत्वाखाली काम करीत आहे. फरक एवढा आहे. याचा कोणी गैरअर्थ काढू नये. मी राजकारण म्हणून बोलत नाही. साहेबांचा स्वभाव असा आहे की, कोणता प्रश्न उपस्थितच होऊ नये आणि प्रश्न निर्माण झाला तर तत्काळ सुटावा.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ....

तो प्रश्न आपल्या राजकारणासाठी आणि आपल्या पक्षासाठी तेवत राहू नये ही भूमिका कधी साहेबांची राहिलेली नाही. कोणताही इश्यू असो तो इश्यू तत्काळ सुटावा ही भूमिका नेहमीच साहेबांची राहिलेली आहे, मग तो राज्याचा असो वा देशाचा असो. अनेक मान्यवर बोलणार आहेत. मी माझ्या वतीने एवढीच विनंती केली आहे की, 12 मार्चला स्व. यशवंतराव चव्हाणांच्या जयंतीच्या निमित्ताने आपण दोन्ही सभागृहांचे विशेष संयुक्त अधिवेशन बोलवावे, त्या अधिवेशनानाला आदरणीय साहेबांना निमंत्रित करावे, हेच अभिष्टचिंतन येथे साहेबांविषयी मी व्यक्त करतो. साहेबांना दिर्घायू लाभो आणि त्यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र, देश घडण्याची ताकद आमच्या सारख्या असंख्य त्यांच्यावर प्रम करण्ाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये येवो. मी साहेबांविषयी पुन्हा एकदा अभिष्टचिंतन करतो आणि थांबतो. धन्यवाद !

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, देशाचे नेते आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष सन्माननीय श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांचे 75 वे अमृत महोत्सवी वर्ष संपूर्ण राज्यभर साजरे करण्यात येत आहे. विधानसभा व विधानपरिषद या सभागृहांमध्ये सातत्याने त्यांनी काम केले आहे. विधानपरिषदेमध्ये आज सदनाचे नेते श्री. एकनाथराव खडसे साहेबांनी आदरणीय पवार साहेबांच्या अभिष्टचिंतनाचा प्रस्ताव मांडला आहे. मी त्या संदर्भात माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी उभा आहे. श्री. पवार साहेबांच्या संदर्भात माझ्यापूर्वी वेगवेगळ्या पक्षांतील सन्माननीय नेत्यांनी, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनीही भावना व्यक्त केल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी आदरणीय पवार साहेबांविषयी संपूर्ण जीवन काळातील त्यांचा अनुभव सदनात मांडण्याचाही प्रयत्न केला आहे. मला एकच गोष्ट सांगायची आहे की, श्री. पवार साहेबांच्या संदर्भात माहीत नसलेला कोणताही कार्यकर्ता या राज्यात दिसणार नाही अशी स्थिती नाही.

....Z

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.........

प्रत्येक गावातील कार्यकर्त्यांसमोर श्री.शरद पवार साहेबांचा संपूर्ण आलेख आहे. पवार साहेब काय आहेत, पवार साहेबांनी कशा पध्दतीने देशात काम केले आणि राज्यातच नाही तर संपूर्ण देश पातळीवर आपल्या कामाचा कसा ठसा उमटविला आहे, यासंदर्भात मी अधिक सांगण्याची गरज आहे, असे मला वाटत नाही. विविध संघटनांमध्ये काम करीत असताना सन 1995 पासून आजपर्यंत असा एकही दिवस नाही की, राज्यकारभार माझ्या दृष्टीक्षेपात नाही. या सर्व काळात मी श्री.शरद पवार साहेबांना पहात आलो आहे. श्री.पवार साहेबांबरोबर मी कामही केले आणि वेगवेगळ्या वेळी सल्ला मिळविला आहे. या दृष्टीकोनातून त्यांचे काम पाहणारा मी प्रत्यक्षदर्शी आहे.

सभापती महोदय, सन 1985 मध्ये विधानसभेवर दारव्हा मतदारसंघातून मी निवडून आलो. त्यावेळी श्री.पवार साहेबांना मी विरोधी पक्षनेता म्हणून पाहिले आहे. प्रभावी विरोधी पक्षनेता कसा असावा आणि विरोधक म्हणून सत्तारूढ पक्षाच्या संदर्भात कशा प्रकारे भूमिका घ्यावी, या संदर्भातील श्री.पवार साहेबांबाबतची अनेक उदाहरणे आमच्यासमोर त्यांनी ठेवली आहेत. सत्तारूढ पक्षाचे चुकत असेल तर ते वारही करायचे आणि सत्तारूढ पक्षाने एखादा चांगला निर्णय घेतला असेल तर त्यांची स्तुतीही ते करायचे, अशा दोन्ही भूमिका ज्यावेळी ते सभागृहात विषद करायचे त्यावेळी आम्हाला आश्चर्य वाटायचे. एखाद्या बाबीसंदर्भात विरोध करणारे श्री.पवार साहेब शासनाकडून एखादी चांगली भूमिका घेतली गेली तर त्याचे समर्थनही करीत आहेत, याचाही अनुभव ते विरोधी पक्षनेते असताना आम्ही अनुभवला आहे. त्यानंतर श्री.शरद पवार साहेब काँग्रेस पक्षात परत आले. खरे पाहिले तर आम्ही सुरुवातीपासून युथ काँग्रेसमध्ये होतो, सन 1988 ला मी युथ काँग्रेसचा महाराष्ट्र शाखेचा अध्यक्ष झालो. त्यावेळी श्री.पवार साहेब नुकतेच पक्षात आले होते आणि मुख्यमंत्री झाले होते. मुख्यमंत्री झाल्यानंतर मी युथ काँग्रेसचा अध्यक्ष झालो. त्यावेळी तत्कालीन काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा आणि माजी राष्ट्रपती माननीय श्रीमती प्रतिभाताई पाटील आणि मुख्यमंत्री श्री.शरद पवार साहेब यांनी माझ्या कार्यालयात येऊन माझ्याकडे युथ काँग्रेस अध्यक्षपदाचा कार्यभार सोपविला, माझा सत्कार आणि सन्मान केला होता. त्यावेळपासून श्री.पवार साहेबांची प्रत्येक बाब माझ्यासमोर आहे.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

सभापती महोदय, राज्याचा निर्णय घेत असताना सर्वांना ते बरोबर घेऊन चालत असत. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा निर्णय घ्यायचा होता, त्या विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावयाचे होते. त्यावेळी सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी विदर्भामध्ये फार मोठी चळवळ उभी केली होती. मला श्री.पवार साहेबांनी बोलावून घेतले आणि काँग्रेस पक्षाकडून वातावरण तयार करावयाचे आहे, ही जबाबदारी काँग्रेस पक्षाऐवजी युथ काँग्रेसवर मी सोपवीत आहे, आपण बैठका घेतल्या पाहिजेत, जिल्ह्या जिल्ह्यात गेले पाहिजे, असे सांगून ही जबाबदारी त्यांनी माझ्यावर, युथ काँग्रेसवर सोपविली. त्याप्रमाणे आम्ही जिल्ह्या जिल्ह्यात गेलो, बैठकाही घेतल्या. कोणत्या प्रश्नाच्या बाबतीत, कोणावर जबाबदारी सोपविली पाहिजे, या संदर्भात युथ काँग्रेस कशा प्रकारे प्रचार राबवू शकतो, एखादा उद्देश साध्य करावयाचा असेल तर कशा प्रकारे निर्णय घेतला पाहिजे, हे आम्ही त्यावेळी पाहिले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्याच्या संदर्भात चळवळ उभी केली जात होती, त्याबाबतीत अशा प्रकारे भूमिका घेत असताना, एक प्रश्नाला स्वरुप देण्याचा प्रयत्न, नियोजन करण्याचा प्रयत्न पवार साहेबांच्या माध्यमातून मी बघत होतो.

सभापती महोदय, पूर्वीच्या काँग्रेस पक्षापासून आम्ही काम केलेले असल्यामुळे स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या संदेशाप्रमाणे महाराष्ट्र चालला पाहिजे, ही आमची भूमिका असायची. श्री.पवार साहेब आणि आमचे सुरुवातीच्या काळात फारसे जमतही नव्हते. नंतरच्या. काळात ज्यावेळी सन 1993 मध्ये श्री.पवार साहेब परत मुख्यमंत्री म्हणून आले त्यावेळी त्यांनी सर्वात अगोदर मला बोलावून घेतले आणि सांगितले की, "माणिकराव यावेळच्या मंत्रिमंडळात मला तुम्हाला घ्यावयाचे आहे." मी त्यांना सांगितले की, "खरे पाहिले तर आपल्याला काही सांगण्याचा माझा अधिकार नाही. कारण, मी तुम्हाला विरोध केलेला आहे." स्व.सुधाकरराव नाईक यांच्या बरोबर आम्ही होतो. मी पुढे म्हणालो की, "त्याही परिस्थितीमध्ये मोठेपणा दाखवून आपण मला बोलावून सांगत आहात की, सोबत घ्यावयाचे आहे. आपणच याबाबत निर्णय घ्यावा." त्यानंतर त्यांनी स्व.सुधाकरराव नाईक यांच्याशी बोलून, चर्चा करुन मंत्रिमंडळामध्ये मला स्थान दिले. मला असे

...3....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.........

वाटत होते की, मंत्रिमंडळामध्ये मला घेतले. कदाचित श्री.पवार साहेब काही वेगळा विचार करु शकतील. मंत्रिमंडळाची पहिली बैठक झाली, खातेवाटप झाले नव्हते. मला त्यांनी बोलाविले आणि विचारले की, "तुम्हाला कोणते खाते हवे आहे." त्यावेळी मंत्रिमंडळाची पहिली बैठक झाल्यानंतर दोन-तीन दिवसात बोलावून, खात्याबाबत विचारण्याची प्रथा होती. "मला अनेक लोक गृह खाते मागत आहेत पण मी ते दिलेले नाही. मुख्यमंत्री म्हणून माझ्याकडे गृह खाते आहे आणि राज्यमंत्री म्हणून तुमच्याकडे मला खाते सोपवयाचे आहे," असे ते मला म्हणाले. मी त्यावेळी त्यांना सांगितले की, "मला गृह खाते नको, दुसरे कोणतेही खाते द्या, ग्रामीण भागाशी संबंधित खाते द्या किंवा विदर्भातील विकासाच्या संदर्भातील खाते द्या. मी आपल्याला काही म्हणणार नाही. पण गृह खाते नको." त्यानंतर मी गृह खात्याचा राज्यमंत्री झालो. परंतु, या खात्याचा मला नंतरच्या काळात चांगला उपयोग झाला. सर्व अधिकाऱ्यांशी माझी ओळख झाली. प्रशासनावर खऱ्या अर्थाने पकड ठेवायची असेल तर गृह खाते महत्वाचे आहे. "तुम्ही नवीन आहात, आमदार झाला आहात, मंत्री झाला आहात, 32/33 व्या वर्षी मंत्री झाला आहात, त्यामुळे आपण गृह खाते घ्यावे", असे ते मला म्हणाले होते. मी त्यांना हात जोडून सांगितले होते की, "गृह खाते सोडून मला कोणतेही खाते द्या." परंतु, दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रातून मी वाचले की, त्यांनी माझ्याकडे गृह खाते दिले होते आणि त्याबरोबरच कृषी, ग्राम विकास ही खातीही दिली होती. अशा प्रकारचा विश्वास त्यावेळी श्री.पवार साहेबांनी माझ्यावर टाकला होता. मी विरोधात असताना, त्यावेळपर्यंत तशी भूमिका घेत असताना मला बोलावून अशा प्रकारे मंत्रिमंडळात त्यांनी मला स्थान दिले, महत्वाची खाती दिली. त्यांना माझ्याबद्दल पूर्णपणे माहिती असावी किंवा नसावी. परंतु, त्यांनी 5-6 महिने माझी चाचणी घेतली. काही तक्रारी यायच्या, काही लोक जाऊन सांगायचे की, मी स्टे दिलेला आहे. परंतु, ज्यावेळी त्यांना माहिती मिळायची की, याबाबतीत माझा काही संबंध नाही, कोर्टाच्या निदेशावरुन कोणत्या तरी अधिकाऱ्याने ऑर्डर केलेली आहे, त्यावेळी चार-सहा महिन्यांनंतर त्यांनी माझ्यावर पूर्णपणे विश्वास टाकण्यास सुरुवात केली.

...AA-1......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

माननीय श्री.शरद पवार साहेबांची मुख्यमंत्री म्हणून काम करण्याची जी पद्धती होती ती मी जवळून अनुभवली आहे. विशेषतः शाहु, फुले, आंबेडकरांच्या विचारांचा, काँग्रेस पक्षाच्या विचारांचा त्यांच्यावर अतिशय घट्ट पगडा होता आणि त्या विचारसरणीला त्यांनी कधीही बाजूला जाऊ दिले नाही. आपण त्या विचारसरणीच्या आधारावर कशा प्रकारे राज्याचा विकास करु शकू या संदर्भातील त्यांची अनेक उदाहरणे आपल्याला बघावयास मिळतील.

सभापती महोदय, राज्यमंत्री म्हणून मी 6 मार्च रोजी शपथ घेतली आणि 8 मार्च रोजी माझ्याकडे गृह राज्यमंत्री पदाची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यानंतर 12 मार्च रोजी मुंबईत साखळी बॉम्बस्फोट झाले. त्यावेळी मी मंत्रालयातील माझ्या दालनात बसलो होतो. माननीय श्री.शरद पवार साहेब देखील त्यांच्या दालनात बसले होते. मी नुकतीच त्यांची भेट घेऊन आलो होतो. त्यावेळी एक सब इन्सपेक्टर चिठ्ठी घेऊन माझ्याकडे आला आणि त्याने मला सांगितले की, स्टॉक एक्स्चेंज येथे बॉम्बस्फोट झालेला आहे, त्या बॉम्बस्फोटात 10-12 लोकांचा मृत्यू झालेला आहे आणि 15-20 लोकांना हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले आहे. मी माननीय श्री.शरद पवार साहेबांकडे धावतच गेलो. त्यावेळी माननीय श्री.पवार साहेब त्यांच्या दालनात ती चिठ्ठी वाचत होते. त्यांनी मला सांगितले की, तुम्ही शांतपणे येथे बसा. त्यांनी मुख्य सचिवांना बोलावून घेतले. त्यावेळी माननीय माधवराव किन्हाळकर आणि माझ्याकडे गृह राज्यमंत्री पदाचा चार्ज होता. तोपर्यंत शहरे आणि ग्रामीण असे वाटप झाले नव्हते. त्यांनी मुख्य सचिवांना सांगितले की, तुम्ही आताच माणिकरावांची गृह राज्यमंत्री (शहरे) आणि माधवराव किन्हाळकर यांची गृह राज्यमंत्री (ग्रामीण) अशी ऑर्डर काढावी. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, तुम्ही लगेच स्पॉटवर जाऊन पाहणी करावी. मी स्पॉटवर जाण्यापूर्वी त्यांनी मला असेही सांगितले की, हे साखळी बॉम्बस्फोट असू शकतात. मी ज्या ठिकाणी बसलो आहे त्या भोवतालच्या परिसरात देखील असा बॉम्बस्फोट होऊ शकतो, याची जाणीव ठेऊन मी येथे बसलो आहे. तुम्ही ताबडतोब स्पॉटवर जाऊन मला रिपोर्ट करा आणि तेथील संपूर्ण व्यवस्था बघा. मी मंत्रालयाच्या बाहेर आलो. त्यावेळी वाहतुकीची कोंडी झाल्यामुळे गाडी येण्यासाठी वेळ लागला होता. मी एअर इंडियाच्या इमारतीकडे बघत होतो. माझ्या



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

नजरेसमोर एअर इंडियाच्या इमारतीजवळ बॉम्बस्फोट झाला. तेथे मोठ्या प्रमाणावर धूर झाला होता. मी ड्रायव्हरला त्या धुरातून गाडी पुढे नेण्यास सांगितले. माझ्या बरोबर 20-22 पोलीस शिपाई होते. बॉम्बस्फोटात जखमी झालेल्या लोकांना गाड्यांमध्ये बसविणे, त्यांना रुग्णालयात नेणे, अनाऊन्समेंट करणे इत्यादी कामे आम्ही करीत होतो. मला पवार साहेबांचा फोन आला की, आताच दुसरा बॉम्बस्फोट झालेला आहे, बॉम्बस्फोटामुळे या इमारतीच्या काचा हलल्या होत्या, तुम्ही प्रथम त्या ठिकाणी जावे आणि किती लोक जखमी झालेले आहेत, त्यांना कोणती मदत पाहिजे याबाबत मला माहिती द्यावी. मी तेथे गेलो आणि माननीय श्री.पवार साहेबांना सांगितले की, सेंट जॉर्ज रुग्णालयात जवळपास 100 ते 150 जखमी व्यक्तींना नेण्यात आले आहे. परंतु, सेंट जॉर्ज रुग्णालयात ब्लड नाही अशा प्रकारचा रिपोर्ट आलेला आहे. त्यांनी मला सांगितले की, मी बसेस पाठवितो, तुम्ही तेथेच थांबा, लोकांना आवाहन करा, लोक ब्लड देण्यासाठी रुग्णालयात जातील. मी माईक हातात घेतला आणि लोकांना आवाहन केले. लोक ब्लड देण्यासाठी त्या बसेसमध्ये बसले. 10 मिनिटात तिन्ही बसेस फुल झाल्या आणि रुग्णालयाकडे रवाना झाल्या. अमूक ठिकाणी बॉम्बस्फोट झाला, तमूक ठिकाणी बॉम्बस्फोट झाल्याची माहिती वॉकीटॉकीवरुन मला मिळत होती. त्या दरम्यान माननीय श्री.पवार साहेबांचे मला 15-20 फोन आले की, आता त्या ठिकाणी परिस्थिती कशी आहे, तुम्ही कोठे पोहोचले, याबाबत ते माहिती घेत होते. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. स्टॉक एक्सचेंज येथे बॉम्बस्फोट झाल्यानंतर देशाची आर्थिक राजधानी उद्ध्वस्त होऊ नये. काही दिवसांपूर्वी मुंबई शहरात दंगली झाल्या होत्या. दंगली झाल्यानंतर त्या ठिकाणी आणखी काही अनुचित प्रकार घडू नयेत म्हणून त्यांनी मला काही सूचना दिल्या होत्या. त्यांनी मला अशीही सूचना दिली होती की, यामध्ये कोणाचा सहभाग आहे याबाबत आपण लगेच काही बोलायचे नाही. कारण, त्यामध्ये एलटीटी असू शकते किंवा दुसरे कोणी असू शकतात. मुंबई शहर पुन्हा आगीत होरपळले जाणार नाही या दृष्टीकोनातून माननीय श्री.पवार साहेब काळजी घेत होते. असे अनेक अनुभव आहेत. परंतु, वेळेअभावी ते सर्व अनुभव सागता येणार नाहीत.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

सभापती महोदय, किल्लारी येथे भूकंप झाला त्यावेळी गणपती विसर्जनाची वेळ होती. गणपती विसर्जन झाले. मला सकाळी 5.30 ते 6.00 वाजता माननीय श्री.पवार साहेबांचा फोन आला की, किल्लारी येथे भूकंप झालेला आहे. अद्याप सूर्योदय व्हायचा आहे. मी सकाळी 6.30 वाजता हेलिकॉप्टरने किल्लारी येथे जाणार आहे. त्या ठिकाणी 40-50 लोक मृत्यूमुखी पडले आहेत. त्यांना जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती मिळाल्यानंतर त्यांनी लगेच मला फोन करुन ही बातमी सांगितली. त्यांनी मला सांगितले की, तुम्ही आज संपूर्ण दिवस ऑफीसमध्ये थांबा आणि ग्रामीण डी.जी. यांना सांगून अधिकाऱ्यांबरोबर बैठक घ्यावी. ते किल्लारीला गेले. त्यावेळी दूरदर्शनवर बातम्या येत होत्या. त्योवळी माननीय श्री.पवार साहेबांनी तेथेच एक छोटे ऑफिस सुरु केले. ते 5-6 दिवस मुंईमध्ये आले नाहीत. ते तेथून आम्हाला सूचना देत होते की, अमूक ठिकाणावरुन साहित्य येईल ते साहित्य उतरवून घ्यावे आणि येथे पाठवावे. त्यावेळी शेंडगे बापू राज्यमंत्री होते. आम्ही 100 ते 150 ट्रक त्या कामासाठी लावले. परदेशातून जे साहित्य येईल ते आम्ही सोडवून घेत होतो. ती जबादारी त्यांनी माझ्यावर सोपविली होती. परदेशातून आलेले साहित्य सोडून घ्यायचे आणि किल्लारी येथे पाठवावयाचे होते. गृह विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावून ते साहित्य एकत्र करुन किल्लारी येथे पाठविण्यात येत होते. तेथे भयंकर अशी स्थिती असताना आम्ही माननीय श्री.पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली लोकांना दिलासा देण्याचे काम करु शकलो.

सभापती महोदय, ज्यावेळी गुजरात येथे भूकंप झाला त्यावेळी कोणाकडे जबाबदारी सोपवावी, असा प्रश्न निर्माण झालेला असताना माननीय श्री.पवार साहेबांचे नाव पुढे आले. माननीय श्री.पवार साहेबांकडे ही जबाबदारी सोपविली तर त्या परिस्थितीवर ते मात करु शकतील, ही भूमिका त्या माध्यमातून होती. अशा अनेक बाबी आहेत. त्या बाबी लहान असल्या तरी आपल्या बरोबर काम करणाऱ्या लोकांना, कार्यकत्यांना संदेश द्यायचा अशा प्रकारचा त्याचा अर्थ असायचा. एकदा घाटकोपर रेल्वे रूळावर अपघात झाला होता. रेल्वे डब्याला आग लागली म्हणून 30-40 महिलांनी चालत्या गाडीतून खाली उड्या टाकल्या आणि बाजूच्या रूळावरुन लगेच दुसरी रेल्वे

..4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

आली व त्यातील 20-25 महिला ठार झाल्या. त्यातील 15-20 महिल्या वाचल्या. कोणाचे हात तुटलेले होते तर कोणाचे डोके फुटलेले होते त्यांना आणि ज्या महिलांचा मृत्यू झाला होता त्यांच्या डेटबॉडी जवळच्या रुग्णालयात नेण्यात आल्या. ही बाब छोटी असली तरी ती लक्षात घेण्यासारखी आहे. तेथे डॉक्टर आलेत किंवा नाही हे बघणे, डेटबॉडी नातवोईकांच्या ताब्यात देणे, तेथे लोकांचा जमाव होता तो पोलिसांच्या मदतीने नियंत्रणात आणणे, यासाठी मी सायंकाळी 5.00 वाजेपासून रात्री 3.00 वाजेपर्यंत त्या रुग्णालयातच होते. त्यावेळी अनेक मंत्री रुग्णांची भेट घेण्यासाठी येत होते. मी त्यांच्या बरोबर जात होतो. त्यावेळी माननीय श्री.शिवाजीराव देशमुख साहेब रुग्णांची भेट घेण्यासाठी आले. मी रात्री 1.30 वाजता त्यांच्या बरोबर गेलो. त्यावेळी माझा एक हात खिशात आणि एक हात मागे होता. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात त्या संदर्भात फोटोसह बातम्या छापून आल्या. त्या दिवशी माननीय श्री.पवार साहेब दिल्लीला गेले होते. ते रात्री उशिरा मुंबईला आले. त्यांनी वर्तमानपत्र हाती घेतले आणि त्यांचे सचिव श्री.राजे यांना विचारले की, यामध्ये तुम्हाला काय बरोबर दिसत नाही ? त्यांनी सांगितले की, माणिकराव ठाकरे साहेब लगेच तेथे गेले, पाहणी केली. माननीय श्री.पवार साहेबांनी सांगितले की, रुग्णांना भेटायला गेल्यानंतर खिशात हात असू नये. तुम्ही त्यांना फोन लावा आणि हे सांगा. त्यांनी मला फोन केला. परंतु, त्यावेळी माझा फोन लागला नाही. मी त्यांच्या सेक्रेटरींना फोन केला आणि विचारले की, तुम्ही दोन वेळा कशासाठी फोन केला होता ?

..2B-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

त्यांनी सांगितले की, पवार साहेबाचा फोन होता. तुम्ही सर्व चांगले केले, तेथे लवकर गेले, तुम्ही सर्व सांभाळले आहे. वर्तमानपत्रात देखील चांगले छापून आले. पेशंटला भेटत असताना खिशात हात असणे बरोबर नाही. संवेदना दाखविल्या जात नाहीत, त्या दृष्टीकोनातून ही बाब आपण लक्षात ठेवली पाहिजे. अशी अनेक उदाहरणे देता येतील. प्रत्येक कार्यकर्त्याने कसे पुढे जावे समाज कार्य कसे करावे, राजकारण कसे केले पाहिजे, यासंदर्भात त्यांची शिकवण, त्यांचे जीवन चरित्र म्हणजे कार्यकर्त्यांना व समाजाला एक शिकवण ठरणार आहे. पवार साहेबांनी राजकारण, समाजकारण किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात केलेले काम अतिशय उत्तम आहे. त्यांचे व्यक्तीमत्व हे बहुआयामी आहे, त्याचे व्यक्तीमत्व एका विषयात बांधून ठेऊ शकत नाही. त्यांच्या संदर्भात सांगायला गेलो तर अनेक विषय सुटून जातात, त्यांच्यावर अनेक पुस्तके निघाली आहेत, अनेक कार्यकर्त्यांना अनेक बाबी माहीत आहेत, पवार साहेबांबाबत चर्चा करावयाची आहे असे म्हटल्यामुळे हा विषय तेवढ्यापुरता मर्यादित होईल. त्यांच्यासोबत काम करताना जे अनुभव आपणाला आले आहेत किंवा त्यांच्याकडून भविष्यात जे आपणाला शिकायचे आहे, त्या दृष्टीकोनातून पवार साहेबांनी केलल्या कामाच्या माध्यमातून आपणाला दिशा मिळाल्याशिवाय राहणार नाही. याबाबत मार्च महिन्यातील 12 तारखेचा उल्लेख विरोधी पक्ष नेत्यांनी केला आहे. दोन्ही सदनातील सदस्यांचे एकत्रित अधिवेशन बोलवून पवार साहेबांबाबत यशवंतराव चव्हाण यांच्या सुरुवातीच्या काळापासून संसदीय प्रणालीवर त्यांचे मार्गदर्शन मिळाले तर निश्चित ते उपयुक्त होईल त्यामुळे यासंदर्भात विचार करावा. माझ्या भावना मी व्यक्त केल्या आहेत, पवार साहेबांना मी अभिष्टचिंतन करतो. भविष्यकाळात त्यांच्याहातून भरभक्कम सेवा घडो. त्यांच्या आयुष्यात जेवढे राजकारणाचे दिवस आहे, त्यामध्ये तासांची मोजणी केली तर आपण कार्यकर्ते किंवा नेते 10 ते 12 तास काम करतो. पवार साहेब 24 तास काम करीत असल्यामुळे त्यांचे वय 75 वर्षे झाले असले तरी राजकारणात काम करताना 50 वर्षे झाले असले तरी त्यापेक्षा किती तरी वर्षे आयुष्यात प्रत्यक्षपणे जनतेच्या, ा समाजाच्या कामी ते पडू शकले आहे. त्यांची काम करण्याची पध्दत व त्यांनी जो वेळ दिला हे मागदर्शन येणाऱ्या संपूर्ण पिढीसाठी उपयुक्त ठरेल अशी आशा व्यक्त करतो. पुन्हा पवार साहेबांचे अभिनंदन करुन माझे भाषण संपवितो.

----------

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, एका व्यक्तीचे दोन्ही सभागृहात अमृत महोत्सवानिमित्त अभिष्टचिंतन करण्याचा ठराव येण्याचा हा पहिला योगायोग आहे. 1990 मध्ये विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री.मनोहर जोशी यांनी श्री.शरदराव पवार यांना 50 वर्षे पूर्ण झाल्याबाबत पहिल्यांदा अभिनंदनाचा ठराव आणला होता. त्यावेळी पवार साहेब मुख्यमंत्री होते, त्यावेळी सभापतींनी सांगितले की, हा ठराव दोन्ही सभागृहात आला पाहिजे. त्यामुळे जो ठराव मांडला तो मी स्वीकारतो याची चर्चा दोन्ही सभागृहात झाली पाहिजे. आज आलेला ठराव 1990 मध्ये देखील आला होता. त्याच व्यक्तीचा ठराव 75 वर्षे पूर्ण झाल्याबाबत दोन्ही सभागृहात येतो त्यावर चर्चा होते हा एक वेगळा योग आहे, असा सन्मान महाराष्ट्राच्या विधानसभेत कोणाला कधीही मिळालेला नाही.

सभापती महोदय, पवार साहेबांच्या वाढदिवसाची संपूर्ण दिल्लीत चर्चा होते. राष्ट्रपती सरकारी कार्यक्रमाला जातात तेव्हा ते कार्यक्रम प्रोटोकॉलप्रमाणे होतात. खाजगी कार्यक्रमाला किंवा वाढदिवसाच्या कार्यक्रमाला, राष्ट्रपती, उप राष्ट्रपती, पंतप्रधान, विविध राज्यांचे मुख्यमंत्री व विविध राज्यांचे पक्ष नेते एकत्र येण्याचा हा एकमेव समारंभ देशात पहिल्यांदा झालेला आहे. ही बाब महाराष्ट्रासाठी भूषणावह आहे. या कार्यक्रमाला जाण्यासाठी प्रोटोकॉलप्रमाणे आम्हाला विमानाची तिकीटे मिळाली नाहीत म्हणून आम्हाला दिल्लीला जाता आले नाही. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे राष्ट्रवादी पक्षाचे खजिनदार आहेत, मी त्यांना सांगितले होते की, तुम्ही स्पेशल विमान करुन आम्हाला घेऊन जा. नागपूरवरुन दिल्लीला जाण्यासाठी दोनच विमाने आहेत, त्या विमानांची तिकीटे आम्हाला मिळाली नाहीत. आम्ही खास विमानाने जाण्याचा देखील प्रयत्न केला होता. विमानाचे भाडे जास्त नाही एक लाख रुपये होते, चार ते पाच लोक गोळा करुन आम्ही गेलो असतो. परंतु नागपूरला विमान नसल्यामुळे ते आम्हाला शक्य झाले नाही.

सभापती महोदय, या देशात एवढा मोठा समारंभ होतो. सर्व नेते त्या कार्यक्रमाला उपस्थित राहतात. असा कार्यक्रम पुन्हा होणे नाही असे मला वाटते. पवार साहेबांच्या रुपाने महाराष्ट्राला बहुमान मिळालेला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जनता ही बाब कधीही विसरणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे कार्यक्रमावरुन आल्यावर त्यांनी मला सांगितले की, त्या हॉलमध्ये काही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

केंद्रीय मंत्री महोदयांना सुध्दा जाता आले नाही. ज्या हॉलमध्ये राष्ट्रपतींचा समारंभ असतो त्या हॉलचे दरवाजे बंद होतात. केंद्रीय मंत्री व या सभागृहाचे माजी सदस्य माननीय श्री.नितीन गडकरी यांना देखील परत जावे लागले. त्याचप्रमाणे 4 ते 5 केंद्रीय मंत्री महोदयांना परत जावे लागले. अतिशय मोठा भव्यदिव्य सभारंभ दिल्ली येथे झाला. आतापर्यंत तीन समारंभ केले त्याबाबत मी सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले, विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुळे यांचे अभिनंदन करतो. ज्यांना आपण आमंत्रित केल, त्यांचा दर्जा त्यांची उंची व नवीन कार्यकर्त्यांना स्फुर्ती देण्याच्या काम आपण तिघांनी केले आहे. ही बाब महाराष्ट्राची जनता विसरणार नाही. एका कार्यक्रमाचे आमंत्रण देण्यासाठी मी त्यांच्या निवासस्थानी गेलो होतो, त्यांच्याकडे साहित्यिक श्री.प्रमोद शिंदे यांचा कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमाला बसण्याची मला संधी मिळाली. पवार साहेब हे अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे. ते क्रीडा, सहकार, राजकारण, समाजकारण साहित्यिक यांच्यामध्ये त्यांचे योगदान आहे. राजकारण, समाजकारण व क्रीडाक्षेत्रासाठी हवे असणारे हे नेतृत्व या महाराष्ट्रात निर्माण झाले आहे.

सभापती महोदय, मी जास्त बोलणार नाही मी दोन तीन गोष्टी फक्त सांगणार आहे, मुद्यांची पुनरावृत्ती मी करणार नाही. पवार साहेबांना राजकारणात खरी स्फुर्ती त्यांच्या मातोश्रीने दिली आहे. त्या शेतकरी कामगार पक्षाच्या लोकल बोर्डाच्या सदस्या होत्या. आक्रमक महिला म्हणून त्यावेळी त्यांच्याकडे पाहिले जात होते. मला आठवते की, माझे आजोबा चर्चा करुन आम्हाला सांगत होते. माझे आजोबा 1925 मध्ये विधानसभेचे सदस्य होते. त्याचे रेकॉर्ड उपलब्ध नाही. 1937 मध्ये सभागृह सुरु झाले आहे, मी प्रधान सचिव डॉ.अनंत कळसे यांना अनेक वेळा बोललो की, त्यांची भाषणे मला बघायची आहे, परंतु त्यांचे रेकॉर्ड उपलब्ध नाही. आजोबा कोणत्याही पक्षाच्या कार्यक्रमाला किंवा अधिवेशनाला जात. अंबेजोगाईतील मुरदाबाद येथे 1961 मध्ये शेतकरी कामगार पक्षाचे मोठे ऐतिहासिक अधिवेशन झाले होते. त्यावेळी आमची चर्चा होत होती, तेव्हा आजोबा सांगत होते. आमच्या घरातील दिवाणखाण्यात आमचे काका, वडील व आम्ही लहान मुले बसत होतो. त्यावेळी पवार साहेबांच्या मातोश्रीची चर्चा होत होती. बाई भरपूर डॅसिंग

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

21-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) BB-4

VVK/ AKN/ MMP/ 17:30

श्री.जयंत प्र.पाटील...

आहेत, बाईंना खरोखर तळमळ आहे. पवार साहेबांना घडविण्याचे काम त्यांच्या मातोश्रीने केले आहे. त्या भाजी पिकवित होत्या व भाजी बाजारात विकण्याचे काम पवार साहेब करीत होते. अत्यंत गरीब परिस्थितीत त्यांनी आपल्या आयुष्याची सुरुवात केली होती. पवार साहेब जेव्हा ॲक्टीव झाले तेव्हापासून त्यांच्यात शेकाप पक्षाचे रक्त आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. ते विचार मांडतात किंवा स्टेटमेंट करतात तेव्हा त्यामध्ये दोन अर्थ असतात. भारतीय जनता पक्षाचे 124 आमदार निवडून आले तेव्हा पवार साहेबांनी असे सांगितले की, पुन्हा निवडणुका होणार नाहीत. अशी कोणतीही कृती आम्ही करणार नाही. भारतीय जनता पक्षाचे सरकार राहिले तरी चालेल कारण जनतेने त्यांना कौल दिलेला आहे.

....CC-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..........

लोकांनी अर्थ चुकीचा काढला. त्यांनी पाठिंबा दिला. व्यक्तिगत संबंध वेगळे आहेत. ज्या दिवशी मूल जन्माला आले त्याच दिवशी त्याला मारुन टाकण्याची घाई कशाला? जनतेचा कौल आहे त्याचा सन्मान केला पाहिजे. त्याबद्दल त्यांनी प्रतिक्रिया दिली नाही. तो त्यांचा स्वभाव नाही. आमचे राजकारणात त्यांच्याशी अनेकदा मतभेद झाले. पण त्यांची व्यक्तिगत संबंध ठेवण्याची हातोटी महाराष्ट्रातील इतर कोणत्याही नेत्यामध्ये दिसून येत नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील हा एकमेव नेता आहे, जो गाव पातळीवर, राज्य पातळीवर कायकर्त्यांना नावानिशी ओळखतो. माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. ते गावातील लोकांना नावानिशी ओळखतात. ते अनेकदा आमच्या घरी आले मुक्कामी राहिले आहेत. स्वत: जीप चालवत शेतावर जाण्याचा त्यांचा प्रघात असे. त्यांना शेतीची व प्रवासाची भरपूर आवड आहे. आजही त्यांना विमानाने या म्हटले तर ते गाडीने प्रवास करण्यास प्राधान्य देतात. त्यांची काम करण्याची वेगळी पध्दत आहे. सर्वसामान्य लोकांशी संपर्क ठेवता येईल, त्या माध्यमातून महाराष्ट्र बघता येतो, जनतेचे प्रश्न समजतात, जे विमान प्रवासातून कळत नाहीत असे त्याचे म्हणणे असते.

सभापती महोदय, पुलोद सरकार स्थापन करण्याच्या वेळेला जनता पक्षाची बैठक झाली. त्या बैठकीसाठी शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांना बोलावले होते. स्व.एस.एम.जोशी, दत्ता पाटील, प्रभाकर पाटील यांना सांगण्यात आले की, तुम्ही जाऊन शरद पवार यांच्याशी बोलावे. शरद पवार त्यावेळी रामटेक बंगल्यावर रहायचे. आमच्या पक्षाची जीप मी चालवत होते. शरद पवार म्हणायचे की, दत्ता पाटील तुम्ही घरी येऊ नका, राजकारण वेगळे आहे, तुम्हाला कळणार नाही. ते रामटेक बंगल्यातून बाहेर आले, आमच्या जीपमध्ये बसले आणि वर्षा बंगल्यावर आले. तेथे बैठक झाली. त्या ठिकाणी पुलोद सरकार कसे स्थापन करायचे याची आखणी झाली. मागाहून नागपूर येथे बैठक होऊन पुलोद सरकार खऱ्या अर्थाने अस्तित्वात आले.

सभापती महोदय, किमान समान कार्यक्रम याबाबत आमच्या पक्षाची अट होती. कापूस एकाधिकार खरेदी योजना आणि मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर हे विषय होते. मराठवाड्यामध्ये नामांतराचा प्रश्न पेटला होता. तेव्हा आमच्या नेत्यांची घरे जाळण्यात आली. श्री.किसनराव देशमुख हे मंत्री होते, त्यांचे घर जाळण्यात आले. मोठे वादळ निर्माण झाले होते. शिवसेना पक्षाचा त्याच वेळेला जन्म झाला. माननीय मंत्री श्री.बबनराव लोणीकर त्यावेळेला आमच्या शेतकरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

21-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) CC.2

SGB/ MMP/ AKN/ 17:40

श्री.जयंत प्र.पाटील..........

कामगार पक्षात होते. हरिभाऊंचे ते कार्यकर्ते होते. मराठवाड्यात निर्माण झालेल्या परिस्थितीतून शिवसेना पक्ष उदयाला आला. मराठवाड्यात ओबीसी व इतर समाज एकीकडे आणि उर्वरित समाज दुसरीकडे अशी स्थिती निर्माण झाली. श्री.शरद पवार मात्र ढळले नाही. त्यांनी निर्णय बदलला नाही. तडजोड घडवून आणली. मराठवाडा शब्द कायम ठेवून 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नामांतर करण्यात आले. सहकार क्षेत्रात त्यांनी अनेक निर्णय घेतले.

सभापती महोदय,एक उत्तम प्रशासक, सहकार चळवळीतील अर्ध्वयू म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. सहकारी क्षेत्रात आज 110 साखर कारखाने कार्यरत आहेत. त्यापैकी 60 ते 70 कारखाने उत्तमप्रकारे चालविले जात आहेत. चांगल्या प्रकारचे मॅनेजमेंट उभे करण्याचे काम त्यांनी केले. कार्यकर्ते उभे करण्याचे काम त्यांनी केले. त्यांना त्यांच्या आयुष्यामध्ये सन्मान मिळाला. कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाला त्यांनी परतून लावले. आज त्यांचा महाराष्ट्रामध्ये वेगळया पध्दतीने सन्मान होत आहे. सर्व पक्षातून, सर्व थरातून, मोठमोठया उद्योगपतींकडून त्यांची वाखाणणी केली जात आहे. हे सर्व पाहता त्यांचे आयुष्य निश्चितपणे वाढणार आहे. वाढदिवसाच्या निमित्तानेझालेल्या सत्काराबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. अनेक निवृत्त अधिकारी आज सांगतात की, ते मुख्यमंत्री होते त्या काळात अधिकाऱ्यांच्या दोन टीम केलेल्या होत्या. त्यांची काम करण्याची पध्दत विचारात घेता अधिकाऱ्यांची एक टीम काम करु शकत नव्हती. म्हणून दोन शिफ्टमध्ये अधिकारी काम करण्यास यायचे. एक टीम सकाळी यायची आणि दुसरी टीम सायंकाळी यायची. आज कार्यकर्ते निर्माण होण्याची प्रक्रिया कमी होत चालली आहे. सकाळी लवकर उठायचे, वाचन करायचे, सर्वांशी संपर्क ठेवायचा आणि आलेल्या पत्रांना उत्तरे द्यायची, आलेल्या फोनबद्दल उत्तर द्यायचे ही त्यांची शैली आहे.

सभापती महोदय, आम्ही फोन केला तर आम्हाला ते स्वतः फोन करायचे व जयंता, कशासाठी फोन केला होता? म्हणून विचारणा करायचे. आमच्याशी कायम संपर्क ठेवण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्याबद्दल अनेक उदाहरणे या ठिकाणी देता येतील. वेळेच्या बंधनाची मला जाणीव आहे. आज ज्या पध्दतीने त्यांचा सन्मान होत आहे त्या निमित्ताने मी निश्चितपणे माननीय सभापतींनी धन्यवाद देतो. श्री.शरद पवार यांच्याकडून या महाराष्ट्राची अनेक वर्षे सेवा घडो आणि त्यांना दिर्घायुष्य लाभो अशा शुभेच्छा देऊन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांचे अभिष्टचिंतन करणाऱ्या प्रस्तावार माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, राज्यात सर्वात लहान वयाचा मुख्यमंत्री म्हणून श्री.शरद पवार यांचे त्या काळात कौतुक झाले. ते पुलोद सरकारचे मुख्यमंत्री होते. आम्ही छोटे कार्यकर्ते होतो. कार्यकर्ता म्हणून मी त्यांच्याबरोबर काम करीत असताना कार्यकर्त्याचे कर्तृत्व, कार्यकर्त्याच्या कामाकडे बघण्याची त्यांची वेगळी शैली होती. मी चंद्रपूर येथून आल्याचे सांगितल्यानंतर त्यांनी चंद्रपूरच्या सर्व समित्यांवर माझी सदस्य म्हणून नेमणूक केली होती. महाराष्ट्राच्या महिला विकास मंडळावर माझी संचालक म्हणून नेमणूक केली होती. मी त्यांच्याबरोबर काम करु लागले. 1980 मध्ये पुलोद सरकार संपुष्टात आले आणि काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर आले. परंतु दोन वर्षे पुन्हा काम करण्याची त्यांनी मला संधी प्राप्त करुन दिली. नंतर लक्षात आले की, मी दुसऱ्या पक्षात असतानाही काँग्रेस पक्षाच्या जागेवर काम करीत आहे, मग माझ्याबद्दल आक्षेप घेण्यात आला. परंतु श्री.शरद पवार यांच्याकडे माणूस ओळखण्याची चाणाक्ष बुध्दी होती. मुरब्बी राजकारणी, धुरंधर नेतृत्व असे त्यांचे वर्णन केले तर वावगे ठरणार नाही.

सभापती महोदय, 1985 मध्ये मी विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत उमेदवार म्हणून फॉर्म भरला. गडचिरोलीहून चंद्रपूरला जात असताना श्री.शरद पवार यांच्या लक्षात आले की, मी निवडणुकीला उभी आहे. त्यांनी मला फोन केला आणि सांगितले की, मी चंद्रपूरहून पुढे जात आहे. मला भाषणाला का थांबविले नाही? चूक माझी झाली होती. त्यांना थांबवावयास हवे होते. परंतु ते थांबतील की नाही अशी मला शंका वाटत होती. परंतु ते म्हणाले की, मी नक्की थांबलो असतो. विरोधी पक्षाचा उमेदवार असतानाही त्यांची प्रचारासाठी भाषण करण्याची तयारी होती. 1990 मध्ये मी पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले त्यावेळेला ते राज्याचे मुख्यमंत्री होते.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

........2डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

सन 1990 मध्ये त्यांच्या समवेत एक विरोधी पक्षाची आमदार म्हणून काम करीत असताना महिलांचे प्रश्न कसे सोडवावे यासंबंधातील प्रशिक्षण देखील ते आम्हाला देत होते. पहिले महिलांचे धोरण हे त्यावेळी आले होते. ते धोरण तयार करण्यामध्ये माझा देखील खारीचा वाटा होता. आता तिसऱ्या महिला धोरणामध्ये देखील मी मदत केलेली आहे. मुलींना जन्मानंतर पित्याच्या मालमत्तेवर थेट हक्क मिळत नव्हता. वडील गेल्यानंतरच तो वारसा मिळत होता. परंतु, पहिल्यांदा कायद्यामध्ये दुरूस्ती करून मुलींना आई-वडिलांच्या मालमत्तेमधील वाटा देण्याचे काम त्यांनीच केलेले आहे. तेव्हा त्यांनी महिलांना स्वतःच्या अस्तित्त्वाची जाणीव करून देण्याचे काम केले आहे. पोलीस पाटील या पदासाठी त्यांनी महिलांसाठी आरक्षण ठेवले. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये 33 टक्के आरक्षण दिले. महिलांना नोकऱ्यांमध्ये देखील 30 टक्के आरक्षण दिले. उच्च शिक्षणामध्ये देखील त्यांनी महिलांसाठी आरक्षण ठेवले. 1990 ते 1995 या कालावधीत त्यांनी महिलांसाठी शैक्षणिक, राजकीय, शासकीय नोकऱ्यांमधील आरक्षण मिळवून दिलेले आहे. त्यांची बुद्धी कॉम्प्युटर सारखी आहे. 288 सदस्यांचे नाव ते सहजरित्या घेत होते. आम्ही पंधरा जण बसलो की, पटकन नाव आठवत नाही. पण ते 288 सदस्यांचे नाव घेऊनच हाक मारायचे. त्यामुळे मी त्यांच्या जवळचा आहे अशी भावना त्या माणसाच्या मनामध्ये निर्माण होत असायची. त्यामुळे लोक जोडली जात होती. त्यांचा हा स्वभाव मी घेतला. मी माझ्या क्षेत्रातील कार्यकर्त्यांना नावाने बोलवायला लागली. ती पकड आजही आहे. आम्हाला जवळून ओळखण्याचे सामर्थ्य आजही आहे असे कार्यकर्त्यांना वाटते. हा स्वभावगुण आदरणीय श्री.शरदरावजी पवार यांचा आहे.

मी विरोधी पक्षात असताना माझे काम असल्यामुळे भेटण्यासाठी वेळ द्यावी अशा आशयाची चिठ्ठी त्यांना पाठविली. त्यांनी मला चिठ्ठी पाठवून 3.00 वाजता भेटण्यास येण्यास सांगितले. परंतु, त्यांना दोन वाजता तातडीने एका कामासाठी जायचे होते. त्यांनी मला सांगितले की, ताबडतोब ये, मी बाहेर जातो आहे. त्यांनी माझे काम केल्यानंतर ते बाहेर गेले. विरोधी पक्षाला सन्मानाने वागविण्याचे काम ते करीत होते. त्यामुळे माणसे जोडण्याचे, शत्रुत्व दूर करण्याचे आणि मित्र जोडण्याचे काम त्यांच्या स्वभावामध्ये होते. मी माझ्या मतदार संघातून निवडून येणारी पहिली महिला आमदार होती. मी निवडून आल्यामुळे भारतीय जनता पक्षाची पकड जिल्ह्यामध्ये असणे

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

आवश्यक आहे असा विचार करायची. तेव्हा मी माझ्या डोळ्यासमोर नेहमी बारामतीचे उदाहरण ठेवत होते. बारामतीचा विकास झाला म्हणून श्री.शरदराजवी इतके दिवस टिकले. आपणही आपल्या विभागाचा विकास केला तर इतके दिवस टिकू. ते माझे स्वप्न पूर्ण झाले आणि लोकांनी देखील मला खऱ्या अर्थाने सहकार्य केले.

सभापती महोदय, मी एकदा त्यांच्या बरोबर विमानाने प्रवास करीत होते. त्यांनी त्यांच्या आईचे वर्णन सांगितले. घरची परिस्थिती सांगितली. त्यांनी अतिशय जवळीकपणे मला घरची परिस्थिती सांगितली. मला सांगितले की, तुला शिकायचे असेल तर तू एकदा पुण्याला ये आणि आमच्या आईने चालविलेले वसतिगृह एकदा बघ. मी मंत्री असताना त्यांनी मला द्राक्ष महोत्सवाला निमंत्रण दिले. त्यावेळी देखील त्यांनी मला सन्मान दिला होता. त्यावेळी मला कळले की, माणूस कितीही मोठा असला तरी सुद्धा छोट्याला मान देतो तोच खऱ्या अर्थाने मोठा होऊ शकतो. त्यांच्याकडे कुशल नेतृत्व आहे. ते अजातशत्रु आहेत. अशा अजातशत्रुच्या अमृतमहोत्सवानिमित्त मांडण्यात आलेल्या अभिष्टचिंतनाच्या प्रस्तावावर मला बोलण्यास संधी मिळाल्याबद्दल आनंद होत आहे. ते कृषी मंत्री असताना मी शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन त्यांना दिल्लीला भेटायला गेले. काही महिलांना घेऊन गेले. मी त्यांना फोन केल्यावर तो त्यांनी स्वतःच उचलला. मला सांगितले की, तुला नेमके काय पाहिजे मला सांग. मी अधिकाऱ्यांना बोलावून सगळा विचार करून तुला उत्तर देईन. त्यांनी स्वतःहून फोन उचलल्यामुळे त्यांच्याशी काय बोलावे हे मला देखील सुचले नाही. त्यावेळी त्यांनी माझे प्रश्न लगेच सोडविले व न्याय मिळवून दिला. अशा प्रकारे ते लोकांचे काम करीत होते. ते अतिशय धूर्त आहेत. सन 1990 मध्ये बजेटचे भाषण सुरू होते. त्यावेळी साहेब दिल्लीला गेले होते. त्यावेळी श्री.सुधाकरराव नाईक नेतृत्व करीत होते. ते आपल्या फाईलमध्ये गुंतले होते. त्यावेळी एक रूपयाची कपात सूचना मांडण्याची पद्धत होती. त्यांच्या अनुपस्थितीचा फायदा घेऊन आम्ही एक रूपयाची कपात सूचना मांडण्यास सुरूवात केली आणि भाषणास सुरूवात झाली. तेवढ्यात श्री.पवार साहेबांची एन्ट्री झाली. मी गोपीनाथजींना म्हटले की, आता आपला डाव पूर्ण फसला. हे एवढे चतुर आहेत की, ते आपला डाव पूर्ण होऊ देणार नाही. त्यांनी इकडे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

तिकडे पाहिले. आम्ही एक रूपयाची कपात सूचना दिली होती हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी ताबडतोब सगळीकडे चिठ्ठी पाठवून गोंधळ घालण्यास सांगितले आणि त्या दिवशीचे सभागृहाचे कामकाज संपविले. तेव्हा पासून विधान सभेत एक रूपयाची कपात सूचना येण्याचे बंद झाले. त्यावर पूर्णतः बंदी आली. धूर्त राजकारणी, उत्तम संघटक, कार्यकर्त्यांना आपलेसे करणारे, यामुळे त्यांना सर्व यश प्राप्त झाले आहे. दिल्लीमध्ये दक्षिण व उत्तरवासियांचे प्रचंड अस्तित्व आहे. ते मराठी माणसाला पुढे येऊ देत नाहीत असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. ते पंतप्रधान झाले असते तर महाराष्ट्राचा स्वाभिमान जागा झाला असता. एक यश आपल्याला प्राप्त झाले असते. भविष्य कुणालाही सांगता येणार नाही. त्यांना उदंड आयुष्य लाभो ते शताब्दी पूर्ण करो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करून माझे दोन शब्द संपविते.

......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त मांडण्यात आलेल्या अभिष्टचिंतन प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

मी या सभागृहात श्री.पवार साहेबांमुळेच आलो आहे. आज मला साहेबांविषयी बोलण्याची संधी मिळत आहे हे मी माझे भाग्य समजतो. श्री.पवार साहेब हे पुणे जिल्ह्याचे. साहेबांचा जन्म 1942 सालचा आहे. ते तरूण असताना शिवाजीनगर एस.टी.स्टँडला उतरायचे. तेथे उतरल्यानंतर आमच्या वाकडेवाडी येथे ॲग्रीकल्चर कॉलेजच्या शेजारी येत असत. त्यावेळी आमचे सायकलचे दुकान होते. तेथून ते सायकल न्यायचे. त्यावेळी त्या भागात एकमेव लॅम्ब्रेटा गाडी आमच्या घरात होती. साहेबांना पुण्यात फिरण्याकरिता ती गाडी देण्यात येत होती. कधी कधी त्यांचा एस.टी.ने डबा यायचा. एस.टी.ने डबा आला नाही तर मग ते आग्रहाने त्यांचा डबा करण्यास सांगून घेऊन जायचे. अनेक गोष्टी सांगता येतील. मी तरूण असताना निवडणुकीचे महत्त्वपूर्ण निर्णय होत होते. राजकारणाच्या अनेक घडामोडी घडत असताना साहेबांनी अनेकांना घडविले. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी साहेबांचा आजार समोर आला. तेव्हा मी काँग्रेस पक्षात होतो. आघाडीची ती सभा झाल्यानंतर ती व्यक्ती म्हणाली की, चला माझे तर बरे झाले. पण साहेबांबद्दल तो वाईट बोलला. तो बोलणारा माणूस संपला. त्या विषयी मी साहेबांना सांगितले. पण साहेबांनी प्रतिक्रया दिली नाही. आपण सर्वांनी साहेबांची पुण्यासह महाराष्ट्रासंबंधातील दूरदृष्टी बघितली आहे. महाराष्ट्रात पर्यटन स्थळ विकसित झाले पाहिजे असा विचार ते नेहमी करीत होते. येथे बरेचजण शेतीसंबंधात बोलले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

EE-1.....

श्री.अनिल भोसले.......

पश्चिम महाराष्ट्रात महाबळेश्वर हे एकमेव पर्यटनस्थळ आहे. पाचगणी,माथेरान या डोंगरी भागात पर्यटनस्थळ होण्याकरिता त्यावेळी माननीय श्री.अनंतराव थोपटे, माननीय मदन बाफना आणि काही आमदारांना पर्यटनस्थळाच्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी परदेशात पाठविले होते. परंतु काही लोकांनी पर्यटनस्थळाच्या संदर्भात विरोध केला, गैर प्रचार केला. आमच्या भागातील पर्यटनस्थळाला भेट देण्यासाठी राज्यातून आणि देशातून अनेक पर्यटक भेट देण्यासाठी येत असतात.

**उप सभापती :** मी सभागृहाची वेळ वाढवित आहे.

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, माननीय पवार साहेबांचे जे काही स्पप्न आहे ते पूर्ण झाले तर महाराष्ट्राच्या विकासाला चालना मिळू शकेल. त्यामुळे राज्य सरकारने, सर्व पक्षीय सदस्यांनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे. माननीय पवार साहेबांनी स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांसाठी 50 टक्के आरक्षणाची तरतूद केलेली आहे. त्यामुळे माननीय पवार साहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी एक व्यासपीठ तयार करण्याची आवश्यकता आहे. दि. 12 मार्च रोजी माननीय चव्हाण साहेबांच्या कार्याच्या संदर्भात दोन्ही सभागृहाचे अधिवेशन बोलवले जाणार आहे. माननीय पवार साहेबांचे विचार ऐकण्यासाठी तरुणांसाठी शासनाने वेगवेगळया ठिकाणी व्यासपीठ तयार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, काल माननीय पवार साहेबांनी पुण्यामध्ये सांगितले की, आपल्या राज्यात दुष्काळ असल्यामुळे मी यापुढे सत्कार स्वीकारणार नाही. माननीय पवार साहेबांचे कृषीच्या बाबातीत राज्यात आणि देशात फार मोठे योगदान आहे. त्यामुळे राज्य सरकारने आरोप प्रत्यारोप न करता माननीय पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी त्यांचे विचार महाराष्ट्रापुढे आणमना दुष्काळ दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत.

सभापती महोदय, काल माननीय पवार साहेबांनी ग.दि.माडगुळकरांचे स्मारक पुण्यातील संभाजी बागेत व्हावे अशी इच्छा प्रदर्शित केली असल्यामुळे राज्य सरकारने परवानगी देण्याची आवश्यकता आहे. यासाठी जो काही खर्च येणार आहे तो खर्च पुणे महानगरपालिका उचलणार आहे. त्यामुळे ग.दि.माडगुळकरांचे स्मारक उभारण्यास राज्य शासनाने मदत करावी एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक ) :सभापती महोदय, उत्तरेतील आणि दक्षिणेतील नेते परस्परांचे तोंड बघत नाहीत, एका व्यासपीठावर कधी येत नाहीत. परंतु माननीय शरद पवारांसाठी दिल्लीमध्ये माननीय पंतप्रधानांपासून ते आदरणीय श्रीमती सोनिया गांधी पर्यंत तसेच देशाच्या अनेक राज्यातील मुख्यमंत्री एकत्र आले होते. या सभागृहात शासनाच्या वतीने माननीय पवार साहेबांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने अभिनंदनाचा ठराव आणला गेला आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात ही जी संस्कृती आहे ती नेमकी कोणी निर्माण केली ? आदरणीय कवी श्री. वसंत बापटांच्या ओळीत म्हटले आहे की, "भव्य हिमालय तुमचा आमचा, केवळ माझा सह्य कडा". माननीय बापटसाहेबांनी या ओळी कदाचित माननीय पवार साहेबांकडे बघून लिहिल्या असाव्यात. महाराष्ट्रामध्ये लोकशाहीचा इतका सुसंस्कृत आविष्कार होण्याची कारणे दोन आहेत. त्यातील पहिले कारण आदरणीय यशवंतराव चव्हाणाचे राजकारण आणि त्यानंतर माननीय पवार साहेबांनी उभे केलेले महाराष्ट्रातील राजकारण हे आहे. महाराष्ट्रात सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांच्यामध्ये कितीही संघर्ष असला आणि संघर्षाची वेळ निघून गेल्यानंतर माणसे एकत्र येऊन राज्याच्या विकासासाठी चर्चा करतात. आदरणीय शरद पवारांच्या संदर्भात सारेजण एकत्र येऊन ठराव मांडतात हे त्याचेच उदाहरण आहे. माननीय पवार साहेबांच्या राजकारणाबद्दल अनेक विवाद असतील,वंदता असेल. परंतु आपल्या सत्यशोधक विचारांचा वारसा त्यांनी त्यांच्या आईकडून घेतला आणि तो अखेरपर्यंत सोडला नाही आणि आजही ते तसेच उभे आहेत. "वारा खात, गारा खात, बाभूळ झाड उभे आहे" या ओळीसुध्दा माननीय पवार साहेबांसाठीच लिहिलेल्या असाव्यात. त्यांना प्रचंड प्रमाणात आजार असतांनाही त्यावर मात करावयाची आणि पुन्हा खंबीरपणे उभे राहायचे. त्यांच्या काळात राज्यावर अनेक संकटे आली होती. ती संकटे नैसर्गिक असतील किंवा राजकीय असतील, ती संकटे मानवी असतील, सामाजिक असतील. प्रत्येक संकटामध्ये खंबीरपणे कोण उभे राहत असतील तर ते माननीय पवार साहेब उभे राहतात हे आपण अनेकदा पाहिलेले आहे. किल्लारीचा भूकंप असो, दुष्काळ असेल, मुंबईचे बॉम्बस्फोट असेल, बाबरीच्या दंगली असतील एवढे असूनही राज्याला 24 तासात सुरळीत करणे हे कसब,कौशल्य केवळ माननीय पवार साहेबांकडे आहे.

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील......

सभापती महोदय, मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या कसोटीमध्ये अनेक राजकीय नेतृत्व कदाचित त्यामध्ये पराभूत झाले असते. परंतु पवार साहेबांनी एक मोठे राजकीय परिवर्तन, सामाजिक परिवर्तन त्या निमित्ताने घडवून दाखवले व त्यासाठी प्रचंड किंमत स्वत:साठी, स्वत:च्या पक्षासाठी आणि राज्यासाठी सुध्दा चुकवली. परंतु परिवर्तनाच्या राजकारणाशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही याचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

सभापती महोदय, मंडल आयोगाच्या अंमलबजावणीचे देशातील पहिले श्रेय माननीय पवार साहेबांनाच द्यावे लागेल. त्याही पलीकडे जाऊन मुस्लीम ओबीसींच्या संदर्भातील निर्णय देशात पहिल्यांदा घेतला तो सुध्दा पवार साहेबांनीच घेतला. हा निर्णय अशा वेळी घेतला की, त्यांची राजकीय किंमत माननीय पवार साहेबांना चुकवावी लागली. परंतु ते मागे हटले नाहीत.

सभापती महोदय, भटक्या विमुक्तांसाठी आपल्या राज्यात ज्या सवलती आहेत तशा सवलती इतर कोणत्याही राज्यात नाहीत. भटक्या विमुक्तांना सवलती देण्याचे काम सुध्दा माननीय पवार साहेबांनी केलेले आहे.

सभापती महोदय, माननीय पवार साहेबांनी शेतकऱ्याच्या कर्जमाफी केली या विषयाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार मांडले आहेत परंतु त्याचे मी रिपिटेशन करणार नाही. परंतु साहित्य, कला, संस्कृती, राजकारण, खेळ, उद्योग असे एकही क्षेत्र नाही की, जे माननीय पवार साहेबांनी व्यापलेले नाही. प्रत्येक ठिकाणी पवार साहेबांचा ठसा हा अमिट आहे आणि तो पुढील काळातही तसाच राहणार आहे. याची साक्ष या क्षेत्रातील त्यांचा वावर आजही थक्क करणारा आहे.

सभापती महोदय, 12 डिसेंबरच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने मी मुंबईत त्यांना भेटावयास गेलो होतो. त्यांनी क्षणात माझ्या भावाबद्दल चौकशी केली. त्याच्यासाठी कोणती पुस्तके बाजारात आली, कशी आली अशी माहिती दिली. मी हे चेकित होऊन त्यांच्याकडे पाहत होतो. असे अनेक चमत्कार त्यांच्या बाबतीत आहेत. पवार साहेबांच्या एकूण राजकारणाबाबत आपल्याला एवढेच सांगता येईल की, ते खऱ्या अर्थाने महाराष्ट्र पुरुष आहेत आणि या महाराष्ट्र पुरुषाचा गौरव आपण

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील......

सारेजण एकत्र येऊन करतो आहोत हा आपल्या सन्मान असून तो सन्मान त्यांच्यासाठी नाही. ही खरे म्हणजे ती आपल्यासाठी सन्मानाची गोष्ट आहे. पवार साहेबांच्या विचारांचा वारसा पुढील काळात त्यांचीच मंडळी नाही तर त्यांनी राजकारण रुजवलेली जी मूल्य आहेत ती मुल्यव्यवस्था, या राज्यातील सर्व राजकीय पक्ष सभ्यता आणि सुसंस्कृतीच्या पातळीवर या पुढच्या काळात त्यांचा वारसा पुढे नेतील अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

---------

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त): सभापती महोदय, राष्ट्र नेते, महाराष्ट्राचे गौरव, मानवतेचे पुजारी सन्माननीय शरद पवार साहेबांच्या अभिष्ट चिंतनाच्या प्रस्तावावर माझ्या पिपल्स रिपब्लीकन पक्षाच्या वतीने त्यांना मानाचा मुजरा करण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी माननीय पवार साहेबांसाठी "अजातशत्रु" हा सुंदर शब्द वापरला. दिल्ली येथील विज्ञान भवनात दि.10 डिसेंबर, 2015 रोजी .....

उप सभापती : सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांना विचार व्यक्त करण्यासाठी पाच मिनिटांचा अवधी देण्यात आलेला असल्यामुळे त्यांनी आपले भाषण पाच मिनिटात पूर्ण करावे.

FF-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, त्या कार्यक्रमास देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान, सर्व राज्यांचे मुख्यमंत्री तसेच सर्व पक्षांचे नेते उपस्थित होते. त्यावरुन श्री.शरद पवार साहेब हे सन्मित्र आणि अजातशत्रू आहेत हे सिद्ध होते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सांगितले की, श्री.शरद पवार साहेबांवर वेगवेगळ्या पक्षातील लोक टीका करतात. मी एक गोष्ट सर्वांना सांगू इच्छितो की, "जिस पेड़ को फल लगते हैं, उसी पेड़ को लोग पत्थर मारते हैं" श्री.शरद पवार साहेब हे असे एक झाड आहे ज्या झाडाला समतेची, बंधुत्वाची, न्यायाची, माणुसकीची आणि सत्तेची देखील फळे लागलेली आहेत. आपण ज्याला मिडास टच म्हणतो त्याप्रमाणे श्री.शरद पवार साहेब मिडास टच आहेत. मिडास नावाचा राजा होता. तो राजा ज्या वस्तुला हात लावेल त्याचे सोने होत असे. श्री.शरद पवार साहेबांच्या परीस स्पर्शाने अनेकांच्या जीवनाचे सोने झाल्याचे आपण पाहत आहोत, असा मिडास टच श्री.शरद पवार साहेबांचा होता.

सभापती महोदय, श्री.शरद पवार साहेबांना मी विश्वकोष म्हणतो, एनसायक्लोपीडिया. त्यांचे वाचन, चिंतन, मनन चांगले होते. श्री.शरद पवार साहेबांनी ज्या क्षेत्रामध्ये आपला ठसा उमटविलेला नाही असे कोणतेही क्षेत्र मला कोणी दाखवून द्यावे, मी त्यास इनाम देण्यास तयार आहे. असा हा आमचा विश्वकोष आहे.

सभापती महोदय, श्री.शरद पवार साहेब चारवेळा मुख्यमंत्री झाले, विरोधी पक्ष नेते झाले, संसदेमध्ये गेले, केंद्रीय मंत्री झाले यावर मी बोलणार नाही. श्री.शरद पवार साहेब हे आपल्या शेतातील भाजी विकण्यासाठी दौंडच्या बाजारामध्ये येत होते. आपल्या शेतातील भाजी दौंडच्या बाजारात विकणारा पुढे राज्याचा मुख्यमंत्री, केंद्रात संरक्षण मंत्री आणि कृषी मंत्री होईल असे कोणाला वाटले होते काय ? असे म्हणतात की, " मैं अकेला चल पडा जाने को मंजिल मगर, आगे मैं चलता गया और कारवां बनता गया"

सभापती महोदय, एक उत्कृष्ट राज्यकर्ता, एक उत्कृष्ट प्रशासक, ज्ञानवंत, प्रज्ञावंत असे हे व्यक्तीमत्व आहे. ज्याला चालती बोलती डिक्शनरी बोलता येईल अशाप्रकारचे ते व्यक्तीमत्व आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे......

या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या वेगवेगळ्या आठवणी सांगितल्या. एक कवी काय म्हणतो ते सांगतो.

अगर भरोसा खुदा पर हैं,
तो जो वह लिखेगा तकदीर वही होगी,
मगर भरोसा खुद पर हैं,
तो भगवान वह लिखेगा जो आप चाहेंगे.

श्री.शरद पवार साहेब हे स्वतःचे भविष्य स्वतः लिहिणारे आहेत आणि दुसऱ्याचे भविष्य घडविणारी किमया पवार साहेबांना लाभली आहे, ही साधी गोष्ट नाही.

सभापती महोदय, श्री.शरद पवार साहेब काँग्रेस आणि रिपब्लीक पक्षाचे नेते होते. त्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही लोकसभेत काम केले. त्यावेळी काँग्रेस पक्षाने रिपब्लीन पक्षासाठी लोकसभेच्या चार जागा सोडल्या होत्या आणि त्या चारही जागांवर रिपब्लीकन पक्षाने उमेदवार निवडून आले होते. त्यामध्ये रा.सू. गवईसाहेब, प्रकाश आंबेडकर, श्री.रामदास आठवले आणि मी असे चारही उमेदवार निवडून आलो. आता श्री.रामदास आठवले तिकडे गेले आहेत. आम्ही इकडे आहोत. निवडणुक होण्यापूर्वी श्री.शरद पवार साहेब नाशिकमध्ये आले होते त्यावेळी त्यांनी स्टेटमेंट केले की, श्री.रा.सू.गवई, श्री.प्रकाश आंबेडकर, श्री.रामदास आठवले निवडून येतील, परंतु प्रा.जोगेंद्र कवाडे यांच्याबद्दल काही सांगता येत नाही. तेव्हा नाशिकच्या कार्यकर्त्यानी इतका धुडगुस आणि घेराव घातला की, श्री.शरद पवार साहेबांना खोलीच्या बाहेर येऊच दिले नाही. शेवटी त्यांनी सांगितले की, काही काळजी करु नका, मी पाहतो. त्यांना मतदारसंघांतील प्रत्येक घरातील लोकांची नावे माहीत होती. त्यावेळी त्यांनी सांगितले की, आमचे काँग्रेसचे दोन उमेदवार पडले तरी चालतील. पण प्रा.जोगेंद्र कवाडे निवडून आलेच पाहिजे. असा त्यांचा परिस स्पर्श होऊन मी निवडून आलो.

सभापती महोदय,आमची राष्ट्रवादी काँग्रेस सोबत युती झाली. युती झाली त्यावेळी आम्हाला अमूक द्या तमुक द्या असे काही ठरले नव्हते. मी वांद्रे येथील कार्यालयात बसलो असताना अचानक मला श्री.शरद पवार साहेबांचा फोन आला आणि त्यांनी माझा बायोडेटा मागितला. मी त्यांना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे......

सांगितले की, माझा बायो-डेटा आपणास माहीत आहे. पण त्यांनी सांगितले की, माझ्याकडे बायो-डेटा पाठवून दे. मी त्यांना बायो-डेटा पाठवून दिला. तिसऱ्या दिवशी माननीय राज्यपालांच्या नामनियुक्त यादीमध्ये माझे नाव घेण्यात आले. मला त्याचे आश्चर्य वाटले. मी असा कधी विचारच केला नव्हता आणि असे काही ठरले नव्हते. श्री.रामदास आठवले जसे बाकीच्या लोकांबरोबर ॲग्रीमेंट करतात तसे आमचे ॲग्रीमेंट झाले नव्हते. परंतु मला त्यांनी विधानपरिषदेवर पाठविले.

सभापती महोदय, राजकारणामध्ये मोठी शक्ती आहे. ही शक्ती सेवाभावनाने, निरपेक्षपणे आणि प्रामाणिकपणे करणे आवश्यक आहे. श्री.शरद पवार साहेबांकडे ही शक्ती आहे आणि ते सेवाभावनेने, प्रामाणिकपणे आणि निरपेक्षपणाने करीत आहेत. म्हणून ते खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे नाही तर देशाचे नेते झाले. राजकीय सत्ता ही समाजाच्या सेवेची किल्ली आहे. जाता जाता एवढेच म्हणेन की, "Politcs is an art of managing contradictions." श्री.शरद पवार साहेबांसारखा अनेक प्रकारच्या कॉन्ट्रॅडिक्शनला तोंड देणारा नेता कदाचित एक मात्र शरद पवार साहेब आहेत दुसरा कोणी असू शकत नाही. आपण ज्याला सर्वगुण संपन्न म्हणतो अशा प्रकारचे त्यांच्याकडे नेतृत्व आहे. जॅक मॅक्सवेल म्हणतात "Genuine leader is not a searcher for conscious but a moulder of a conscious." "A leader is one who knows the ways goes the ways and shows the ways."

सभापती महोदय, श्री.शरद पवार साहेब लिजंड आहेत. अशाप्रकारचे वैभव राज्याला आणि देशाला लाभले. ते देशाचे कृषी मंत्री असताना युनोमध्ये त्यांच्या कार्याचा सत्कार झाला. एक महान व्यक्तीमत्व राज्यात निर्माण झाले. आज त्यांच्या अभिष्टचिंतनाचा ठराव दोन्ही सभागृहात होत आहे. पण एक गोष्ट निश्चित आहे की, "Great people born in adverse zone not in comfort zone." अत्यंत विपरित परिस्थितीचा सामना करून ते आज उच्च पदाला गेले आहेत.

.........2G-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

अमेरिकेची राज्यघटना थॉमस जेफरसन यांनी लिहिली. जेव्हा अमेरिकेच्या निवडणुकीची वेळ आली तेव्हा कोणीही थॉमस जेफरसन यांच्या विरुध्द अर्ज भरला नाही. अमेरिकेतील जनतेने त्यांना बिनविरोध निवडून दिले. अशाप्रकारे बिनविरोध निवडून येण्याचे भाग्य अमेरिकेची राज्य घटना लिहिणाऱ्या थॉमस जेफरसनला मिळाले. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना तशा प्रकारचे भाग्य लाभले नाही. आज मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत भगवान बुध्दांच्या चरणी प्रार्थना करतो की, थॉमस जेफरसन यांना जे भाग्य लाभले तशाच प्रकारचे भाग्य देशाचे राष्ट्रपती होण्यासाठी माननीय श्री.शरद पवार यांना लाभले पाहिजे. माननीय श्री.शरद पवार साहेबांना देशातील सर्वोच्च पद असलेले राष्ट्रपती पद बिनविरोध मिळावे, एवढीच या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करतो व माझे भाषण संपवितो.

धन्यवाद. जय भिम, जय विदर्भ.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आदरणीय श्री.शरदचंद्र पवार साहेबांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मांडण्यात आलेल्या अभिष्टचिंतनाच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, अमेरिकेच्या एका विद्यापीठाने दोन-तीन वर्षांपूर्वी माननीय श्री.शरद पवार साहेबांना डॉक्टरेट पदवी बहाल करुन, त्यांचा गौरव केला होता. त्यांनी कोणत्या विषयावर प्रबंध लिहिला म्हणून नव्हे तर त्यांनी राज्य आणि देश पातळीवर विविध क्षेत्रात जे उल्लेखनीय काम केले होते त्याची दखल घेऊन त्यांना डॉक्टरेट पदवी बहाल केली होती. माननीय श्री.शरद पवार साहेबांनी शेतकरी, आदिवासी, मागासवर्गीय, ओबीसी समाजाच्या दृष्टीने किंवा अन्य प्रांतांत विविध क्षेत्रात जे काम केले होते त्याची दखल घेऊन त्यांचा गौरव केला होता.

सभापती महोदय, अनेकजण माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या बद्दल गमतीने असे म्हणतात की, महाराष्ट्रातील कोणत्याही खेडे गावातील कोणत्याही रानवस्तीमध्ये काय होत असेल वा नसेल, हे माननीय श्री.शरद पवार साहेब नक्की सांगू शकतात. एवढा मोठा अभ्यास आणि माहिती असणारा नेता आज तरी या महाराष्ट्रात दुसरा कोणताही नाही, ही वस्तुस्थिती आहे. महोदय, माननीय श्री.शरद पवार साहेबांनी देश पातळीवर जे काम केले ते खरोखरच अतुलनीय स्वरुपाचे आहे.

सभापती महोदय, त्यांचा आणि माझा संबंध आला त्या दरम्यान माझे त्यांच्यासोबत काही वेळा जरूर मतभेद झाले असतील. हे खरे असले तरी त्यांच्यासोबत मतभेद कमी आणि त्यांच्याबद्दल आदर मात्र मोठ्या प्रमाणावर होता. परंतु दुर्दैवाने या राज्याच्या विकासाचा ध्यास घेऊन, सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचे काम करीत असताना त्यांच्या प्रगतीबद्दल. अनुभवाबद्दल, अभ्यासाबद्दल, ज्ञानाबद्दल आणि त्यांच्या व्यासंगाबद्दल एका बाजूला चर्चा करीत असताना दुसऱ्या बाजूला त्यांच्यावर काही बाबतीत आरोप चिकटविण्याचे काम करण्यात आले. याचे माझ्यासारख्या सामाजिक कार्यकर्त्याला अनेकदा दु:ख होते. मी सांगू इच्छितो की, त्यांनी कधीही अशा पध्दतीने चुकीचे काम केले नाही. या ठिकाणी मी जातीयवादीपणाने बोलत आहे असे समजण्याचे कारण नाही. मी सांगू इच्छितो की, खाजगीत किंवा मीडियातील मंडळी माननीय श्री.शरद पवार



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

साहेबांवर जाणीवपूर्वक 'मराठा नेते' असे लेबल लावण्याचा प्रयत्न दुर्दैवाने करतात. मी अनेक वर्षे त्यांच्या सानिध्यात आलो. मी खात्रीने सांगेन की, त्यांनी मराठा किंवा अन्य कोणत्याही जातींच्या बाबतीत कधीही जातीयवादातून काम केल्याचे पाहिले नाही.

सभापती महोदय, मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी त्यांनी आपली सर्व सत्ता पणाला लावली होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाल्यानंतर तोच एकमेव पक्ष असा आहे की, ज्या पक्षाने मुस्लीम समाजाच्या मुलांच्या शिक्षणासाठी 5 कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केलेली आहे. मुस्लीम समाजाबद्दल कोण काय बोलते यावर मला भाष्य करायचे नाही. माननीय श्री.शरद पवार साहेबांनी पक्षाच्या माध्यमातून 5 कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केलेली असतानासुध्दा, ते मुस्लीम विरोधी नेते असल्याचे सांगितले जाते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी सांगितले की, त्यांना कल्पना नसताना सुध्दा त्यांना माननीय राज्यपालांच्या कोट्यातून विधानपरिषदेचे सदस्यत्व दिले. यामागील कारण म्हणजे वेगवेगळ्या समाजातील नवीन मंडळींना विविध क्षेत्रात संधी देण्याचे काम त्यांनी केले. ज्या ज्या वेळी सत्तास्थाने आली त्या त्या वेळी त्यांनी वेगवेगळ्या समाजातील लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. अर्थात त्या व्यक्तींमध्ये कर्तृत्व सुध्दा तितकेच होते. एकंदरीत त्या लोकांच्या कर्तृत्वाला न्याय देण्याचे काम माननीय श्री.पवार साहेबांनी केले. तरी सुध्दा त्यांच्यावर जातीयवादाचे आरोप ठेवण्यात आले.

सभापती महोदय, माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त अनेक मुलाखती प्रसिध्द होत होत्या. मी त्यांची एक मुलाखत ऐकली. ते जेव्हा राज्यातून केंद्रात गेले तेव्हा त्यांनी त्यांचा उत्तराधिकारी म्हणून स्व.सुधाकरराव नाईक साहेबांची निवड केली. खऱ्या अर्थाने त्यावेळी डॉ.पद्मसिंह पाटील यांचा हक्क असताना त्यांनी सुधाकरराव नाईक यांची मुख्यमंत्री म्हणून निवड केली. यामागील कारण म्हणजे स्व.वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राला जे देणे दिले आणि त्यांनी त्यांच्यासाठी जे काम केले होते त्याची उतराई करण्यासाठी त्यांनी स्व.सुधाकरराव नाईक यांना उत्तराधिकारी नेमले. असे असताना सुध्दा दुर्दैवाने त्यांना एका चौकटीत डांबून ठेवून त्यांचे नेतृत्व कमी करण्याचे काम अनेक मंडळी करीत आहेत. त्यामुळे या गोष्टींचे वैषिम्य माझ्यासारख्या कार्यकर्त्यांना निश्चितपणे वाटते.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

21-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) GG-4

SJB/ AKN/ MMP/ 18:20

श्री.विनायक मेटे....

सभापती महोदय, प्रशासननिक कामात त्यांचा आणि माझा संबंध आला होता. त्यांना हे माहीत होते की, देशात मागासवर्गीय प्रवर्गातील अधिकारी मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी मागासवर्गीय अधिकाऱ्यांच्या दोन बैठक घेतल्या होत्या. त्या दोन्ही बैठकांना मी उपस्थित होतो. त्यांना हे ठाऊक होते की, मागासवर्गीय अधिकाऱ्यांचे विविध प्रश्न आहेत. काही बाबतीत त्यांच्यावर अन्याय-अत्याचार होतो. त्यामुळे तो दूर करण्यासाठी त्यांनी बैठका घेतल्या होत्या. मागासवर्गीय लोकांवरील अन्याय-अत्याचाराचे विषय अनेकदा चर्चेसाठी आल्याचे मी बघितले आहे.

सभापती महोदय, विकासाची कामे करीत असताना, सर्वांना बरोबर घेऊन जात असताना त्यांनी कधीही आपला-परका असा दुजाभाव केला नाही. तसेच त्यांनी व्यक्तिगत संबंध सातत्याने जोपासण्याचे काम केले. त्यांच्या हातामध्ये सत्ता आल्यानंतर त्यांच्याकडे विकासाची कामे घेऊन गेल्यानंतर त्यांनी कधीही दुजाभाव केला नाही. हे मी स्वतः बघितले आहे. हे करीत असताना त्यांनी या राज्याची तरुण पिढी घडविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देऊन त्यांच्यासाठी काम केले आहे. आज माननीय श्री.शरद पवार साहेबांमुळे ही तरुण पिढी समोर आली आहे.

सभापती महोदय, माननीय शरद पवार साहेबांनी काँग्रेस पक्षासोबत फारकत घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस हा स्वतंत्र पक्ष स्थापन केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील काही जण उदाहरणार्थ श्री.अनिल देशमुख, स्व.आर.आर.पाटील, श्री.जयंत पाटील यांनी खाजगीत सांगितलेले आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा काँग्रेस पक्षापासून वेगळा झाला नसता तर आम्हाला राज्यमंत्री पदाचा सुध्दा लाभ मिळाला नसता. महोदय, तरुण पिढीच्या हातामध्ये महाराष्ट्र द्यावा आणि पुढील पिढीला महाराष्ट्र घडविण्याची संधी मिळावी, त्यांना अनुभव मिळावा, पुढील गोष्टीचे ज्ञान मिळावे म्हणून हा महाराष्ट्र तरुण पिढीच्या हातामध्ये सोपविण्याचा माननीय श्री.शरद पवार साहेबांचा कल होता आणि तो आजही कायम आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ....

कितीही बोलले तरी कमीच आहे. मी जास्त बोलत नाही. मला त्यांचा सहवास लाभला. आजही आमचा संबंध आहे. त्यांचे कर्तत्व, ज्ञान, अनुभव यांना हवी तेवढी संधी मिळाली नाही हे या महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते आजतागायत स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांपर्यंत ते गुरूमानतात. ते गुरू म्हणून शोभतात. सर्वांचा आदर करीत महाराष्ट्राला पुढे घेऊन जात असताना त्यांना त्यांच्या मनासारखे उत्तम आरोग्य लाभो. सन 2004 मध्ये त्यांना आजार झाल्याचे समजले. आपण काही मंडळी होता. काही 5-10 लोकांना बोलावून त्यांनी कल्पना दिली आणि सांगितले की, महाराष्ट्राची सन 2004 ची निवडणूक सांभाळायची आहे. पूर्ण निवडणुकीमध्ये येणार नाही असेही त्यांनी सांगितले. मात्र असे असताना सुध्दा ऑपरेशन झाल्याबरोबर 4-8 दिवसांच्या आत त्यांनी मैदानात उडी घेऊन प्रचार हातामध्ये कसा घेतला ते आपण स्वतः डोळ्यांनी पाहिले आहे. रक्त येत असताना सुध्दा ते आले, त्यांची हिंमत, जिगर याला तोड नाही. त्यामुळे त्यांच्या जिगरला, हिंमतीला सलामच केला पाहिजे. त्यांना उदंड आयुष्य मिळो, त्यांच्या इच्छा, आकांक्षा पूर्ण होवो, देव असेल तर त्याने त्या जरूर पूर्ण कराव्यात एवढीच मी या निमित्ताने सदिच्छा व्यक्त करतो आणि त्यांचे अभिष्टचिंतन करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड. हुस्नबानू खलिफे)**

ॲड. निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, महाराष्ट्राचे सुपूत्र, देशाचे नेते, राष्ट्रवादी काँगेस पक्षाचे अध्यक्ष, आमच्या युवकांचे प्रेरणास्थान माननीय पवार साहेबांच्या वयाच्या 75 व्या वर्षानिमित्त प्रस्तावावर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. सत्तेची समिकरणे बदलल्यानंतर आज सुध्दा सामान्य जनतेच्या हृदयावर राज्य करणारे नेते म्हणजे माननीय पवार साहेब आहेत. युवक काँग्रेसचे नेतृत्व करीत राज्यातील तरूण गृह राज्यमंत्री ते महाराष्ट्राचे सर्वात तरूण मुख्यमंत्री म्हणून माननीय पवार साहेबांचे कर्तृत्व हे आमच्या सारख्या युवकांना निश्चितपणे एका दीपस्तंभासारखे आहे. काँग्रेस पक्षाचे तेव्हा एक मुखपत्र होते, त्याची धुरा संपादक म्हणून माननीय पवार साहेबांकडे होती. पत्रकार म्हणून, राजकारणी म्हणून राज्यामध्ये, देशामध्ये माननीय पवार साहेबांनी निश्चितच एक वेगळा ठसा उमटविला आहे. राजकारणातील चढ-उतार सहज पचवून माननीय पवार साहेब यांनी आपला ठसा हा फक्त राज्य पातळीवर नव्हे तर राष्ट्र पातळीवर देखील अतिशय चांगल्या पध्दतीने उमटविला आहे. आज आपण सभागृहात स्मार्ट सिटी संदर्भात वारंवार चर्चा करतो. पण बारामतीच्या विकासाने माननीय पवार साहेबांनी स्मार्ट गाव तर कधीच दाखवून दिले आहे. आपल्या देशाचे माजी पंतप्रधान माननीय मनमोहन सिंग साहेब, विद्यमान पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी देखील बारामती मॉडेलचे भरभरून कौतुक केले आहे. केंद्र सरकारमधील बऱ्याचशा मंत्र्यांनी या संदर्भातील वक्तव्ये सातत्याने केले आहे. आधुनिक तंत्रज्ञान समजून घेणे, काळाला अनुसरून समाजहिताचे निर्णय घेणे हे माननीय पवार साहेबांकडून विद्यार्थी काँग्रेसचा अध्यक्ष असताना आणि युवक काँग्रेसचा अध्यक्ष असताना बऱ्याच जवळून पहायला मिळाले. परवा दिवशी पुस्तकाच्या अनावरणाच्या निमित्त एकत्र असताना किंडल या नवीन आलेल्या अप्लिकेशनच्या संदर्भात पवार साहेब समजून घेण्याचा प्रयत्न करीत होते की वाचक वर्ग आता कोणत्या दिशेने वळत आहे, कोणत्या दिशेने पुढील साहित्य पूर्ण देशात वाढत आहे, त्या दृष्टीकोनाने युवकांना काय आवडत आहे, युवकांचे ओढा कोणत्या दिशेने आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. निरंजन डावखरे ....

राज्यामध्ये आणि देशात माननीय पवार साहेबांनी नेहमीच प्रत्येक क्षेत्रामध्ये आपले काम, आपला ठसा उमटविला आहेच. पण विशेष करून कोकणचा एक प्रतिनिधी म्हणून मी सांगू इच्छितो की, कोकणची रेल्वे म्हणजेच कोकण रेल्वे मुळात साहेबांमुळे सुरूझाली आणि ती सुरूहोताना त्यावेळी गाणे सुरू झाले होते की, "कोकणात रेल्वे धावणार, माझी रेल्वे येणार." कोकणच्या प्रत्येक माणसाला एक आपुलकीचे नाते, एक प्रेम, एक भेट म्हणून माननीय पवार साहेबांकडून एक मोठी भेट म्हणून म्हणजे कोकण रेल्वे मिळाली. नेहमीच कार्यकर्त्याचे ऐकून घेणे, लोकांचे ऐकून घेणे हे दुर्मिळ गुण नेत्यामध्ये असणे गरजचे आहे हे माझ्यासारख्या युवक कार्यकर्त्याला नेहमीच पवार साहेबांच्या व्यक्तिमत्वाकडे पाहताना शिकायला मिळाले. एक प्रसंग आजच्या कार्यक्रमानिमित्त मुद्दाम सांगू इच्छितो. रत्नागिरीला लोकसभेच्या निवडणुकीच्या संदर्भात प्रचाराला गेलो असताना तटकरे साहेबांमुळेच रत्नागिरी ते मुंबई माननीय पवार साहेबांबरोबर हेलिकॉप्टरमधून येण्याची एक संधी मला मिळाली. जशी मुंबई जवळ आली, साहेबांनी वरूनच एक-एक बेट ओळखायला सुरूवात केली होती आणि त्यानंतर जसे आम्ही गव्हर्नर बंगल्याच्या जवळ आलो, त्यावेळी तेथे असणाऱ्या सिगल पक्षाच्या संदर्भात पवार साहेबांनी मला मुद्दाम सांगितले की, निरंजन, हे पक्षी तुला माहीत आहेत का, हे याच ऋतूमध्ये येतात, या ऋतूमध्ये आल्यानंतर हे आपल्यामधून निघून जातात. सभापती महोदय, एवढ्या बारकाईने प्रत्येक कार्यकर्त्याला कोणत्या गाष्टीची समज असली पाहिजे, जाण असली पाहिजे हे निश्चिपणे सांगण्याचे काम पवार साहेबांकडून होत होते. माझे वडील विधानपरिषदेचे उप सभापती माननीय श्री डावखरे साहेबांच्या राजकीय कारकिर्दीच्या जडणघडणीमध्ये नेहमीच माननीय पवार साहेबांचे मोलाचे मार्गदर्शन हे असतेच. तरूण म्हणून मलाही नेतृत्वाची संधी त्यांच्यामुळे प्राप्त झाली आहे. विद्यार्थी संघटनेचा अध्यक्ष, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचा अध्यक्ष या नात्याने माननीय पवार साहेबांमुळेच मला येथे काम करण्याची संधी मिळाली. 10 तारखेला दिल्लीला झालेल्या कार्यक्रमामध्ये ते व्यासपीठ पाहून निश्चितपणे राष्ट्रवादीचा एक कार्यकर्ता म्हणून आमच्या इकडच्या बाकावरील सर्व सन्माननीय सदस्यांचे वजन निश्चिपतणे वाढले आहे.

..4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. निरंजन डावखरे ....

सभापती महोदय, 10 तारखेच्या कार्यक्रमातील फक्त 3 वक्त्यांचे त्यांनी जे म्हटले त्याचा पुनरूच्चार मी करूइच्छितो. सोनिया गांधी मॅडमनी म्हटले की, "He was the Chief Minister of Maharashtra for four times. He is still remembered for his leadership and his effective administration. No one else could have been in that crucial position for such a long time. He was the national choice. In fact, he was the only choice." त्यावेळी फक्त आणि फक्त चॉईस ही पवार साहेबच असू शकतात.

सभापती महोदय, तसेच आपल्या देशाचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी साहेब यांनी सुध्दा एक कविता पवार साहेबांसाठी म्हटली होती, ती अशी की, "अमल करो ऐसा मन में जहाँ से गुजरे तुम्हारी नजरें वहाँ से तुम्हें सलाम मिले. आज शरदराव जी का जीवन देखकर ऐसा लगता हैं की जहाँ पर भी उनकी नजर गुजरेगी वहाँ पर से उनको सलाम मिलेगा" सभापती महोदय, यालाच पुढे जोडून आपल्या देशाचे माननीय राष्ट्रपती श्री. प्रणव मुखर्जी साहेबांनी मुंबईच्या बॉंबस्फोट मालिकेच्या संदर्भात पुढे सांगितले की, "Without any wastage of time he brought back normalcy in the economic center of India which was even appreciated by the ever critical media and they particularly chose a phrase which has still remembered salam mumbai." माननीय राष्ट्रपती म्हणाले की, सलाम शरद पवार जी, सलाम शरद पवार जी.

सभापती महोदय, दोन्ही सभागृहांच्या एकत्रित अधिवेशनाची सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे साहेबांनी सूचना केली. निश्चितपणे ती स्वागतार्ह आहे. आपले सभागृहाचे नेते, आपले सर्वच ज्येष्ठ मंडळी या संदर्भातील निर्णय घेतील आणि 12 मार्चला या संदर्भातील एक दुर्मिळ योग पुन्हा एकदा घडून येईल असा मी विश्वास व्यक्त करतो आणि आपल्या सर्वांचा फार वेळ न घेता माझे दोन शब्द थांबवितो. मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल पुन्हा एकदा आभार. धन्यवाद ! जय हिंद !

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....I

अप्रधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त अभिष्टचिंतन प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, माझी आणि श्री.शरद पवार साहेबांची ओळख सन 1987 मध्ये झाली. मी त्यावेळी राजकारणात नव्हतो. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांचे वडील श्री.प्रभाकर पाटील यांचे चुलते श्री.दत्ता पाटील यांनी मला निवडणुकीत उभे केले. माझ्या विरोधात सन्माननीय श्री.शरद पवार यांचे मित्र श्री.प्रभाकर धारकर हे उभे होते. मी राजकारणात नवखा होतो. मला कोणी ओळखत नव्हते. त्यामुळे मी निवडणुकीत अपयशी होणार, असेच वाटले होते. परंतु, मी जिंकुन आल्यानंतर सन्माननीय श्री.शरद पवार यांनी माझे कौतुक केले. खरे तर ते मला ओळखतही नव्हते आणि मी त्यांच्या मित्राला पाडून निवडून आलो होतो. तरीही त्यांनी मला बोलावून घेतले. ज्या व्यक्तीने आपल्या पक्षाच्या उमेदवाराला हरवले, अशा व्यक्तीला त्यांनी बोलावून घेतले. मी शेतकरी कामगार पक्षाकडून उभा राहिलो होतो. माननीय श्री.दत्ता पाटील साहेबांच्या मेहेरबानीने मी राजकारणात पाऊल ठेवले. मला वेळोवेळी राजकारणात माननीय श्री.शरद पवार यांचा सल्ला मिळाला.

सभापती महोदया, माननीय श्री.शरद पवार यांना कोकणातील माणूस विसरु शकणार नाही. कारण, त्यांनी कोकणात बागायतींचा विकास केला व त्यामुळे तेथील लोकांच्या हातात पैसा आला. त्यांनी फलोत्पादनाची योजना कोकणात राबवली. फलोत्पादनामध्ये नवनवीन संशोधन झाले पाहिजे, जास्तीत जास्त उत्पादन आले पाहिजे, हे देखील त्यांनी या माध्यमातून पाहिले. ज्यांना घरात खायला मिळत नव्हते त्यांनी दोन-तीन एकरात फळबागा लावल्यामुळे त्यांच्याकडे पैसा येऊ लागला, हे सर्व श्री.शरद पवार साहेबांमुळेच झालेले आहे. कोकणात मच्छिमारी आणि फलोत्पादनासाठी श्री.शरद पवार यांनी जेवढे केले आहे तेवढे कुणीही केलेले नाही, त्यामुळे कोकणी बांधव त्यांना कधीही विसरु शकणार नाही. आज कोकणातील फळे केवळ देशातच विकली जात आहेत असे नाही तर निर्यातही होत आहेत. आज कोकणचा आंबा परदेशी जात आहे, याचे मुख्य कारण श्री.शरद पवार साहेब आहेत. त्यांची काम करण्याची दृष्टी पाहिली तर तशी दृष्टी आज महाराष्ट्रातील कोणत्या नेत्याकडे असेल, असे मला वाटत नाही.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत........

सभापती महोदया, कोकणात एन्रॉन प्रकल्प त्यांनीच आणला. त्यावेळी कोकणात सर्वच्या सर्व आमदार काँग्रेस पक्षाचे होते. त्यांनी सर्व आमदारांना बोलावून घेतले. एन्रॉन प्रकल्प कोकणात झाला पाहिजे आणि तो झाला नाही तर आपल्यावर विजेचे फार मोठे संकट येईल, उद्योग बंद पडतील, आपले राज्य गेले तरी चालेल, पण एन्रॉन आला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. सत्तेची पर्वा न करता राज्यात विजेचे उत्पादन झाले पाहिजे, महाराष्ट्रातील उद्योग जगला पाहिजे, हे श्री.शरद पवार साहेबांचे धोरण होते. लोकांनी विरोध केला तरी राजकीय नेत्यांनी, आमदारांनी मदत करुन एन्रॉन प्रकल्प उभा करण्याची भूमिका घ्यावी, असे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळे एन्रॉनची पायाभरणी कोकणात झाली. परंतु, त्यानंतर राज्यात दुसऱ्या विचाराचे सरकार सत्तारुढ झाले. एन्रॉन अरबी समुद्रात बुडवू, अशी भाषा होऊ लागली. काही काळ एन्रॉन प्रकल्प बंद पडला तरी आजपर्यंत हा प्रकल्प कुणीही बुडवू शकले नाही, ही श्री.शरद पवारसाहेबांची दृष्टी आणि पुण्याई आहे.

सभापती महोदया, श्री.शरद पवार साहेबांवर अनेक वेळा टीका झाली. भूखंडाच्या बाबतीत टीका झाली, खैरनार यांनी तर ट्रकभर पुरावे देतो, असे सांगितले. परंतु, आजपर्यंत त्यांनी एकही पुरावा दिलेला नाही. मी चॅलेंज देऊन सांगतो की, कोणत्याही फाईलवर त्यांनी खराब काम केलेले नाही, अधिकाऱ्यांना डावलले नाही. ही त्यांची काम करण्याची पध्दत होती. श्री.शरद पवार यांच्या सारखे काम करुन दाखविणे आजपर्यंत कुणाला शक्य झालेले नाही. आम्ही त्यांना विचारायचो की, आपण उत्तर का देत नाही. ते सांगायचे की, आपण काही केले नाही तर उत्तर देण्याची आवश्यकता नाही. आपण या समाजासाठी काम करतो, त्यामुळे आपण आपले काम करीत राहिले पाहिजे. ते असेही सांगायचे की, शेतकरी बांधावर निघाल्यानंतर चिखल हा उडणारच आहे. त्याप्रमाणेच आपण आपले काम करीत राहिले पाहिजे, कधी तरी जनतेला कळते.

सभापती महोदया, आज श्री.शरद पवार साहेबांचे नाव राज्यात, देशात आणि परदेशातही घेतले जाते. आज श्री.शरद पवार साहेबांकडे काम करण्याची जी वृत्ती आहे, ती कोणाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माणसाकडे नाही. आपण दिल्लीला गेल्यानंतर एखाद्या नेत्याला भेटायचे असेल तर अगोदर

...3....



श्री.विजय सावंत.......

अपॉईंटमेंट घ्यावी लागते, काम काय आहे ते सांगावे लागते. एवढे करुनही साहेबांना वेळ नाही, ते बिझी आहेत, असे ऐकावे लागते. परंतु, श्री.शरद पवार साहेबांना भेटण्यासाठी अपॉईंटमेंट घ्यावी लागत नाही. त्यांच्या स्वीय सहायकांना फोन करुन विचारायचे, साहेब आहेत का, असले तर थेट त्यांची भेट मिळते. श्री.शरद पवार साहेब हे महाराष्ट्रातील एकमेव असे नेते आहेत की, ते कोणत्याही कार्यकर्त्याला, सामान्य माणसाला भेटतात. अशी माणसे मोठी असतात.

सभापती महोदया, श्री.शरद पवार साहेबांचे मित्र अनेक आहेत. त्यांची मैत्री आम्ही पाहिलेली आहे. स्व.गोपीनाथरावजी मुंडे यांनी राजकारणात त्यांना विरोध केला. परंतु, त्यांचे मैत्रीचे संबंध होते. स्व.बाळासाहेब ठाकरे साहेबांचे आणि श्री.शरद पवार साहेबांचे मैत्रीचे संबंध आपण पाहिले आहेत. श्री.मनोहर जोशी सरांची आणि त्यांची मैत्री होती. मी कोकणात त्यांच्याबरोबर अनेक वेळा फिरलो आहे.

सभापती महोदया, मी निवडणुकीला उभा राहिल्यानंतर निवडून येणार नाही, असे अनेक लोक बोलत होते. परंतु, मी श्री.पवार साहेबांना सांगितले की, मी निवडून येणार आहे. मी निवडून आलो त्यावेळी ते नागपूरला होते. परंतु, सामान्य कार्यकर्त्याने दिलेला शब्द पूर्ण केल्याबद्दल ते भेटावयास नागपूरहून आले. सामान्य माणसाच्या शब्दाची जाणीव ठेवणारा असा नेता झाला नाही. कोकणासाठी आजपर्यंत त्यांनी जे केले आहे, ते कोकणवासी विसरु शकणार नाही.

सभापती महोदया, श्री.शरद पवार साहेबांना दीर्घायुष्य लाभो आणि त्यांच्याकडून या महाराष्ट्राला, आमच्या सारख्या कार्यकर्त्यांना सतत प्रेरणा लाभत राहो, अशी प्रार्थना करतो आणि थांबतो.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदया, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त अभिष्टचिंतन प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, महाराष्ट्राचे सुपुत्र आणि भारतीय राजकारणात ज्यांनी आपले स्वत:चे वेगळे स्थान स्वकर्तुत्वाने निर्माण केले आहे, असे आदरणीय नेते श्री.शरद पवार साहेबांना मी अमृतवर्षानिमित्त अभिष्टचिंतन करतो.

सभापती महोदया, आज श्री.शरद पवार साहेबांच्या अमृत महोत्सवानिमित्ताने जो ठराव या सभागृहात मांडण्यात आलेला आहे, ही एक अनन्यसाधारण घटना आहे. फार कमी वेळा महाराष्ट्राच्या विधानपरिषदेमध्ये असे ठराव मांडण्यात आले आहेत आणि आज या प्रस्तावावरील चर्चेत सहभागी होण्याची संधी मला मिळाल्याबद्दल मला फार आनंद होत आहे.

सभापती महोदया, श्री.शरद पवार साहेबांबद्दल पहिल्यापासूनच आमच्या मनात आदराचे स्थान होते. परंतु, श्री.शरद पवार साहेबांचा अहमदनगर जिल्ह्याशी खूप जवळचा संबंध होता आणि आहे. श्री.पवार साहेब शिक्षणासाठी प्रवरा नगरला होते. ते या परिसरामध्ये वावरलेले आहेत. त्यांचे अहमदनगरशी स्नेहाचे आणि जवळकीचे नाते आहे. श्री.अण्णासाहेब शिंदे हे एक मोठे नेते, ज्यांनी देशाचे कृषी मंत्री म्हणून काम केले होते. त्यांचे आणि श्री.पवारसाहेबांचे खूप जवळकीचे संबंध होते. श्री.भाऊसाहेब थोरात हे सहकारामधील खूप मोठे नाव होते. त्यांच्याबद्दल श्री.पवार साहेबांच्या मनात खूप चांगल्या भावना होत्या. त्यांना सहकाराविषयी खूप प्रेम होते. ते बोलत असताना सांगायचे की, भाऊसाहेबांना सहकारात जे जमले ते इतरांना का जमत नाही. त्यांना खूप आपुलकी आणि जवळीक आमच्या सर्व परिवाराशी होती आणि त्यांच्याबददल खूप आदर माझ्या मनात आहे.

सभापती महोदया, श्री.शरद पवार साहेबांना निश्चितच एक धुरंदर राजकारणी म्हणून सर्व देश ओळखतो. त्यांच्या राजकारणाविषयी मी बोलणार नाही. मला त्यांच्याविषयी पहिल्यापासून एका गोष्टीचे आकर्षण आहे आणि ते म्हणजे त्यांचा असलेला पुरोगामी विचार व पुरोगामी विचारांशी त्यांची असलेली बांधिलकी. खऱ्या अर्थाने माझ्या मनामध्ये त्यांच्याविषयी असलेल्या आदराचे प्रमुख कारण हे आहे.

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर तांबे........

सभापती महोदय, श्री.शरद पवार साहेबांनी महिलांचा खूप मोठा सन्मान राखला आहे. त्यांच्या वैयक्तिक जीवनात सौ.सुप्रिया सुळे ताईंच्या नात्याने एक अपत्य आणि तीही मुलगी असताना त्यांनी महाराष्ट्राला स्वतःच्या कृतीतून एक उदाहरण घालून दिलेले आहे. यामुळे निश्चितच तरुणांसाठी मार्गदर्शक तत्वज्ञान लाभले आहे. पुढच्या काळात त्यांनी महिलांविषयी अनेक चांगले निर्णय घेतले. महिलांना राजकारणात आरक्षण दिले, वेगवेगळ्या ठिकाणी सन्मान देण्याचा विषय असो, वारसाहक्क असो, प्रत्येक बाबतीत श्री.पवार साहेब आग्रही राहिलेले आहेत.

सभापती महोदय, मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. एखादा राजकारणी एवढी मोठी रिस्क कशी घेऊ शकतो, असा प्रश्न आमच्या मनात निर्माण झाला होता. परंतु, त्यांनी ती घेतली याचे कारण त्यांची पुरोगामी विचारांशी असलेली बांधिलकी. मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर झाले पाहिजे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नांव मराठवाडा विद्यापीठाला दिले पाहिजे, यासाठी खूप धारिष्टयाने त्यांनी निर्णय घेतला आणि त्याची अंमलबजावणी देखील केली.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या पुरोगामी क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा एक आधारवड म्हणून श्री.शरद पवार साहेबांचा उल्लेख आपल्याला करावा लागेल. मी आवर्जून सांगतो की, महाराष्ट्राने देशाच्या राजकारणाला नेहमीच दिशा देणारे नेतृत्व दिलेले आहे. नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे महात्मा गांधीजींचे गुरु होते. लोकमान्य टिळकांनी "स्वराज्य हा माझा जन्मसिध्द अधिकार आहे" हे ठणकावून सांगितले आणि उभ्या देशातील जहालगटाचे नेतृत्व केले.

...JJ-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे.......

आपण बघितले की, स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांनी संपूर्ण देशात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. माननीय श्री.पवार साहेबांनी देखील संपूर्ण देशात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविलेला आहे. त्यांच्या पक्षाचे संख्याबळ किती आहे हे महत्वाचे नाही. परंतु, आज देशाच्या राजकारणात माननीय श्री.पवार साहेबांचे जे स्थान आहे ते दिशादर्शक आहे, असे मला वाटते. मी जास्त बोलून सभागृहाचा वेळ घेणार नाही. आज देशात राजकीय अस्थिरतेची परिस्थिती निर्माण झालेली आहे. आपण परवा संविधानावर चर्चा केली. आपण ज्या मूल्यांचा स्वीकार केलेला आहे, मग ते स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, समाजवादाचे मूल्य असेल. मला असे वाटते की, आज या सर्व मूल्यांची जपणूक करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. त्याबद्दल साशंकता निर्माण व्हावी अशा प्रकारचे चित्र देशात निर्माण झालेले आहे. अशा वेळी आम्हा चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना माननीय श्री.पवार साहेबांकडून खूप अपेक्षा आहेत. देशातील मूल्ये अबाधित राखण्यासाठी पुढील राजकारण असले पाहिजे, अशी भावना मी व्यक्त करतो.

सभापती महोदय, माननीय श्री.पवार साहेब खूप मोठे नेते आहेत. त्यांनी अधिक मोठे व्हावे, अशी आपणा सर्वांचीच इच्छा आहे. माननीय श्री.पवार साहेबांना उत्तम आरोग्य लाभो, त्यांचे उर्वरीत आयुष्य आनंदात जावो आणि राजकीय व इतर क्षेत्रात त्यांचा उत्कर्ष होवो, अशी भावना व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

-------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या मातीतील सुपूत्र, देशातील असंख्य शेतकरी व कामगारांवर प्रेम करणारे, त्यांच्या ह्रदयावर राज्य करणारे नेते आदरणीय श्री.शरद पवार साहेबांच्या अमृत महोत्सवानिमित्त अभिष्टचिंतनाच्या प्रस्तावावर मला बोलण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माननीय श्री.पवार साहेबांविषयी वेगवेगळे विचार मांडले आहेत. कामगार चळवळ, माथाडी कामगारांच्या चळवळी संदर्भात त्यांचे जे योगदान आहे त्याबाबत मी माझे विचार मांडणार आहे. राज्यातील विविध कामगार चळवळीमध्ये मग आमचा गिरणी कामगार, महानगरपालिकेतील सफाई कामगार, गोदीमध्ये काम करणारा मागार, बीड जिल्ह्यातील ऊस तोड कामगार असेल किंवा माथाडी कामगार असेल, चळवळीतील सर्व कामगारांचे प्रश्न सोडवून त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम आदरणीय श्री.पवार साहेबांनी केले आहे. मग ती संघटित कामगार चळवळ असो किंवा असंघटित कामगार चळवळ असो, कामगार संघटनेची मोठी युनियन असो किंवा एखादा साधरण कामगार जरी असला तरी त्याला न्याय मिळवून देण्याचे काम आदरणी श्री.पवार साहेबांनी केले आहे. पिंपरी-चिंचवड हे माननीय श्री.पवार साहेबांचे आवडते शहर आहे. या शहरातील कोणत्याही कारखान्यातील कामगारांनी वाटाघाटी यशस्वी होऊ न शकल्यामुळे संप करण्याची भूमिका घेतली तर स्वत: जातीने लक्ष घालून कामगारांचा संप मिटवून कामगारांना उद्योगपतींकडून 4 पैसे जास्त मिळवून देण्याचे काम माननीय श्री.पवार साहेबांनी केलेले आहे. माथाडी चळवळीमध्ये माननीय श्री.पवार साहेबांचे खूप मोठे योगदान आहे. स्व.यशवंतराव चव्हाण सोबांच्या नेतृत्वामुळेच माथाडी कामगार कायदा झाला. स्व.अण्णासाहेब पाटील विधान परिषदेचे सदस्य होण्यामध्ये माननीय श्री.पवार साहेबांचा खूप मोठा वाटा आहे. मी त्यावेळी लहान होतो. त्यावेळी माननीय श्री.पवार साहेब तरूण होते. माननीय श्री.पवार साहेब माथाडी कामगारांचा मेळाव्यात सहभागी होत होते, मोर्चाला सामोरे जात होते. अशी अनेक उदाहरणे आहेत. मी त्याबाबतचे फोटोग्राफ्स देखील देऊ शकतो. परंतु, माननीय श्री.पवार साहेब येथेच थांबले नाहीत. स्व.यशवंतराव चव्हाण, स्व.वसंतदादा पाटील आणि माननीय श्री.पवार साहेबांनी माथाडी चळवळीला आपले समजले आणि आज त्यांच्या प्रेमापोटीच आम्ही माथाडी चळवळीची प्रमुख मंडळी त्या ठिकाणी राहिलो.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील.........

सभापती महोदय, सन 1995 पूर्वी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती नवी मुंबई येथे स्थलांतर करण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. मुंबईतील गर्दी कमी झाली पाहिजे, मोठ्या बाजारपेठा नवी मुंबई येथे स्थलांतरीत केल्या तर मुंबईतील गर्दी कमी होईल. या बाजारपेठा नवी मुंबई येथे स्थलांतरीत होत असताना कामगारांचे, व्यापाऱ्याचे, वाहतुकदारांचे प्रश्न सुटले पाहिजेत यासाठी आम्ही माननीय श्री.पवार साहेबांशी भांडत होतो. माननीय श्री.पवार साहेबांनी मधला मार्ग काढून कामगार, व्यापारी, वाहतुकदार यांचे प्रश्न सोडविले आणि आम्ही नवी मुंबई येथे स्थलांतर केले. सन्माननीय सदस्यांची मुंबई शहरातील दंगलीचा ओझरता उल्लेख केलेला आहे. ज्यावेळी बाबरी मशिद तोडण्यात आली त्यावेळी मुंबई शहर पेटले होते. त्यावेळी मी भायखळा येथे राहत होतो. आम्ही लहान होतो. भायखळा येथील लाकूड व्यापाऱ्यांच्या दुकानांना आगी लावण्यात आल्या होत्या. मदनपुरा, मोहम्मद अली रोड येथे लोकांना फिरणे कठीण झाले होते. परिस्थिती एवढी गंभीर झाली होती की, कोण कोणत्या जातीचा आहे, कोणे कोणाला कापून टाकेल, हे सांगता येत नव्हते. त्यावेळी मुंबापुरीतील व्यापारी, माथाडी कामगार सर्व काही सोडून आपल्या गावी निघून गेले होते. आदरणीय श्री.पवार साहेबांनी त्यावेळी काही लोकांना फोन केले होते. त्यांनी रोमाची असोसिएशनचे श्री.शरद मारु, लोकल ट्रान्सपोर्ट, मुंबई शहरातून इतर ठिकाणी माल पोहोचविणाऱ्या आर.एम.टी.चे श्री.मुरलीधर पवार, माझे मोठे बंधू स्व.शिवाजीराव पाटील यांना बोलावून घेतले होते. नवी मुंबई येथे राहणाऱ्या लोकांना बोलावून घेण्यासाठी त्यांनी पोलिसांचा पिंजरा पाठविला होता, त्या पिंजऱ्याच्या मागे व पुढे पोलिसांची गाडी होती. त्यांनी दूरदर्शनवरुन कामगार, व्यापारी, वाहतुकदारांना आवाहन केले की, मुंबापुरी सुरु करावयाची आहे, लोकांना अन्न मिळाले पाहिजे, कामगार मुंबापुरीत आला पाहिजे, लोडिंग-अनलोडिंग झाले पाहिजे, लोकांना दूध मिळाले पाहिजे तरच मुंबापुरी सुरु होऊ शकते. त्यावेळी मुंबापुरी सुरु करण्यामध्ये माननीय श्री.पवार साहेबांचा सिंहाचा वाटा होता.

सभापती महोदय, माननीय श्री.पवार साहेब संरक्षण मंत्री म्हणून दिल्लीला गेले. परंतु, त्यांचे माथाडी कामगारांवरील प्रेम कधीच कमी झाले नाही. त्यावेळी स्व.सुधारराव नाईक साहेब

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील.........

राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यावेळी माथाडी कामगारांच्या घरांचा प्रश्न निर्माण झाला होता. जागतिक बँकेने कोरपखेरणे येथे आर्थिक दुर्बल घटकांसाठी घरे राखीव ठेवली होती. त्यावेळी श्री.नकूल पाटील साहेब सिडकोचे चेअरमन होते. माननीय श्री.पवार साहेबांनी त्यांना सांगितले की, माथाडी कामगार दुर्बल घटकांप्रमाणेच काबाडकष्ट करतात, तुम्ही त्यांना घरे द्यावी. माननीय श्री.पवार साहेबांच्या मदतीमुळे त्यावेळी आम्हा माथाडी कामगारांना कोपरखेरणे येथे घरे मिळाली.

सभापती महोदय, केंद्रात भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर होते. त्यावेळी माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान होते. त्यावेळी माथाडी कामगारांच्या विविध माथाडी मंडळांमध्ये इनकम टॅक्सचा प्रश्न निर्माण झाला होता. प्रॉव्हिडंट फंड आणि ग्रुज्युईटीच्या रकमेवर माथाडी मंडळांवर 280 कोटी रुपयांचा इनकम टॅक्स लावण्यात आला होता. त्यावेळी माथाडी मंडळांना टॅक्स भरावा लागला असता तर ही मंडळे बंद झाली असती. त्यावेळी आम्हाला कोणताही आशेचा किरण दिसला नाही. त्यावेळी आम्हाला एकमेव आदरणीय श्री.पवार साहेब दिसले. मी ज्यावेळी माननीय श्री.पवार साहेबांना भेटायला गेलो त्यावेळी अकाऊन्टंट श्री.विनायक जोशी, माननीय श्री.शशिकांत शिंदे आणि बोर्डाचे चेअरमन माझ्या बरोबर होते. त्यांनी आम्हाला सांगितले की, याला तात्पुरती स्थगिती मिळू शकते. परंतु, हे दुखणे कायम स्वरुपी दूर केले पाहिजे. तुम्ही याबाबत अभ्यास केला तर तुम्हाला न्याय मिळेल. त्यावेळी काही काळ माननीय श्री.जसवंत सिन्हा साहेब आणि काही काळ माननीय श्री.यशवंत सिन्हा साहेब अर्थमंत्री होते. त्यांनी माननीय श्री.पवार साहेबांच्या एका शब्दावर स्थगिती दिली आणि स्थगिती मिळाल्यानंतर माननीय श्री.पवार साहेबांनी आम्हाला बोलावून वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. त्यांनी सांगितले की, फक्त स्थगिती देऊन हे प्रश्न सुटणार नाहीत, हे प्रश्न भविष्यात उद्‌भवतील, म्हणून यावर कायम स्वरुपी तोडगा निघाला पाहिजे. त्यासाठी तुम्ही पूर्णपणे अभ्यास करा आणि नंतर आम्हाला कायद्यातून सूट मिळाली. आज माथाडी कामगार फार संतुष्ट आहे. आज आम्हाला रोटीरोटी व्यवस्थित मिळत आहे. ज्यावेळी माझे वडील वारले, त्यावेळी देखील माननीय श्री.पवार साहेब संघटनेच्या मागे उभे राहिले. ज्यावेळी स्व.शिवाजीराव पाटील वारले त्यावेळी देखील पवार साहेब संघटनेच्या आणि कामगारांच्या पाठीशी

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील.........

उभे राहिले. मी एक उदाहरण देऊ इच्छितो की, मागील शासनात आमच्या काँग्रेस पक्षाचे युवा नेते माननीय श्री.राहुलजी गांधी यांनी इतर राज्यातील एपीएमसी कायदाच बंद करावा, असे सांगितले. महाराष्ट्रात देखील तो फतवा आला. त्यावेळी आम्ही माथाडी कामगार, व्यापारी सर्व एकत्र झालो. आम्ही माननीय श्री.पवार साहेबांना सांगितले की, महाराष्ट्रात कृषी उत्पन्न बाजार समितीचा कायदा चांगल्या पद्धतीने राबविला जातो.

..2K-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील...

काही त्रुटी असतील तर त्या दूर करा. यामध्ये आमचे काही कमी करा, व्यापाऱ्यांचे काही कमी करा, परंतु शेतकऱ्यांना बाजारभाव मिळाला पाहिजे. हा कायदा रद्द केला तर हा संघटित घटक उध्दवस्त होईल. त्यावेळी पवार साहेबांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण व तत्कालीन कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांना सांगून हा कायदा रद्द करण्याचे थांबविले होते.

सभापती महोदय, हा विषय सहजासहजी संपणारा नाही, पवार साहेबांच्या इतक्या आठवणी आहेत की, मला बोलायला बराच वेळ लागेल. शेवटी जाता जाता मी एवढेच सांगतो की, पवार साहेब एवढे थोर आहेत की, आज देखील मला पवार साहेबांच्यापुढे जावयाचे असेल तर माझे हातपाय थरथर कापतात. याचे कारण असे की, राजकारणात त्यांनी इतके काम केले आहे की, आमचे जेवढे वय नाही, तेवढे त्यांचे आयुष्य राजकारणात गेले आहे. आमचे प्रश्न मांडण्या अगोदर त्यांच्या हातात त्यासंदर्भातील माहिती असते. पवार साहेब आम्हाला भेटले नाही आणि आम्ही त्यांना एसएमएस पाठविला व आमचा विषय महत्वाचा असल्यामुळे पवार साहेबांचा आम्हाला लगेच फोन येतो की, विषय काय आहे तेवढा मला सांगा.

सभापती महोदय, एक म्हण आहे, 'घार उडी आकाशी चित्त तिचे पिल्लापाशी' महाराष्ट्र व देशातील कोणत्याही काणाकोपऱ्यात पवार साहेब असतील. मुंबई किंवा नाशिकचा माथाडी कामगार, गिरणी कामगार, ऊस तोड कामगार अडचणीत आला तर पवार साहेबांचा फोन खणखणतो मग ते क्रीकेटसाठी परदेशात गेले असतील किंवा महाराष्ट्रातील कोणत्याही कोणाकोपऱ्यात असले तरी त्यांनी तो प्रश्न सोडविला आहे. पवार साहेबांच्या बाबतीत मला एक वाक्य येथे बोलावेसे वाटते. "India is powerless without the word 'Pawar', Indians would be more powerful along with 'Pawar'."

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी अतिशय चांगला विषय मांडला होता, पवार साहेब मुख्यमंत्री असताना त्यांना भेटून निधीच्या संदर्भातील त्यांनी उल्लेख केला आहे. आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री किंवा या अगोदरचे मुख्यमंत्री अशा का गोष्टी करु शकत नाहीत. आपण पवार साहेबाबाबत इतके सर्व बोलू शकतो. तत्कालील मुख्यमंत्री किंवा आताचे मुख्यमंत्री किंवा भविष्यात होणारे मुख्यमंत्री किंवा मंत्री असतील ज्यांना खरोखर दूरदृष्टी आहे,

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील...

ज्यांना महाराष्ट्राचा विकास करण्याची इच्छा असेल, पवार साहेबांविषयी बोलत असताना त्यांचा थोडासा गुण घेतला असता तर पहिल्या आठवड्यात सभागृह बंद पडले नसते. आमच्या शेतकऱ्यांना न्याय मिळाला असता. आमच्या माथाडी कामगारांच्या बैठका झाल्या असत्या. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबाबत मी आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

जयहिंद, जय महाराष्ट्र.

---------

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्याजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदया, आज माननीय श्री.शरदचंद्र पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्ता अभिष्टचिंतनाचा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, या प्रस्तावावर भाष्य करीत असताना आज दिवसभर विविध नेत्यांनी व विविध वक्त्यांनी व सन्माननीय सदस्यांनी ते कोणत्याही पक्षाचे असोत त्या सर्वांनी पवार साहेबांबाबत त्यांना आलेले अनुभव किंवा त्यांच्यासोबत ज्या बाबी शेअर केलेल्या आहेत, त्या सर्वांनी आपले अनुभव येथे विषद केले आहेत. आज ही चर्चा ऐकल्यानंतर दोन ओळीत या सर्वांचा सार सांगायचा झाला तर मला एवढेच सांगावेसे वाटेल की, "शैल्ये शैल्येन् माणिक्कम् मोक्तीकम् न गजेगजे साधोनही सर्वौत्रम् चंदनम् न वने वने " याचे तात्पर्य एवढेच आहे की, प्रत्येक पर्वत शिखरावर माणिक आढळतो असे नाही, प्रत्येक हतीच्या मस्तकामध्ये मोती असतोच असे नाही, साधूचा गणवेश धारण केलला प्रत्येक व्यक्ती साधू असतोच असे नाही. तर प्रत्येक जंगलात चंदन असतेच असे नाही. तर ते कधी कधी, कोठे कोठे दुर्मिळ असते. असेच आमचे आदरणीय श्री.शरदचंद्रजी पवार साहेब हे दुर्मिळ व्यक्तीमत्व आहे, या दुर्मिळ व्यक्तीमत्वाच्या सर्व बाबींवर येथे प्रकाश टाकण्यात आला.

सभापती महोदया, या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, मी फार छोटा माणूस आहे, आज मी आमदार म्हणून आदरणीय साहेबांच्या आर्शीवादामुळे उभा आहे, माझी व त्यांची भेट 22 जून 1998 रोजी वर्धा येथील सुरेश देशमुख साहेबांकडे झाली होती. त्यावेळी निवडणुकीचे वारे सुरु होते. त्यावेळी मी 30 वर्षाचा होतो. मुलाखत देण्यासाठी मला बोलविण्यात आले होते. साहेब कोण्या तरी ख्याजा बेगची वाट पाहत होते. मी तेथे उभा होतो, बायोडाटा पाहिल्यावर साहेबांच्या लक्षात आले की हाच तो आहे. माझ्या मनात हो,नाही असे सुरु होते. माजी मंत्री राजाभाऊ ठाकरे यांनी सांगितले की, त्याचा विचार नाही, साहेबांनी मला बोललेला पहिला शब्द असा होता की, आम्ही सांगतो तरी उभे राहावयाचे नाही काय ? मी हो,नाही अशा द्विधा मनःस्थितीत होतो. त्या वेळी मी ठीक आहे, असे म्हणालो. त्यावेळेपासून मी राष्ट्रवादी पक्षाचा कार्यकर्ता म्हणून काम करु लागलो. आयुष्यातील माझे पहिले भाषण 18 ऑगस्ट 1999 रोजी दिग्रस येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्याजा बेग...

पार्टीच्या पहिल्या सभेत झाले. मला असेही नमूद करावेसे वाटते की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन झाल्यानंतर घड्याळ या चिन्हाबाबत राष्ट्रवादीच्या पहिल्या उमेदवाराच्या पहिल्या भाषणाच्या वेळी श्री.शरद पवार साहेब आले होते हे देखील मी माझे स्वतःचे नशीब समजतो. या सर्व बाबींवर लक्ष घालित असताना राजकीय व्यक्तीकडून कधी पदे मिळतात, कधी कोणते काम मिळते. कधी पक्षाचे तिकिट मिळते. कधी आपल्या जवळच्या माणसाची कामे होतात. पवार साहेबांकडून आपल्या सर्व कार्यकर्त्यांना व जे त्यांच्याशी संबधित आहेत, त्या सर्वांना ऊर्जा मिळते. असे मला या निमित्ताने वाटते. साहेबांनी राजकीय क्षेत्रात स्वतःचे अढळपद निर्माण केले आहे. एखादा व्यक्ती पदाने मोठा होतो, साहेब ज्या पदावर गेले त्या पदाची त्यांनी गरिमा वाढवून दिली, त्या पदाला मोठे केले. एवढ्या मोठ्या माणसाचे देशातून अभिष्टचिंतन होत आहे, फक्त खंत एकाच गोष्टीची आहे की, जयललिता यांच्यामागे त्यांचा तामिळनाडू उभा असतो, ममता बॅनर्जी यांच्या मागे त्यांचा पश्चिम बंगाल उभा असतो, मायावती यांच्या मागे उत्तर प्रदेश उभा असतो. एवढ्या मोठ्या प्रगल्भ व्यक्तीमत्वाच्या मागे महाराष्ट्राने उभे राहण्याची गरज आहे. ती गोष्ट घडून येईल अशा मी शुभेच्छा देतो. साहेबांचे अभिष्टचिंतन करीत असताना 'जिंदगी में सदा मुस्कराते रहो, एक सितारा बनो, झगमगाते रहो,' मला या प्रस्तावावर बोलण्याची संधी दिली त्याबाबत मी आपले आभार मानतो. धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, आज माननीय श्री.शरदचंद्र पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्ता अभिष्टचिंतनाचा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या ठरावावर मला बोलण्याची संधी मिळते त्यामुळे मी माझे भाग्य समजते. महिलांना राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणणारा नेता कोण असेल तर ते पवार साहेब आहेत. आतापर्यंत राजकारणात अशी परिस्थिती होती की, राजकारण हे क्षेत्र फक्त पुरुषांचे आहे, महिलांचे ते क्षेत्र नाही. महिलांनी चूल आणि मूल सांभाळावे अशी वृत्ती समाजात होती. पवार साहेबांनी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण दिले. त्यामुळे ग्रामीण भागातील महिला देखील सरपंच झाली. शहरी भागात महिला महापौर व उप महापौर पदापर्यंत येऊन ऐटित मिरवू लागल्या आहेत. महिला देखील राजकारणात खूप प्रभावीपणे काम करु शकतात. हे महिलांना सिध्द करण्याची संधी मिळाली. अनेक क्षेत्रात आज महिला पुढे दिसत आहेत, पवार साहेब संरक्षण मंत्री असताना त्यावेळी आर्मीमध्ये व एअरफोर्स तरुण मुलींना संधी मिळालेली आहे. आज महिला पायलट चांगली कामगिरी बजावत आहेत, कर्तबगारी बजावित आहेत, पुरुषांच्या बरोबरीने काम करण्याची संधी पवार साहेबांनी दिली आहे. मला आजही आठवते की, महिला धोरण ठरले त्यावेळी पवार साहेब मुख्यमंत्री होते, पवार साहेबांचा 70 वा वाढदिवस होता तेव्हा मी राष्ट्रवादी कॉंग्रेसची महिला अध्यक्ष असताना महासागर नावाचे पुस्तक काढण्यात आले होते, त्यामध्ये सर्वांचे लेख समाविष्ट करण्यात आले होते.

...LL-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.....

त्यावेळी आम्ही अनेक महिला नेत्यांच्या मुलाखती घेतल्या. डॉ.रोहिणी गव्हाणकर यांच्या आठवणी सांगितल्या. मृणाल गोरे, अहिल्याताई रांगणेकर आणि आम्ही तळागाळातील काम करणाऱ्या अनेक प्रतिनिधी होतो. श्री.शरद पवार यांनी मुख्यमंत्री असताना सर्व महिलांच्या काय समस्या आहेत त्या जाणून घेण्यासाठी एक तासाची वेळ दिली होती. परंतु प्रत्यक्षात सहा तास बसून त्यांनी ग्रामीण व शहरी भागातील महिलांच्या समस्या जाणून घेतल्या. असा एकच मुख्यमंत्री आम्ही पाहिला, ज्यांनी महिलांचे प्रश्न समजून घेतले आणि महिलांनी केलेल्या सूचना उपयोगात आणून महिला धोरण तयार केले. आज श्री.शरद पवार यांना आपण सतत काम करताना बघतो. काम हेच त्यांचे ध्येय आहे. हजारो लोकांपर्यंत पोहोचायचे हीच त्यांना आसक्ती असते. असे एकही क्षेत्र नाही ज्या क्षेत्राचे त्यांना ज्ञान नाही. श्री.शरद पवार हे चालता बोलता संगणक आहेत असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. राजकारणातून समाजकारण करणारा एकमेव नेता श्री.शरद पवार आहेत. त्यांच्या आई श्रीमती शारदाबाई यांच्याकडून त्यांना समाजकारणाचे संस्कार लाभले. त्यांच्या पत्नी श्रीमती प्रतिभाताई यांची शांत, संयमी व प्रेमळ साथ त्यांना लाभली. कन्या श्रीमती सुप्रिया सुळे यांनी युवतींसाठी, महिलांच्या उध्दारासाठी राजकारणातील वाटचाल सुरु ठेवली आहे. इतकेच नव्हे तर महाराष्ट्र आणि देशातील तळागाळातील प्रत्येक महिलेला तिचा हक्क मिळवून देणारा नेता म्हणून श्री.शरद पवार यांचेच नाव घ्यावे लागेल.

सभापती महोदय, स्त्री भ्रूण हत्या देशात मोठया प्रमाणात होत असताना धर्म, जाती पाती, रुढी, परंपरा यांचे जनमानसामधील स्तोम वाढवायचे नसेल तर नेत्याचा प्रभाव लोकांवर होत असतो. आपण समाजापुढे आदर्श घालून दिला पाहिजे. मुलगा मुलगी भेद आपण मानत नाही. एक लेक सुध्दा मुलापेक्षा कर्तृत्ववान असू शकते, हे त्यांनी दाखवून दिले. गंध, टिळे, आंगठ्या यांचा राजकारणात यश मिळविण्यासाठी त्यांनी कधीही वापर केला नाही. फक्त स्वकर्तृत्व आणि देशातील नेत्यांचा आदर्श त्यांनी कायम ठेवला. 2004 साली ज्यावेळी जनता दलातून मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला, त्यावेळी स्व.आर.आर.पाटील हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष होते. वन विभागातील झोपड्यांचा प्रश्न सुटावा म्हणून श्री.शरद पवार यांची भेट घेणे आवश्यक होते. श्री.शरद पवार वरळी सी लिंकची पाहणी करुन दिल्लीला जाणार होते. एअरपोर्टवर त्यांची भेट



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.........

होऊ शकते असा निरोप मला मिळाल्यामुळे मी त्यांची एअरपोर्टवर भेट घेतली. श्री.शरद पवार यांनी लगेच पुढच्या क्षणाला ज्यावेळी मुंबईला येईल त्यावेळी वन विभागाचे मंत्री व जिल्हाधिकारी यांना बोलावून एक बैठक घेण्याचे सूचित केले आणि हा प्रश्न तातडीने सोडविण्याचा मानस व्यक्त केला. त्यानुसार त्यांनी हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. मला सांगावयास आनंद वाटतो की, वन विभागातील 12500 लोकांचे चांदिवली येथे पुनर्वसन झाले त्यामध्ये श्री.शरद पवार यांचा सिंहाचा वाटा आहे.

सभापती महोदय, मी राजकारणात येईन, आमदार होईन असे कोणी मला म्हटले असते तर मला ते खरे वाटले नसते. मी कमर्शियल आणि सिरॅमिट आर्टिस्ट होते. पार्ल्यामध्ये रहात असताना मंडल आयोगाचे राजकारण झाल्यानंतर मंदिर वही बनाएंगे हा विषय पुढे आला. गरीब कष्टकऱ्यांचे प्रश्न बाजूला फेकले जातात हे लक्षात आल्यानंतर मी पार्ल्यातील राष्ट्रवादी सेवा दलाच्या लोकांबरोबर काम करण्यास सुरुवात केली. मृणाल गोरे यांच्याशी माझी भेट झाली. 4-5 वर्षापूर्वी श्री.शरद पवार यांची भेट झाली त्यावेळी त्यांनी मृणालताई कशा आहेत अशी माझ्याकडे विचारणा केली होती. त्यावेळी ते असेही म्हणाले होते की, आपण एकदा त्यांना भेटायला जाऊ. श्री.शरद पवार साहेब खास वेळ काढून गोरेगाव येथे आले आणि त्यांनी मृणाला गोरे यांची भेट घेतली. मृणाल गोरे या विरोधी पक्षनेत्या होत्या, त्या काळातील घटनांची आठवण काढून दोघांनी बराच वेळ गप्पा मारल्या होत्या. गप्पा मारताना त्यांना कधीच वाटले नाही की, त्या विरोधी पक्षनेत्या होत्या. श्री.शरद पवार यांच्या विरोधात आम्ही अनेक आंदोलने केली. चैत्यभूमी आणि मासेमाऱ्यांच्या प्रश्नासाठी आम्ही लढत होतो. राजकारणामध्ये संधी मिळणे खूप आवश्यक असते. आम्हाला दोन वर्षे का होईना, श्री.शरद पवार साहेबांमुळे तळागाळात काम करण्याची संधी मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये अनेक तरुण नेते आपल्याला पहावयास मिळतील, ज्यांना तरुणपणी संधी मिळाली आणि त्यांनी त्या संधीचे सोने केले आहे. आजपर्यंत अनेक नेते होऊन गेले. महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी या सर्व थोर नेत्यांपासून शरद पवार साहेबांपर्यंत अनेक नेत्यांनी फक्त कर्तव्य समजून काम केले.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

जाहिरातबाजी केली नाही. सोशल मीडियाच्या माध्यमातून आजचे नेते आधी जाहिरात करायची आणि नंतर काम करायचे या पध्दतीने वाटचाल करीत आहेत. यापासून ते कायम दूर राहिले.

...3...



श्रीमती विद्या चव्हाण.........

सभापती महोदय, श्री.शरद पवार यांना यशवंतराव चव्हाण यांच्याविषयी पूर्ण आत्मियता, प्रेम आहे. त्यांना आदर्श समोर ठेवून राजकारण करीत असताना त्या वाटचालीतून त्यांना खूप शिकायला मिळाले. कृतज्ञतेची भावना ह्दयात ठेवून जयंती, पुण्यतिथीच्या निमित्ताने प्रतिष्ठित व्यक्तींचा गौरव करणारे शरद पवार साहेबांसारखे नेते दुर्मीळ आहेत. राजकारणात शतृत्व असते. परंतु वैयक्तिक जीवनात किती मित्रत्व असू शकते हे त्यांच्याकडून शिकायला मिळते. टी.व्ही.वरील चर्चा पाहता एकमेकाविषयी किती भयंकर लोक बोलतात. परंतु पवार साहेबांकडून मित्रत्वाचे नाते कसे जपले जाते हे पहावयास मिळते. स्व.आर.आर.पाटील यांना कॅन्सरचा आजार झाला त्यावेळी शरद पवार साहेबांच्या पायाला फ्रॅक्चर झाले होते. नीट चालता येत नव्हते. परंतु आर.आर.पाटील यांना दुर्धर आजार झाला असून ते शेवटच्या स्टेजला आहेत हे कळल्यामुळे तशाही परिस्थितीत ते त्यांची भेट घेण्यासाठी हॉस्पिटलमध्ये गेले होते. श्री.शरद पवार साहेब आपल्याला भेटायला हॉस्पिटलमध्ये आले आहेत हे कळल्यानंतर आर.आर.पाटील यांना गहिवरुन यायचे. आपल्याकडून काही तरी कमी राहिले, आर.आर.पाटील यांना आपण वाचवू शकलो नाही अशी खंत त्यांना वाटत होती.

सभापती महोदय, पंतप्रधान पदी बसायला मिळाले नाही याची खंत कदाचित पवार साहेबांना नसेल, परंतु संपूर्ण देशात इतक्या योग्यतेचा माणूस या पदावर बसू शकला नाही हे देशाचे दुर्भाग्य आहे असे मला वाटते. राजकारण हे पक्ष, पक्ष बळ आणि संख्या यावर आधारित असते. एक चतु:रस्त्र अनुभवी नेता, हिमायलाची उंची गाठलेला नेता, केवळ कोत्या मनोवृत्तीमुळे पंतप्रधान पदावर बसू शकला नाही याची चुटपुट लागून राहिली आहे. पंतप्रधान न होण्यामुळे देशातील तळागाळातील मध्यमवर्गीयांचे नुकसान झाले आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, मंडल आयोगाच्या अनेक आठवणी सांगण्यात आल्या. मंडल आयोगाची अंमलबजावणी देशाचे माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंह यांनी केली. त्यांच्याबरोबर काम करण्याची मला संधी मिळाली. श्री.शरद पवार साहेबांनी महाराष्ट्रामध्ये त्या मंडल आयोगाची अंमलबजावणी केली त्यांच्याबरोबर सुध्दा मला काम करण्याची संधी मिळाली, हे मी माझे भाग्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

समजते. त्याचप्रमाणे शेतीमालाच्या दर वाढीविषयी पूर्वी आम्ही लढलो, मोर्चे काढले, आंदोलने केली. शेती मालाच्या दरवाढीमुळे मध्यमवर्गीयांना त्रास सहन करावा लागतो. परंतु जेव्हा शेतकऱ्यांकडे बघायला लागलो तेव्हा शेतीमालाला भाव मिळणे योग्य आहे असे वाटू लागले.

...2एम.1.

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

डॉ.मनमोहन सिंग यांचे सरकार असताना श्री.पवार साहेबांना टोर्गेट केले जायचे की, आपण कृषी मंत्री आहात. महागाई आपल्या मुळे वाढत आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळाला पाहिजे म्हणून श्री.पवार साहेबांनी कायमच काम केले आहे. त्याचा उल्लेख येथे केला पाहिजे. दुष्काळ हा आज पडत नसून गेली चार वर्षे पडत आहे. आघाडी सरकारमधील मंत्र्यांना, आमदारांना आपापल्या मतदार संघामध्ये जाऊन पाण्याचे नियोजन कसे करायचे, टँकर कसे पुरवायचे, जनावरांसाठी चाऱ्या छावण्या कशा द्यायच्या या विषयी मार्गदर्शन करून सर्वांना कामाला लावले. यासंबंधातील श्री.पवारसाहेबांच्या अनेक आठवणी सांगता येतील. परंतु, नेहमीच आमच्यावर अन्याय होतो. सुरूवातीला जे बोलतात त्यांना व्यवस्थित मुद्दे मांडता येतात. आम्ही ज्यावेळी चांगली मांडणी करण्याचे ठरवितो त्यावेळी वारंवार बेल वाजविली जाते. श्री.पवार साहेबां सारख्या नेत्याने महिलांवर चांगले काम केले आहे. असा योग वारंवार येत नाही. कधी तरी हा दुग्धशर्करा योग येतो. संपूर्ण महाराष्ट्रातील महिलांकडून, कष्टकऱ्यांकडून, शेतकऱ्यांकडून, सर्व श्रमजीवी, दलित, मागासवर्गीय या सर्वांकडून आम्ही त्यांना खूप चांगले आयुष्य लाभो व त्यांची उत्तरोत्तर प्रगती होवो अशी इच्छा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद.

.......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या जनतेवर,, शेतकऱ्यांवर कुठल्याही प्रकारचे संकट आले तर त्या संकटाला सह्याद्रीच्या कडा करून संकटाला निर्भयपणे पळवून लावणारे द्रष्टे नेते, शेतकऱ्यांचे जीवन उंचवणारे द्रष्टे नेते, गोरगरीब, दीन-दलित, अठरा पगड जातीला स्वतः सोबत घेऊन जाणारा द्रष्टा नेता, लोकशाहीमध्ये सत्तेची सिंहासने बाजूला गेली तरी सुद्धा या महाराष्ट्रातील कोट्यवधी जनतेच्या हृदयाच्या सिंहासनावर आरूढ झाले आहेत ते आमचे मार्गदर्शक, आमचे पालक, या देशाचे नेते माननीय श्री.शरदश्चंद्र पवार साहेब यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्ताने संबंध देशभर आणि राज्यभर कृतज्ञतेचे सोहळे होत आहेत. दिल्ली येथे झालेला अभूतपूर्व सोहळा प्रत्यक्षपणे या डोळ्यांनी पाहण्याचा योग मला मिळालेला आहे. त्यामुळे त्यांच्या विषयी अवघ्या पाच मिनिटांमध्ये आपले मत व्यक्त करणे खरोखर अशक्यप्राय अशी गोष्ट आहे. शेवटी आपल्याला कुठलेही काम करताना वेळेचे नियोजन केले पाहिजे. याचे भान ठेवून आपल्यावर घंटी वाजविण्याची वेळ येणार नाही याची काळजी मी नक्की घेणार आहे. अनेकांच्या विचारांचे काहूर डोक्यामध्ये असताना, काय मांडणी करायची असे अनेक प्रश्न पडलेले असताना माननीय श्री.पवार साहेबांचे नेतृत्व या राज्याला लाभले. ही खरोखरच मराठी माणसाच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे. त्यामुळे शालेय जीवना पासून ते आज पर्यंतचा त्यांचा प्रवास कशा पद्धतीने घडला हे अनेक पुस्तकांच्या माध्यमातून उलगडला असून तो जनतेसमोर आलेला आहे. राजकारण, समाजकारण यात आपण सातत्याने वावरत असताना नेतृत्व कसे असावे, त्यातून काय शिकावे हे सर्व गुण आमच्या सारख्या सामान्य कार्यकर्त्याला श्री.पवार साहेबांमुळे शिकायला मिळाले आहेत. श्री.पवार साहेबांच्या माध्यमातून आम्हाला शिदोरी मिळण्याचे काम झाले आहे. आज इतिहासाची पाने उलगड असताना राज्यावर मोठमोठी संकेटे आली. मग कधी मुंबईतील बॉम्बस्फोट असेल, लातूर जिल्ह्यात किल्लारी येथे झालेला महाभयंकर भूकंप असेल. रात्री ज्यावेळी भूकंप झाला त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी अगदी सकाळी 7.00 वाजता मुख्यमंत्री घटनास्थळी हजर होते. मुख्यमंत्री घटनास्थळाची पाहणी करून करून गेले नाहीत तर उमरग्या सारख्या तालुक्याच्या ठिकाणी आठ दिवस ठाण मांडून

..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

बसले होते. त्यावेळी त्यांनी संपूर्ण यंत्रणा आपल्या हातामध्ये घेतली होती. असे उदाहरण कुठल्याही राज्यात कधीही घडले नव्हते. त्या भूकंपग्रस्तांना उभारी देण्याचे काम, नव्हे तर त्यांचे जीवन उभारण्याचे काम केवळ आणि केवळ कोणामुळे शक्य झाले असेल तर ते माननीय नेते श्री.शरदश्चंद्र पवार साहेबांमुळे झाले आहे हे आज देखील तेथील जनता मान्य करते.

राज्यात पावसामुळे, दुष्काळामुळे अनेक संकटे येतात. यात आमचा मराठवाडा जास्त होरपळला जातो. आमच्या मराठवाडा विभागामध्ये सलग चार वर्ष दुष्काळ आहे. विशेष करून बीड, लातूर, उस्मानाबाद येथे अतिशय कमी पाऊस पडलेला आहे. आज देखील आमच्या जिल्ह्यामध्ये तीव्र पाणी टंचाई आहे. असे असताना या शेतकऱ्याला मदत केली पाहिजे, त्यासाठी सरकारने मदत केली पाहिजे, जरी मी सत्तेवर नसलो तरी राज्य व केंद्र सरकारला सूचना करेन आणि माझ्या शेतकऱ्याला मदत करेन अशी भूमिका घेण्याचे काम माननीय श्री.शरद पवार साहेबांनी केले आहे. या वर्षीचा उन्हाळा कसा होता हे आपण अनुभवले आहे. कडक उन्हाळ्यामध्ये मराठवाड्या सारख्या भागाचा दौरा करण्याचे काम श्री.पवार साहेबांनी केले आहे. ते नुसते शहरामध्ये जाऊन आले नाहीत. वाडी-तांड्यावर, शेतावर, बांधावर जाण्याचे काम त्यांनी केले. शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकण्याचे काम त्यांनी केले आहे. शेतकऱ्यांचे सगळे प्रश्न स्वतः समजून घेतले आणि माननीय मुख्यमंत्र्यांना सह्याद्रीवर भेटून सगळी व्यथा मांडण्याचे काम केले. मला एक प्रसंग आठवतो. ज्यावेळी आमच्या मराठवाड्यातील उस्मानाबाद, बीड जिल्ह्यांमध्ये गारपीट झाली तेव्हा शेतकरी उद्ध्वस्त होण्याची शक्यता निर्माण झाली. द्राक्षासारखे खर्चिक पीक गारपीटीमुळे उद्ध्वस्त झाले. संपूर्ण बागा नेस्तनाबूत झाल्या. त्यावेळी श्री.पवार साहेब कृषी मंत्री होते. मी त्यांच्या सोबत होतो. सकाळी 7.00 वाजता आम्ही एका खेड्यात गेलो, गावामध्ये गेलो. तेथे गाडी जात नव्हती. चिखल झाला होता. दुसरा कोणी असता तर म्हणाला असता की, माघारी चला. बाकीचे लोक म्हणाले की, साहेब पुढे जाता येत नाही. साहेबांनी सांगितले की, बैलगाडी आणा. बैलगाडी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

आणल्यानंतर साहेब स्वतः त्यात बसले आणि उद्ध्वस्त झालेल्या बागेत जाऊन त्या शेतकऱ्याला धीर देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. असे महाराष्ट्रात केवळ श्री.शरदश्चंद्र पवार हेच करू शकतात. ते खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे पोशिंदा आहेत. सत्ता हातामध्ये आल्यानंतर सत्तेचे सोने जनतेसाठी झाले पाहिजे, लोकांसाठी झाले पाहिजे असा विचार सातत्याने ज्याने कोणी केला असेल तर ते माननीय नेते श्री.शरश्चंद्र पवार यांनी केला आहे. केंद्रामध्ये मंत्री पद घेताना कुठलेही महत्त्वाचे खाते मागता आले असते. ते संरक्षण मंत्री होते. त्यांचे इमान काळ्या मातीशी असल्यामुळे त्याला न्याय देण्याचा प्रयत्न त्यांनी कृषी खात्याच्या माध्यमातून केला आहे. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर न भूतो न भविष्य असा मोठा निर्णय व हिंमत कोणी केली नव्हती ती हिंमत माननीय श्री.शरदश्चंद्र पवार यांनी केली आहे. त्यांनी 71 हजार कोटी रूपयांची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला याचा सार्थ अभिमान आहे. शेतीमध्ये, सांस्कृतिक, साहित्यिक अशा सर्व क्षेत्रांमध्ये सर्वदूर सर्वमान्य नेतृत्व कोणी केले असेल तर ते श्री.शरदश्चंद्र पवार साहेबांनी केले आहे. पूर्वी मराठवाड्यामध्ये एकच विद्यापीठ होते. आता दोन विद्यापीठे झाली आहेत. मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करताना परिस्थिती अतिशय गंभीर झाली होती. सगळ्याचा त्यास विरोधी होता. त्यावेळी मोठी दंगल झाली होती. त्यावेळी सत्ता जाईल असे देखील सांगितल होते. शेवटी सत्ता गेली. परंतु, ज्या विचारांशी आपण नाळ जोडली आहे त्या विचारांपासून दूर जाण्याचे काम श्री.पवार साहेबांनी कधीच केले नाही. त्यावेळी मराठवाड्याचे नाव बदलण्याचा क्रातिकारक निर्णय श्री.शरदश्चंद्र पवार साहेबांनी घेतला होता.

NN-1......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे......

माननीय पवार साहेबांचे नेतृत्व आपल्या राज्याला लाभले ते खऱ्या अर्थाने आपल्या राज्याचे भाग्य आहे. माझ्या या महान नेत्याला 100 वर्षाचे दीर्घ आयुष्य मिळावे, त्यांचा 100 वा वाढदिवस साजरा व्हावा अशी प्रार्थना मी आई तुळजा भवानीच्या चरणी करतो. या 100 वा दिवसाचा योग आम्हाला डोळयाने पाहता यावा यासाठी आमच्या मतदारांनी आम्हाला आमदार म्हणून ठेवावे अशी प्रार्थना मी या निमित्ताने करतो. मी पवार साहेबांना अमृत महोत्सवाच्या अभीष्टचिंतनाच्या निमित्ताने माझ्या मराठवाडयातील तमाम शिक्षक कर्मचाऱ्यांच्या वतीने मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच या देशाचे नेते आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी राज्याला आणि देशाला जे योगदान दिले त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो, त्याच बरोबर त्यांना दीर्घायुष्य लाभो अशा प्रकारची प्राथना आणि अभिष्टचिंतन करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी पवार साहेबांचे योगदान त्यांचे अनुभव यासंदर्भात विचार व्यक्त केले आहेत. 2-5 मिनिटात पवार साहेबांच्या संदर्भात कृतज्ञता व्यक्त करणे, त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विश्लेषण करणे अवघड आहे. मी एवढेच सांगतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मोठया माणसाची चर्चा "गांधीजी आणि रानडे" या पुस्तकात केलेली आहे. त्यांनी सांगितले होते की, एखादा माणूस मोठा का आहे याबाबत डॉ.बाबासाहेब सांगतात की, मोठया व्यक्तिमत्वाकडे पाहिल्यानंतर पहिल्यांदा तो अतिशय बुद्धिमान माणूस असतो तसेच तो अतिशय प्रामाणिक सुध्दा असतो. जगातील अनेक व्यक्तिमत्वांचे विश्लेषण करुन त्यांनी हे अनुमान काढलेले आहे. मोठा माणूस घडण्यासाठी त्या माणसाकडे प्रखर बुद्धिमत्ता असली पाहिजे आणि तो अतिशय प्रामाणिक असला पाहिजे. त्याची अभ्यास करण्याची प्रवृत्ती असली पाहिजे. त्यांनी असे म्हटले आहे की, "Great man one who is motivated by the dynamic of social purpose." माणूस केवळ बुध्दामान असून चालत नाही. माणूस बुद्धिमान असेल व तो प्रामाणिक नसेल तर त्याच्या हातून काही होऊ शकत नाही. किंवा एखादा माणूस खूप प्रामाणिक आहे परंतु तो बुद्धिमान नसेल तर त्याच्याही हातून काही होऊ शकत नाही. त्यामुळे माणूस प्रामाणिक आणि बुद्धिमान सुध्दा असला पाहिजे तसेच त्याच्याकडे सोशल परपज बद्दल वेगळे वैशिष्ट्य असले पाहिजे. He should be motivated by the social purpose, dynamic of social purpose. तो समाजाच्या प्रश्नाबद्दल मोटीव्हेटेड असला पाहिजे. जेव्हा आपण अशा पध्दतीने पवार साहेबांच्या व्यक्तिमत्वाकडे पाहतो तेव्हा असे लक्षात येते की, शेतकऱ्यांचे प्रश्न असतील, दलितांचे प्रश्न असतील, महिलांचे प्रश्न असतील या सर्व प्रश्नांकडे पाहताना पवार साहेब मोटीव्हेटेड असतात. सर्व प्रश्नांबद्दल त्यांची एक भूमिका असते ती म्हणजे फुले,शाहू आणि आंबेडकरवादी. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या भूमिकेचे ते समर्थन करीत असतात. स्त्रियांना समानतेचे मूल्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेने दिलेले आहे. स्त्रिया कोणत्याही धर्माच्या असल्या त्यांना समान हक्क दिले पाहिजे. राजकारणात स्त्रियांना समान मूल्य आहे परंतु

...3....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड ......

राजकारणात समान वाटा मिळत नव्हता म्हणून पवार साहेबांनी महिलांसाठी राखीव जागा निर्माण केल्या व ही गोष्ट डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराच्या सिद्धान्ताची आहे. ज्योतिबा फुले यांच्या शिक्षणाबद्दल किंवा शाहू महाराजांनी दिलेल्या राखीव जागेच्या संदर्भात असेल, पवार साहेब नेहमी तात्त्विक विचार करीत असतात. पवार साहेब हे या देशातील सर्वात मोठे परिवर्तनवादी आहेत, सक्रीय परिवर्तनवादी आहेत, प्रत्यक्ष कृतिशील परिवर्तनवादी आहेत. मी त्यांची येथे केवळ स्तुती करतो असे नाही. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी पवार साहेबांच्या संदर्भात आपापले अनुभव सांगितले आहेत. माझ्याकडे त्यांच्या संदर्भात हृदयस्पर्शी अनुभव आहेत. परंतु त्यावर वेळ न घालविता मी असे विश्लेषण करतो की, माननीय पवार साहेब या शतकातील, या देशातील सर्वात ज्येष्ठ ग्रेट मॅन असून ते आपल्या महाराष्ट्राचे भूमिपुत्र आहेत. ते केवळ शेतकऱ्यांचेच नाही तर सामान्य, गरीब, दलित, भटक्या आणि विमुक्तांचा तसेच अल्पसंख्यांकाचाही विचार करतात. असा हा थोर माणूस आपल्याला लाभलेला आहे. त्यांना 100 वर्षाहून अधिक आयुष्य लाभो अशी प्रार्थना करुन, अभिष्ट चिंतन करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

-----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आनंद ठाकूर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आमचे प्रेरणास्थान व राष्ट्रीय नेते आदरणीय शरद पवार साहेबांच्या अभिष्टचिंतन प्रस्तावावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. खरे म्हणजे मी आज जो उभा आहे तो पवार साहेबांमुळेच आहे. मी आदिवासी भागाचे प्रतिनिधीत्व करतो. आमच्याकडे सरपंच देखील आदिवासी माणूसच निवडून येऊ शकतो. आमदार खासदार सुध्दा आदिवासी समाजाचे निवडून येऊ शकतात. साहेबांचे माझ्याकडे लक्ष गेल्यामुळेच मी या ठिकाणी प्रस्तावावर बोलत आहे.

सभापती महोदय, माननीय पवार साहेबांच्या संदर्भात ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या आठवणी, माहिती, आणि त्यांच्या कर्तृत्वाबद्दल विचार मांडले आहेत. त्यांच्या संदर्भातील पालघर जिल्हयाच्या संदर्भातील दोन तीनच आठवणी सांगणार आहे.

सभापती महोदय, सन 2002 मध्ये पालघर जिल्हयात चिकूवर रोग आला होता हा रोग चिकूच्या फळातील गर खात असे. आमच्या भागातील चिकूच्या रोगाच्या संदर्भातील माहिती साहेबांनी दिल्लीमध्ये ऐकली. साहेबांना या रोगाच्या संदर्भात माझ्याशी बोलावयाचे असल्यामुळे फोन करण्यास सांगितले. साहेबांनी सांगितले की, तुझ्या भागातील चिकूवर असा असा रोग आलेला असून त्याची माहिती मला मिळाली आहे. त्यांचा सरीगाम येथे कार्यक्रम असल्यामुळे ते डहाणूला येणार होते व त्यावेळेस ते स्वत: चिकूच्या बागेची पाहणी करणार होते. आम्ही सकाळी 8 वाजता जवळच्या बागेत गेलो, साहेबांनी काही सँपल घेतले आणि ते सँपल दापोली कृषी विद्यापीठात आणि इस्त्रायलला पाठविले. त्यानंतर या रोगावर कशाप्रकारे मात करावी यासंदर्भात आमच्या शेतकऱ्यांना माहिती मिळू शकली. या गोष्टीची कोठेही चर्चा झाली नाही. परंतु त्यांनी तात्काळ माहिती घेऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नामध्ये लक्ष घातले.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे साहेबांनी सांगितले की, ते जेव्हा पक्षात सामील होण्यासाठी गेले तेव्हा साहेबांनी त्यांना कशा प्रकारे मार्गदर्शन केले याची माहिती दिली. पहिल्यांदा कुटुंब बघा व नंतर निर्णय घ्या.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी आहे की, एक मोठी व्यक्ती माझ्या माध्यमातून साहेबांना भेटावयास गेली. या व्यक्तीचे त्यांच्या क्षेत्रात मोठे नाव होते. त्या व्यक्तीने साहेबांना पक्षात येण्याविषयी भावना बोलून दाखवली. तेव्हा साहेबांनी त्यांना विचारले की, तुम्हाला आमच्या

...5....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आनंद ठाकूर ......

पक्षात यावयाचे आहे तर तुम्हाला आमच्या पक्षाकडून काय पाहिजे. त्या व्यक्तीने सांगितले की, मला राष्ट्रीय पातळीवर काम करावयाचे आहे. तेव्हा साहेबांनी त्यांना सांगितले की, तुम्ही आता ज्या क्षेत्रात काम करीत आहात त्या क्षेत्रात तुम्ही उंचीवर गेला आहात, तुमचे क्षेत्र सोडून तुम्ही येथे येण्याचे कष्ट घेऊ नका. तुमच्या क्षेत्रात तुम्ही अजून काही वर्षे काम करु शकता, आपले करिअर सांभाळा तुम्हाला आमच्या पक्षात सहजा सहजी संधी मिळणार नाही.

XX-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री.आनंद ठाकूर......

एक-दोन राष्ट्रीय पक्षांची नावे सांगून त्याठिकाणी प्रयत्न करण्यास सांगितले. त्या उपरही आपणास आमच्या पक्षात यावे असे वाटत असेल तर तुम्ही जरुर या. त्या व्यक्तीने मला बाहेर आल्यावर सांगितले की, इतका स्पष्ट आणि स्वच्छ सल्ला देणारे नेतृत्व मी पहिल्यांदा पाहत आहे. त्या व्यक्तीला नंतर संधी मिळाली आणि आज ते सत्ताधारी पक्षामध्ये केंद्रात फार मोठ्या पदावर आहेत. साहेबांची एक स्वच्छ आणि स्पष्टपणे बोलण्याची कार्यपद्धती माझ्यासारख्या कार्यकर्त्याला पहावयास मिळाली.

सभापती महोदय, मी आपणास आणखी एक गोष्ट सांगतो. आमच्या भागात कम्युनिष्ट पक्षाचे माजी खासदार व माजी आमदार श्री.लशीकोम आहेत. आम्ही त्यांना भेटायला गेलो होतो. त्यावेळी माझ्यासोबत त्यावेळचे खासदार श्री.संजीव नाईक होते. आम्ही त्यांच्या संस्थेमध्ये गेलो. त्यांची मोठी शैक्षणिक संस्था आहे. त्यांचे कॉलेज आणि शाळा आहेत. आम्ही त्यांना भेटल्यानंतर त्यांनी आम्हाला सांगितले की, माझी ही संस्था श्री.शरद पवार साहेबांमुळे आहे. मी ज्यावेळी आमदार होतो त्यावेळी साहेबांनी मला बोलावून सांगितले की, "आपला संपूर्ण भाग आदिवासी आहे त्या भागामध्ये शैक्षणिक संस्था उभी करा." मी त्यांना सांगितले की, "माझ्याकडे इतके इन्स्फ्रास्ट्रक्चर नाही, पैसा नाही." साहेबांनी मला आर्थिक मदत मिळवून दिली शिवाय संस्था उभी करुन त्यास मान्यता मिळवून दिली. एवढेच नव्हे तर त्यांना दोन वर्षानंतर इमारतीसाठी पैसे कमी पडले त्यावेळी देखील साहेबांनी त्यांना मदत केली. विरोधी पक्षाचा आमदार असतानाही साहेबांनी त्यांना मदत केली. कारण आदिवासी भागाची सेवा व्हावी म्हणून साहेबांनी स्वतः पुढाकार घेऊन मदत केली. आमचा त्यांच्याशी पक्षाच्या माध्यमातून नेहमीच संघर्ष होत राहिलेला आहे. परंतु त्यांनी साहेबांबद्दलचा आदर आम्हाला बोलून दाखविला. साहेबांबद्दल आणखी बरेच काही बोलता येईल.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आदरणीय श्री.शरद पवार साहेबांबद्दल त्यांच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. साहेबांनी 100 वर्षे जगावे, त्यांच्याकडून देशाची सेवा व्हावी आणि त्यासाठी त्यांना निरामय आयुरारोग्य लाभो अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आनंद ठाकूर......

करतो. साहेबांकडून आणखी मोठमोठी कामे व्हावीत ज्याचा महाराष्ट्र राज्यातील लोकांना अभिमान वाटेल. कारण अमृत महोत्सवी वर्षामध्ये देखील त्यांचे कामाकडे लक्ष लागलेले आहे. सर्वसामान्य माणसाकडे लागलेले आहे. ते प्रॅक्टीकल नेते आहेत. या सर्व गोष्टींचा चांगल्या प्रकारे कसा उपयोग होईल हे पाहणारे ते नेते आहेत. त्यांनी सर्व जनतेला आणि कार्यकर्त्यांना आवाहन केले की, मी तुमच्या सर्वांचा आग्रह मान्य केला. आपण माझ्या सत्काराचे कार्यक्रम केले त्या कार्यक्रमाला मी हजर राहिलो. पण पुढच्या काळामध्ये आपण सर्वांनी महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील जनतेसाठी अहोरात्र काम करु या आणि महाराष्ट्रात त्यांचे उदाहरण घालून देऊ या. अशा पद्धत्‍ीने दूरदृष्टी ठेवून काम करणाऱ्या या नेतृत्वाला मी सलाम करतो आणि त्यांचे अभिष्टचिंतन करुन माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेल ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री.एकनाथराव खडसे यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त अभिष्टचिंतनपर प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आदरणीय श्री.शरद पवार साहेबांच्या आजच्या दिवसाचा हा विशेष ठराव आणि त्या निमित्ताने आपण दुपारपासून सुरु केलेल्या चर्चेच्या शेवटाकडे आलेलो आहोत. आपण मला थोडासा वेळ दिला त्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, बहुतांश वक्त्यांनी श्री.शरद पवार साहेबांचे मोठेपण, त्यांचे कृषी क्षेत्रातील काम, नामांतराचे काम, बॉम्बस्फोटातील काम, भूकंपातील काम या गोष्टींबद्दल बरेच विस्ताराने सांगितलेले आहे. मी माझ्यापुरता सीमित करु इच्छितो की, आजच्या या प्रसंगी विधिमंडळातील शरद पवार ही जी कारकीर्द आपल्यासमोर उभी आहे. या कारकीर्दीचे थोडेसे निरीक्षण आहे, त्या संदर्भात मी आपणाशी बोलू इच्छितो.

सभापती महोदय, गेल्या अनेक वर्षापासून मी त्यांचा एक कार्यकर्ता म्हणून त्यांच्या सोबत खूप जवळून काम करीत आहे. मी सर्व प्रक्रियेमध्ये खूप जवळून असतो. परंतु त्याही पलीकडे प्रत्येक भ्ेटीनंतर असे वाटते की, आपल्याला अजून काही समजून घ्यायचे आहे. अजून काही तरी राहिलेले आहे. आपल्याला त्यातून काही तरी शिकण्यासारखे आहे.

सभापती महोदय, 1967 साली सर्वप्रथम या सभागृहात आदरणीय श्री.शरद पवार साहेबांचा अगदी तरुण वयात प्रवेश झाला. कॉलेजच्या जीवनापासून राजकीय पक्षात म्हणजे काँग्रेसमध्ये संघटनात्मक काम सुरु केले. काँग्रेस पक्षाची जडणघडण खूप वेगळी होती. आपण काँग्रेसची संस्कृती हा भाग जो पाहतो तो खूप वेगळा होता. त्यांना पक्षामध्ये काम करताना काँग्रेसमधील खऱ्या संस्कृतीचा परिचय झालेला होता. ती निरीक्षणे त्यांनी आपल्या कथनामध्ये नमूद केलेली आहेत. त्यातील एक भाग मी येथे वाचून दाखवितो. साधी माणसे कशी असतात, ती साहेबांनी पाहिली. ज्यांच्यामुळे त्यांना काँग्रेस संस्कृती आणि काँग्रेस संघटन समजले. ते आपल्या पुस्तकात लिहितात की, "काही माणसांचा साधेपणा डोळे दिपवून टाकणारा असतो. साधेपणा आणि



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले........

प्रामाणिकपणा हे अलंकार मानले तर आसामचे माजी मुख्यमंत्री श्री.शरदचंद्र सिंन्हा यांच्या व्यक्तीमत्वाची ती जन्मजात शोभिवंत कवचकुंडले होती. उक्तीप्रमाणे कृती आणि वर्तन असणाऱ्या अत्यंत मोजक्या राजकीय व्यक्तीमत्वांपैकी शरदबाबू एक होते. त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मला मिळाली, हे माझे भाग्य होते. श्री.शरदचंद्र सिन्हा यांच्या बाबतीतला एक प्रसंग आणि कॉंग्रेस संस्कृतीचे महत्व सांगणारा प्रसंग साहेबांनी उदधृत केलेला आहे. कॉंग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन मुंबईत होते. आझाद मैदानावर देशाभरातून येणाऱ्या प्रतिनिधींची व्यवस्था करण्याच्या कामात पवारसाहेब आणि त्यांचे सहकारी होते. त्यावेळेचे व्ही.टी.स्थानक म्हणजे आताचे छत्रपती शिवाजी टर्मिनस येथून एक उंच आणि सडपातळ व्यक्ती एका हातात बॅग आणि डोक्यावर वळकटी घेऊन चालत येत होती. ती व्यक्त्ी आमच्यासमोर येऊन उभी राहिली. सुरुवातीला कोण आहे हे समजले नाही. पण नंतर अचानक लक्षात आले आणि मला आश्चर्याचा धक्का बसला की, ते शरदचंद्र सिन्हा होते. त्यावेळी ते आसामचे मुख्यमंत्री होते. मुख्यमंत्री असलेला हा माणूस बॅग आणि वळकटी स्वत: उचलून आला होता. इतकेच नव्हे तर गुहावाटीवरुन थर्ड क्लासच्या डब्यातून 72 तासांचा प्रवास करुन ते आले होते. पक्षाच्या अधिवेशनाला जाताना सरकारचा एक पैसाही खर्च होता कामा नये असे पक्षाचे धोरण होते. दुसरे म्हणजे विमानाने किंवा रेल्वेच्या फर्स्ट क्लासने प्रवास करण्याइतपत पैसे त्यांच्याजवळ नव्हते. स्वत:च्या खिशाला परवडेल इतक्या पैशात जसा प्रवास करता येईल तो त्यांनी स्वीकारला होता. साधेपणा आणि सात्विक प्रवृत्तीचे दर्शनच शरदचंद्र सिन्हांनी आम्हाला घडविले. श्री.शरद पवार साहेबांमध्ये हे सगळे गुण कुठून येतात याचा शोध घेण्याचा आपण प्रयत्न करतो त्यावेळी आपल्या लक्षात येते की, अशा अनेक व्यक्तींच्या बाबतीत पवार साहेबांनी आपल्या आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यावर जे जे लोक भेटले मग त्यामध्ये एस.एम.जोशी असतील, पुलोदला पुढे नेणारे नेते असतील, अशा सर्वांचा आर्दश त्यांनी त्यावेळेपासून घेतलेला होता.

सभापती महोदय, ज्यावेळी ते पहिल्यांदा आमदार झाले आणि पक्ष संघटनेचे काम करीत होते. त्यावेळी पवार साहेबांनी आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेबांना एक पत्र लिहिले होते. आपण सर्वांनी त्याचा उल्लेख केलेला आहे. ते यशवंतराव चव्हाण साहेबांचे शिष्योत्तम होते.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

यशवंतराव चव्हाण साहेबांकडून त्यांना सर्व शिक्षण मिळाले. दिनांक 31 मार्च, 1969 म्हणजे आमदारकी मिळाल्यानंतरच्या पहिल्या दोन वर्षात त्यांनी लिहिलेले पत्र आहे. त्यांनी एका तरुण कार्यकत्या्ची घुसमट आपल्या नेत्यासमोर मांडताना म्हटले होते की, "राजकीय क्षेत्रामध्ये माझ्यासारख्या नवीन कार्यकर्त्यांची अवस्था मोठी विचित्र झालेली आहे. देशातील एकंदर राजकीय परिस्थिती, काँग्रेसची दिवसेंदिवस होणारी पडझड तिचा यत्किचिंतही परिणाम न होणारी अथवा न करुन घेणारी पक्षाची हायकमांड, यामुळे चिंता वाटते, मन अत्यंत अस्वस्थ होत आहे आणि काही प्रमाणात नैराश्य येऊ लागले आहे. तरुण पिढीला, नवीन सुशिक्षित पिढीला आकृष्ट होण्यासाठी थोडेसे सुद्धा अनुकूल वातावरण नाही." शेवटी ते असे म्हणतात की, "जे जे माझ्या मनामध्ये आले ते तुमच्यापर्यंत अस्वस्थता कळवावयाची होती." आपल्या नेत्याबरोबर मुक्त संवाद करण्याची त्यांची चांगली हातोटी होती. त्यांनी पुढे लिहिलेले की, "मनात असलेले विचार प्रश्न आपण आमचे नेते असल्याने व मनातील भावना कुठेतरी मांडणे आवश्यक आहे. त्यासाठी नेतृत्व विचारी यावे व या दृष्टीने फक्त आपणच समरस होऊ शकता म्हणून आपणास त्रास देत आहे."

........ 2P-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

एक कार्यकर्ता म्हणून माननीय श्री.शरद पवार साहेबांची ही भावना, देशाच्या सर्वोच्च नेत्यापर्यंत पोहचण्याची जी परंपरा होती, जी गुरुकडून घेतलेली विद्या होती, ती अव्याहतपणे वयाच्या 75 व्या वर्षी सुध्दा अखंडपणे जपणारा आणि म्हणूनच लोकांच्या ह्रदयात स्थान मिळविणारा हा एक मोठा नेता आहे. केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे तर सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात सुध्दा मोठ्या प्रमाणावर काम करणारा लोकोत्तर नेता आपल्या सर्वांना बघायला आणि काम करताना दिसतो.

सभापती महोदय, 1967 साली माननीय श्री.शरद पवार साहेबांचा विधिमंडळात प्रवेश झाला. त्यापूर्वी त्यांनी मुंबई फारशी बघितली नव्हती. बारामतीवरुन एखादा शेतकरी ट्रकने ज्यावेळी मुंबईत भाजीपाला विकण्यासाठी यायचा त्यावेळी तो माननीय श्री.शरद पवार साहेबांना सोबत घेऊन मुंबईत यायचा. त्यानंतर त्यांना कॉलेज जीवनात मुंबई बघाविशी वाटली. त्यांचा वर्ग मित्र असलेल्या धनाजी जाधव या मित्राच्या नातेवाईकाच्या सहकार्याने माननीय श्री.शरद पवार साहेब मुंबईत आले. ती मुले मुंबईत आली असताना त्यांना विचारण्यात आले की, तुम्ही मुंबईत कशासाठी येत आहात ? माननीय श्री.पवार साहेब म्हणाले की, मला तीन गोष्टी बघायच्या आहेत. पहिली म्हणजे मला मुंबईची ट्राम बघायची आहे, दुसरी मुंबईचा समुद्र किनारा बघायचा आहे. कारण इतक्या मोठ्या प्रमाणावर पाणी आम्ही गावाकडे कधी बघितलेच नाही. तसेच तिसरी गोष्ट म्हणजे सांताक्रुझ येथील विमानतळावर जाऊन हवेत उडणारी विमाने बघायची आहेत. यावर नातेवाईकांनी त्यांना विचारले की, आपल्याला या तीनच गोष्टी बघायच्या काय ? त्यावर ते 'नाही' म्हणाले. त्यावेळी श्री.पवार साहेबांनी संघटनेच्या कामाला सुरुवात केली होती. त्यांनी सांगितले की, मला मुंबईतील विधिमंडळ बघायचे आहे. लोकप्रतिनिधी ज्या ठिकाणी काम करतात ते मला बघायचे आहे. त्यानंतर त्यांनी विधिमंडळ गॅलरीची पास मिळविली. माननीय श्री.शरद पवार साहेब हे विधिमंडळाच्या प्रेक्षक गॅलरित येऊन बसले. त्यावेळी सभागृहात प्र.के.अत्रे, एसेम जोशी यांच्यासारखे अनेक अभ्यासू सदस्य सत्ताधारी आणि विरोधी बाकावर असायचे. त्यावेळी श्री.शरद पवार नावाचा एक तरुण कार्यकर्ता प्रेक्षक गॅलरित येऊन सभागृहाचे कामकाज बघतो. सुरक्षा रक्षकाचे गॅलरितील प्रेक्षकांकडे लक्ष असते. कामकाज बघत असताना शरद पवार नावाचा तरुण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

आपला एक पाय सहजपणे दुसऱ्या पायावर घेतो. तितक्यात सुरक्षा रक्षक येऊन त्यांना सांगतो की, या ठिकाणी शिस्त आहे, येथे बसल्यानंतर पायावर पाय घ्यायचा नाही. तुम्ही अगोदर पायावर ठेवलेला पाय खाली घ्यावा. तो तरुण आपला पाय खाली घेतो. परंतु तो तरुण जसजसे भाषण ऐकतो तसतसा तल्लीन होऊन आपला दुसरा पाय पुन्हा पायावर घेतो. सुरक्षा रक्षक पुन्हा येऊन त्यांना पाय खाली घेण्यास सांगतो. सुरक्षा रक्षक त्यांना सांगतो की, आता तुम्ही पुन्हा पाय वर घेतल्यास तुम्हाला बाहेर काढून देईन. श्री.शरद पवार आपला पाय पुन्हा खाली घेतात. परंतु ते जेव्हा तिसऱ्यांदा पायावर पाय ठेवतात त्यावेळी सुरक्षा रक्षक त्यांच्याजवळ येतो आणि त्यांचा हात धरून त्यांना गॅलरितून बाहेर काढतो. त्यावेळी श्री.शरद पवार साहेब गमतीने म्हणतात की, "आमदार होण्याच्या आधी हकालपट्टी होण्याचा पहिला प्रसंग माझा विधिमंडळात अशाप्रकारे घडला आणि त्याच दिवशी मी ठरविले की, जेव्हा केव्हा या सभागृहात येईल तेव्हा लोकप्रतिनिधी म्हणूनच येईल, जेणेकरुन मला कोणीही बाहेर काढू शकणार नाही."

सभापती महोदय, त्यानंतर माननीय श्री.शरद पवार साहेबांचा विधिमंडळात 1967 मध्ये प्रवेश झाला. माननीय श्री.शरद पवार साहेब त्यावेळी आमदार झाले. अनेक सन्माननीय सदस्यांनी माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या अनेक क्षेत्राबद्दल सांगितले. माननीय श्री.शरद पवार साहेबांनी विधिमंडळ सभागृहात 1967 मध्ये आमदार म्हणून ज्या विषयावर पहिले भाषण केले होते त्याच विषयावर त्यांनी केंद्रीय कृषी मंत्री पदाचा कार्यभार सोडताना 2014 मध्ये भाषण केले. सभागृहातील त्यांच्या पहिल्या आणि शेवटच्या भाषणाचा विषय हा कृषी आणि सहकार होता. त्यांनी 1967 मध्ये जी सुरुवात केली तीच सुरुवात 2014 पर्यंत, किंबहुना आजपर्यंत अव्याहतपणे सुरु आहे.

सभापती महोदय, स्व.वसंतराव नाईक यांचे मंत्रिमंडळ आल्यानंतर माननीय श्री.शरद पवार साहेबांना पहिल्यांदा राज्यमंत्री पद देण्यात आले. त्यांना गृह राज्यमंत्री करण्यात आले. याशिवाय त्यांच्याकडे माननीय मुख्यमंत्र्यांची इतरही खाती सोपविण्यात आली. अशा परिस्थितीत त्यांनी काय केले ? त्यांनी सर्वप्रथम पोलीस विभागामध्ये एक बदल केला. त्यांनी पोलिसांना हाफपँट मधून फुलपँटमध्ये आणले. एकप्रकारे पोलिसांना सन्मान देण्याचे काम कोणी केले असेल तर गृह

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

राज्यमंत्री म्हणून आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी केले. त्यांनी अतिशय चांगल्याप्रकारे हा निर्णय घेतला. त्यानंतर ते कॅबिनेट मंत्री झाले. त्यांच्याकडे शिक्षण विभागाचा कारभार देण्यात आला. त्यानंतर त्यांच्याकडे कृषी विभागाचा कारभार देण्यात आला. माननीय श्री.पवार साहेबांकडे कृषी मंत्री पदाचा कार्यभार सोपविल्यानंतर त्यांनी वार्ताहरांसाठी टिप्पणी लिहिली की, सुरुवातीला माझ्या हातामध्ये लाठी दिली. म्हणजे 'दंडुका' दिला. नंतर शिक्षण विभागाचा कारभार सोपविण्यात आला. म्हणजे दुसऱ्या वेळी माझ्या हातात 'छडी' दिली आणि तिसऱ्यांदा माझ्याकडे कृषी विभागाचा कारभार सोपवून माझ्या हातामध्ये 'नांगर' देण्यात आला. तो नांगर खांद्यावर घेतलेला बळीराजाचा सेवक आजही ही पायवाट तुडवत तुडवत पुढे निघाला आहे.

सभापती महोदय, आपल्या राज्यात अधिवेशनाची सुरुवात 'वंदे मातरम्' या गीताच्या समूह गायनाने होते. कोणी सांगू शकेल काय, की ही सुरुवात कोणी केली ? मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, कामगार सल्लागार समितीमध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या केशवराव धोंडगे यांनी या विषयी सूचना मांडली होती. त्यावेळी सत्तेत काँग्रेस पक्षाचे सरकार होते. दि.9/8/1990 रोजी अधिवेशनाची सुरुवात 'वंदे मातरम्' या गीताच्या समूह गायनाने झाली. सभापती महोदय, परंपरा निर्माण करावयाच्या असतात, इतिहास घडवायचा असतो, निर्णय घ्यावयाचे असतात, धडाडी दाखवायची असते, कर्तृत्व सिध्द करावयाचे असते. या गोष्टी कशामुळे येतात, तर कायम लोकांमध्ये राहिल्यामुळे येतात. या गोष्टींमुळेच त्यांना या सर्व गोष्टींची परंपरा होती, त्याचा फार मोठा अभिमान होता.

सभापती महोदय, या सभागृहात दिनांक 12 डिसेंबर, 1990 रोजी सभागृहाचे कामकाज सुरु होते. माननीय श्री.शरद पवार साहेब हे मुख्यमंत्री होते. त्यांचे मुख्यमंत्री म्हणून अभिनंदन करण्याचा ठराव सभागृहात चर्चेला आला होता. त्यावेळी माननीय श्री.शरद पवार साहेबांनी 50 व्या वाढदिवसानिमित्त असे म्हटले होते की, "अध्यक्ष महोदय, या सदनामध्ये गेली अनेक वर्षे काम करण्याची संधी मला मिळाली. पण आजच्या इतके संकट या सदनामध्ये यापूर्वी माझ्यावर कधी आले नव्हते. पण ते संकट प्रेमाचे आहे, सद्भावनेचे आहे. संघर्ष करण्याचा प्रसंग या सदनामध्ये अनेक वेळा आला. त्याच्यामुळे मी कधी चिंतीत झालो नाही. माझ्या स्वभावातही नाही,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

आपल्यापैकी अनेकांना ठाऊक आहे. पण आपल्या उपस्थितीमध्ये आपल्याबद्दल, आपले मित्र मनापासून ज्यावेळी बोलतात, अपेक्षा करतात, मी समजू शकतो. पण बोलतात, अभिनंदन करतात त्यावेळी मन अतिशय अस्वस्थ होते. मी आपला सगळ्यांचा, संपूर्ण सभागृहाचा आणि महाराष्ट्रातील जनतेचा अंत:करणापासून आभारी आहे की, महाराष्ट्राचे काम करण्यासाठी आपण या ठिकाणी माझ्याबद्दल मनापासून सद्‌भावना व्यक्त केल्या आहेत."

सभापती महोदय, 25 वर्षांपूर्वी ज्या सभागृहाने आदरणीय श्री.शरद पवार साहेबांबद्दल भावना व्यक्त केल्या होत्या त्या गोष्टीला 25 वर्षांचा काळ उलटून गेला आहे. आता त्यांच्या 75 व्या वर्षानिमित्त पुन्हा त्याच भावना व्यक्त करीत आहोत. हा प्रसंग खूप महत्त्वाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी सांगितले की, माननीय श्री.शरद पवार साहेबांवर मराठा लेबल लावण्यात आले. त्यांचे नेतृत्व एखाद्या जातीपुरते मर्यादित आहे काय, असे सांगण्याचा प्रयत्न केला गेला. गेल्या वर्षभराच्या काळात अनेक मुलाखती, पुस्तके, ग्रंथ प्रसिध्द होत असताना, अनेक प्रश्न पडत होते, अनेक लोक विचारत होते. आपल्यापैकी बऱ्याच जणांना माहीत असेल की नाही, मला कल्पना नाही. परतु माननीय श्री.शरद पवार साहेब यांनी सांगितले की, दिल्लीत मराठा समाज म्हणजे महाराष्ट्रीयन असे म्हटले जाते. मराठा म्हणजे मराठा समाजाचा नाही तर स्ट्राँग मराठा लीडर असे दिल्लीच्या इंग्रजी वर्तमानपत्रात कायम छापून येते. ते मराठा या समाजाबद्दल नसते तर मराठी माणसाबद्दल असते. अशाप्रकारे हे सर्व समजून घेत असताना केवळ संरक्षण मंत्री म्हणून नाही, लोकसभेचे विरोधी पक्ष नेते म्हणून नाही, केंद्रीय कृषी मंत्री म्हणून नाही तर हा उत्तरोत्तर वरवर चढत जाणारा आलेख आपण ज्यावेळी बघत जातो त्यावेळी आपल्या लक्षात येते की, हे काही साधे काम नाही.

..2क्यू..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

आता 2 दिवस गेले. गेली 2 दिवस पुण्यातील रेसकोर्सवरचा कार्यक्रम किती मोठा झाला हे सर्वांनी सांगितले. ऐतिहासिक सभा झाली. सभापती महोदय, या अगोदर या रेसकोर्सच्या मैदानात पंडित जवाहरलाल नेहरू व सन 1971 च्या विजयानंतर स्व. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या दोन सभा होऊ शकल्या होत्या. परवाच्या सभेचे भाग्य दिल्लीच्या विज्ञान भवनातील समारंभाइतकेच महत्त्वाचे होते. रेसकोर्सवर मोठ्या प्रचंड जनसमुदयाने हजेरी लावली. आपल्या नेत्यांचे म्हणणे ऐकण्यासाठी लोक तेथे जमले. या मागे तपश्चर्या असते. समाजाच्या सर्व स्तरावर साहित्य असेल, कला असेल, संस्कृती असेल, क्रीडा असेल असे एकही क्षेत्र नाही की जे पवार साहेबांना माहीत नाही, ज्यामध्ये त्यांची इन्व्हॉल्व्हमेंट नाही, ज्याच्यामध्ये त्यांचे सहकार्य नाही. तरूणांना पुढे आणण्यासाठी मग घाशीराम कोतवाल यांना पुढे नेण्याचा प्रसंग असेल किंवा वेगवेगळ्या संगीत नाटकांचे पुनरूज्जीवन असेल, मराठी साहित्याची ऊर्मी आणि ऊर्जा अधिक वेगाने पुढे नेण्याची बाब असेल सर्व ठिकाणी त्यांचे सहकार्य होते. दिल्ली स्तरावरील आपल्या पैकी किती जणांना आहे हे मला माहीत नाही. पण साहित्य अकादमीचे पुरस्कार असतील, माननीय राष्ट्रपतींकडून दिले जाणारे पद्मपुरस्कार असतील, महाराष्ट्रातून ज्या-ज्या लोकांना हे पुरस्कार मिळतात, ज्या दिवशी हा समारंभ होतो त्या दिवशी संध्याकाळी त्या सर्वांचा सत्कार पवार साहेब स्वत: आपल्या घरी सन्मानाने बोलावून करतात.

सभापती महोदय, दिल्लीत महाराष्ट्र कुठे आहे असे जर विचारायचे असेल तर नक्की तुम्हाला 6 जनपथवर सापडेलच सापडेल. प्रत्येक मराठी माणूस तेथे आदराने आलेला असेल याची आपण खात्री बाळगा, इतका जबरदस्त विश्वास या माणसाने दिला आहे. आता दोन दिवस पुण्यामध्ये होतो. रेसकॉर्स मैदानावरची एक सभा सोडली तर पुण्यामध्ये 2-3 छोटे कार्यक्रम होते. पुण्यातील पत्रकार संघाचा एक वार्तालाप होता. पुण्याच्या जुन्या पेठेतील इमारत आहे. कधी काळी पवार साहेब मुख्यमंत्री असताना तो भूखंड पत्रकार संघाला पुण्याच्या साहेबांनी दिलेला होता. त्यालाही 75 वर्षे होत होती. त्यामुळे मुद्दाम पवार साहेबांना बोलाविलेले होते. पहिल्याच पत्रकारांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

प्रास्ताविकात उल्लेख केला की, साहेब, तुमच्यामुळे भूखंड मिळाला. साहेबांनी त्यांना थांबविले आणि ते म्हणाले की, भूखंड व शरद पवार यांच्याबद्दल हे समीकरण महाराष्ट्रामध्ये इतके घट्ट झाले आहे की, आजपर्यंत मी शेकडो जणांना अतिशय चांगल्या कामांसाठी भूखंड दिले, पण अजुनही भूखंडाचा विषय काढला की, माझ्या अंगावर काटा येतो.

सभापती महोदय, काम चांगले असेल, मनाला पटलेले असेल, समाजाच्या हिताचे असेल तर होणाऱ्या टीकेची त्यांनी कधीही पर्वा केली नाही. त्यांनी कायम एक धोरण स्वीकारले की, त्यांना बोलायचे आहे तर बोलू द्यावे, थोडे दिवस थकतील, त्यामध्ये सत्य काही नाही असे समजल्यावर जनतेला ते आपोआप कळून येईल. त्यामुळे मी जेथे आहे तेथे शांतपणे असतो. असाच पुढचा वार्तालापाचा कार्यक्रम होता. फ.मु.शिंदे यांच्या काव्यखंडाचे प्रकाशन होते. त्यावेळी इतर पत्रकार जमले होते, काही प्रश्न सुरू झाले. साहेबांनी हातात वर्तमानपत्र घेतले होते, त्यांनी ते उघडले आणि सांगितले. मघाशी कोणी तरी उल्लेख केला आणि 3-3 पिढ्यांची नावे घेतली. शेत कुठे आहे, जमीन कुठे आहे पिकते काय आहे विकते कुठे आहे असे सर्व सांगणारा हा माणूस. पण परवा ते म्हणाले की, अलीकडे मला वर्तमानपत्र उघडले की, पूर्वीचा मी असलेला वाचक आणि आज येत असलेली वर्तमानपत्रे याच्यात मी कुठेतरी डिसकनेक्ट झालो आहे. अतिशय छोटी कॉमेंट होती. सकारात्मक गोष्टी छापण्यापेक्षा नकारात्मक बातम्यांचा सूर लागलेला असतो, त्याबद्दल पत्रकारांना वेडेवाकडे काहीही न विचारता ते बोलले. पूर्वी ते म्हणायचे की, सकाळमध्ये मी बातमीदार म्हणून नोकरी केली. पवार साहेब हे सांगायचे. बातमीदार असताना परुळेकर आम्हाला सांगायचे की, सकाळमध्ये देशपातळीवर काय चालेल आहे ते येऊ द्या, सकाळ गावामध्ये जातो, सकाळ छोट्या गावामध्ये जातो, तेथील मार्केटमधील माणसाला, भाजी विकणाऱ्या माणसाला वर्तमानपत्र वाचायचे असेल तर त्यामध्ये त्याच्या बाजारात मिळणाऱ्या भावाचे काय चालले आहे ते त्याला कळले तर त्याला त्यात अधिक इंटरेस्ट आहे. त्यामुळे तो अधिक प्रेमाने तुमचा सकाळ वाचेल. लोकांना हवे काय, नको काय, लोकांवर आपण लादतो काय या सगळया गोष्टीचा विचार करायला पाहिजे. एक सामाजिक भान म्हणून फार मोठी महत्त्वाची गोष्टी नेत्याला कायम जपावी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

लागते. नामांतराचा विषय असेल, किल्लारी भूकंप असेल असे अनेक विषय आहेत जे शासकीय चौकटीत कधीच बसत नाहीत. पण आजही तुम्ही मंत्रालयातील किवा त्यांच्या हाताखाली किंवा त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या मंत्रालयातील अधिकाऱ्यांना विचारा. कोणत्याही पध्दतीने त्या यंत्रणेची मोडतोड न करता त्या चौकटीत कशा चांगल्या पध्दतीने लोकोपयोगी बसविता येतील याचा आग्रह धरणारे आदरणीय पवार साहेब हे कायमच सर्वांसाठी आदर्श म्हणून राहिले आहेत. खेळाडूंना ते आपले वाटतात, गरिबांना ते आपले वाटतात, मागासवर्गीयांना ते आपले वाटतात, आदिवासींना ते आपले वाटतात, शहरवासियांना ते आपले वाटतात, गावाकडच्या लोकांना ते आपले वाटतात, पाणीवाल्यांना ते आपले वाटतात, शेतमालाची जी काही चढउतार चालते अशा लोकांच्या पाठीशीही शरद पवार आहेत हा शब्दच महत्त्वाचा असतो. अलीकडे मात्र त्यांच्या बोलण्यातून जाणवते की, हे सगळे चालले असताना ज्या पध्दतीने आपण बांधणी करायला पाहिजे, त्यासाठी ज्या पध्दतीने सर्वांनी एकत्र रहायला पाहिजे ते होताना दिसत नाही. मैत्री जपावी, उत्तम राजकीय पटलावर एकमेकांशी वाद करावा, निवडणुका लढवाव्यात. पण निवडणुकीकडे सुध्दा खेळ म्हणून पहावे असे ते म्हणतात. पवार साहेअ मुळात स्पोर्टस्‌मन आहेत. निवडणुकीमध्ये सुध्दा खेळ म्हणून बघा. कोणत्याही मॅचमध्ये एक संघ विजयी होतो, एक संघ पराभूत हातो, पण संघ बाद होत नाही. पुढच्या फेरीची तयारी सर्वांनाच करावी लागते, त्या फेरीसाठी सदैव सज्ज रहायचे, पराभवाने कधी खचून जायचे नाही आणि यशाचा उन्माद आपल्यामध्ये कधी वाढू द्यायचा नाही एवढी एक शिकवण जरी सर्वांनी जपली तरी सुध्दा पवार साहेबांनी जो मार्ग दाखविला त्या मार्गावरून चालताना आपल्याला निश्चितपणे समाधान वाटेल. आपण सर्वांनी सद्‌भावना व्यक्त केलेल्या आहेत. यामुळे अशा पध्दतीने पुढे जात असताना वयाची 75 गाठणाऱ्या पवार साहेबांबद्दल मला कुसुमाग्रजांच्या एका कवितेतील काही ओळी आठवतात की, "माणूस इतका मोठा होतो, माणूस इतका मोठा होत जातो की, त्याच्या पायाला स्पर्श करण्यासाठी लाखो हात असतात, पण त्याच्या मनात खंत असते की, आता मायेने पाठीवर हात ठेवणारे शिल्लक राहिले नाहीत." आपल्या आधीची पिढी निघून गेली, त्या पिढीबद्दलची खंत आहे, चव्हाण साहेबांच्या आठवणी असतील, आईच्या आठवणी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

असतील, इतरांच्या आठवणी असतील, एस.एम.जोशींच्या आठवणी असतील ही सगळी खंत उराशी बाळगून मी काही तरी अजून देणे लागतो, हे नक्षत्रांचे देणे देत हा माणूस कधीही संपत नाही, कधीही संपणार नाही, अशा पध्दतीचा हा माणूस, ज्याचे मातीशी नाते फार घट्ट आहे आणि आकाशही त्याला फार चांगले समजते. आजच्या त्यांच्या या प्रस्तावाच्या निमित्त आयुष्यावर कविवर्य महानोरांनी लिहिलेल्या थोड्याशा ओळी वाचून मी माझे भाषण संपविणार आहे.

"काळ्या तांबड्या मातीचा, टिळा दगड धोंड्याला,
आम्ही भरला मरठ, हिरव्या बिलोरी झाडांना,
येता पावसाची झड, न्हाली गुलालात माती,
पंख पिवळ्या पानात, थेंब थेंब झाले मोती,
मोतीयाचा मळवट, कळा भोगल्या भुईला,
किती वर्षांनी मिळाली, ओटी फाटक्या दु:खाला,
येऊ दे गा पिक पाणी, जन्म दु:खाच्या कारणी,
सोनसळी मातीतला, गंध भरु दे अस्मानी,
काळ बरबट जळोनी, गंगा वाहू दे निर्मळ,
लाख चांदण्या गोंदून, कधी भरु दे आभाळ,
गोदा गंगोत्रीचे पाणी, झाले पावन दांडात,
काळ्या गर्भार भुईला, स्वप्न पडे चांदण्यात,
काळ्या तांबड मातीचा, टिळा दगड धोंड्याला,
आम्ही भरला मरठ, हिरव्या बिलोली झाडांना"

पवार साहेब, काही बोलायचे आहे, पण बोलणार नाही, देवळाच्या दारामध्ये भक्ती तोलणार नाही. धन्यवाद !

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माझ्याकडे अजून दोन सन्माननीय सदस्यांची भाषणासाठी नावे आहेत. (अडथळा) कोणाला नाराज करण्यात अर्थ नाही. हा प्रसंगच असा आहे की, कोणाला नाराज करणे शक्य नाही. मी सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश गजभिये, रामराव वडकुते व किरण पावसकर यांना सांगू इच्छितो की, जे काही बोलले गेले आहे, त्याच्या व्यतिरिक्त बोलायचे असेल तरच संधी घ्यावी. उगाच मुद्दे रिपिट करण्यात अर्थ नाही. सदनाने ज्या उंचीवर ही चर्चा नेली आहे, यावरून खाली आणण्याचा प्रयत्न करू नये. केवळ 2 मिनिटांत म्हणणे मांडावे. आपल्याला पवार साहेबांबद्दल जे काही चांगले शब्द काढायचे आहेत ते नमूद करावेत.

...R

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त मांडण्यात आलेल्या अभिष्टचिंतन प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सभागृहामध्ये सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे झाल्यानंतर जमिनीपासून आकाशापर्यंत सर्व उपमा देऊन श्री.शरद पवार साहेबांविषयीची सर्व गुणवैशिष्ट्ये सर्वांगाने सांगून झाली आहेत. आपण म्हणाला त्याप्रमाणे तेच ते विषय रिपिट न करता मी काही वेगळे पैलु मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, स्व.लाल बहादुर शास्त्री यांनी "जय जवान, जय किसान" अशी घोषणा दिली होती. सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी कामगारांविषयी श्री.शरद पवारसाहेबांची गुणवैशिष्ट्ये सांगितली आहेत. त्या दिवशी मीही एक क्षण अनुभवला. साताऱ्यातील कर्नल महाडीक नावाचा एक जवान शहीद होतो, श्री.शरद पवार साहेब या वयात तेथे जातात. आपणही त्या ठिकाणी होता. ते तेथे जाऊन सांगतात की, त्यांच्या पत्नीला जर नोकरी हवी असेल, पुढचा उदरनिर्वाह करण्यासाठी, मानाने जगण्यासाठी काही द्यायचे असेल तर त्यांच्या पत्नीला बारामतीच्या शिक्षण संस्थेत नोकरी द्यावी. आजच्या या काळात, सन 2015 मध्ये असा विचार करणारा श्री.शरद पवार साहेब सोडून दुसरा कोणता नेता असू शकेल, असे मला वाटत नाही. म्हणून मी म्हणालो की, "जय जवान, जय किसान" ही त्यावेळी शास्त्रीजींची घोषणा असेल पण "जय जवान, जय किसान आणि जय कामगार", ही श्री.शरद पवार साहेबांची घोषणा आहे.

सभापती महोदय, खऱ्या अर्थाने श्री.शरद पवार साहेबांनी कामगारांच्या आयुष्यात चांगले क्षण निर्माण केले आहेत, हे सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी विस्तृतपणे मांडलेले आहे.

सभापती महोदय, श्री.शरद पवार साहेबांच्या नेतृत्वाला 'भविष्याचा वेध घेणारे नेतृत्व' असेही म्हणता येईल. मी आमदार झालो. मलाही बरे वाटले. पहिल्या वेळी आमदार झालो होतो. राजकीय जीवनामध्ये असे काही क्षण येतात की, ज्यावेळी आपण कुणाला काही सांगूही शकत नाही, कुणाकडे जाऊन रडुही शकत नाही, बोलू शकत नाही. त्यावेळी नेतृत्वावर विश्वास ठेवायचा झाला तर दोन नेतृत्व महाराष्ट्रात होती. एक म्हणजे स्व.बाळासाहेब ठाकरे आणि त्यानंतर कोणाकडे जाऊन बोलण्याची इच्छा झाली असती तर ती फक्त श्री.शरद पवार साहेबांकडे. माझ्या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर........

जीवनात घडलेला प्रसंग म्हणून सांगेन की, सन 2011 मध्ये तत्कालीन उपमुख्यमंत्री श्री.अजित दादा पवार यांनी आम्हाला हात दिला. त्यांनी हात दिला तरी आमच्या डोक्यावर आशीर्वादाचा हात ठेवण्याचे काम श्री.शरद पवार साहेबांनी केले. तेव्हा जर श्री.पवार साहेबांनी ते काम केले नसते तर आज मी या ठिकाणी दोन मिनिटेही बोलू शकलो नसतो. म्हणूनच मी म्हणालो की, भविष्याचा वेध घेणाऱ्या नेतृत्वाची गरज असते. आपण जायचे तर कोणाकडे जायचे, कोणत्या नेतृत्वाकडे जायचे, त्यांच्याकडून मला काय मिळणार आहे, मी त्यांच्यासाठी काय करु शकेन, ज्यांनी मला मोठे केले आहे त्यांना मी काय देऊ शकेन, या सर्व गोष्टींवर बारकाईने विचार करुन सल्ला देण्यासाठी, मायेची फुंकर घालण्यासाठी आणि ते सर्व घडवून आणण्यासाठी सशक्त नेतृत्वाची आवश्यकता असते आणि ते नेतृत्व भविष्याचा वेध घेणारे असावे लागते.

सभापती महोदय, आपण म्हणाला की, वेगळे काही बोलण्यासारखे असेल तर जरुर बोला. मी खेळाडुंबाबत बोलणार आहे. मी सन 2011 मध्ये शिवाजी पार्क येथे एक कबड्डी स्पर्धा आयोजित केली होती आणि त्या स्पर्धेच्या निरोप समारंभासाठी श्री.शरद पवार साहेब आले होते. व्यासपीठावरुन उतरल्यानंतर काही मुली......मी आता त्यांना मुली म्हणणार नाही, कारण त्या आता कदाचित आजीच्या भूमिकेत सुध्दा गेल्या असतील.... हे सर्व जुन्या खेळाडुंनी कार्यक्रम संपल्यानंतर श्री.पवार साहेबांना गराडा घातला. तेथील प्रत्येक व्यक्ती श्री.पवार साहेबांबद्दल आणि त्यांच्या सौभाग्यवतींबद्दल जे काही सांगत होता ते ऐकल्यानंतर असे वाटते की, यांनी आपल्या खेळाला एका उंचीवर नेऊन ठेवले आहे. आम्ही माती, दगडात खेळत होतो, आम्हाला मऊ मातीवर, मॅटवर नेऊन ठेवणारे नेतृत्व कोणते असेल तर ते श्री.पवार साहेब आहेत. फक्त तेवढ्यापुरतेच नाही त्यामधून त्या खेळाडुंना नोकऱ्या कशा लागतील, "खेळाडु झालास, मोठा झालास पण तु एअर इंडियात लागला पाहिजेस, तुला नोकरी लागली पाहिजे, तुझा उदरनिर्वाह झाला पाहिजे," अशा पध्दतीने काळजी घेणारे नेतृत्व श्री.पवार साहेब आहेत, असे सांगणारे एक नाही तर दोन ते तीन डझन लोक निघतील. आम्हाला या खेळातही त्यांनी वर आणले आणि आम्हाला नोकऱ्या सुध्दा दिल्या, अशा अनेकांच्या भावना आहेत.

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.........

सभापती महोदय, त्या दिवशी दिल्लीमध्ये महाराष्ट्राची मान उंचावली आहे, हे फक्त त्या दिवशीचा कार्यक्रम बघितल्यानंतर कळले. समाजातील, राजकारणातील किंवा शेतीतील संतुलन बिघडले तर फक्त श्री.पवार साहेब हेच पुन्हा समतोल राखू शकतील. स्त्रीभ्रुणहत्या म्हटल्यानंतर त्यासाठी काय उपाय केले पाहिजेत, याचा उगम तेथूनच झाला. वातावरणाच्या बाबतीत आजही आपण पाहतो की, पॅरिसमध्ये त्या दिवशी परिषद भरवली गेली. पाऊस कमी पडतो, अवेळी पडतो, काय करायचे, पुन्हा श्री.पवार साहेबांचे विचार त्या ठिकाणी घेतले जातात. राजकारणातील एखादी अडचण असेल तर प्रश्नच येत नाही. म्हणजे समाजासाठी समतोल राखण्याचे नेतृत्व जर आताच्या घटकेला कोणाकडे असेल तर ते श्री.पवार साहेबांमध्येच आहे, हे सर्वांनीच मान्य केले आहे.

सभापती महोदय, परदेशातून येणारी प्रत्येक व्यक्ती म्हणते की, भारतात गेल्यानंतर आम्हाला काय बघायला मिळेल. ताजमहाल बघायला मिळेल, मुंबई सारखे शहर बघता येईल. पण राजकारणाचा विचार केल्यास प्रत्येक महाराष्ट्रातील माणसाला अभिमान वाटेल की, श्री.पवार साहेब महाराष्ट्रातील आहेत अशा प्रकारच्या नेतृत्वावर दोन ते पाच मिनिटात बोलता येण्यासारखे नाही. त्यामुळे आदरणीय श्री.शरदचंद्र पवार यांना उदंड, उदंड दिर्घायुष्य लाभो, अशी श्री महालक्ष्मी चरणी करतो, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबददल आपले आभार मानतो आणि थांबतो.

------------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभापती महोदय, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त मांडण्यात आलेल्या अभिष्टचिंतन प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी यापूर्वी मांडलेल्या मुद्यांचे रिपिटेशन करणार नाही. या ठिकाणी सर्वांनी माननीय श्री.शरद पवार यांचे अभिष्टचिंतन केले आहे. मी सुध्दा माझ्या वतीने त्यांचे अभिष्टचिंतन करीत आहे.

सभापती महोद, खऱ्या अर्थाने श्री.शरद पवार साहेबांबद्दल जेवढे बोलावे तेवढे कमी आहे. अनेक लोकांनी असे सांगितले की, त्यांचे आयुष्य खूप चांगले गेले आहे. परंतु, मी या मताशी सहमत होणार नाही. त्यांचे आयुष्य खूप संघर्षात आणि संकटात गेले आहे. परंतु, त्यांनी त्या प्रत्येक संकटावर मात करुन विजय मिळविण्याचे काम स्वकर्तृत्वावर, गुणवत्तेवर केले आहे, असे म्हणावे लागेल.

सभापती महोदय, श्री.शरद पवार साहेबांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले आहेत. अनुसूचित जाती आणि जमातीच्या लोकांसाठी स्वतंत्र बजेट देणारे ते एकमेव मुख्यमंत्री होते. तोपर्यंत मागासवर्गीयांसाठी स्वतंत्र बजेट नव्हते. मागासवर्गीयांचा निधी अन्य ठिकाणी वळविण्यात येत होता. या राज्यात त्यांनी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, व्हीजेएनटी मधील लोकांसाठी स्वतंत्र बजेट देण्याचा निर्णय घेतला.

सभापती महोदय, त्या काळात आरपीआय पक्षाचे दिवस फार चांगले होते. आता तर मला मंत्री करा, मला मंत्री करा, अशी धावपळ सुरु आहे. त्यावेळी श्री.पवार साहेबांनी आठवले साहेब आमदार नसताना त्यांना होस्टेलवरुन आणून मंत्री केले होते. हा दलितांचा सन्मान राज्यामध्ये दुसरा माणूस करु शकणार नाही.

सभापती महोदय, श्री.शरद पवार साहेबांनी एक ऐतिहासिक घटना घडवून दाखविली आहे. खुल्या वर्गासाठी असलेल्या मतदारसंघातून 4 दलित खासदारांना निवडून आणण्याचे सामर्थ्य उभ्या महाराष्ट्रामध्ये फक्त श्री.शरद पवार साहेबांमध्ये आहे. खुल्या संवर्गातील लोकांची मते दलितांच्या पारड्यात टाकण्याचे सामर्थ्य कोणी दाखविले असेल तर ते शरद पवार यांनी दाखविले आहे. आता आरपीआय पक्षाचे दिवस चांगले नाहीत.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये........

सभापती महोदय, मध्यंतरी आम्ही दिल्लीला गेलो असताना श्री.पी.ए.संगमा साहेबांकडे भेटावयास गेला होतो. त्यावेळी त्यांची कन्या श्रीमती अगाथा संगमा या देखील उपस्थित होत्या. आम्ही श्री.शरद पवार साहेबांना भेटून त्यांच्याकडे गेलो होतो. त्यावेळी श्री.संगमा साहेब दुसऱ्या पक्षात होते. त्यांनी आमची आस्थेने विचारपूस केली. ते म्हणाले की, **प्रकाश गजभिये जी हमकोबहुत दुख होता है, .................**खरोखरच त्यांच्यामध्ये प्राईम मिनिस्टर मटेरियल आहे.

...SS-1......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये......

परंतु, ते पंतप्रधान होऊ शकत नाहीत, हे दु:ख आहे. मी माझ्या आयुष्यातील एक प्रसंग सांगतो. सन 1997 पूर्वी मी नगरसेवक होतो. सन 1997 मध्ये आर.पी.आय. पक्षाचा मी एकच नगरसेवक निवडून आलो होतो. परंतु, नागपूर महानगरपालिकेचा विरोधी पक्षनेता बनण्याची संधी मला कोणी दिली असेल तर ती माननीय श्री.शरद पवार साहेबांनी दिलेली आहे. म्हणून माझ्या सारखा एक साधा कार्यकर्ता त्यांना विसरु शकत नाही.

सभापती महोदय, राज्यातील पत्रकारांना पत्रकार भवन बांधण्यासाठी जागा देण्याचे काम माननीय श्री.पवार साहेबांनी केले. ज्यावेळी पाऊस आला, पावसामुळे जमीन खरडून गेली, पिके उद्धवस्त झाली, पशुधन वाहून गेले, त्यावेळी पहिल्यांदा शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पाहणी करणारा नेता कोणता असेल तर ते माननीय श्री.पवार साहेब आहेत. राज्यात उद्योग धोरण, महिला धोरण, क्रीडा धोरण आणण्याचे काम माननीय श्री.पवार साहेबांनी केले आहे. आपण बघितले की, लोकसभेत प्रश्न उपस्थित करण्यासाठी खासदार पैसे घेतात. परंतु, आमच्या साहेबांना संसदेचा सर्वोत्कृष्ट संसदपटू पुरस्कार मिळाला आहे, हे आपण विसरु शकत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी संसदेत प्रश्न विचारण्यासाठी खासदार पैसे घेतात, असे वक्तव्य केले आहे. कृपया ते रेकॉर्डवरुन काढण्यात यावे.

**सभापती** : ठीक आहे, ते वक्तव्य रेकॉर्डवरुन काढण्यात येईल.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, संसदेचा सर्वोत्कृष्ट संसदपटू, महिलांविषयी आस्था, क्रिकेमधील क्रिकेटपटू, कृषीमधील खरा शेतकरी, महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 50 टक्के आरक्षण देणारा नेता कोणता असेल तर ते माननीय श्री.पवार साहेब आहेत. मी एका वर्तमानपत्रात बातमी वाचली होती की, "People will not tolerate if government fail to honour committtment ‍ Pawar." पुढे असे म्हटले आहे की, "The political situation is going to such level if this stalling of Parliament continuous it will affect the



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये......

fate of Parliamentary Democracy and people of India.. and everybody said red activists, Gandhi demand Bharatratna for Pawar" श्री.बिपीन गांधी असे म्हणतात की, माननीय श्री.पवार साहेबांमध्ये एवढे गुण असल्यामुळे त्यांना भारतरत्न पुरस्कार दिला पाहिजे. आम्ही निश्चितपणे ही मागणी करीत आहोत.

सभापती महोदय, राज्यात 3 रुपये किलो दराने तांदुळ, 2 रुपये किलो दराने गहू देण्याचे काम माननीय श्री.पवार साहेबांच्या काळातच झाले आहे.

**सभापती** : आपण आता रिपिटेशन करु नये. आपण माननीय श्री.पवार साहेबांचे अभिष्टिचिंतन करुन आपले भाषण पूर्ण करावे.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, मी माननीय श्री.पवार साहेबांविषयी एक कविता म्हणतो.

पवार साहब को ऊचाई पर देखकर हैरान हैं बहुत लोग,
पर किसी ने उनके पैरों के छाले नहीं देखे,
किसानों को देखकर दुखी हैं बहुत लोग,
लेकिन पवार साहब के बगैर और लोगों ने,
किसानों की आँख के आंसू नही देखे."

सभापती महोदय, मी माननीय श्री.पवार साहेबांचे शतशः अभिनंदन करतो आणि त्यांना वंदन करुन पुन्हा एक शेर म्हणून माझे भाषण संपवितो.

"हाथ में गीता लेकर जुबां पे कुराण रखेंगे,
मन में गुरुग्रंथ साहिब तो दिल में बायबल रखेंगे,
जातीवाद का करके खात्मा मन में फुले, शाहू, आंबेडकर का नाम रखेंगे
और लहराकर राष्ट्रवादी का झंडा शरद पवार साहब का सन्मान रखेंगे."

सभापती महोदय, मी माननीय श्री.पवार साहेबांचे शतशः अभिनंदन करतो आणि वेळे अभावी माझे दोन शब्द संपवितो.

--------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामराव वडकुते (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री श्री.शरदचंद्रजी पवार साहेबांच्या अमृत महोत्सवानिमित्त मांडण्यात आलेल्या अभिष्टचिंतनाच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

देशाचा जानता राजा, गोरगरिबांचा, शेतकऱ्यांचा, मजुरांचा कैवारी म्हणून माननीय श्री.पवार साहेबांना ओळखले जाते. त्यांनी बरेच निर्णय घेतलेले आहेत. ते मुख्यमंत्री असताना त्यांनी घेतलेल्या एका निर्णयामुळे मी त्यांच्या विचारांशी जोडला गेलो. तो निर्णय येथे सांगणे मला आवश्यक वाटते. ग्रामीण भागातील तरुण मॅट्रिक उत्तीर्ण होऊन, ग्रॅज्युएट झाल्यानंतर शहरात एमपीएससीच्या परीक्षेला बसले तर त्यांना भौतिक सुविधा न मिळाल्यामुळे 10 टक्के रूरल वेटेज मिळाले पाहिजे, असा महत्वपूर्ण निर्णय त्यांनी ग्रामीण भागासाठी घेतला होता. परंतु, दुर्दैवाने तो निर्णय पुढे कोर्टात टिकू शकला नाही. तो निर्णय कायम राहिला असता तर राज्यातील ग्रामीण भागातील अनेक मुले उप जिल्हाधिकारी, आयपीएस झाले असते. माननीय श्री.पवार साहेब हे दूरदृष्टी असलेले नेते आहेत. खेड्यापाड्यातील लोकांचे दु:ख समजून घेणारा आमचा नेता आहे. दिल्ली येथील विज्ञान भवनात जो कार्यक्रम झाला तसा कार्यक्रम मी माझ्या आयुष्यात बघितलेला नाही. आमच्या नेत्याने बरेच निर्णय घेतलेले आहेत. मग ते महिलांसाठी, गोरगरिबांसाठी, शेत मजुरांसाठी असतील किंवा ज्या ज्यावेळी राज्यावर संकट आले त्या त्यावेळी ते धावून गेले. मग तो किल्लारी येथील भूकंप असेल. आपण त्याचे साक्षीदार आहात. निवडणुकीपूर्वी आमच्या समाजाचा मागील 65 वर्षापासूनचा आरक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी माननीय श्री.पवार साहेबांनी मागील काळात प्रयत्न केले. तो प्रश्न सुटू न शकल्यामुळे अजूनही त्यांच्या मनात ती खंत आहे. राजकारणाच्या पलीकडे जाऊन धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सुटला पाहिजे आणि त्यांनी आमच्या व्ही.जे.एन.टी. समाजासाठी जो निर्णय घेतला, त्यामुळे आमच्या समाजातील अनेक तरुण डॉक्टर, इंजिनिअर झाले. हा निर्णय देखील आमच्या समाजाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. सर्व समाजातील लोकांना न्याय देण्याचे काम आणि सर्व जाती धर्मातील लोकांना बरोबर घेऊन काम करणे या निर्णयामुळे शक्य झाले, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

..4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामराव वडकुते..........

सभापती महोदय, सूर्याच्या अस्तित्वाच्या आड काहीही आले तरी अंधार राहत नाही, तसा हा पृथ्वीवरील सूर्य आहे. त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेवल्यामुळे मी या सभागृहाचा सदस्य होऊ शकतो. मघाशी कवाडे साहेबांनी सांगितले की, परीस लोखंडाला घाल्यानंतर त्या लोखंडाचे सोने होते. माननीय श्री.पवार साहेबांनी गोरगरिबांच्या डोक्यावर हात ठेवल्यामुळे त्यांच्या आयुष्याचे सोने झाल्याशिवाय राहत नाही. आमच्या नेत्याला आम्हा सर्व कार्यकर्त्यांचे आयुष्य लाभो, त्यांनी वयाची 100 वर्षे पूर्ण करावीत आणि त्यांच्या हातून अशीच देशाची सेवा घडावी, एवढे बोलून वेळे अभावी मी माझे दोन शब्द संपवितो.

--------

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री माननीय श्री.शरदचंद्र गोविंदराव पवार यांचा जन्म दिनांक 12 डिसेंबर, 1940 रोजी पुणे जिल्ह्यात बारामती तालुक्यातील काटेवाडी येथे झाला. त्यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण घेत असतानाच सामाजिक व राजकीय कार्यास सुरुवात केली. त्यांनी अनेक वर्षे विद्यार्थी व युवक चळवळीचे नेतृत्व केले. तसेच, विद्या प्रतिष्ठान, कृषी विकास प्रतिष्ठान, बारामती, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगावचे संस्थापक-अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा व वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणेचे अध्यक्ष म्हणूनही उत्तम कार्य केले. तसेच, त्यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व नेहरु सेंटर, मुंबईचे अध्यक्ष, महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन, गरवारे क्लब हाऊस, महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद, अखिल भारतीय कबड्डी व खो-खो संघटना, मुंबई शहर तालीम संघाचे अध्यक्ष, मराठा मंदिरचे उपाध्यक्ष, सुश्रुषा मेडिकल ट्रस्टचे अध्यक्ष, मुंबई क्रिकेट असोसिएशन व ऑल इंडिया क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तसेच, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. तसेच, त्यांनी महाराष्ट्र राज्य युवक काँग्रेसचे अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस, 1982 ते 1986 महाराष्ट्र काँग्रेस (एस) चे संस्थापक-अध्यक्ष, तसेच, 1999 पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणूनही धुरा सांभाळली आहे.

माननीय श्री.शरदचंद्र पवार साहेब हे सन 1967, 1972, 1978, 1980, 1985 व 1990 असे सहा वेळा पुणे जिल्ह्यातील बारामती मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर तर 1993 मध्ये पुणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून महाराष्ट्र विधान परिषदेवरही निर्वाचित झाले. त्यांनी जुलै, 1980 ते ऑगस्ट, 1981 आणि जानेवारी, 1983 ते डिसेंबर, 1985 या काळात महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते तसेच, मार्च, 1995 ते मे, 1996 या कालावधीत महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते म्हणून उत्तम कार्य केले.

..2T-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती...**

त्यांनी मार्च 1972 ते नोव्हेंबर,1974 या काळात गृह, माहिती व जनसंपर्क, पुनर्वसन, क्रीडा व राजशिष्टाचार याखात्याचे राज्यमंत्री तर नोव्हेंबर, 1974 ते जुलै, 1978 या काळात शिक्षण, कृषी, पाटबंधारे, गृह, उद्योग व कामगार खात्याचे मंत्री म्हणूनही उत्तम कार्य केले. तसेच जुलै, 1978 ते फेब्रुवारी 1980, जून 1988 ते मार्च 1990, मार्च 1990 ते जून 1991 व मार्च 1993 ते मार्च 1995 असे चार वेळा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री पदही भूषविले आहे. या काळात त्यांनी कृषी, औद्योगिक, सहकार क्षेत्राच्या विकासाबरोबरच महिला धोरण, फलोत्पादन, स्त्री सक्षमीकरण यासारखे लोकहिताचे अनेक निर्णय घेतले. त्यांनी मुंबईतील बॉम्बस्फोट, किल्लारी येथील भूकंप या संकट काळात अतिशय कौशल्याने परिस्थिती हाताळली.

माननीय श्री.शरदचंद्र प्रवार साहेब हे 1984,1991,1996,1998,1999 व 2004 मध्ये पुणे जिल्ह्यातील बारामती मतदारसंघातून तर 2009 मध्ये सोलापूर जिल्ह्यातील माढा मतदारसंघातून असे सात वेळा लोकसभेवर निर्वाचित झाले. तर 31 जानेवारी, 2014 रोजी ते राज्यसभेवरही निर्वाचित झाले आहेत. त्यांनी बाराव्या लोकसभेत विरोधी पक्षनेता म्हणूनही उत्तम कार्य केले. त्याचप्रमाणे जून 1991 ते मार्च 1993 या काळात देशाचे संरक्षण मंत्री तर मे 2004 ते 2014 या काळात देशाचे कृषीमंत्री म्हणूनही उत्तम कार्य केले. याकाळात भारत देशाने कृषी व अन्नधान्य क्षेत्रात उल्लखनीय कामगिरी केल्याबद्दल 4 मार्च 2012 रोजी संयुक्त राष्ट्र संघाच्या अन्न व कृषी संघटनेने त्यांचा गौरव केला होता. तर संसदेने 2003 मध्ये "उत्कृष्ट संसदपट्टु" पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला तसेच त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना 2008 मध्ये अमेरिकेतील डेट्राईट विद्यापीठाकडून डी.लीट. पदवी देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान केला आहे.

अशा या उत्कृष्ट संसदपट्टु कुशल प्रशासक, उत्तम संघटक, अभ्यासू व्यक्तीमत्व, जनमानसातील लोकप्रिय नेत्याच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांचे अभिष्टंचिंतन.

प्रस्ताव सर्वानुमते संमत झाला.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आता साडे आठ वाजले आहेत, त्यामुळे पुढील कामकाज घेण्यात येऊ नये.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे मघाशी सर्व गट नेत्यांशी या विषयावर चर्चा झाली आहे. आपण तेथे नव्हता, विषय असा आहे की, अभिनंदनाच्या प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर लगेच शोक प्रस्ताव घेण्यापेक्षा मध्ये काही तरी कामकाज घ्यावे असे सर्वांचे मत आहे. उद्या कामकाज पत्रिकेवर दोन प्रस्ताव येणार आहेत, प्रलंबित 260 चा प्रस्ताव आणि दुसरा अंतिम आठवडा प्रस्ताव तसेच आजच्या लक्षवेधी सूचना व नियम 93 ची निवेदन लवकर काढून घेतली तर उद्या कामाचा लोड कमी होईल. नियम 93 च्या निवेदनावर सन्माननीय सदस्यांनी फक्त एक प्रश्न विचारावा. ते झाल्यानंतर जेवढ्या लक्षवेधी सूचना आहेत, तेवढ्या घेऊन त्यानंतर शोक प्रस्ताव घेण्यात येईल.

--------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औरंगाबाद म.न.पा. हद्दीत नवीन आरोग्य केंद्र उभारण्यासाठी निधी उपलब्ध असूनही कार्यवाही न होणे, याबाबत श्री.सतिश चव्हाण वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 27 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, औरंगाबाद महानगरपालिकेकडे आरोग्य केंद्रे उभारण्यासाठी भरपूर जागा आहेत. या आरोग्य केंद्रासाठी केंद्र शासनाने निधी दिला आहे, बीओटीवर जागा देण्यासाठी त्यांना वेळ आहे, त्यासाठी सर्वसाधारण सभा घेण्यासाठी त्यांच्याकडे वेळ आहे, परंतु आरोग्य केंद्रांची उभारणी करणे व त्यासाठी जागा निश्चित करण्यासाठी महानगरपालिकेला सर्वसाधारण सभा घेण्यासाठी वेळ मिळत नाही. मंत्री महोदय महानगरपालिकेला नवीन आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबत तातडीने निदेश देणार आहेत काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट सत्य आहे, एनआरएचएमचा निधी उपलब्ध आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने आठ आयडेटिंफाय लोकेशन पैकी दोन लोकेशनसाठी जागा फिक्स केल्या आहेत, 6 जागांवर वेगवेगळी आरक्षणे आहेत, याबाबतीत लवकर निर्णय घेणे अपेक्षित आहे, कारण 2 कोटी 10 लाख रुपये प्रस्तावित असून त्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. यासंदर्भातील निदेश लवकरात लवकर महानगरपालिकेला देण्यात येतील. नॅशनल अर्बन हेल्थ मिशनचे सेंटर आठ जागांवर लवकर चालू करण्यासाठी त्या 8 जागांबाबत महानगरपलिकने सभा घेऊन लवकर कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात येतील.

------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : भिवंडी जि.ठाणे येथून वर्तकनगर रुग्णालयात जात असताना रुग्णवाहिकेमधील ऑक्सिजन सिलेंडरचा स्फोट होऊन एक दिवसाच्या बालकाचा झालेला मृत्यु, याबाबत श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 18 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, भिवंडी येथे अत्यंत दुर्दैवी घटना घडलेली आहे. नियम 93 च्या सूचनेच्या माध्यमातून मी हा विषय उपस्थित केला होता. ठाणे जिल्ह्यात ज्या रुग्णवाहिका आहेत, त्याची तपासणी केली तर त्यांची परिस्थिती किती दयनीय आहे याची आपणाला कल्पना येईल. आता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, या घटनेची पुनरावृत्ती कधीही होऊ शकते. सरकार या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहणार असेल तर रुग्णवाहिकांचे ऑडिट व त्याची तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, घटना अशी घडली आहे की, एका दिवसाचे मूल एका दवाखान्यातून दुसऱ्या दवाखान्यात घेऊन जात असताना रुग्णवाहिकेमधील ऑक्सिजनच्या सिलेंडरचा स्फोट झाला. या विषयाची माहिती मी घेत होतो. यासंदर्भात ऑडिट करण्यात येईल, यासंदर्भातील अधिक माहिती घेण्यात येत आहे. या घटनेत कोणाचा दोष होता, याची तपासणी करण्यात येईल. नॅशनल ॲब्युलन्स कोड प्रमाणे सर्व ॲब्युलन्सचे ऑडिट करण्याचे निदेश देण्यात येतील.

**सभापती** : सूचना क्रमांक 22, सूचना क्रमांक 29, सूचना क्रमांक 24 बाबत सन्माननीय सदस्य उपस्थित नसल्यामुळे त्या उद्या घेण्यात येतील. सूचना क्रमांक 4 बाबत सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचे निवेदन आले आहे. सूचना क्रमांक चार ही चार वेळा पुढे ढकलण्यात आली आहे, आज मंत्री महोदय उपस्थित आहेत तर सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत त्यामुळे ही सूचना देखील उद्या घेण्यात येतील. त्याचप्रमाणे सूचना क्रमांक 25 देखील उद्या घेण्यात येईल.

------

.....7....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील पाणी जायकवाडी धरणात सोडल्यामुळे सदर जिल्ह्यांमध्ये पिण्याच्या पाण्यात करण्यात आलेली कपात, याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री विजय शिवतारे ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 31 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----

....8...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, काही महिन्यापूर्वी पाण्याच्या संदर्भात उत्तर महाराष्ट्र विरुध्द मराठवाडा अशी परिस्थिती त्या ठिकाणी निर्माण झाली होती. माझ्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी अतिशय सक्षम राज्यमंत्री उपस्थित आहेत, याबाबत माझ्या मनात दुमत नाही. त्या ठिकाणी पाण्याचा प्रश्न पेटलेला होता, जलसंपदा मंत्री हे नाशिकचे पालकमंत्री आहेत, नाशिकरांच्या बाबतीत त्यांची नैतिक जबाबदारी असताना त्यांनी उत्तर देणे अपेक्षित होते. ते या ठिकाणी नाहीत हे आमच्या नाशिकरांचे दुर्दैव आहे, नाशिकरांचे पालकत्व स्वीकारण्यासाठी त्यांनी उपस्थित रहावयास पाहिजे होते. ते उपस्थित नाहीत म्हणून मी त्यांचा निषेध करतो.

**सभापती** : कलेक्टीव्ह रिस्पॉन्सिबिलीटी म्हणून सभागृहात राज्यमंत्री उपस्थित आहेत, आपण फक्त मुद्यांवर बोलावे, निषेध वगैरे नंतर बघू.

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, निषेध शब्द वापरणे योग्य नाही.

**सभापती** : सदर शब्द मी काढून टाकीन.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी जबाबदारीने बोलतो,

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया पाण्याच्या विषयावर बोलावे, इतर काहीही बोलू नये.

....UU-1..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मेंढेगिरी समितीने समन्यायी पाणी वाटपाचे धोरण आखून नाशिककरांवर अन्याय केला आहे. आळंदी धरण कोणत्या समुहात असले पाहिजे हेच श्री.मेंढेगिरी यांना माहित नाही. खालच्या अधिकाऱ्यांना जर का विचारले ही हे धरण कुठल्या समुहात असले पाहिजे तर ते सुध्दा त्यांना माहित नाही, हे आमचे दुर्दैव आहे. अशा पध्दतीने चुकीचे समन्यायी पाणी वाटपाचे धोरण आमच्यावर मेंढेगिरी समितीने लादले आहे. याचा शासन पुनर्विचार करणार आहे काय? तेथील परिस्थिती गंभीर बनलेली होती. लोक रस्त्यावर उतरले होते. मीडियाचे प्रतिनिधी त्यांची बाजू ऐकून घेण्यासाठी आले असताना पोलीस अधिकाऱ्यांनी मीडियाच्या प्रतिनिधींना अमानुष मारहाण केली. आमच्याविरुध्द कशाप्रकारे लिहिले असे विचारुन त्यांना जाणीवपूर्वक मारहाण केली. सकाळचे प्रतिनिधी श्री.महेंद्र महाजन यांना गंभीरपणे मारहाण करण्यात आली. त्या संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करणार आहात काय?

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी सांगितले की, उजनीसाठी वेगळा न्याय आणि जायकवाडीसाठी वेगळा न्याय दिला जात आहे. प्रत्यक्ष तसे काही केलेले नाही हे मी सभागृहाला सांगू इच्छितो. मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जेव्हा अशा प्रकारचे पिटिशन महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणासमोर जातात त्यावेळेला आपली बाजू मांडण्यासाठी अनेक लोकप्रतिनिधी तेथे गेले होते. सभागृहात माननीय सदस्यांनी बाजू मांडल्याप्रमाणे सर्व बाजू त्या ठिकाणी मांडली गेली. उजनी धरणाबाबत वेगळा न्याय दिलेला नाही. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडून सुनावणी घेतली जाते त्यावेळी संबंधित सर्व पक्षकार, पाणी वाटप संस्था, लोकप्रतिनिधी व इतर संबंधितांना नोटीस देऊन बोलावले जाते. सर्वांचे म्हणणे ऐकले जाते. त्यानंतर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण त्या संदर्भात निर्णय घेत असते. प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाच्या विरोधात सन्माननीय विरोधी पक्षनेते औरंगाबाद खंडपीठासमोर प्रथम गेले. औरंगाबाद खंडपीठाकडून स्थगिती मिळाली नाही. या संदर्भात पूर्णपणे न्यायालयीन प्रक्रिया सुरु झाल्याने सरकार त्यामध्ये हस्तक्षेप करु शकत नाही. हायकोर्टापासून सुप्रीम कोर्टापर्यंत सर्व गोष्टी गेल्या. सर्व गोष्टी आपण ऐकल्या, प्राधिकरणाने ऐकल्या. शेवटी न्याय व्यवस्थेवर आपण विश्वास ठेवला पाहिजे. निश्चितपणे काही वेळेला चुका होत असतात. परंतु बाजू मांडण्याची पध्दत किंवा रिप्रेझेंटेशनमध्ये थोडीशी कमतरता झाली असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय शिवतारे...

माझे स्वत:चे मत आहे. म्हणून अशा प्रकारचे निर्णय झाले. परंतु निश्चितपणे मेंढेगिरी समितीने सर्व प्रकारचा विचार करुन समन्यायी पध्दतीचा निकाल दिलेला आहे. हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टापर्यंत निर्णय झाला. आजही 12.84 टीएमसी पैकी 2.49 टीएमसी पाणी सोडणे बाकी आहे. त्यासाठी जनहित याचिका सुप्रीम कोर्टामध्ये सुध्दा आहे, त्याबाबत 14 जानेवारी, 2016 रोजी सुनावणी होणार आहे. ही बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे अधिक बोलणे योग्य होणार नाही.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे. औरंगाबाद जिल्हयात काही साखर कारखाने आहेत.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मग कसा काय निर्णय होणार आहे?

**सभापती** : माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना मी बोलण्यासाठी अनुमती दिलेली नाही. माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांना मी दालनातही स्पष्ट सांगितले होते आणि आताही सांगतो, तुमच्या भावना संवेदनशील असल्यामुळे एक प्रश्न विचारण्याची मी संधी देत आहे. नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदनाबाबत नाशिक विरुध्द जायकवाडी असे प्रकरण या ठिकाणी उपस्थित करु नये. मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. ते उत्तर बरोबर आहे की चूक आहे हे नंतर ठरविता येईल. यातून काय निर्णय होणार आहे. वकील म्हणून माझे मत देऊ का आणि माजी जलसंपदा मंत्री म्हणून सांगू का? माननीय श्री.सुनील तटकरे या ठिकाणी उपस्थित आहेत. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणासमोर जे पिटिशन आहे, ते क्वॉसी ज्युडिशियल पिटिशन असते. त्यावर दाखल झालेली अपील वगैरे सब ज्युडिस असतील तर या ठिकाणी चर्चा करुन दोन्ही बाजूच्या पक्षांना न्याय हवा असेल तर तो न्याय मिळणार नाही. तरी देखील मी माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांना शेवटचा प्रश्न विचारण्याची संधी देत आहे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, संबंधित पाणी फक्त पिण्यासाठी वापरावे. असे असताना आजही औरंगाबाद परिसरात साखर कारखाने अतिशय जोरात सुरु आहेत, डिस्टिलरी अतिशय जोरात सुरु आहेत. हे सर्व पाणी पिण्याकरिता दिलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित बोलण्यासाठी उभे असतात)



**सभापती** : माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी कृपया खाली बसावे. दुसऱ्या जिल्हयावर अन्याय करु नये.

श्री.जयवंतराव जाधव : पाणी हे फक्त पिण्याकरिता द्यायचे होते. असे असताना साखर कारखाने सुरु आहेत, डिस्टिलरी सुरु आहेत. इरिगेशनकरिता हे पाणी उचलले जात नाही असे प्रमाणपत्र तेथील जिल्हाधिकाऱ्यांना उच्च न्यायालयात द्यावयास लावणार आहात का?

(विरोधी पक्षाचे काही माननीय जागेवर बसूनच बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : तुम्ही वेगळया मार्गाने या विषयावर बोलू शकता. श्री.अमरसिंह पंडित यांना मी सांगू इच्छितो की, अशा प्रकारे जागेवर बसून बोलणे योग्य नाही. मी दिलेल्या निर्णयाला तुम्हाला चुकीची माहिती किंवा कुठले अधिकार कोणत्या परंपरेने मिळाले तरी मी यापुढे संधी देणार नाही. मी तुम्हा तिघांना स्पष्टपणे सांगितले आहे की, 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने जिल्हयाच्या वादाबद्दल बोलू नये. माननीय सदस्य काय म्हणतात यापेक्षा मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर महत्वाचे आहे. मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर मान्य नसेल तर तुम्हाला दुसऱ्या आयुधाचा वापर करता येईल. इतके स्पष्ट असताना वादात जाण्याचे कारण नाही. माननीय सदस्यांनी एकमेकाशी बोलू नये.

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांचे मनोगत निश्चितपणे संवेदनशील आहे. मी कालच नगरमध्ये गेलो होतो. तेथील शेतकरी अतिशय अडचणीत आलेले आहेत हे खरे आहे. परंतु न्यायालयापुढे आपण काही करु शकत नाही. 4-5 वर्षे सांभाळलेल्या द्राक्ष, पेरुच्या बागा पाण्याअभावी जळत असताना पाहून मनामध्ये उद्विगनता येते. मॅटर सब ज्युडिस आहे. मी या ठिकाणी बोलताना आपण कुठे चुकलो हे बोललो तर कदाचित आपण अडचणीत येऊ शकता, म्हणून मी बोलू इच्छित नाही. सभापती महोदय, ज्या पध्दतीने बाजू मांडण्याची त्यांनी प्रक्रिया केली त्याबाबत मी निश्चितपणे माझ्या दालनात सांगू शकतो. त्या पध्दतीने मांडणी झाली असती कदाचित विषय मार्गी लागू शकला असता. परंतु न्यायालयीन प्रक्रिया होत असताना त्यावर बोलणे योग्य होणार नाही.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

21-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) UU.4

SGB/ AKN/ MMP/ 20:40

**पृ.शी./मु.शी.** : बीड जिल्हा शासकीय रुग्णालयातील गलथान कारभारामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय याबाबत श्री.अमरसिंह पंडित वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.राम शिंदे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 10 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, हा विषय याच अधिवेशनात तिसऱ्यांदा उपस्थित होत आहे. बीड जिल्हयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.बोल्टे यांच्या संदर्भातील हा विषय आहे. सुपर क्लास वन दर्जाचे अधिकारी आपल्या हाताखाली काम करणाऱ्या डॉ.देशपांडे यांना दालनात बोलावतात व शिवीगाळ करतात. निवेदनामध्ये जे म्हटले आहे ते अत्यंत चुकीचे आहे. रुग्णालयातील एआरटी, सीडी-4, सीटी स्कॅन मशीन सुरु झालेले नाही.

..2व्ही.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित...

डायलिसिस सेंटरवर उपचार घेणाऱ्यांनी विचारणा केली तर त्यास उत्तर दिले जात नाही. वैद्यकीय देयकामध्ये व्यवहार केल्याशिवाय ती संबंधितांना दिली जात नाहीत. वैद्यकीय देयके तातडीने निकाली म्हणजे त्याचा अर्थ व्यवहार झाला असा अर्थ निघतो. वैद्यकीय देयकांसंबंधी व्यवहार झाला नाही तर चार महिने वाट पाहिली जाते आणि रिजेक्शनच्या नावाखाली ते परत पाठविले जाते. अपात्र म्हणून ते वैद्यकीय देयक परत पाठविले जाते. या सिव्हील सर्जनसंबंधी मी सातत्याने गेल्या तीन अधिवेशनापासूनचा प्रश्न उपस्थित करीत आहे. गेल्या अधिवेशनात माननीय मंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले की, आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांकडून आम्ही त्यांची चौकशी करू. त्या चौकशीचा अहवाल देखील सभागृहापुढे आलेला नाही. किंबहुना कोणी चौकशी देखील केलेली नाही. प्रधान सचिवाच्या कार्यालयात एका जबाबदार व्यक्तीकडून मी तक्रारदार म्हणून मला बोलाविले जावे, तसेच ज्या कोणाच्या तक्रारी आहेत त्या त्यांच्या गैरहजरीत, इनकॅमेरा ऐकून घ्याव्यात. त्यासंबंधीचा अहवाल आपल्याकडे आल्यानंतर 15 दिवसांच्या आत आपण कारवाई करणार आहात काय ?

श्री.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सिव्हील सर्जन डॉ.बोल्टे यांच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित केले आहेत. सन्माननीय सदस्यांनी सिटीस्कॅन, डायलिसिस आणि वैद्यकीय देयक व चौकशी संदर्भात येथे प्रश्न उपस्थित केले आहेत. यासंबंधात सन्माननीय सदस्य वारंवार मागणी करीत आहेत. त्या अनुषंगाने बैठक बोलावून निश्चित स्वरूपामध्ये त्यांचे समाधान करण्याच्या दृष्टीने योग्य ती चौकशी केली जाईल.

श्री.अमरसिंह पंडित : सभापतल महोदय, त्यांचे सीसीटीव्ही फुटेज घेतले तर हे सगळे प्रश्न निकाली लागतील.

**सभापती :** ठीक आहे. मंत्री महोदय, आपण सगळे पुरावे घ्यावेत आणि मग चौकशी करावी.

........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** शोक प्रस्ताव

**मु.शी.:** श्री.बटेसिंह कन्हैयालाल रघुवंशी, माजी वि.प.स.यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.राजकुमार बडोले (सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री) : सभापती महोदय, श्री.बटेसिंह कन्हैय्यालाल रघुवंशी, माजी वि.प.स.यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो :-

"श्री.बटेसिंह कन्हैय्याला रघुवंशी, माजी वि.प.स.यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

कै. बटेसिंह कन्हैय्यालाल रघुवंशी यांचा जन्म 13 ऑगस्ट, 1929 रोजी नंदुरबार येथे झाला. त्यांचे शिक्षण दहावी पर्यंत झाले होते.

कै. रघुवंशी यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सक्रीय सहभाग घेतला होता. त्यांनी नंदुरबार येथील आदिवासी दूध उत्पादक संघाचे संस्थापक-चेअरमन, नंदुरबार तालुका विधायक समितीचे सचिव, नंदुरबार इंदिरा महिला सहकारी बँकेचे कार्यकारी-संचालक तसेच धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तसेच काहीकाळ उपाध्यक्ष म्हणूनही उत्तम कार्य केले होते. नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी, भूमिहीन शेतकरी-शेतमजूर यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले होते. त्यांचा नंदुरबार जिल्ह्यातील अनेक सामाजिक, शैक्षणिक व सहकारी संस्थाशी निकटचा संबंध होता.

कै. रघुवंशी यांनी 1960-70 नंदुरबार नगरपालिकेचे सदस्य, 1972-78 नंदुरबार पंचायत समितीचे सभापती तसेच धुळे जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणूनही उत्तम कार्य केले होते. नंदुरबार जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते.

कै. रघुवंशी सन 1985 व 1991 असे दोन वेळा धुळे स्थानिक प्राधिकारी संस्था या मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार, दिनांक 19 डिसेंबर, 2015 रोजी दु:खद निधन झाले.

...3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, श्री.बटेसिंह कन्हैय्यालाल रघुवंशी, माजी वि.प.स.यांच्या दु:खद निधनानिमित्त सामाजिक न्याय मंत्र्यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यावर भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

धुळे-नंदूरबार या आदिवासी परिसरामध्ये अल्पसंख्याक समाजामध्ये जन्माला आलेल्या या नेतृत्त्वाने धुळे-नंदूरबार जिल्ह्यातील सर्वसामान्य माणसांच्या प्रश्नांसाठी सतत काम करण्याचा प्रयत्न केला. 1980 नंतर मी राजकारणात आलो. त्यावेळी मी वेगवेगळ्या कारणांसाठी माझ्या वडिलांच्या समवेत युवक काँग्रेसचा कार्यकर्ता म्हणून फिरत असताना श्री.बटेसिंह रघुवंशी यांच्याशी माझा परिचय झाला होता. बॅरिस्टर अंतुले यांच्या राजकारणामध्ये त्यांच्या अलसबा कोर्ट वर यायची त्यामध्ये श्री.रघवंशी साहेबांचा अग्रक्रम होता. धुळे नंदूरबार परिसरातील वेगवेगळे प्रश्न पोटतिकडकीने मांडत असताना स्थानिक स्वराज्य संस्थांमधून त्यांची दोन वेळा विधान परिषदेवर निवड झाली होती. विधान परिषदेच्या माध्यमातून देखील त्यांनी वेगवेगळे प्रश्न मांडले. त्या अगोदर, नगर परिषदा असेल जिल्हा परिषदा असेल या माध्यमातून देखील त्यांनी अनेक प्रश्नं मांडले होते. आपल्या परिसरातील सर्व आदिवासी बांधवांचे प्रश्न सोडविले गेले पाहिजेत अशी आग्रही भूमिका त्यांनी राज्य सरकारकडे सातत्याने मांडली होती. त्यांचे चिरंजीव श्री.चंद्रकांत रघवंशी आज विधान परिषदेचे सदस्य आहेत. मी ज्यावेळी 1992 मध्य रायगड जिल्हा परिषदेचा अध्यक्ष झालो त्यावेळी श्री.चंद्रकांत रघवंशी देखील धुळे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाले. त्यानंतर धुळे नंदूरबार जिल्ह्याचे विभाजन झाले. आपल्या वडिलांचा वारसा एका बाजूला चालवत असताना श्री.रघुवंशी साहेबांनी त्या विभागामध्ये जी विचारधारा सतत मांडण्याचा प्रयत्न केला तिच भूमिका श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी नंतरच्या कालावधीमध्ये अखंडपणाने सुरू ठेवली. अशा या थोर समाजसेवकाचे दु:खद निधन झाले. मी माझ्या पक्षाच्यावतीने त्यांना विनम्रपणे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

====



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे सदस्य राहिलेले कै.बटेसिंह कन्हैय्यालाल रघुवंशी यांचे वयाच्या 87 व्या वर्षी 19 डिसेंबर 2015 रोजी पहाटे निधन झाले. त्याबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यास अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

. सभपती महोदय, श्री.बटेसिंहभैय्यांच्या बरोबर काम करण्याची संधी मिळाली होती. माझा आणि त्यांचा फार घनिष्ट संबंध होता. आताच माननीय सदस्य श्री.सुनीलजी तटकरे यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचे चिरंजीव सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी हे आपल्या सभागृहाचे विद्यमान सदस्य आहेत. श्री.बटेसिंहभैया हे दोन वेळा विधान परिषदेवर निवडून आले होते. निष्ठावंत काँग्रेसचे घराणे अशी त्यांची परंपरा राहिलेली आहे. त्यांचे पूर्ण कुटुंब हे काँग्रेसमय आहे. अनेक वर्ष त्यांनी कॉग्रेस पक्षाची सेवा केली आहे. जेव्हा नंदूरबार आणि धुळे जिल्हा एक होता तेव्हा संपूर्ण जिल्ह्याचे राजकारण श्री.बटेसिंहभैय्याजी यांच्या भोवती फिरत होते. ते त्या एकत्रित असलेल्या जिल्ह्याचे नेतृत्व करीत होते. नंदूरबार पंचायत समिती पासून त्यांनी राजकारणाला सुरूवात केली. त्यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष म्हणून देखील काम केले आहे. ते या सभागृहाचे देखील सदस्य होते. संपूर्ण नंदूरबार जिल्ह्यामध्ये त्यांनी शिक्षणाचे जाळे तयार केले आहे. ते त्यांच्या कार्याचे फार मोठे वैशिष्ट्य आहे. 2 सिनिअर कॉलेजेस, 3 ज्युनिअर कॉलेजेस, 14 हायस्कूल्स, 65 आश्रमशाळा, डी.एड., बी.एड.कॉलेज त्यांनी काढलेले आहे. या कार्याची दखल घेऊन अखिल भारतीय जैन समाजाने महात्मा महावीर अवॉर्ड देऊन त्यांचा गौरव केला आहे. त्यांचे चिरंजीव श्री.चंदू भैया हे या सदनाचे दोन वेळा सदस्य राहिले असून त्यांची आता तिसरी टर्म सुरू आहे. श्री.चंदू भैय्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रत्नाताई चंद्रकांत रघुवंशी या ही गेले साडे अकरा वर्ष नंदूरबार नगर परिषदेच्या नगराध्यक्ष आहेत. असे महाराष्ट्रात कुठेही घडलेले नाही. त्या एकदा लोकांच्यामधून निवडून आलेल्या आहेत. नंतर मग आपल्या सिस्टीममधून आरक्षणातून त्या निवडून आल्या. आजही त्या नंदूरबार जिल्ह्याच्या नगराध्यक्षा आहेत. अशा संपूर्ण कुटुंबाने सामाजिक सेवेला वाहून घेतलेले आहे. जशी श्री.चंदूभैय्यांनी नंदूरबारची जबाबदारी सांभाळली तशी श्री.बटेसिंह भैय्यांनी त्या अगोदरच्या काळात माजी राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील या प्रदेशाध्यक्ष असताना सांभाळली आहे. ते त्यावेळी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते. काँग्रेस पक्षाच्यावतीने मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. WW 2....

............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, श्री.बटेसिंह कन्हैयालाल रघुवंशी हे या सभागृहाचे सदस्य होते. ते नंदूरबार आणि धुळे जिल्हयातील आदरणीय व्यक्तिमत्व होते. त्यांनी राजकारणात खूप वर्षे काम केले होते. नंदुरबार हा आदिवासी बहुल भाग आहे. आदिवासी भागात त्यांनी शिक्षण प्रसाराचे खूप मोठे कार्य केले होते. त्यांनी उत्तम रीतीने आश्रमशाळा चालविल्या होत्या. आपल्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना उत्तम आणि दर्जेदार जेवण मिळावे यासाठी ते स्वत: लक्ष घालीत होते. सर्वांना प्रेम आणि जीव्हाळा देणारे ते व्यक्तिमत्व होते. त्यांना शेतीबद्दल खूप आवड होती. या सभागृहाचे विद्यमान सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांचे ते पिताश्री होते. कॉंग्रेस पक्षावर निष्ठा असलेले हे घराणे आहे. असे श्री.बटेसिंह कन्हैयालाल रघुवंशी हे आदरणीय व्यक्तिमत्व आपल्यातून निघून गेल्याबद्दल मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

---

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती :** सामाजिक न्यायमंत्री श्री.राजकुमार बडोले यांनी कै.श्री.बटेसिंह कन्हैयालाल रघुवंशी माजी वि.प.स. यांच्या दु:खद निघनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे. त्यावर सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या अनुपस्थितीत सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे, सन्माननीय गट नेते श्री. शरद रणपिसे साहेब तसेच सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

कै.रघुवंशी यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सक्रीय सहभाग घेतला होता. त्यांनी नंदुरबार येथील आदिवासी दूध उत्पादक संघाचे संस्थापक-चेअरमन, नंदुरबार तालुका विधायक समितीचे सचिव, नंदुरबार इंदिरा महिला सहकारी बँकेचे कार्यकारी-संचालक तसेच धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तसेच काही काळ उपाध्यक्ष म्हणूनही उत्तम कार्यकेले होते. नंदुरबार जिल्हयातील आदिवासी, भूमिहीन शेतकरी-शेतमजूर यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले होते. त्यांचा धुळे आणि नुदुरबार जिल्हयातील अनेक सामाजिक, शैक्षणिक व सहकारी संस्थाशी निकटचा संबंध होता.

कै.रघवंशी यांनी 1960-70 नुदुरबार नगरपालिकेचे सदस्य, 1972-78 नंदुरबार पंचायत समितीचे सभापती तसेच धुळे जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणूनही उत्तम कार्य केले होते. नंदुरबार जिल्हयाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते.

कै.रघुवंशी सन 1985 व 1981 असे दोन वेळा धुळे स्थानिक प्राधिकारी संस्था या मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. एक अभ्यासू लोकप्रतिनिधी अशीच त्यांची प्रतिमा होती.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार,दिनांक 19 डिसेंबर, 2015 रोजी दु:खद निघन झाले. त्यांच्या स्मृतीस मी अभिवादन करतो व भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

-----

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती :**आज सकाळी विरोधी पक्ष नेत्यांनी दिनांक 18 डिसेंबर, 2015 रोजी मातंग समाजाच्या लोकस्वराज्य आंदोलन पदयात्रेच्या मोर्चावरील लाठीचार्जबाबत मुद्दा उपस्थित केला होता. त्यासंदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदन करण्याचे आदेश दिले होते. त्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या वतीने राज्यमंत्री निवेदन करीत आहेत.

**पृ.शी.:** दिनांक 18 डिसेंबर, 2015 रोजी लोकस्वराज्य आंदोलन पदयात्रेच्या मोर्चावरील लाठीचार्ज.

**मु.शी.:** दिनांक 18 डिसेंबर, 2015 रोजी लोकस्वराज्य आंदोलन पदयात्रेच्या मोर्चावरील लाठीचार्ज संबंधी माननीय गृह राज्यमंत्र्यांचे निवेदन.

प्रा.राम शिंदे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

-----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय,

**सभापती :** मी निवेदन करण्याचे आदेश दिले होते व त्याप्रमाणे शासनाच्या वतीने या ठिकणी निवेदन करण्यात आले आहे. आपल्याला दुसऱ्या डिव्हाईसच्या निमित्ताने प्रश्न विचारता येतील. निवेदनावर प्रश्न विचारण्याची संधी सन्माननीय सदस्यांना मिळणार नसल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बर्हिगमन करतात.)

**सभापती :** आता लक्षवेधी सूचना क्रमांक एक घेण्यात येईल.

-----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : पुणे शहरातील विकास आराखड्यातील त्रुटी दूर करुन नवीन विकास आराखडा तयार करणे

**मु.शी.** : पुणे शहरातील विकास आराखड्यातील त्रुटी दूर करुन नवीन विकास आराखडा तयार करणे यासंबंधी सर्वश्री ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री सुनिल तटकरे, हेमंत टकले, अनिल भोसले,जयवंतराव जाधव, नरेंद्र पाटील, किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे, आनंद ठाकूर, श्रीकांत देशपांडे, दत्तात्रय सावंत, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, मुझफ्फर हुसेन सय्यद , वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.जयदेव गायकवाड ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे शहराच्या विकासासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या समितीने नुकताच विकास आराखडा जाहीर करणे, मात्र सदर विकास आराखडयात मोठया प्रमाणात त्रुटी असल्यामुळे व विकास आराखडयात असलेली व आरक्षणे वगळल्यामुळे तेथील नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, डीसीरुलबाबत नियुक्त केलेल्या समितीने शासनास अहवाल दिला नसल्याने अनेक विकास कामांना खीळ बसण्याची शक्यता निर्माण होणे, एका राजकीय पक्षाने माहे ऑक्टोबर, 2015 च्या दरम्यान पुणे शहरात मोर्चाचे आयोजन करुन विरोध दर्शविण्यात येणे, याबाबत शासनाने नियुक्त केलेल्या तथापि राहून गेलेल्या त्रुटी दुरुस्त करुन नवीन विकास आराखडा तयार करणेबाबत शासनाने केलेली वा करण्यांत येत असलेली कार्यवाही वव शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड :सभापती महोदय, पुणे महानगरपालिका शासनाला मुदतीमध्ये विकास आराखडा सादर करण्यास असमर्थ ठरली असून दि.27.3.2015 रोजी एका आदेशाद्वारे विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने त्रीसदस्य समिती स्थापन केली होती. सदर समितीला सहा महिन्यांची मुदत देण्यात आली होती. या समितीने दि.26.9.2015 रोजी शासनाला जो नवीन विकास आराखडा सादर केला असून त्यामध्ये विकास नियमावली सादर करण्यासाठी 45 दिवसांची मुदत देण्यात आली होती. त्याप्रमाणे दि. 10.11.2015 रोजी नियमावली सादर करण्यात आलेली आहे. शासनाच्या वतीने विकास आराखडयाच्या संदर्भात सांगितले आहे की, प्रस्तावित आरक्षणाबाबत या समितीने सर्वसाधारण धोरण स्वीकारलेले आहे त्यामुळे सर्वसाधारण धोरण कोणते आहे ? या समितीने जो नवीन विकास आराखडा तयार केला त्यामध्ये पूर्वी सुचवलेल्या विकास आराखड्यातील महत्वाचे रिझर्व्हेशन वगळण्यात आलेले असून नरगपालिकेकडे पैसा नाही असे कारण त्यासाठी देण्यात आले आहे. या शहरातील उद्याने, क्रीडांगणे, दवाखाने, शाळा असे रिझर्व्हेशन्स वगळलेले आहेत त्यामुळे शहराच्या विकासाचा फार मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्रीसदस्य समितीमुळे पुणे शहराच्या विकासावर गंभीर असे परिणाम घडत आहेत. जमीन गेल्यानंतर पुन्हा ती क्रिएट करता येत नाही. या त्रीसदस्य समितीचा संपूर्ण अहवाल स्वीकारला तर त्यामध्ये राजकीय हेतू आहे की, काय अशी माझ्या मनात शंका आहे. समितीने महत्वाची आरक्षण रद्द केलेली आहेत त्यामुळे सरकार यासंदर्भात फेर विचार करणार आहे काय, तसेच शाळा, उद्याने, क्रीडांगणे यांची आरक्षणे पुणे शहरासाठी पुर्ववत ठेवले जाणार आहे काय ?

XX-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्मानीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांनी पहिला प्रश्न असा विचारलेला आहे की, सहा महिने उलटून गेले आणि डी.सी.आर. झाला. त्याबाबत मला एवढेच सांगायचे आहे की, विकास आराखडा विहित मुदतीत आला नाही म्हणून शासनाने त्रिसदस्यीय समिती नेमली होती. त्या समितीचा अहवाल सुद्धा शासनाकडे प्राप्त झालेला आहे. तो अहवाल छाननीसाठी संचालकांकडे पाठविला आहे आणि नियमानुसार तो अहवाल छाननीसाठी पाठविणे क्रमपाप्त असून ते बंधनकारक आहे. दिनांक 27.3.2018 पर्यंत तो मंजूर करण्याची मुदत आहे. दुसरा प्रश्न विचारला होता की, सर्वसाधारण धोरण काय आहे ? समितीने जी आरक्षणे वगळलेली आहेत ती आपणास विस्तृतपणे सांगतो. मंजूर अभिन्यासामधील खुल्या जागेवरील वगळलेली आरक्षणाची संख्या 45 आहे. ले-आऊटमधील जी ओपन स्पेस असेल ती तेथील रहिवाशांसाठी किंवा सोयीसाठी ठेवायची असते त्या जागांवर देखील आरक्षणे टाकण्यात आली होती म्हणून ती वगळलेली आहेत. दुसर म्हणजे शासनाच्या ज्या जागा होत्या त्यावर आरक्षणे टाकली होती ती वगळण्यात आली आहेत. पुढील 20-25 वर्षात पुढे काय करायचे त्यासाठी शासनाला कुठे काय जागा लागेल त्यासाठी आरक्षणे करुन ठेवली जातात. म्हणून जी काही जागा लागणार होती अशा जागांवर महानगरपालिकेने टाकलेली आरक्षणे वगळली होती. तिसऱ्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, मंजूर विकास योजनेच्या रहिवास किंवा विकसनशील भागात नव्याने प्रस्तावित करण्यात आलेल्या आरक्षणाबाबत वगळण्यात आलेली आरक्षणे म्हणजे आपण एख्ادا एरिया एन.ए.करतो. एन.ए. झालेली जमीन असेल तर त्याठिकाणी आरक्षण टाकत नाही असे सर्वसाधारण धोरण आहे. अशाप्रकारची एकूण 199 आरक्षणे प्रस्तावित होती, ती आरक्षणे वगळण्यात आलेली आहेत. नाला, गार्डनचे आरक्ष्ण वगळून ग्रीन बेल्ट दर्शविलेले आहे. याचे कारण असे की, ग्रीन बेल्ट दाखविल्यानंतर तेथे् ॲक्विझीशन करण्याची गरज पडत नाही. महानगरपालिकेचा प्रपंच असा असतो की, त्यांना ॲक्विझीशनचा प्रॉब्लेम असतो म्हणून तेथे ते ग्रीन बेल्ट दाखविलेले आहेत, अशाप्रकारची केवळ 25 आरक्षणे आहेत. पार्किग, दफन भूमी, बगीचा, हॉस्पीटल, भाजीबाजार, नदी सुधार प्रकल्प, पोलीस चौकी यांसाठी जवळपास 55 आरक्षणे आहेत. काही जागांवर 127 च्या नोटीसासुद्धा दिलेल्या आहेत. अशा जागांवर आरक्षण टाकून काय फायदा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

म्हणून ती आरक्षणे सुद्धा वगळलेली आहेत. एकूण 937 आरक्षणांपैकी 386 आरक्षणे वगळलेली आहेत. त्याच बरोबर 31 आरक्षणे नव्याने प्रस्तावित केलेली आहेत. तेथील लोकांच्या मागणीनुसार नव्याने 31 आरक्षणे प्रस्तावित केलेली आहेत. त्यासाठी सजेशन्स आणि ऑब्जेक्शन्स मागविण्यात आले,नंतर सुनावणी झाली. त्यानंतर हे सर्व प्रस्तावित केलेले आहे. संचालकांकडे पाठविलेला प्रस्तावाची छाननी होऊन पुन्हा छाननी समितीकडे येणार आहे. त्या समितीवरील सदस्य त्यावर अंतिम निर्णय घेणार आहेत.

श्री.अनिल भोसले : सभ्पती महोदय,माननीय मंत्र्यांनी पुणे विकासाच्या आराखड्यासंदर्भात उत्तर दिलेले आहे. पुणे जिल्हयामध्ये जुने रस्ते आहेत. शनिवार- नारायण पेठ येथे सात कोटी रुपयांच्या रस्त्यांची कामे त्रिसदस्य समितीने सुचविलेली आहेत. विभागीय आयुक्त, आयुक्त आणि संचालक, नगर रचना अशा तिघांची समिती आहे. तेथे जुने वाडे, ऐतिहासिक ठिकाणे असल्यामुळे त्याठिकाणी रस्तारुंदी होणार नाही. जर तेथे अशी कामे करावयाची झाली तर तेथील गरीब नागरिकांचे पुनर्वसन करुन त्यांना योग्य तो मोबदला देणार काय ? दुसरी गोष्ट म्हणजे या संदर्भात सकाळ वर्तमानपत्राने एक बैठक बोलाविली होती. त्या बैठकीस जिल्ह्याचे पालकमंत्री उपस्थित होते. त्यावेळी पालमंत्र्यांनी जाहीर केले होते की, राज्य सरकार मार्च महिन्याअखेरपर्यंत पुणे शहराचा विकास आराखडा मंजूर करील. या विकास आराखड्यामध्ये अनेक आरक्षणे बदललेली आहेत अशी त्यांना विचारली केली असता त्यांनी सांगितले की, अशा काही चुका झाल्या असतील तर त्या दुरुस्त करुन लोकांना योग्य न्याय देण्यात येईल. माझा प्रश्न आहे की, माननीय पालकमंत्र्यांना असा निर्णय घेण्याचा अधिकार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, आता जी प्रस्तावित आरक्षणे आहेत त्यामुळे रस्त्यावरील जे लोक बाधित होत असतील तर त्यांचे पुनर्वसन करणार काय असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. यासाठी शासनाचे सर्वसाधारण धोरण आहे. शासन नेहमी सहानुभूतीपूर्वक विचार करुन जे अनधिकृत आहे त्यांचे सुद्धा पुनर्वसन शासन करते. तेव्हा या ठिकाणीसुद्धा निश्चितपणे सहानुभूती राहील. माननीय पालकमंत्र्यांनी जी घोषणा केली त्यांना तशी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

घोषणा करण्याचा अधिकार आहे काय असा त्यांनी प्रश्न विचारला. त्याबाबत सांगू इच्छितो की, त्यांनी विचारलेला प्रश्न या लक्षवेधी सूचनेचा भाग नाही. जर तशी काही बाब असेल तर ती तपासून पहावी लागेल. कारण वर्तमानपत्रात तशी बातमी आली असेल तर ती ग्राह्य धरुन त्यावर भाष्य करणे चुकीचे ठरेल.

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, सकाळ वर्तमानपत्रात काय बातमी आली हे मी सांगत नाही. मी त्या बैठकीला हजर होतो. त्या ठिकाणी विकास आराखड्या संदर्भात प्रश्न विचारण्यात आले त्यावेळी माननीय पालकमंत्र्यांनी सर्व आमदारांसमोर उत्तर दिलेले आहे. माननीय पालकमंत्री जे काही बोलले त्याबाबत मी बोलत आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती सत्य समजून त्याची माहिती घेण्यात येईल. माननीय पालकमंत्री त्या ठिकाणी काय बोलले याची मला देखील माहिती नाही.

**सभापती :** ही सर्व प्रोसेस एमआरटीपी ॲक्टप्रमाणे अत्यंत प्रचलित आणि परंपरेने घडलेली आहे. माननीय पालकमंत्र्यांनी त्यांचे वैयक्तिक मत मांडले असेल. परंतु माझ्या माहितीनुसार यामध्ये माननीय पालकमंत्र्यांची कोणतीही भूमिका नाही. सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारले ते तपासून त्याची माहिती द्यावी.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, एकूण 937 आरक्षणांपैकी 386 आरक्षणे वगळलेली आहेत म्हणजे जवळपास एक-तृतियांश आरक्षणे वगळलेली आहेत. एमआरटीपी ॲक्टप्रमाणे महानगरपालिकेमध्ये समिती नेमण्यात आली होती. सजेशन्स आणि ऑब्जेक्शन मागविण्यात आल्या अशी सर्व प्रक्रिया झाली. शासनाने नेमलेले तज्ज्ञ आणि निवडून आलेले लोकप्रतिनिधी या सर्वांनी मिळून हा आराखडा तयार केला होता. असे असताना एक-तृतियांश आराखडा बदलणे योग्य नाही असे मला वाटते. माझा प्रश्न आहे की, ज्यावेळी राज्य सरकारकडे हा आराखडा मंजुरीसाठी येईल त्यावेळी विधानसभा आणि विधानपरिषदेतील सदस्य किंवा महापौर, पदाधिकारी आणि काही लोकप्रतिनिधींना शासन विश्वासात घेईल काय ?

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, एकूण 937 आरक्षपणांपैकी 386 आरक्षणे वगळलेली आहेत आणि काही नव्याने आरक्षणे प्रस्तावित केलेली आहेत. विहित मुदतीत प्रस्ताव आला असता तर हे सर्व करण्याची गरज नव्हती. स्थानिक प्राधिकरण असमर्थ ठरले म्हणून आपण तेथे त्रिसदस्य समिती नेमली. जर 127 ची नोटीस दिलेला भूखंड असेल तर त्यावर आरक्षण ठेवून काय उपयोग आहे ? जी आरक्षणे धोरणात बसत नव्हती अशी आरक्षणे वगळेली आहेत.

**सभापती :** मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या प्रश्नाच्या संदर्भात पुणे जिल्ह्यातील विधानसभा आणि विधानपरिषद सदस्यांची एक बैठक घ्यावी.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत**

**सभापती :** आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेली लक्षवेधी क्रमांक 2 ते 10 व 12 पुढे ढकण्यात आल्या आहेत. लक्षवेधी क्रमांक 11 बाबत माननीय मंत्र्यांनी त्यांच्या दालनात बैठक घेण्यात येईल असे सांगितलेले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेली लक्षवेधी क्रमांक 2 ही तिसऱ्यांदा पुढे ढकलण्यात येत आहे.

**सभापती :** उद्या ही लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

....... 2Y-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** लक्षवेधी सूचनेसंदर्भातील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री.बबनराव लोणीकर (पाणी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अकोला शहरातील पाणी पुरवठा योजना चालविण्याकरिता अकोला महानगरपालिकेतील मनुष्यबळ व निधीची कमतरता असणे" या विषयावरील श्री.गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचनेबाबत दिनांक 20 मार्च, 2015 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे अधिकची माहिती जोडावी.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या मंगळवार, दिनांक 22 डिसेंबर, 2015 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन्हा भरेल. सकाळी 10.00ते 11.45 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. या विशेष बैठकीत विरोधी पक्षातर्फे आज दिनांक 21 डिसेंबर, 2015 रोजीच्या कार्यक्रमपत्रिकेत म.वि.प. नियम 260 अन्वये दर्शविण्यात आलेल्या महागाई व गैरव्यवहार या विषयावरील प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 9 वाजून 21 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 22 डिसेंबर, 2015 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही